
मे १९८६) (किंमत १ रु

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्रीसाईलीला
मे १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

श्री. रा. द. बन्ने
कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

श्री. सदानंद चेंदवणकर
(मराठी आवृत्ती)


---


**वर्ष ६५ वे]** **[अंक २ रा**

**किमत १ रुपया**

दूरध्वनी ४१२२५६१


---


: कार्यालय :

**"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे
श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



## श्री साई वाक्सुधा

धरावा नित्य सत्संग ।
इतर संग नित्य सत्यंग ।
सत्संग एकचि निःसंग ।
अंग भावना निर्मळ ॥ १४२ ॥

सत्संग तोडी देहासक्ति ।
एवढी बलवत्तर तयाची शक्ति ।
पथ एकदां जडल्या भक्ति ।
संसार निर्मूळि सांकडी ॥ १४३ ॥

भाग्यें घडल्या सत्संग ।
सहज उपदेश यथासांग ।
तत्संगें तरे कुसंग ।
रमतें निःसंग मन तेथें ॥ १४४ ॥

व्हावया परमार्थी रिघाव ।
विषयविरक्ति एक उपाव ।
न धरितां सत्संगाची हाव ।
स्वरूपठाव लागेना ॥ १४५ ॥

सुखापाठीं येतें दुःख ।
दुःखापाठींच येतें सुख ।
सुखासी जीव सदा सन्मुख ।
तोचि विन्मुख दुःखासी ॥ १४६ ॥

— श्री साई सच्चरित् अध्याय १० वा.

## सुविचार

क्रोधः प्राणहरः शत्रुः
क्रोधो मित्रमुखो रिपुः ।
क्रोधो ह्यसिमहा तीक्ष्णः
सर्वं क्रोधोऽपकर्षति ॥

रामायण- उत्तरकांड ५९।२१

क्रोध हा प्राण हरण करणारा शत्रु होय. क्रोध हा बाहेरून मित्रासारखा भासणारा शत्रु होय. क्रोध हा अत्यंत तीक्ष्ण अशी तरवार आहे. क्रोध हा सर्वांचा नाश करणारा आहे.

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला मे - १९८६

## अनुक्रमणिका


| क्रमांक | शिर्षक | लेखक-कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | -- अतिथी देवो भव | ४ |
| २. | साई तारी त्याला कोण मारी | — श्री. संभाजी नाईक | ५ |
| ३. | प.पू. माताजी कलावती देवी | — डॉ. रा.सी. कापडी | ६ |
| ४. | मी पाहिलेले श्री साईबाबा | — श्री. शंकरराव चौबळ | १० |
| ५. | हुकूमाचा एक्का- श्री. साईबाबा | — सौ. कावेरी क्षीरसागर | १६ |
| ६. | श्री. साईनाथांचा शरणार्थी | श्री. वि.बा. खेर | १७ |
| ७. | साई भक्ती | — वैजू हुल्याळकर | १९ |
| ८. | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — साईनंद | २० |
| ९. | मला आलेले बाबांचे अनुभव | — श्री. मधुकर राणे | २२ |
| १०. | अवतारालाही अवतार... | — सौ. उषा अधिकारी | २३ |
| ११. | बी.एड.ला प्रवेश बाबांनी दिला | — सौ. प्रमिला धडाडे | २५ |
| १२. | बाबांच्या द्वारकामाईने वाचविले | — श्री. माधव गोरे | २६ |
| १३. | बाळाला बरे वाटले | — सौ. कल्पना पोतदार | २८ |
| १४. | भक्तांची माऊली साई बाबा | श्री. ए.एस. फर्नांडीस | २९ |
| १५. | श्री. साईनाथ स्मरण | — श्री. प्रभाकर कोळमकर | ३३ |
| १६. | श्री. साईबाबांची धूनीमाता | — सौ. सुमती खानविलकर | ३६ |
| १७. | साईतारी त्यास कोण मारी | — श्री. प्रकाश क्षीरसागर | ३८ |
| १८. | साक्षात्कार | — श्री. बबन येरम | ३९ |
| १९. | मी पडले पण बाबांनी सावरले | — सौ. पद्मावती वैद्य | ४० |
| २०. | दर्शना पुरती दृष्टी आणि | — प्रा.रे.श्री. पुजारी | ४२ |
| २१ | उदीमुळे मुलाला जीवदान | सौ. सरोजिनी मुळ्ये | ४३ |
| २२. | कथाही साईची | — श्री. मुकेश कामत | ४४ |
| २३. | सोन्याचे मंगळसूत्र परत | सौ. रेखा दीक्षित | ५० |
| २४. | संत रामदास | — | ५१ |
| २५. | सारे जीवन साईमय झाले | सौ. संगीता गोडबोले | ५२ |
| २६. | मरणाच्या दारातून कुत्रा परतला | — सौ. नीता भुजबळ | ५३ |
| २७. | डोया भरी देखू साईले | — सौ. लीला मराठे | ५५ |
| २८. | साईभक्ती कशी असावी | — सौ. रेखा माहिमकर | ५६ |
| २९. | साईनाथ आले घराला | — गंगाधर सुत | ५८ |
| ३०. | झडकरी धाव आता | — सौ. प्रमिला धडाडे | ५९ |
| ३१. | साईनामाचा प्रवाह | — श्री. श्रीकांत सावंत | ६० |
| ३२. | संतांची साईलीला | — कु. कमला गोरे | ६१ |
| ३३. | प्रेमभरे गाऊ साई नाथ | — सौ. मंदाकिनी इनामदार | ६२ |
| ३४. | श्रद्धा लाख मोलाची | — श्री. जगदीश देवपुरकर | ६३ |
| ३५. | नमन | — सौ. शकुंतला जगनकर | ६३ |
| ३६. | जेथे जातो तेथे साई | कु. शिला तुळसकर | ६४ |

## संपादकीय

# अतिथी देवो भव



साईभक्तांनो, साईबाबांना किंवा आपल्या इष्ट देव-देवतांच्या मूर्तीला, तसबिरीला नैवेद्य दाखविणे हा एक श्रद्धेचा भाग आहे. त्यांचा हेतू हाच की, त्यामुळे मनावर सुसंस्कार होणे व अन्नावर सुसंस्कार होणे. वास्तविक ही गोष्ट खरोखर चांगली आहे. पण देव कधी नैवेद्य खातो काय? नाही. नैवेद्य आपणच खातो. अग्नी नारायण म्हणजे परमेश्वर. म्हणून आपण अग्नी नारायणाला आहुती देतो. त्यामुळे अग्नी नारायण तृप्त होतो, शांत होतो, थंडावतो. त्याप्रमाणे माणसाची भूक म्हणजे त्याच्या जठराग्नीची आग. हा जठराग्नी म्हणजे अग्नी नारायण होय. मग ज्याला पुरसे अन्न मिळत नाही किंवा मिळतच नाही त्याचा जठराग्नी शांत करणे हे सुद्धा आपले कर्तव्यच आहे. सूर्यनारायण हा जसा सर्वांचा आहे तसाच मानव धर्म हा सुद्धा सर्वांचाच नाही का? सर्वांचे मुख एकच, त्याप्रमाणे आपण अन्नदान करा. आपल्याकडे वेळी अवेळी आलेल्या अतिथीला भक्ती भावाने असेल ते खाद्य दान दिले तरच तो मनुष्य होय नाही तर त्याला मनुष्य म्हणणे सुद्धा पाप आहे. शिवाचे दर्शन-शिवयोगी दर्शन झाले तरच मन पवित्र शांत असते आणि म्हणूनच संत किंवा महंतांची परीक्षा करणे आपल्या हाती नाही हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे.

ब्रम्हदेवाने मानवाला जन्माला घालताना ८४ लक्ष योनीतून जन्माला घातले आहे. २१ लक्षाच्या चार योनी आणि मग मानव जन्म महान पुण्यवंत तो जो मानवाच्या जन्माला आला. कारण इतर सर्व पशु पक्षांपेक्षा ब्रम्हदेवाने मानवाला ज्ञान अधिक दिले. म्हणूनच ह्रदयापासून आंतरिक कळकळीने म्हणावे लागते की, हे देवा, तुला सोडून-तुझ्या नामस्मरणाला सोडून हे डोळे आंधळे कर, ही वाचा बंद कर, डोळ्यासमोर फक्त सत् चरित्राशिवाय इतर वाचन नको. पवित्रपणा शिवाय पहाणे नको पण यासाठी प्रत्येकाने आपल्या अंतःकरणाची शुद्धी केली पाहिजे. ही वाढ जर करावयाची असेल तर पवित्र हेतू आणि दृढनिष्ठा अंगात सामावून घेणे हे महत्वाचे आहे. कंदीलाची चावी फिरवली की जास्त मोठा प्रकाश पडतो तशी बुद्धीची चावी फिरवा लख्ख प्रकाश पडेल व त्यात आपले गुण-अवगुण, दुर्गुण-सद्गुण व दोष-निर्दोष हे स्पष्ट दिसतील.

सध्याच्या जगात पैशामुळे माणसाला मद चढतो. केवळ संपत्तीमुळे मद-मत्सर वाढतो आहे. या संपत्तीच्या मदांधतेमुळे अधिकारामुळे मस्ती, मद बळावतो आहे. म्हणून या मद-मत्सराला विसरा आणि लीनता, विनम्रतावादी होण्यासाठी परमेश्वराजवळ अंतर्मुख व्हा. संपत्तीमुळे, अधिकारामुळे मद-मत्सर अंगी आला तर दुष्ट दुराचाराचा विचार विवेकी मनाने सोडून गंगेत तो अर्पण करावा.

अन्नदान म्हणजे सर्वात मोठे सत्कर्म होय. तृप्त झालेला आत्मा म्हणजेच विश्वशांती

होय. अग्नी नारायण हा चराचरात आहे. तो महान आहे. "अग्नी तो मुख्य दैवत। त्यावीण सर्वही जाणा व्यर्थ॥ नवग्रह आज्ञा पाळीत। ऐसा श्रेष्ठ अग्नी हा॥ मग अशा श्रेष्ठ अग्नी नारायणाची आराधना करणे, जठराग्नीला तृप्त करणे, भुकेलेल्यांना खाऊ-पिऊ घालणे हे इष्टच होय. देवाचे मुख म्हणजे अग्नी नारायणाचेच मुख होय. आपल्या धर्मात जठराग्नीलाच अग्नीनारायण मानतात. म्हणून दुष्टाला, सुष्टाला, शत्रूला तृप्त करावे. आत्मा शांत करावा व अमर व्हावे. अग्नी नारायणाचे हे महत्व ओळखूनच श्री साईबाबांनी आपल्या हयातीत धूनी मातेची स्थापना केली आहे ही गोष्ट भक्तांनो विसरू नकात.

# साई तारी त्याला कोण मारी

— श्री. संभाजीराव बी. नाईक
के. जे. सोमैया कॉलेज,
कोपरगांव
जि. अ.नगर.

बरेच दिवसापासून साईलीला ह्या अंकात अनुभव लिहिन म्हणत होतो. परंतु एक दिवस माझा मुलगा (वय ७ महिने) अचानक रात्रीच्या वेळेस रडण्यास लागला व तो रडण्याचे काही केल्या थांबेना. त्या वेळेस मला साईलीला अंकात पूर्वीचा प्रसंग अनुभव म्हणून पाठवणार होतो. तो न पाठविल्यामुळेच की काय मुलगा रडण्यास लागला असे मला वाटून मी बाबांना क्षमा मागून अनुभव लिहिण्यास घेतला व मुलगाही रडण्याचे थांबला.

माझ्या पत्नीची डिलिव्हरी सुखरूप होऊन मुलगा झाला. घरातील सर्वांना आनंद झाला. परंतु डिलिव्हरीनंतर ४ तासांनी पत्नीला पहिला झटका आला. त्यावेळेस दवाखान्यामध्ये पत्नीजवळ फक्त आई होती. ताबडतोब मला फोन आल्यानंतर मी हॉस्पीटलमध्ये गेलो, व त्याच वेळेस दुसराही झटका माझ्यासमक्ष आला मी मात्र खुपच घाबरलो व अशा वेळेस मी माझ्या बाबांना आर्त स्वराने 'ॐ साईनाथाय नमः' असे म्हणून जप करू लागलो. डॉक्टरांनी पत्नीला झोपेचे इंजेक्शन दिले व डॉक्टरांना यापूर्वी अशी केस आली होती का असे विचारले परंतु डॉक्टर नाही म्हणाले, मग मात्र मी पुरताच घाबरलो. परंतु माझे बाबा पाठीशी असल्यामुळे धीर करून पत्नीच्या उशाजवळ बाबांचे नामस्मरण करीत बसलो व अशा वेळेस मला उदीची आठवण झाली, परंतु विटाळात उदी कशी द्यावी अशा विचारात असताना एका निष्ठावान भक्ताच्या घरून उदी आणून ती पत्नीच्या कपाळावर लावली. माझे मन पत्नीला पुण्याला अथवा श्रीरामपुरला मोठ्या हॉस्पिटलला नेण्याचे विचारात होते. त्याच वेळेस माझ्या वडिलांनी बाबांवर श्रद्धा ठेवून पत्नीला आहे त्याच दवाखान्यात ठेवण्याचा सल्ला दिला. मी मात्र पत्नीला उदी लावण्याचा नित्यक्रम चालू ठेवला व अचानक ३० तासांनी पत्नीला जाग आली व ती सर्वांना ओळखू लागली व तिच्यावरील संकट टळले. हे केवळ साई-आशिर्वादामुळेच शक्य झाले, व या अनुभवापासून साईबाबांवरील श्रद्धा अधिक दृढ झाली.

# परमपूज्य माताजी कलावतीदेवी



— डॉ. रा. सी. कापडी
कोल्हापूर.

या कलीयुगात सर्वत्र भ्रष्टाचार, अत्याचार व अनाचार माजला आहे. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. आईची वत्सलता, माया ममता हे शब्द नुसते कोषांत राहिले आहेत. मुलाची आज्ञा धारकता, बापाची पालकता हे शब्द शिक्षणापुरते शाळेत शिकणाऱ्या पाल्यापुरते ऐकू येतात. मुले मोठी झाली, लग्न झाले, त्यांना मुलेबाळे झाली म्हणजे आईबापांना, म्हातारपणी सुनांच्या तोंडाकडे पहावे लागते. देतील तो घांस आणि मरतील ती हांक ऐकून एकमेकांच्या तोंडाकडे पहावे लागते. कांहीवेळा आईबापांना पंगुत्व आले म्हणजे त्यांचे हाल कुत्रा विचारीत नाही. म्हातारी म्हाताऱ्याला दुसऱ्याच्या ओसरीवर दिवस काढावे लागतात हे आम्हां प्रत्यक्ष पाहिले आहे म्हणून हातपाय धड आहेत तोपर्यंत समोरचे वाढलेले ताट घ्यावे असे म्हटले जाते. पैसा अडका असला तर आईबापाचे खून करण्यापर्यंत मजल जाते.

हे कलीयुग आहे असे चालायचेच. स्मगलिंग, फसवाफसवी, दरोडा, अत्याचार, बलात्कार ही दृश्ये टी.व्ही.वर पहायला मिळतात. कलीयुगाचा शेवट तर आलेला नाहीं ना? राष्ट्र राष्ट्रांतील अणुयुद्धाच्या घोषणा हेच दर्शवीत आहेत.

पण अशा अंधकारमय जगात **संतांच्या** रूपाने आशेचा किरण मार्ग दाखविण्यास या कलीयुगात विशेषतः या भारतात दिसत आहे. हे भारताचे भाग्य होय.

हिंदु धर्मात कृतयुग, त्रेतायुग, द्वापार युग व कलीयुग अशी चार युगे सांगितली आहेत. या चार युगातील द्वापार युगात

यदा यदाही धर्मस्थ ग्लानीर्भवती भारत
धर्मसंस्था पनार्थाय संभवामी युगे युगे

या भगवंताच्या वचनाप्रमाणे राम कृष्ण या मानव देहधारी पुरुषोत्तमानी दुष्टांचा संहार करून भगवंताचे वरील वचन सार्थ केले. परंतु कलीयुगात असा मानव देहधारी पुरुषोत्तम झाला नाही. म्हणून परमेश्वराने आपले प्रेषीत संताच्या रूपाने सर्व धर्मात पाठविले आहेत.

हे प्रेषीत विशेषतः भारतात अनेक स्त्री पुरुषांच्या रूपाने वावरत आहेत. हे प्रेषीत आपल्या आचार विचाराने धार्मिक वृत्तीची जी माणसे आहेत त्यांचे अंतःकरण आकर्षीत करतात व समाजात बिघडलेली घडी धर्माचरणात नीट बसविण्याचा प्रयत्न करतात.

या भगवंताच्या प्रेषीतामध्ये स्त्री पुरुषाचा भेदभाव नसतो. या प्रेषीतांना आम्ही **संत** म्हणतो. आज मी एका स्त्री संताची ओळख करून देण्याचा प्रयत्न करीत आहे.

कर्नाटकमध्ये बेळगाव जिल्ह्यात अनगोळ गावी हरी मंदीरात वास्तव्य केलेल्या परमपूज्य माताजी **कलावतीदेवी** ह्या एका सुखवस्तू पारमार्थीक आचार विचारांच्या कल्याणपूर घराण्यात इ.स. १९०८ साली ऋषी पंचमीच्या दिवशी जन्मल्या. या घराण्यात परमहंस शिवराम स्वामी या नावाचे बाल संन्यासी होऊन गेले.

सुचितां श्रीमंताम गेहे योगभ्रष्टे। भिजायते। या गीतेतील वचनाप्रमाणे कल्याणपूर घराण्यात कलावती देवी अवतीर्ण झाल्या. कलावती हे नाम हुबळीचे सिद्धारूढ स्वामींनी या बालिकेवर अनुग्रह करून आत्मसाक्षात्कारी आपल्या प्रमाणे सिद्धयोगी बनविले. या मुलीचे माईबाप परमार्थिक आचार विचाराचे होते. त्यांनी या बालिकेचे पाळण्यातील नाव रुक्मावती ठेविले होते. त्यांचे वडील बाबूराव हे लाडीकपणे बाळ या नावाने संबोधीत.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे बाळचा ओढा लहानपणा पासून परमेश्वराकडे होता. त्या बोलायला लागल्या त्यावेळी त्यांचा पहिला शब्द 'हरी' उच्चारला गेला. बाळ चालता बोलता झाल्यावर वडीलांबरोबर समुद्र स्नानास जाई. एकदा स्नान करून येत असता त्यांना पांच इंच उंचीची एक चंदनाची श्रीकृष्णाची मूर्ती सापडली. तेंव्हापासून या बालिकेचा वेळ हरीची पूजा, अर्चा व ध्यान करण्यात जाऊ लागला. तिचे वडील संगीत तज्ञ असल्यामूळे त्यांच्या भजनात व किर्तनात गोड आवाजाना साथ ती देऊ लागली. भजनात ती रंगू लागल्यामुळे सर्व भाषेतील अभंग तोंडपाठ येऊ लागले.

ती मोठी झाल्यावर लहानपणीच तिचे भविष्य एका सिद्धाने सांगितल्याप्रमाणे घडून येऊ लागले. तिचे लग्न गोपाळ कृष्ण नावाच्या इंजिनिअर बरोबर होईल. त्याच्याबरोबर ती फक्त चारच वर्षे संसार करील. तिला दोन मुलगे होतील नंतर ती जगत्‌उद्धाराचे कंकण बांधील व अध्यात्मिक मार्गात ती जगत्‌वंद्य संताच्या मालिकेत बसेल. वरील भविष्याप्रमाणेच तंतोतंत घडून आले. तिला २१ व्या वर्षी एकाएकी वैधव्य प्राप्त झाले. ते सहन न होऊन आपली मुले आईकडे सोपवून ती एका विहिरीत जीव देण्यास गेली. पण अकस्मात एक सिद्ध पुरुष प्रगट होऊन त्याने तिला अटकाव केला. जगत्‌-उद्धाराकरिता तुझा जन्म आहे. तू हुबळीच्या सिद्धारूढाकडे जा. या सिद्धाच्या वचनाप्रमाणे नेसलेल्या एका वस्त्राने ती हुबळीला सिद्धारूढांकडे आली.

सिद्धारूढ महाराजांनी तिच्या श्रद्धेची प्रखर कसोटी घेतली. ती अर्धवस्त्र नेसून अर्धे वस्त्र वाळवून नेसू लागली. तिला खाण्याकरिता कोणी खजूर आणून दिला तेवढाच खावून ती राहू लागली.

- महाराजांकडे येणाऱ्या राजे राजवाड्यांच्या स्त्रिया तिला लुगडी व खाद्य पदार्थ देऊ लागले. तरी ती महाराजांची परवानगी नसल्यामुळे नाकारीत असे. महाराजांनी एका गवंड्याच्या हाताखाली तिला मातीच्या पाट्या टाकण्याचे काम दिले. तिने ते काम मोठ्या निष्ठेने केले. बांधकाम मठाचेच चालले होते.

महाराजांनी नंतर तिला आपल्या सेवा करणाऱ्या बायांमध्ये काम करण्यास लावले.

लवकरच सिद्धारूढ महाराजांची ती आवडती सेविका झाली. इतर भक्त भक्तीणी तिचा हेवा करू लागले.




एके दिवशी महाराजांना सिंहासनाकडे येण्यास बराच वेळ होता. तितक्या वेळात रूक्मावतीने—तिचे ते सासरचे नाव होते- महाराज येणाऱ्या पथावर सारवून सुंदर रांगोळ्या काढल्या. परंतु एका कुत्र्याने रूक्मावतीच्या अपरोक्ष त्या कलापूर्ण सजविलेल्या मार्गावर घाण केली. महाराजांची येण्याची वेळ झाली त्यावेळी रूक्मावतीला कळल्याबरोबर ती धावत आली, ती घाण काढली व पूर्ववत कलापूर्ण रांगोळ्या घातल्या हे सर्व करीपर्यंत महाराजांचा एकही भक्त पुढे येऊन कुत्र्याची विष्टा काढावयास पुढे सरसावला नाही. महाराजांची स्वारी सिंहासनावर बसली व पुढे ठेवलेल्या पेढ्याचा पुडा सोडून एक पेढा हातात धरला आणि म्हणाले ज्याने ही कुत्र्याची विष्टा काढून स्वच्छता राखली त्याने पुढे येऊन ह्या पेढ्याचा प्रसाद घ्यावा. भक्तांच्या समुदायातून कोणीच पुढे येईना. आंतरज्ञानीने स्वामींनी हे जाणले होते. स्वामींनी रूक्मावतीला हाक मारली व तिच्या तोंडात पेढा भरविला. सगळा भक्तवृंद अवाक् झाला. महाराजांनी प्रवचन सुरू केले. भक्त तीन प्रकारचे आहेत. जो सद्‌गुरुनी सांगण्यापूर्वी त्यांची कामे उरकतो तो श्रेष्ठ - पहिल्या नंबरचा भक्त. जो गुरुनी सांगितल्यावर गुरुची कामे झटपट करतो तो मध्यम प्रतीचा भक्त! जो गुरुंनी सांगितलेले काम आता करू उद्या करू असे मनात घोकीत असतो तो कनिष्ठ भक्त.

मी तुम्हांवर सारखेच प्रेम करतो. दुजाभाव ठेवीत नाही. तुम्ही स्वतःच कोणत्या वर्गात बसता ते ठरवा. "भक्ती एकची मी जाणे । साने थोर न म्हणे । आम्ही भावाचे पाहुणे भजतेचा ॥

रूक्मावतीचा शब्दभाव, एकनिष्ठा, ज्ञान लालसा,ईश्वरभक्ती, सखोल विचार, उत्तम मर्म ग्राहकता, धारणाशक्ती, धीटपणा, कार्य तत्परता वगैरे गुणांवर सिद्धारूढ स्वामी बेहद खूष होते.

महाराजांनी रूक्मावतीची ती रांगोळीची कला पाहून तिचे **कलावती देवी** असे नामकरण केले. व तिच्या अंगावर आपल्या अंगावरील छाटी फिकून महाराज निघून गेले.

एकदा कलावती देवी ध्यानमग्न होऊन प्रभू दर्शनाची चिंतन करीत असता तिचे अष्टभाव जागृत होऊन आनंदाश्रूंचा प्रवाह सुरू झाला. ती म्हणाली "प्रभूराया! तू

माझ्यावर कधी कृपा करणार?

इतक्यात सिद्धारूढ स्वामी प्रगट झाले त्यांनी मस्तकावर वरदहस्त ठेवून देवीची ज्ञान ज्योत प्रज्वलीत केली. देवी समाधीस्त झाल्या. जवळजवळ आठ तास त्या स्थितीत राहिल्या. त्यांनी जेंव्हा डोळे उघडले तेंव्हा त्यांना आढळून आले की आपणास सद्गुरूंनी सुख दुःखातीत, निरामय, अद्भूत, अवीट, अविकारी अशा स्थितीत सर्वांना कलावती देवीला **'माताजी'** म्हणावयास फर्मावले.

एकदा महाराज मातांजींकडे आले आणि म्हणाले मी आता वृद्धावस्थेमुळे माझा देह जर्जर झाला आहे. मी समाधी घेणार आहे. तोपर्यंत तू येथेच रहा. आत्मदर्शन जरी झाले असले तरी अंगात ते मुरले पाहिजे. सहा महिने एकांतात राहून साधन अभ्यास कर. त्यानंतर बारा वर्षे हरीनाम आणि विश्वप्रेम प्रचारार्थ गावोगावी प्रयाण कर. मी सर्वकाळ तुझ्यापाशीच आहे. कसलीही भिती बाळगू नको. बारा वर्षानंतर बेळगावात अनगोळ गावी स्थायीक हो. तेथील लोक फार मागासलेले आहेत त्यांना बोध करून त्यांच्या ठिकाणी हरीप्रेम उत्पन्न कर. जनता जनार्दनाच्या सेवेत निमग्न राहून. दासपणाचे सुख सोहाळे भोगीत रहा.

महाराजांनी अशा रितीने जन सुधारणेचे प्रचंड कार्य माताजीच्या हाती देऊन, समाधी घेतली.

अनगोळ गावी जे हरीमंदिर उभारले गेले आहे, तेथे त्रिकाळ भजन-पूजन आरती धुपारती सुरू आहे त्याची पार्श्वभूमी ही अशी आहे.

सद्गुरुंनी शिष्याला आपल्या उच्च स्थानावर बसवून त्याच्या हातून जगत् उद्धाराचे कार्य केले. ही गोष्ट अपूर्व आहे. असाधारण आहे. विशेषतः स्त्री संत अगदी विरळा. माताजींनी सद्गुरुच्या ठिकाणी हरीरूप कल्पून त्याची जी अनन्यभावे सेवा केली त्याचे हे आधुनिक काळातील चालते बोलते उदाहरण होईल.

संगीत कला अवगत व्हावी म्हणून संगीत कलाकार गुरुची वाटेल ती सेवा करतात. पण संगीत हे क्षणीक सुख देणारे साधन आहे. शाश्वत सुख देणाऱ्या गुरुच्या पायी आपले प्रेम किती ओतावे लागेल बरे? तुकाराम महाराज म्हणतात —


काय द्यावे यांसी व्हावे उतराई
ठेवीन हा पायी जीव थोडा ॥

माताजीनी गुरुची आज्ञा तंतोतंत पाळली. बारा वर्षे गावोगावी, खेडोपाडी कीर्तने, भजन, प्रवचन याचा हल्लकल्लोळ मांडला. त्यामुळे मधमाशाच्या पोळाभोवती मधमाशा घोंघावतात. त्याप्रमाणे ठिकठिकाणी भक्तांची गर्दी वाढत गेली.

माताजींचे चरित्र म्हणजे संसार आणि परमार्थ याचा परिपाक आहे. माताजी म्हणजे उत्साहाचा सागर आनंदाचे आगर, प्रेमाचा डोंगर.

अनगोळ येथील हरीमंदिरा शेजारी परमार्थ निकेतन आहे. परम अर्थ जाणण्याचे ठिकाण ब्रम्हानंदाचे भोग भोगण्याचे स्थान. परमार्थाची ओळख करून देणारी शाळा. अशी अनेक हरीमंदिरे भक्तांनी ठिकठिकाणी उभारली आहेत.

# मी पाहिलेले श्री साईबाबा



— श्री. शंकर हरीभाऊ चौबळ,
मधुकुंज को.हौ.सोसायटी,
फ्लॅट नं. १०२, दाऊदबाग,
जयप्रकाश मार्ग, अंधेरी - ५८.

माझा जन्म १६-८-१९१० साली डहाणू (जिल्हा - ठाणे) येथे झाला. आज मी ७५ वर्षे पूरी करून ७६ व्या वर्षात पदार्पण केले आहे. माझे वडील कै. हरीभाऊ विश्वनाथ चौबळ श्री साईबाबांचे निस्सीम भक्त होते. त्यांचा श्रीबाबांशी १९११ साली संबंध आला. प्रथम भेटीतच माझ्या वडीलांना बाबांच्या साक्षात्काराचा अनुभव आला. तो असा की, माझे वडील श्री बाबांचे दर्शन घेण्यास प्रथमच शिर्डीस जाण्यापूर्वी घरच्या वडील मंडळींची अनुज्ञा घेण्याकरीता गेले असता त्या सर्वांनी वडीलांस शिर्डीस जाण्यास विरोध दर्शविला. ते म्हणाले, "तो एक मुसलमान फकीर आहे. तो मशिदीत बसतो आणि भिक्षा मागून खातो. त्याच्याकडे तू कशाला जातोस? असे भोदू लोक जगात काय थोडे आहेत. तरी तू जाऊ नकोस." अर्थातच ह्या विरोधास न जुमानता माझे वडील शिर्डीस श्री बाबांच्या दर्शनाकरीता गेलेच. शिर्डीस श्री बाबांचे दर्शन घेण्याकरीता वडील मशिदीत गेले असता गांवी जे विरोधात्मक शब्द त्यांच्या वडील मंडळीकडून उच्चारले गेले होते. त्या शब्दाचा प्रतिध्वनी बाबांच्या मुखातून त्यांना ऐकू आला. बाबा म्हणाले, "अरे मी एक फकीर आहे. मी येथे मशिदीत बसतो व भिक्षा मागून खातो. तू माझ्याकडे कशाला आलास? जा आलास तसा परत जा." बाबांच्या तोंडून हे शब्द ऐकताच माझ्या वडीलांना वाटले, मी येथे प्रथमच आलो असताना आणि माझे येणे कोणासही माहीत नसताना हा गावी झालेला प्रकार बाबांनी कसा जाणला? ते विस्मीत झाले आणि त्यांची खात्री झाली की, हा कोणी साधुपुरुष असावा. गेल्याप्रमाणे ते तेथे ४/५ दिवस राहीले व नंतर परत आले. ह्यानंतर ते वारंवार शिर्डीस जाऊ लागले. पुढे पुढे त्यांना बाबांबद्दल इतकी ओढ लागली की, बाबांच्या सहवासाचा, सान्निध्याचा, दर्शनाचा रोज लाभ व्हावा म्हणून त्यांनी शिर्डीस काही काळ बिऱ्हाड करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे इ.स. १९१४ साली चार महिने व इ.स. १९१७ साली चार महिने त्यांनी बिऱ्हाड केले. मला वाटते, आम्ही एकदा आप्पा शिंप्याच्या घरात राहात होतो व दुसऱ्यावेळी अब्दुलबाबा ज्या घरात राहात होते, त्या घराच्या मागील बाजूस एका मोठ्या

घरात राहात होतो. माझ्या वडीलांनी शिर्डीस बिऱ्हाड केल्यामुळे आम्हां सर्व मुलांनाही बाबांच्या सहवासाचा व दर्शनाचा लाभ मिळाला.

इ.स. १९१४ सालचा प्रसंग मी बराच लहान असल्यामुळे मला काही आठवत नाही. इ.स. १९१७ साली मी सात वर्षांचा असल्यामुळे मला बऱ्याच गोष्टी आठवतात. त्यावेळेस शिर्डीस जाण्यास हल्लीप्रमाणे वाहनांची सोय नव्हती. कोपरगावला आगगाडी आल्यानंतर भक्त मंडळीस शिर्डीस जाण्याकरीता घोड्यांच्या टांग्यातून किंवा बैलगाडीतून प्रवास करावा लागे. जेवणाची व्यवस्था श्रीमती शारदाबाई यांच्या येथे होत असे. राहाण्याची उत्तम सोय दिक्षीत वाड्यात किंवा साठेसाहेबांच्या वाड्यात होत असे.

मी ज्यावेळेस (इ.स. १९१७ साली) बाबांना पाहिले त्यावेळेस बाबांचे वय ७६, ७७ असावे, असे मला वाटते. बाबांचे बसणे, उठणे, राहणे, झोपणे बहुतेक मशिदीतच होते. बाबा कठड्याजवळ लांब पाय सोडून व कठड्यावर डावा हात ठेवून धूनीसमोर बसत असत. हल्ली बाबांच्या द्वारकामाईच्या ओट्यावरील भाग, लोखंडाचे गज घालून व दरवाजा ठेवून बंद करण्याची व्यवस्था केली आहे. धूनीही तशीच गज घालून बंद केली आहे. त्यावेळेस हे दोनही भाग सर्वांना खुले होते. त्याप्रमाणे मशिदीच्या ओट्यावरून खाली सभा मंडपात उतरत असतांना, सभा मंडपाच्या उजव्या बाजूला लोखंडाचा कठडा सुमारे ४'-०'' ते ४'-३'' उंचीचा असावा, असे वाटते. आता ते कुंपण जाऊन त्या ठिकाणी चुन्यामातीची भिंत उभारली आहे व त्यावर लोखंडाचे गज लाविलेले आहेत. बाबा, कधी कधी मशिदीत पूर्व बाजूस असलेल्या दगडावर बसत असत. बाबा रंगाने गोरेपान असून ते उंचीने ६ फूट असावे असे वाटते. त्यांचे बोलणे अत्यंत गोड व प्रेमळ होते. त्यांची भाषा रांगडी असे. बाबांच्या दरबारात लहान थोर लोकांना सारखीच वागणूक असे. बाबा ज्या कठड्यावर हात टेकून बसत त्या कठड्यापासून पूर्वेस ४/५ फुटांवर ओट्याच्या धारेजवळ एक मोठा चौकोनी दगड होता. त्यावर बसून बाबा दुपारी स्नान करीत असत. स्नान करताना ते लंगोटी नेसीत. अशा वेळेस मशिद बहुतेक एक दोन व्यक्ती सोडून निर्मनुष्य असे. अशा वेळी मला अनेक वेळा बाबांच्या सान्निध्यात असण्याचा लाभ झालेला आहे. असे असल्यामुळे मला बाबांच्या उघड्या देहाचे दर्शन होत असे. ह्या वयातही चेहरा इतका मोहक होता की त्यांना पाहिल्याबरोबर नास्तिक मनुष्यही त्यांच्याकडे न कळत आकर्षिला जाई. बाबांच्याजवळ (आगपेटीच्या काड्यांसारख्या) काड्यांचा मोठा संग्रह असे, तसेच भिंतीच्या कोनाड्यात चिलमींचा मोठा साठा होता. मशिदीच्या तक्तपोशीला काचेच्या हंड्या लावून त्यात मेणबत्या घालून त्या पेटवून मशिद प्रकाशित केली जात असे. साई चरित्राची पहिली आवृति प्रसिद्ध झाली. त्यामध्ये बाबांचा एक भिक्षेचा फोटो आहे, तसे बाबा दिसत असत, असे मला आठवते. बाबांची काकडआरती भल्या पहाटेस व्हावयाची. पूजा बहुतेक बापूसाहेब जोग करीत असत. बापूसाहेब जोग उंच असून रंगाने गोरेपान व शरीराने सुदृढ होते. ते पूजा करताना जांभळ्या रंगाचे (सोवळे) वस्त्र परीधान करीत. बाबा एक दिवसाआड वाजत गाजत चावडीत जात व तेथे आरती झाल्यानंतर चावडीचे दरवाजे बंद करून घेऊन पांढऱ्या

शुभ्र चादरी अंथरून झोपत असत.

दुसऱ्या दिवशी पहाटेस चारच्या सुमारास भक्तमंडळी बाबांची काकड आरती करण्यास व बाबांना वाजतगाजत मशिदीत नेण्यास जमत असत. अशावेळी बाबा कधीकधी नृसिंह अवतार धारणे करीत व आपल्या लाडक्या भक्तांना सटक्याचा प्रसाद देत असत. प्रसाद मिळालेल्या अशा भक्तांमध्ये सर्वश्री म्हाळसापति, तात्या कोते (पाटील), काकासाहेब दीक्षित, बापूसाहेब बुटी बापूसाहेब जोग, अण्णासाहेब दाभोलकर वगैरे मंडळींचा समावेश होता. मशिदीत आल्यानंतर भक्तमंडळी प्रसाद घेऊन व बाबांना नमस्कार करून आपापल्या मुक्कामी जात. नंतर बाबा प्रातर्विधी उरकण्याकरीता लेंडीवर जात व तेथून परतल्यावर ते भीक्षेला जात. भिक्षेवरून परत आल्यानंतर मशिदीत भक्तमंडळी जमत व भक्तांची बाबांबरोबर थोडी बातचीत होऊन व बाबांचा आशीर्वाद वगैरे घेतल्यानंतर दुपारी १२-०० ते १२-३० च्या सुमारास बाबांची दुपारची आरती व्हावयाची. आरती झाल्यानंतर भक्तमंडळी बाबांना नमस्कार करून व प्रसाद घेऊन पुन्हा आपापल्या मुक्कामास जेवण्याकरीता व विश्रांती घेण्यास जात. सकाळच्याप्रमाणे दुपारी चार नंतरही बाबांचा दरबार भरत असे. भक्तांना शिर्डी सोडण्यापूर्वी बाबांची परवानगी घ्यावी लागे. बाबांनी परवानगी दिली की, बाबा स्वतः भक्तांना आपल्या हाताने उदीचा प्रसाद देत. एकदा शिर्डी सोडण्यास परवानगी मिळाली की, त्या भक्तांना परत शिर्डीस राहता येत नसे. त्यावेळेस एक अनाथ विधवा बाई शिर्डीस येऊन बाबांच्या आश्रयाला राहिली होती. तिला आम्ही "बाबांची आई" असे म्हणत असू.

ती बाई 'राधाकृष्णा बाई' म्हणून ओळखली जाई. शिर्डीस येण्यास तिला कोणती परिस्थिती कारणीभूत झाली व ती शिर्डीस येऊन तिने आपल्या आयुष्याचे कसे सार्थक करून घेतले, ह्याबद्दल मला कै. सगुणराव व श्री. मार्तंड (कै. म्हाळसापतीचा मुलगा) यांच्याकडून जी माहिती मिळाली ती मी येथे देत आहे.

राधाकृष्णा बाई ही एक बाल विधवाबाई होती. आम्ही ज्यावेळेस शिर्डीत होतो त्यावेळेस तिचे वय सुमारे २५ ते ३० च्या घरात असावे, असे मला वाटते. ती उंचीने ५'-२" किंवा ५'-३" असावी. आई रंगाने गौरवर्णाची होती. तिचे कपाळ गोंदलेले होते. ती शुभ्र पांढरे ५ वारी पातळ परिधान करीत असे. बालवयातच वैधव्याची कुऱ्हाड तिच्या सुगंधीत व प्रफुल्लीत होत जाणाऱ्या आयुष्यांवर पडल्यामुळे तिच्या मनाला धक्का बसला व ती पुढील आयुष्याचा विचार करू लागली. अशी स्थिती प्राप्त झाली असता, आता काय करावे, कोठे जावे, पुढील आयुष्य कसे घालवावे अशा अडचणीत असताना तिच्या कानांवर बाबांची सत्कीर्ति ऐकू आली व तिने बाबांचे दर्शन घेण्याचे ठरविले. हाच क्षण तिच्या आयुष्यात भाग्याचा काल ठरला. तिने त्वरीत शिर्डीस जाण्याचा निश्चय केला व ती शिर्डीस येऊन तिने बाबांचे चरण धरले. बाबांचे चरण म्हणजे तीर्थाचे तीर्थ, गंगेची गंगा व पावित्र्याचे पावित्र्य. मग तिला पावन होऊन जाण्यास उशीर कसा लागेल? बाबांना तिने आपली कर्मकहाणी निवेदन करण्यापूर्वीच बाबांनी तिची परिस्थिती ओळखिली व तिला धीर दिला. बाबांचे अंतःकरण माऊलीचे होते. बाबांनी तिच्या

राहाण्याची
नवीन आयु
नसत. मशि
बाबा राहाव
रस्ता रोज
पुनीत झाले
पवित्र झाल
तिच्या अंग
मन दिवसें
बदल होत
श्री रामचंद्रां
मुक्त झाली
झाली. तिचे
आलेला स
शिर्डीत अ
आईकडे प्र
असे. आई
उपसण्याचे
कामे अस

आमचे
आम्ही त्या
असू. बाब
बाबांकरीता
असताना अ
आम्ही एवे

गावाती
मागून मशि
बसलेले प
प्रसाद द्या
राहील्यावर
माझे नाक
आता खे
लाड करु
खाली उत
खड्या अ

राहीलो. जवळ जाऊन उभा राहील्यावर ते म्हणाले, "तू फार घाणेरडा आहेस, तू बाबांजवळ गेलास म्हणजे बाबांना तुझे नाक साफ करावयास लागते. तरी तू यापुढे बाबांजवळ येत, जाऊ नकोस." हे त्यांचे बोलणे ऐकून मी फार घाबरलो व दुसऱ्या दिवशी नित्यनियमाप्रमाणे मशिदीत गेलो. परंतु बाबांच्या जवळ जाण्याची तीव्र इच्छा असूनही मी बाबांपासून दूर खालीच उभा राहीलो. मी बाबांकडे रोजच्याप्रमाणे न गेल्यामुळे बाबांनी मला एका भक्ताकडून बोलावणे पाठविले. परंतु तेथे जवळच श्री. माधवराव देशपांडे उभे असल्यामुळे मी बाबांजवळ जाण्याचे टाळले. मला बोलावयास आलेला इसम परत गेला. तेव्हा बाबांनी त्याला परत माझ्याकडे पाठविले व तो येऊन मला उचलून बाबांजवळ घेऊन गेला. बाबांजवळ गेल्यावर बाबांनी मला उचलून घेतले, मांडीवर बसविले आणि विचारले, "कां भाऊ, आज तूं माझ्यावर रागावलास का? आज तू माझ्यापासून लांब दूर दूर कां पळतोस? हे बाबांचे प्रेमळ शब्द ऐकून मी बाबांस भीतभीत सांगितले कीं, 'बाबा, तो म्हातारा आहेना तो मला काल म्हणाला, ए मुला, तू फार घाणेरडा आहेस. तू बाबाजवळ येतोस आणि बाबांना तुझे नाक साफ करावे लागते. तरी तू यापुढे बाबांजवळ येत जाऊ नकोस.' ते असे म्हणाले मी भीतीने येण्याचे टाळले. श्री. माधवराव देशपांडे जवळच होते. त्यांना उद्देशून बाबा म्हणाले, "अरे शामा, तू जसा माझा मुलगा आहेस तसा भाऊही माझाच आहे. माझ्या मुलांचे मी करणार नाही तर कोण करणार? माझी मुले माझ्याजवळ येणारच. नको, त्याला असा रागावू नकोस" अर्थात त्या दिवसापासून मीही बाबांजवळ मन मानेल तसे जाऊ लागलो व देशपांडेही त्यानंतर काही बोलले नाहीत.

दुसरा एक प्रसंग. मी दुपारची आरती सुरू होण्यापूर्वी सभामंडपाच्या कडेस असलेल्या कठड्यावर चढलो होतो. बाबांनी हे पाहील्याबरोबर बाबा म्हणाले "अरे तो पोरगा कठड्यावरून पडेल त्याला खाली उतरवा व नंतर आरती सुरू करा." त्याप्रमाणे कोणीतरी मला कठड्यावरून खाली उतरविले व नंतर आरती सुरू झाली.

इ.स. १९१७ सालच्या कोजागिरीच्या पौर्णिमेच्या दिवशी बाबांच्या मशिदीत उत्सव साजरा झालेला मला आठवतो. त्यादिवशी मशिदीच्या सभामंडपात एक फोनोग्राफ लावला होता व भक्त मंडळी आनंद साजरा करीत होती. त्या दिवशी गावात आलेल्या सर्कशीतला हत्ती सर्कशीच्या मालकाने बाबांच्या दर्शनाला आणला होता.

श्री बाबांचा माझ्याशी वरील वागण्याचा अर्थ मला माझ्या आयुष्यात बराच काळ कळला नाही. परंतु जसजसा मी मोठा होऊ लागलो तसतसा मला बाबांच्या कृपेचा अनुभव येऊ लागला. आयुष्याची वाटचाल करीत असताना मला शिक्षण प्राप्त करून घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी नोकरी मिळविण्याकरीता लागणाऱ्या वशिलेबाजीचा अभाव, नोकरीत कायम होऊन पुढे प्राप्त होणाऱ्या पदोन्नती करीता येणारे व्यत्यय संसारातील इतर अडचणी ह्या सर्वांवर मात करून आयुष्यात मी जो यशस्वी झालो ते केवळ साईकृपेमुळेच. बाबांचा प्रेमळ व सहाय्यक हात मला मिळाला नसता तर मी ह्या जगात कोठे वाहत गेलो असतो, हे सांगणे कठीण आहे. त्यामुळे माझी पक्की खात्री झाली

आहे की बाबा माझ्या पाठीशी उभे आहेत. आयुष्यात हीच माझी कमाई. इ.स. १९१७ सालानंतर बाबांच्या हयातींत पुन्हा शिर्डीस जाण्याचा योग मला आला नाही. अर्थात शिर्डीस मी आजपर्यंत अनेकवेळा जाऊन आलो आहे, बरेच दिवस राहीलेला आहे व अजूनही जात येत आहे.

आता माझ्या वडीलांच्या मृत्यूविषयीची माहिती वाचकांच्याकरींता मी मुद्दाम देत आहे.

माझे वडील इ.स. १९२८ सालीं जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात शिर्डीस बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याकरीता गेले होते. शिर्डीस गेल्यानंतर २ दिवसांनी ते साकोरी येथे श्री. उपासनी बाबांच्या दर्शनास गेले. श्री. उपासनी महाराज शिर्डीस खंडोबाच्या मंदीरात तप करीत असताना माझे वडील इ.स. १९१७ साली म्हणजे आमचे शिर्डीस वास्तव्य असताना श्री. उपासनी बाबांना रोज दुध पुरवित असत. त्यामुळे उपासनी महाराजांचा माझ्या वडीलांवर विशेष लोभ होता. श्री. उपासनी महाराजांचे दर्शन घेताक्षणीस श्री. उपासनी बाबा माझ्या वडीलांना म्हणाले की, "तू शिर्डीस फार राहू नकोस, लवकर घरी परत जा." लगेच वडील शिर्डीस परत आले. तेथे त्यांना ताप आला व तशा स्थितीत ते मुंबईस अंधेरी येथे घरी आले. अंधेरीस आल्यानंतर त्यांना डॉक्टरचे औषध सुरू केले. परंतु त्यांच्या प्रकृतीस काही उतार पडला नाही व शेवटी ह्या तापातच त्यांचा रविवार दिनांक १४.१.१९२२ रोजी पहाटेस ५.३० च्या सुमारास अंत झाला. मृत्यूपूर्वी ३ दिवस अगोदर ते बेशुद्धावस्थेत होते. परंतु अशा बेशुद्धावस्थेत असतानाच मृत्यूपूर्वी त्यांच्या मुखातून खालील शब्द अगदी स्पष्टपणे निघाले व नंतर लगेच त्यांची प्राणज्योत साईचरणी विलीन झाली.

१) ज्ञानेश्वराने गीतेवर केली टीका,
पुंडलिकाने विठ्ठल केला सखा, तसा हरीने साई केला सखा.

२) शिर्डी माझे पंढरपूर, साईबाबा रमावर,
शुद्धभक्ति चंद्रभागा, भाव पुंडलिक जागा
याहो, याहो, अवघे जन, करा मला बाबांना अर्पण॥

बेशुद्धावस्थेत काढलेले हे त्यांचे शब्द ऐकून आमची सर्वांची मने आश्चर्याने थरारून गेली. आम्हांस असे वाटले की मनुष्य जीवंत असून शुद्धीत असताना त्याला भगवंताचे स्मरण राहते परंतु मनुष्य मृत्युपूर्वी बेशुद्धावस्थेत असताना व त्याला दुसऱ्या कशाचेही स्मरण राहात नसताना, त्याला फक्त आपल्या आराध्यदैवताचे स्मरण राहते, हे कसे घडते. ह्याचा मी पुष्कळ वर्षे विचार करीत असताना ह्या बद्दलचा खुलासा मला श्री ज्ञानेश्वरीच्या ८ अध्यायात (श्लोक ६ व श्लोक १४) सापडला. हे भगवत्‌गीतेंतील श्लोक व ज्ञानेश्वरीच्या ओव्या मी वाचकांच्या माहितीकरीतां खाली उदधृत करीत आहे.

**भगवतगीता अध्याय ८ (श्लोक क्रमांक ६) :-**

यं यं वापि स्मरन् भावं त्यजत्यन्ते कलेवरम्।
तं तमेवैति कौन्तेय सदा तद् भाव भावितः॥

अर्थ :- अथवा हे कुंतीपुत्रा, ज्या ज्या वस्तूचे स्मरण करीत मनुष्य अंतकाली देहाचा

त्याग करतो त्या त्या वस्तुप्रत तो सर्वथा (तिच्या स्मरणाने) तिच्या ठिकाणी चित्त एकाग्र झालेला असल्यामुळे जाणे.

**ज्ञानेश्वरीच्या ओव्या :-**

तेवि जिनेनि अवसरे। जे आवडो नि जीवी उरे। तेचि मरणाचिये मेरे फार हो लागे॥ ७४ ॥ आणि मरणीं जया जे आठवे। तो तेचि गतीते पावें। म्हणोनि सदा स्मरावे। मातेचि तुवां॥ ७५ ॥

**भगवत्गीता, अध्याय ८ (श्लोक १४) :-**

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः॥

अर्थ :- पार्था, जो सतत अनन्यचित्त होऊन नित्य माझे स्मरण करतो, त्या (माझ्याशी) निरंतर एकवटलेला योग्याला मी सुलभच आहे.

श्रीकृष्णाने (गीतेंत) म्हटले आहे की, माझ्या अनन्य आणि प्रेमळ भक्ताला त्यांच्या अंतकाळी घेराव घालतो व त्याच्या संसार विषयांच्या कल्पनेपासून रक्षण करून त्याला आत्मज्ञान देतो. म्हणून त्यास देहाचा त्याग करीताना क्लेश होत नाही. अशा भक्तांना मी माझ्याजवळ नेतो. बाबांनी (पूर्व अवतारी कृष्ण) हे वचन तंतोतंत खरे करून दाखविले आहे. हा आमचा जीवंत अनुभव आहे. ह्या योगाने भगवंताने आपले अदृष्य असलेले अस्तित्वच प्रगट केले आहे. असे आहेत आपले बाबा. त्यांचे आपण सतत स्मरण केले व त्यांचे सर्वकाळी नाम घेतले म्हणजे ते आपल्याजवळ राहातात म्हणून साईभक्तांनी त्यांचे सदा चिंतन करून आपले आयुष्य सार्थकी लावावे. असे होते माझे आई-वडील कीं ज्यांच्या पुण्यायीने व भाग्याने आम्हांस बाबांच्या दर्शनाचा, सहवासाचा व सेवेचा लाभ झाला. त्यांचे पुण्यस्मरण करून मी लेख पूरा करतो.

# ॥ हुकमाचा एक्का म्हणजे श्री साईबाबा ॥

**— सौ. कावेरी क्षीरसागर,**
दत्त सोसायटी, कदम निवास,
महाबळेश्वर.

माझ्या पतीना गेल्यावर्षी मधुमेहाचा त्रास सुरू झाला आणि रक्तातली साखर खूपच वाढली. तेव्हा दवाखान्यात चेक करायला गेले असताना तिथेच श्री साईबाबांना हाक मारली आणि सांगितले, की ह्यांच्या रक्तातली साखर नेहमीसारखी व्हावी. श्री साईवचनाप्रमाणे उठबशा केल्या आपल्या आणि दुधाच्या पेला साईबाबांचा. शेवटी प्रयत्नाअंती साईश्वर, हा अनुभव आला. डॉक्टरांची साधी ट्रिटमेंट, ह्यांचे पथ्य आणि साईकृपा यामुळे ह्यांची साखर अगदी नॉर्मल झाली. पत्ते खेळताना ४ हुकुमाची पाने असली तरी हुकमाचा एक्का लागतोच. तसे आपल्या आयुष्याच्या पत्त्याच्या डावात साईबाबांचा आशीर्वाद हाच हुकूमाचा एक्का आहे.

# श्री साईनाथांचा शरणार्थी

१२

लेखक : ब्रम्हीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि. बा. खेर

एकदा माझ्या खोलीसमोर मी काही साफसफाईचे काम करत होतो, तेथे चूल पेटवताना भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायातील चौथ्या श्लोकाची —

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो।
योगेश्वरं ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ।।

आठवण आल्याने मोठ्याने वारंवार बोलत होतो. या पंक्ति वारंवार बोलण्याचा हेतु विश्वदर्शनाची अभिलाषा होती हे तर स्पष्टच आहे. ईश्वरदर्शनाच्या ज्या इच्छेने मला शिरडीस आणले तीच इच्छा अर्जुनाने व्यक्त केली होती, व ही प्रार्थना शेजारच्या राधाकृष्णआईच्या कानावर घालून तिच्या द्वारा बाबांचे प्रभुदर्शन प्राप्त करण्याची होती.

त्याच रात्री स्वप्नात आनंदलहरीत आद्यशक्तीचे वर्णन ज्या श्लोकात आहे त्याच आकाराचे दर्शन झाले. भगवंतांनी अर्जुनाला विश्वरूप दर्शन घडवले ते हे नव्हते. बाबांचे दर्शन ज्या आकारात झाले त्याच आकारात, त्यांच्या संमतीने मंत्राची सुरुवात करताच त्या रूपाने सर्वत्र होई.

बृहतातील बृहत् व अणूंतील अणू रूपाने हा आकार त्या समयी दिसायचा. पण नंतर शिरडीत राह्यलो त्या दरम्यान बाबांचे तेज रूपाने विजेसमान दर्शन होई. फार उदासीनता वाटे तेव्हा बाबांचे ह्या रूपाने दर्शन होई व खिन्नता नष्ट होई. गूढ विषय जर समजत नसला तर या दर्शनानंतर लगेच समजे. ब्रम्हसूत्र ४ ते ६ मध्ये स्पष्ट सांगितले आहे की हा मानव विद्युत पुरुष आहे आणि तो साधकाला ब्रम्ह प्राप्त करून देतो. 'गमयति' — घेऊन जातो — शब्द आहे त्यावरून समजते की हा 'श्रुयमाण अमानव पुरुष' ज्याच्यात नेतृत्व आहे तोच श्री साईबाबा — भक्तांसाठी अवतरलेला, प्रकट झालेला अमानव पुरुष.

मी शिरडीत प्राणायामाचा अभ्यास करीत असे तो बाबांनी कसा थांबविला त्याची हकीकत पूर्वी येऊन गेली आहे. तरीसुद्धा प्राणायामाची हौस शमली नव्हती. मार्च १९१७ पासून १५ जानेवारी १९२१ पर्यंत मी अहमदाबाद येथे असताना योगानुशासन नावाचा प्राचीन ग्रंथ माझ्या वाचण्यात आला. रामशंकर त्रिपाठी त्याच्या गुरुकडून आसन, ब्रह्मदातण, नेती, नौली, धौती, बस्ती, प्राणायाम वगैरे शिकला होता. त्यांच्याकडून मी शिकावे का अशी बाबांकडे विचारणा केली असता त्यांनी होकार दिला. त्या क्रिया शिकण्याची सुरुवात मी ब्रह्मदातणाने केली. मीठाचे गरम पाणी एक दोन तांबे पिऊन, उत्तान आसन (पश्चिमोत्तान?) केल्याने कोठा साफ झाल्यानंतर ब्रह्मदातण म्हणजे वडाची पातळ साफ केलेली/सालं घशातून बेंबीपर्यंत उतरवून ती चांगली हलवण्याची - फिरवण्याची क्रिया काही काळ केल्यावर, रामशंकर जवळ त्याच्या गुरुने दिलेली सिद्ध धौती होती

ती सर्व घशातून उतरवून व शेवटचे टोक पकडून ठेवून, पुनः गरम पाणी पिऊन हळुहळू नाजुकपणे बाहेर काढण्याचा प्रयोग सुरू केला. पुष्कळ दिवस तो प्रयोग चालू ठेवला. धौती बाहेर येई तेव्हा तिच्यासह कफ-लाळ निघे. खालच्या टोकाचा भाग थोडा पिवळा झालेला असे त्यावरून ते पित्ताशयापर्यंत पोचते असे रामशंकरकडून समजले. या क्रियेने अशक्ति वाटू लागली कारण खाण्यापिण्यात दूध आणि पुरीविना काही नसे. शिवाय प्रमाणात मला या वस्तु घेता येत नसत. या सर्व क्रिया सुरू करण्यापूर्वी मोताच्या वैद्याने पाठविलेला साल मिश्री पाक तसेच रामशंकरने बनविलेल्या सालंमिश्री पाक सेवनाने शरीरात चांगल्या प्रमाणात शक्ति आली होती व दाढीचे एक दोन पांढरे केस काळे पण झाले होते. परंतु ही क्रिया सुरू केल्यानंतर अशक्ति जाणवली व काळे झालेले दाढीचे केस परत पांढरे झाले, म्हणून रामशंकरच्या सल्ल्याने त्या क्रिया बंद केल्या. या क्रियांच्या दरम्यान नेती शिकविण्यासाठी रामशंकरला एक दोन वेळा विनंती केली, पण त्याने तिकडे कानाडोळा केल्याने ती गोष्ट तशीच राहिली. यानंतर अहमदाबादमध्ये प्लेगचा प्रादुर्भाव झाल्याने शाळा अनिश्चित मुदतीकरिता बंद झाली व मला रामशंकरकडे सरखेजला रहावे लागले. तेथे दुसरे काही काम नसल्याने प्राणायाम शिकविण्यास रामशंकरला सांगितले, व त्याने दाखविल्याप्रमाणे रोज सहा प्राणायामांना सुरुवात केली. रामशंकरने सांगितल्याप्रमाणे या अभ्यासाच्या मुदतीत थोडे तूप सेवन करण्याचे ठेवले. परंतु हे तूप मला पचेना व प्राणायामाचा विपरीत परिणाम दिसून आला. तिथपासून प्राणायाम करण्याचे सोडले ते कायमचेच. मी शिरडीत असताना बाबांनी मला प्राणायाम करण्यापासून थांबविले त्याचे हेच कारण असावे, हे मी वरील अनुभवाने समजलो. प्राणायामाच्या सर्व प्रकारची ओळख झाली पण करण्याचे थांबवले. क्वचितच सरदी, डोकेदुखी झाल्यास प्राणायाम प्रथम करीत असे तो प्रयोग सफल झाला नाही. एकदा डोळ्यांत जळजळ झाली असता, नासिकेवर नजर स्थिर केल्याने ती थांबली; परंतु या सर्व क्रियांचा माझ्या अध्यात्म प्रगतीशी फार संबंध दिसून आला नाही. उलट त्यांनी शरीर मनकेन्द्रित होण्याची भिती वाटली आणि बाबांची फार मर्जी किंवा मनःपूर्वक संपूर्ण संमती असल्याचे न वाटल्याने ह्या क्रियांना खीळ पडली ती कायमची.

इतक्या वर्षांनी म्हणजे १९५७ ऑगस्टमध्ये वरील बाबत लख्ख प्रकाश पडल्यासारखा वाटला. लहानपणी पुष्कळवेळा स्वप्नांत भीति वाटण्यासारखे देखावे दिसत, व मी कावळा होऊन उडून गेल्याने त्या भयातून वाचलो अशी अनेक वेळा स्वप्ने पडत. त्यावरून प्रथमपासूनच माझा विहंगम मार्ग आहे किंवा पूर्वजन्मीचा मी विहंगममार्गी आहे, हठयोगी मार्गी नव्हे, शुकदेवाचा मी अनुयायी, नामदेवाचा नव्हे, अशी आता खात्री पटते. १९१६ च्या आधीच बाबांकडून मला प्रथमपासूनच या प्रकारची सूचना मिळाली ते आता समजते. त्या वेळी बाबा प्रथम म्हणाले, "माझा हा बाबू कसा उडुं उडुं जात होता" ही विहंगममार्गाचीच सूचना आहे. "त्या रांडेने ह्याला चेतविले" ह्या शब्दांचा संबंध मी राधाकृष्ण आईकडे लावला. परंतु रांडेचा अर्थ माया असाच होता. १९५४ साली पूर्वाश्रमीचे वामन प्राणगोविंद पटेल यांनी १४-७-१९५३ रोजी स्वामी साईशरणानंद या

नावाने संन्यास घेतला. त्यांना ६-१-१९५४ रोजी जागृत अवस्थेत साक्षात भगवान शंकरांकडून महावाक्योपदेश मिळाला व तुझा दिक्षा गुरु शुकदेव आहे अशी जाणीव करून देण्यात आली. तुझ्या दीक्षागुरुचे नाव शुकदेव आहे असे बाबांनी सांगितले व आता वराहोपनिषदाचे ३३ ते ४४ पर्यंतचे श्लोक वाचून समजले की बाबांनी मला शुकाचा विहंगममार्ग सांगितला आहे. — वामदेवाचा यम वगैरे परिस्थितीनिगडित हठयोगाचा, योगाचा, सांख्यांचा किंवा सत्वयुक्त कर्मांचा पिपिलीकेचा कीडा मार्ग (धोपट मार्ग) सांगितलेला नाही.

अकरा महिन्यांच्या माझ्या शिरडीतील वास्तव्यात कधी कधी मला थोडा अधिक ताप येई, परंतु बाबांच्या कृपेने त्या वेळी असाच अनुभव येई की, जणू काय तापाशी आपला काही संबंध नाही. खोलीत चातुर्मासांत खूप पाणी गळे, चारी बाजूला पाणी पडे. सगुणरावांनी मला एक लाकडीफळी आणून दिली होती त्यावर मी पडून राही व तेवढीच जागा कोरडी असे. नंतर माझा बंधु वैकुंठ याने बाबांना पत्र लिहिल्यावरून बाबांनी मला घरी जाण्यास सांगितले. म्हणून मी तयार होऊन निघालो.

तुझ्या दीक्षागुरुचे नाव शुकदेव आहे असे बाबांनी सांगितले व आता वराहोपनिषदाचे ३३ ते ४४ पर्यंतचे श्लोक वाचून समजते की बाबांनी मला शुकाचा विहंगममार्ग सांगितला आहे; वामदेवाचा यम वगैरे परिस्थिती निगडित हठयोगाचा, योगाचा, सांख्यांचा किंवा सत्वयुक्त कर्मांचा पिपिलीकेचा कीडा मार्ग (धोपट मार्ग)

# साई-शक्ती

विठ्ठल म्हणे कोणी
म्हणे कोणी दत्त
मारुती तो आहे
राम तोची सत्य
रुप त्याचे अनेक
परी माया एक
आईचं हृदय तेच
त्या साईंची मी लेक
करु कशी भक्ती
द्यावी तीच बुद्धी
साई-साई नित्य गाई
द्यावी मज शक्ती

गीत-गाऊ बाबांचे
स्मरण करू साईंचे
भय त्याची कुणाचे
ज्यासी रक्षण बाबांचे

**— वैजु. प्र. हुल्याळकर**
कलंगुट गोवा
४०३ ५१६.

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

अनुवाद — साईनंद

रविवार १७-१२-१९११

आज प्रार्थनेनंतर मी साईमहाराजांना बाहेर जाताना पाहिले तसेच नंतर ते परत आलेलेही पाहिले. ते आज फार चांगल्या मनःस्थितीत होते. त्यांनी केलेल्या विनोदामुळे आज आमची भरपूर करमणूक झाली. आज मेघराज बेलाची पाने आणण्यासाठी बाहेर गेला होता तो काहीसा उशिरा आला म्हणून दुपारच्या भोजनास उशिर झाला. दुपारी मी हाजीसाहेब फाळके, डॉ. हाटे, श्री. शिंगणे आणि इतर काही यांचेबरोबर गप्पा मारीत बसलो. आज गोखले दूर गेले होते. संध्याकाळ होण्याच्या सुमारास मी मशिदीत गेलो परंतु साई महाराजांनी मला व माझ्या इतर मित्रांना लांबूनच नमस्कार करण्यास सांगितले. माझा मुलगा बळवंत याला मात्र जवळ बोलावून दक्षणा आणण्यास सांगितले. आम्ही बाबांना चावडीसमोर वंदन केले आणि रात्री पुन्हा शेजारतीचे वेळी. आज रात्री साई महाराज चावडीत झोपत आहेत.

माझा घसा आज कालच्या पेक्षा ठीक होता. प्रार्थनेनंतर मी श्री. शिंगणे, वामनराव पाटील व दरवेश साहेब यांचेबरोबर गप्पा मारीत बसलो. दरवेश साहेब कल्याणचे असून त्यांचे संपूर्ण नाव दरवेश हाजी महमद सादिक असे असावे. साई महाराजांना बाहेर जाताना व काही वेळानंतर ते मशिदीत आलेले मी पाहिले.

ते चांगल्या मनःस्थितीत होते आणि त्यांच्या पूजेला बरेच भक्तही आले होते. माझी पत्नीही आली होती. दुपारचे आरतीनंतर मी परतलो आणि भोजनानंतर हाजी साहेब, बापूसाहेब जोग व इतर मंडळी यांचेबरोबर गप्पा मारीत बसलो. संध्याकाळचे सुमारास आम्ही मशिदीत गेलो आणि साईमहाराजांजवळ बसतो तो संध्याकाळ जवळ जवळ झालीच असे समजून साई महाराजांनी आम्हाला निरोप दिला आणि आम्ही चावडीसमोर उभे राहून नित्याप्रमाणे त्यांना तेथून वंदन केले. निवासस्थानी आल्यावर भक्तांचे भजन ऐकत मी बसलो.

मंगळवार १९-१२-१९११

सकाळी मी लौकर उठलो. ताजेतवाने वाटले. प्रार्थना केली आणि मी सर्व दृष्टीने ठीकठाक आहे असे वाटते. मी अद्याप प्रार्थना करीत असतानाच साई महाराज केव्हाच बाहेर पडून गेले होते त्यामुळे मला त्यांचे दर्शन झाले नाही. नंतर मी मशिदीत गेलो व त्यांना उत्तम मनःस्थितीत असल्याचे पाहिले. ते म्हणाले, एक श्रीमंत मनुष्य होता त्याला पाच मुलगे व एक मुलगी होती त्यांनी आपल्या कौटुंबिक मालमत्तेची विभागणी केली. चार मुलांनी आपापला स्थावर व जंगम मालमत्तेचा वाटा घेतला. परंतु पाचव्या मुलाने व त्या एकुलत्या एक मुलीने आपला वाटा घेतला नाही. भुकेने व्याकुळ होऊन ती इकडे तिकडे भटकू लागली व शेवटी साईबाबा जवळ आली. त्यांचे जवळ जड

जवाहिराने भरलेल्या सहा गाड्या होत्या. दरोडेखोरांनी त्या सहा गाड्यांपैकी दोन गाड्या पळविल्या. उरलेल्या चार गाड्या वटवृक्षाखाली त्यांनी ठेवल्या. एवढ्यात बाबा ज्यांना मारुती म्हणून पुकारीत ते त्रिंबकराव कडमडले आणि मग या कथेला वेगळेच वळण लागले. दुपारचे आरतीनंतर मी घरी परतलो; भोजनानंतर मी दरवेश साहेबांबरोबर गप्पा करीत बसलो. ते फार चांगले सद्‌गृहस्थ आहेत. आज वामनराव पाटील दूर रवाना झाले. दुपारी राम मारुती बाबा आले. भजनाचे वेळी ते नृत्य करीत व उड्या मारीत असत. आम्ही सायंकाळी साई महाराजांना पाहिले आणि नंतर पुन्हा रात्री शेजारतीचे वेळी. राम मारुती बाबा भीष्मांचे भजनाचेवेळीही हजर होते. ते त्यावेळी नाचत व प्रसंगी उड्याही मारीत असत. आज दुपारनंतर साई महाराज निमगाव येथे गेले. डेंगळ्यांना ते भेटले. एक झाड तोडले आणि परतले. त्यांचेबरोबर वाद्ये-वाजंत्र्या घेऊन बरीच मंडळी गेली होती आणि त्यांना मिरवणूकीने त्यांनी परत आणले. मी लांबवर कुठे गेलो नाही. राधाकृष्णाबाई आज वाड्यात बाबांचे अभिनंदन करण्यासाठी आल्या होत्या. मी आज त्यांना प्रथमच डोक्यावरून पदर घेतल्याशिवाय पाहिले.

**बुधवार २०-१२-१९११**

मी आज सकाळी खूपच लौकर उठलो आणि काकड आरतीला गेलो. आरती संपता-संपताच मी वामनराव पाटलाना पाहिले. त्यांना तिथे एकाएकी पाहून आश्चर्यच वाटले. नंतर समजले की ते शिरडीला येत असताना वाटेत कोपरगाव येथे त्यांनी पेरू आणण्यासाठी म्हणून गाडीवानाला खटारा गाडी घेऊन पाठविले पण गाडीचे बैलच कुठे पळून गेले! त्यांचा शोध घेण्यासाठी ते खूप खूप भटकले. त्यांना बराच त्रासही झाला. ही कथा मोठी चमत्कारीकच! साई महाराजांनी चावडी सोडली त्यावेळी 'अल्ला मालिक' एवढेच ते म्हणाले. ऐकू जाईल असे आणखीन ते काहीच म्हणाले नाहीत. मी निवासस्थानी परतलो. प्रार्थना केली आणि साई महाराजांना बाहेर जातांना आणि पुन्हा ते मशिदीत परतताना पाहिले. ते उत्तम मनःस्थितीत होते. दरवेश बाबा म्हणाले की आपण बाबांना रात्री भेटलो आणि त्यांनी मला शुभेच्छा दिल्या. मी हे साई महाराजांना म्हणालो पण त्यावर ते काहीच बोलले नाहीत. मी आज साई महाराजांचे पाय चेपले. खरच त्यांचे पाय किती नरम आहेत! आज आमचे भोजन काहीसे उशिराच झाले. भोजनानंतर मी आज आलेली वर्तमानपत्रे वाचत बसलो. सायंकाळच्या सुमारास मी मशिदीत गेलो बाबांचे शुभाशीर्वाद घेतले, चावडी समोर त्यांना वंदन केले; आणि निवासस्थानी परतलो. भीष्मानी भजन सुरू केले. राम मारुती बाबा हे त्यावेळी हजर होते. दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले.

# मला आलेले बाबांचे अनुभव

— श्री. मधुकर शामराव राणे
३७३ अ शनवार पेठ पुणे -

मला श्रीसाईबाबांची भक्ति करण्याची प्रेरणा झाली. साधारण सन् १९५५ ला हैद्राबादला असताना अगोदरची गोष्ट घडलेली आहे. आमच्या घरातील सर्वजण दत्ताचे फोटोला (आरती) नमस्कार दररोज करत होतो. परंतु एकदा असे झाले की, रात्री मला स्वप्नात दत्ताच्या फोटोच्या जागी साईबाबा दिसू लागले. उठल्यावर मी माझ्या वडिलांना स्वप्नातील गोष्ट सांगितली तर ते म्हणाले साईबाबा हे दत्ताचेच अवतार आहेत. तेव्हापासून मला बाबांबद्दल जास्तच ओढ लागली. आमच्याकडे सर्वांची साईबाबांवर श्रद्धा व भक्ति आहे.

मी हैद्राबाद येथे एस.टी. (निझामस्टेट रेल्वे) मध्ये कामाला होतो. मला दरवर्षी रेल्वे पास मिळत होता. हैद्राबाद ते मुंबई मनमाड मार्गे मी पास काढला. मी पहिल्यांदाच शिर्डीला जाण्यासाठी निघालो. मनमाड आल्यावर मनमाड ते कोपरगाव तिकिट काढायला वेळ मिळाला नाही. कारण हैद्राबादची गाडी उशीरा आली. त्याकरिता कोपरगावची गाडी सुटण्याची वेळ झाली. मी व माझ्या बसेस्चे पॅसेंजर गाडीत चढलो. गाडीत बसल्यावर शेजारील लोकांना सहज सांगितले की, माझ्याजवळ तिकीट नाही. गार्ड किंवा चेकरला सांगण्यास वेळ मिळाला नाही. गाडीत खूप गर्दी होती. एक गृहस्थ म्हणाले की, माझ्याजवळ एक जादा तिकीट आहे. मित्र येणार होता. तो आला नाही तर ते तुम्हांला देऊ कां? मी होय म्हणालो. तिकीट घेतले. खाली उतरल्यावर पैसे देतो असे म्हटले ते होय म्हणाले. उतरल्यावर स्टेशनवर सगळीकडे शोधले तर ते कुठेच दिसले नाहीत. साक्षात् बाबांनीच तिकीट आणून दिले असे सर्वजण म्हणाले.

एकदा असे झाले की १९५६ मध्ये माझी बदली हैद्राबादहून औरंगाबादला झाली. एक वर्षांनी माझी पत्नी व मुले शिर्डीला गेली. रजेमुळे मला त्यांच्याबरोबर जाता आले नाही. माझ्या खिशात दोन पास होते. एक नवा दुसरा जुना (तारीख संपलेला) एक पास मी न पाहताच दिला होता. सर्वजण निघून गेल्यावर मी खिशात पाहिले तर नवीन पास माझ्याजवळ होता. जुना पास पत्नीबरोबर दिला होता. लगेच मी ऑफिसमध्ये जाऊन तिथे सांगितले की, स्टेशनवर जाऊन फोन किंवा टेलीग्राम करतो, तेव्हा तेथील लोक म्हणाले तुम्ही काही काळजी करू नका. साईबाबा सर्व पाहून घेतील. चमत्कार असा झाला की, जाता येता दोन वेळा पास चेक झाला. परंतु काहीही न होता सर्व मंडळी खुशाल परत आली. अशा तऱ्हेने बाबांच्यावर सर्व भार टाकल्यामुळे ते माझ्या हाकेला धावून आले.

आम्ही २, ३ वर्षापूर्वी कोल्हापूरला मुलाकडे गेलो असतांना मला मुलीचे पत्र मुंबईहून आले की, तिच्या ५ वर्षाच्या मुलीचा किडलेला दात भूल देऊन २०० रु. खर्च करून काढायचा होता. तिला भूलीची भिती वाटत असल्यामुळे आईला पाठवून कळवले की, भूलीला (ऑपरेशनला) भिवू नकोस कारण साईबाबा आपले पाठीराखे आहेत. मी दररोज बाबांच्या देवळांत जाऊन जप, पोथी वाचत होतो. ३, ४

वेळा दवाखान्यातून नातीला घरी पाठवत होते. कारण सर्दी, ताप, खोकला असल्यामुळे तारीख पुढे ढकलली जात होती. आम्ही ६ महिन्यानंतर पुण्याला आलो. माझ्या मुलीला व नातीला पुण्याला बोलाविले. डॉ. श्रीकांत शारंगपाणी यांच्याकडे दात दाखविण्याकरिता नेले. १० रु. देऊन भूल न देता दात काढला. यावेळेस पण बाबा माझ्या हाकेला धावून आले होते.

त्यांच्या पुस्तकातले वचनच आहे की —

नित्य मी जीवंत। जाणा हेचि सत्य।
नित्य ह्या प्रचित अनुभवे।

असे मला अनेक अनुभव आलेले आहेत. त्यातले काही वर दिलेले आहेत.

# अवतारालाही अवतार संपवावा लागला-

**सौ. उषा अधिकारी,**
सावित्री सदन, बंदर रोड रत्नागिरी

श्री विष्णूने दुर्जनांना ऱ्हास आणि सज्जनांचा सांभाळ करण्यासाठी दशावतार घेतले. यातले काही प्राण्यांच्या रुपात होते. या दशावतारात परशुराम हा चिरंजीव असा अेकच अवतार आहे. बाकी अवतारामध्ये अवतार कार्य पूर्ण झाल्यावर देहत्याग केलेला आहे. राम आणि कृष्ण हे परमेश्वराचे विशेष गाजलेले अवतार. राम अवतारात राक्षसांचा संहार करायचा होता, भरतभूमीवर रामराज्य चालवायचे होते, राजनीतीचा धडा लोकांना शिकवायचा होता हे कार्य होते. कृष्णरुपात दैत्यांच्या विलक्षण त्रासातून भरतभूमीला मुक्त करायचे होते. याच अवतारात परमेश्वराच्या अगाध, अघटीत लीलांचे दर्शन घडवायचे होते. मानवरुपात राहिल्याने साध्या मानवासारखे देहव्यापार- भोग भोगूनही दाखवायचे होते. राम अवतारात वानरांसारख्या प्राण्यांची मदत घेऊन बलाढ्य राक्षसांचा संहार करून भरतभूमीत रामराज्य म्हणजे सुखाचे राज्य लोकांना दाखवून रामाने शरयू नदीत देहत्याग केला. कृष्ण अवतारात पांडवांच्या रथाचे सारथ्य करून कुरुक्षेत्रावर भगवतगीता अर्जुनाला सांगून त्याच्यात वीरश्री निर्माण करून कुरुपुत्रांचा व त्यांचे पाठीशी उभे राहिलेल्या दुष्टांचा संहार करण्याचे कार्य करवून सामान्य माणसाप्रमाणे एका सामान्य व्याधाच्या हातून मृत्यूचा स्वीकार कृष्णाने केला.

आपले बाबा म्हणजे कृष्णच. बाबांचे शिरडीत आगमन होण्यापूर्वी आपल्या भरतभूमीमध्ये हिंदूमुस्लीम भयंकर वाद होता. श्रीबाबांचा अवतार त्यासाठीच होता. मानवजात ही एकच जात. जाती जमाती माणसाने निर्माण केल्या आहेत, परमेश्वराकडे जातपात हा भेद नाही. हे लोकांना त्यांच्या सहवासात राहून पटवून द्यायचे होते. परस्परात आपलेपणा, प्रेम निर्माण करायचे होते. हे कार्य सोपे नव्हते. समाजकंटकांकडून कितीतरी त्रास, अवहेलना सहन करायला लागणार होती. अर्थात हे बाबांना कठीण नव्हते. श्रीबाबा हे प्रत्यक्ष अवतारच होते. त्यांनी ते तोंडाने सांगितले नाही पण त्यांच्या विविध लीला, त्यांचे

अचाट सामर्थ्य, निसर्गावर असलेली त्यांची अफाट सत्ता यांनी ते सिद्धच झाले होते. श्रीबाबा शिरडीत ६० वर्षे वास्तव्य करुन होते. रुई, निमगाव, राहाते या तीन गावापलिकडे ते कुठेही गेले नाहीत- त्यांनी आगगाडी कधी पाहिलेली नव्हती, तरी सगळे वेळापत्रक त्यांना तोंडपाठ असे. भक्तांच्या बहात्तर पिढ्यांचा ते इतिहास सांगत. आपले किती जन्माचे संबंध आहेत ते सांगत. पुढे होणाऱ्या गोष्टी त्यांना आधीच कळत. ते पूर्ण अंतर्ज्ञानी होते. श्रीबाबांनी आपल्या सहवासात आलेल्या, श्रद्धा सबुरी ठेवणाऱ्या भक्तांना मोक्षपदाला नेले. भक्तांवर मातेसारखें प्रेम केले. भक्तांना कधीही कसलाही उपदेश न करता त्यांचे आचरण सुधारले. त्यांच्यात बंधुभाव निर्माण केला.

प्रारंभी फकीर म्हणून शिरडीत आगमन झाले तेव्हा लोक त्यांना वेडा समजत. मुले टिंगल करीत. पण बायजाबाई पाटील मात्र त्यांना देवच समजत. पाठोपाठ रानावनात हिंडूनही त्यांना प्रेमाचे चार घास भरवत. त्यांचे ८।१० वर्षांचे लाडके लेकरु या आपल्या मानल्या मामाला हट्टाने नवीन कपडे घालायला लावी. बाबा बायजाबाईचा भाव पाहून मशिदीत राहायला लागल्यावर तात्या तिथे झोपायला लागला. कोवळे ८।१० वर्षे वय. सधन पाटलांचा एकुलता एक लाडका लेक. पण बायजाबाईने त्याविरुद्ध चकार शब्द काढला नाही. आपले सुदैवी पोर देवाच्या सहवासात राहिले तर त्यात त्याचेच कल्याण आहे ही ती भक्तिमान स्त्री जाणून होती. ती बाबांवर तात्या-इतकीच माया करीत होती. तिचा मृत्यू होण्यापूर्वी तिने तान्या बाळाला बाबांच्या स्वाधीन करून म्हटले होते की याचा नीट सांभाळ करा. लेकरु द्वाड आहे, तापट आहे. श्रीबाबांनी त्यांना वचन दिल्यावर बायजाबाई सुखाने मरणाला सामोऱ्या गेल्या. श्रीबाबांना पुढचे भाकीत आधीच कळत असल्याने तात्यांचा मृत्यूकाळ दिसू लागला होता. तो एका रात्री स्वप्नात त्यांनी रामचंद्र पाटलांच्या कानावर घातला होता. त्याला ते खरेही वाटले होते आणि खरोखरच तात्या आजारी पडला आणि श्रीबाबांचे भाकीत खरे होणार असे दिसू लागले. पण बायजाबाईला दिलेले वचन बाबा विसरले नव्हते. त्यांनी आपल्या निर्वाणाची कुणालाही कल्पना न देता तात्याच्या मृत्यूच्या बरोबर वेळेला स्वतः समाधी घेतली. श्रीबाबांचा आर्युदाय संपत आला होता त्याचा अर्थ नव्हे. श्रीबाबा म्हणत असत "मी मरुन जाईन पण दिलेला शब्द आणि वचन पुरे करीनच करीन या मशिदीत बसून मी असत्य भाषण कधीच करीत नाही." त्याप्रमाणेच श्रीबाबा वागले- रामाने सामान्य माणसांप्रमाणे १४ वर्षे वनवास भोगला. श्रीकृष्णाने स्यमंतक मण्याची चोरी केल्याचा आरोप सहन केला. श्रीबाबांनी वेडा, खुळा वगैरे विशेषणे स्वतःना लावून घेतली. राम-कृष्णांनी राजवैभव तरी भोगले. आपल्या या शिरडीतल्या राजाने मात्र कसलेच उपभोग भोगले नाहीत. भिक्षा मागूनच पोट भरले. सामान्यांसारखेच राहिले.. आपले असामान्य दाखवता दाखवता विजयादशमीच्या साडेतीन मुहूर्तातील एका सुमुहूर्तावर सामान्य माणसाप्रमाणे भुर्रकन अनंतात विलीन झाले. अवतारालाही आपला अवतार प्रेमळ भक्तासाठी संपवावा लागाला.

# बी. एड. ला प्रवेश बाबांनी दिला

**सौ. प्रमिला लिलाधर धडाडे**
एम. ए. बी. एड.
अशोकनगर, नागपूर.

**''जरी हे शरीर गेलो मी टाकून ।।
तरी मी धावेन भक्तांसाठी''**

शिरडी येथील साईबाबांच्या दर्शनाला आम्ही सर्वजण ५ डिसेंबर १९८४ रोजी गेलो. गुरूवारला सायंकाळी आरतीच्या वेळी मी मंदिरात उपस्थित होते. आरती संपल्यानंतर साईबाबांच्या मंदिरात मी बसले. त्यावेळी मला ''साईबाबांची ११ वचने'' लिहिलेला बोर्ड दिसला. औत्सुक्यापोटी मी तो बोर्ड वाचला. त्यातील 'जरी हे शरीर गेलो मी टाकून। तरी मी धावेन भक्तांसाठी' हे वचन वाचल्याबरोबर मला त्यांच्या वचनाची प्रचिती आलेल्या अनुभवाची आठवण झाली.

माझे पती एम. ए. झालेले असून ते 'जे.सी. डी. गर्ल्स हायस्कूल' नागपूर येथे नोकरीवर आहेत. फार दिवसांपासून बी.एड. होण्याची त्यांची इच्छा होती. पाच वर्षापासून ते सारखे बी.एड. ट्रेनींगला ॲडमिशन मिळावी म्हणून फॉर्म भरत होते. पण ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यांना बी.एड. साठी ॲडमिशन मिळत नव्हती. ३ वर्षापूर्वी तर नागपूरच्या बी.एड. ट्रेनिंग कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळणार होती व तसे आश्वासन पण मिळाले होते. पण ऐन वेळेवर कमी पर्सेन्टेजमुळे ॲडमिशन मिळाली नाही. त्यामुळे ते मनोमन जरा निराश झाले. मला देखील वाईट वाटत होते.

मी मग साईबाबांना शरण गेले. त्यांना विनंती केली, ''साईबाबा, हे ॲडमिशन करिता इतके प्रयत्न करतात. पण ह्यांची ॲडमिशन होत नाही आणि बी.एड. करण्याची ह्यांची फार फार इच्छा आहे. तेव्हा साईबाबा जर तुम्ही आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करता, अडीअडचणीच्या वेळी साथ देता तर मग माझ्या मिस्टरांना ॲडमिशन का मिळू देत नाही? कसेही करा. पण ह्यांना जवळपास कुठे तरी ॲडमिशन मिळू द्या. जर तुम्ही माझ्या मिस्टरांना ॲडमिशन मिळू दिली तर आम्ही शिरडीला तुमच्या दर्शनास येऊ.'' अशा प्रकारचे साईबाबांना साकडे घातले. जर खरोखर तुम्ही भक्तांची इच्छा पूर्ण करणारे भक्तवत्सल असाल, तर माझी ही इच्छा पूर्ण कराल, नाही तर नाही असेही मी अज्ञानीपणाने म्हटले.''

पुन्हा ह्यांनी १९८४ च्या उन्हाळ्यात नियमितपणे बी.एड. करण्यासाठी फॉर्म भरला. पण नंबर काही लागतच नाही. तेव्हा ह्यांच्यापेक्षा मी जास्त दुःखी व निराश झाले. कारण मी बी.एड. आहे. माझ्या मिस्टरांची माझ्यापेक्षा कमी डिग्री असू नये. ही माझी इच्छा म्हणून ह्यांना ॲडमिशन मिळाली नाही की, मला वाईट वाटायचे. नागपूरचे बी.एड. ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले.

आणि ----- अगदी अकस्मात ऑगस्ट महिन्यामध्ये एक बंद लिफाफा पोस्टाने घरी आला. मी तो लिफाफा फोडून वाचायला सुरुवात केली. त्यात लिहिले होते, 'यावर्षी

काटोलला 'नवीरा महाविद्यालयामध्ये' बी.एड. ट्रेनींग कॉलेज सुरू करण्याची सरकारने परवानगी दिली आहे. तेव्हा आपल्याला ॲडमिशन पाहिजे असल्यास १५०० रु. नगदी भरावे' ते पत्र वाचून मला अतिशय आनंद झाला. कारण 'ॲडमिशन मिळणार' म्हणून माझी आशा पालवली. मी धावतच देवघरात गेले व साईबाबांच्या फोटोकडे बघून भारावलेल्या अंतःकरणाने म्हटले, "बाबा तुमची लीला किती अगाध आहे. किती सहजतेने, घर बसल्या तुम्ही ह्यांना ॲडमिशन मिळू देण्याचे स्वप्न पूर्ण केले. खरंच बाबा, तुम्ही आपल्या भक्तांवर सदैव कृपादृष्टी ठेवता व त्यांची इच्छा पूर्ण करता. पण आम्ही पामर मात्र, तुमची लीला समजून घेऊ शकत नाही. कारण आम्ही 'पी हळद अन् हो गोरी' अशा प्रवृत्तीचे लोक. खरोखरच बाबा, तुमच्यावर श्रद्धा ठेवली तर तुम्ही भक्तांची इच्छा पूर्ण केल्याशिवाय राहत नाही. त्याकरीता भक्तांजवळ सबुरी असायला हवी." अशा प्रकारे बाबांनी, घर बसल्या अगदी सहजतेने, ह्यांना बी.एड. ला ॲडमिशन मिळवून देण्याची, माझी कितीतरी दिवसांची इच्छा पूर्ण केली, व आता ते बी.एड. ट्रेनींग बाबांच्या कृपेने पास देखील झालेले आहेत.

आणि या सर्व प्रकारावरून "जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठी' या त्यांच्या वचनाची प्रचिती येते. तेव्हा सर्व साई भक्तांना माझी आग्रहाची विनंती आहे की, त्या साईवर तुम्ही श्रद्धा ठेवा म्हणजे तुम्हाला सबुरीचे फळ मिळेलच मिळेल.

"श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय"

●●●●●●

# साईबाबांच्या द्वारकामाईने कोणाकोणाला वाचविले

— **श्री. माधव गजानन गोरे.**
विनायक बाग,
बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला (पश्चिम), मुंबई : ४०० ०७०.

**लोहाराची मुलगी**

अेका धनत्रयोदशीला बाबांनी धूनीत हात घालून दूरवर रहात असलेल्या मुलीला भट्टीत पडत असताना वाचविले.

**भिमाजी पाटील**

क्षयरोगी भिमाजी पाटलाला जेव्हा द्वारकामाईत आणले तेव्हा बाबा म्हणाले या द्वारकामाईत तुझे आता पाऊल पडले तेव्हा तुला नक्की दुखण्यापासून आराम पडणार व त्याप्रमाणे भिमाजी पाटील क्षय मुक्त झाला.

**बाळा शिंपी**

जेव्हा बाळा शिंपी याचा हिवताप जाईना तेव्हा तो अेक दिवस द्वारकामाईत आला व बाबांना आपले दुःख सांगितले. बाबांनी त्याला सांगितले "लक्ष्मीआईच्या देवळाजवळच्या काळ्या कुत्र्याला दहिभात खाऊ घाल" त्याप्रमाणे बाळाने केल्याबरोबर त्याचा हिवताप नाहीसा झाला.

**बापूसाहेब बुट्टी**

अेकदा शिर्डीत असताना बापूसाहेब बुट्टींना सारख्या वांत्या व जुलाब होऊ लागले, तेव्हा भक्तांनी त्यांना बाबांसमोर द्वारकामाईत आणले. तेव्हा बाबांनी त्यांच्यासमोर बोट हलवून सांगितले "आता शौचास होता कामा नये व वांतीही येता कामा नये" त्याप्रमाणे दोन्ही व्याधींनी पलायन केले व बापूसाहेब खडखडीत बरे झाले.

**आळंदीचे स्वामी**

अेकदा ह्या स्वामींना कर्णरोगाने बेजार केले म्हणून ते द्वारकामाईत आले तेव्हा बाबांनी त्यांना आशीर्वाद दिला "अल्ला अच्छा करेगा" नंतर स्वामी पुण्यास निघून गेले व ८ दिवसातच त्यांचा कर्णरोग बरा झाला.

**काका महाजनी**

अेकदा काका महाजनींना जुलाबाने अगदी हैराण केले तेव्हा बाबांनी द्वारकामाईच्या सभामंडपात अेक शेंगदाण्याची थैली पडली होती त्यातील दाणे उचलले व ते सोलून काकांना खायला दिले व नंतर त्यांना पाणी प्यायला दिले व त्या क्षणापासून काकांचे जुलाब बंद झाले.

**श्री दत्तोपंत**

हरदा शहरचे श्री. दत्तोपंत पोटशूळाच्या व्याधीने १४ वर्षे गांजले होते. तेव्हा अेक दिवस ते शिरडीला द्वारकामाईत आले व बाबांना आपल्या व्याधीबद्दल सांगितले. तेव्हा बाबांनी त्यांना विभूती दिली व डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला व तेव्हापासून त्यांचा पोटशूळ पूर्ण बरा झाला.

**डॉक्टर पिल्ले**

नारुग्रस्त डॉक्टर पिल्ले अेकदा द्वारकामाईत बाबांच्या शेजारी बसले होते. तेव्हा थोड्यावेळाने संध्याकाळ झाली म्हणून अब्दूल पणत्या पेटविण्याकरिता द्वारकामाईत आला व पणत्या लावता लावता अब्दूलचा पाय चुकून पिल्यांच्या नारुग्रस्त पायावर पडला व त्यातून नारु बाहेर पडले व पिल्यांना अेकदम आराम पडला.

**मालेगावच्या डॉक्टरांचा पुतण्या**

अेकदा डॉक्टरांच्या पुतण्याला दाढ्याव्रण झाला होता. खूप औषधे झाली, परंतु गुण येईना. म्हणून डॉक्टर त्याला घेऊन शिर्डीला आले, व द्वारकामाईत येऊन बाबांना रोगाबद्दल निवेदन केले, बाबांनी त्यांना अुदी दिली व रोज व्रणावर फासावयास सांगितली. व त्याप्रमाणे ८ ते १५ दिवसात त्या पुतण्याला उत्तम गुण आला.

**शामा**

अेकदा शामाला सर्पदंश झाला तेव्हा लोकांनी त्यांना उचलून द्वारकामाईत आणले, तेव्हा बाबांनी शामाला पाहून खालील उद्‌गार काढले, "चढू नको भटुरड्या वर। चढशील तर खबरदार। चल निघ जा खाली उतर" हे उद्‌गार अर्थात सर्पविषाला उद्देशून होते व त्याप्रमाणे शामा विषमुक्त होऊन बरा झाला.

# बाळाला बरे वाटले

जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी

## तरी मी धावेन भक्तांसाठी

**सौ. कल्पना एस्. पोतदार**
९४ एम्/७१ जनता नगर
ताडदेव रोड
मुंबई — ४०० ०३४.

हे साईबाबांचे वचन खरोखरीच सार्थ आहे. माझ्या बहिणीला १२ ऑक्टोबर १९८५ रोजी शस्त्रक्रिया करून पहिला मुलगा झाला. दहा बारा दिवसानंतर त्या मुलाची तब्येत बिघडली. म्हणून त्याला गिरगावातील एका मोठ्या डॉक्टरांना दाखविले. त्यांनी त्याला न्युमोनीया झाला आहे असे सांगून हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यास सांगितले. अकरा दिवस त्या हॉस्पीटलमध्ये त्याला ठेवले. तेथे त्याला ऑक्सिजनवर ठेवले. जवळजवळ वीस औषधाच्या बाटल्या, इंजेक्शने झाली. चार वेळा त्याचा एक्स-रे काढला. रक्त, लघवी, संडास सर्व तपासले परंतु अजिबात त्या बाळाला गुण आला नाही. म्हणून आम्ही तेथून त्याला दुसऱ्या मोठ्या डॉक्टरांकडे नेले. जन्मतः त्याचे वजन दोन किलो होते. नवीन डॉक्टरांनी वजन केले तेव्हा ते एक किलो सातशे ग्रॅम भरले. म्हणजे वजन खूपच कमी झाले. आम्ही सर्व काळजीत पडलो. साईबाबांचा धावा करू लागलो. त्या डॉक्टरांनी त्याला भाटिया हॉस्पीटलमध्ये ठेवण्यास सांगितले. त्या मुलासाठी परदेशी दुधाचा डबा चालू करण्यास सांगितले. त्या दुधाने त्याला बरे वाटले. त्याचा कफ कमी झाला. नंतर एकाएकी त्याला संडास सुरू झाला. ताप येऊ लागला. डॉक्टरानी त्याचे तोंडाने दूध पिणे बंद केले, व त्याला नाकात नळी घालून दूध देऊ लागले. चार एक्स-रे काढले. बेरीयम हे पांढरे औषध प्यायला देऊन एक्स-रे काढला. डॉक्टर म्हणत, अन्ननलिकेत काही तरी दोष असावा असे चाळीस टक्के वाटते. नाकातली नळी किती दिवसानी काढणार असे डॉक्टरांना विचारले असता ते म्हणाले, किती दिवसानी काय विचारता? किती महिन्यानी काढणार असे विचारा. या त्यांच्या वाक्याने आम्ही खूपच

घाबरलो. बाळाची आई तर काळजी करून बारीक होत चालली. मधून मधून बाळाला शंभर पर्यंत ताप येऊ लागला. त्या हॉस्पीटलमध्ये एक महिना झाला. परंतु बाळाची तब्येत सुधारेना. शेवटी ते हॉस्पीटल आम्ही सोडले, व बाळाला दादरला आठवले डॉक्टरांकडे आणले. त्यांनी परत त्याचे रक्त, लघवी, संडास सर्व तपासले. दादरला कश्यप हॉस्पीटलमध्ये त्याला ठेवले. त्याला रक्ताची जरूरी आहे असे डॉक्टरांनी सांगितले. त्याप्रमाणे त्याला शंभर सीसी रक्त चढवले. नंतर बेरीयमच्या साह्याने एकस-रे मध्ये काही दोष आढळल्यास त्याचे ऑपरेशन करावे लागेल असे डॉ. आठवले व डॉ. लोकेश्वर यानी सांगितले. बाळाला आता तोंडाने थोडे थोडे दूध देऊ लागले. आम्ही साईबाबांचा धावा सुरू केला. नवस केला. आमच्या बाळाचा फोटो निर्दोष असू दे म्हणून साईबाबांना विनवणी केली, आणि साईबाबांच्या कृपाप्रसादाने बाळाच्या छातीच्या काढलेल्या फोटोत बिलकुल दोष नाही असे डॉक्टरानी सांगितले. आमचे सर्वांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले. साईबाबांच्या कृपेने आमचा बाळ सात दिवसात बरा झाला. गुरूवारी त्याला डॉक्टरांनी घरी पाठवले. साईनिकेतनमध्ये जाऊन साईबाबांच्या चरणावर आम्ही बाळाला ठेवले, व घरी आणले. २६ डिसेंबर ८५ रोजी दत्तजयंतीच्या शुभ मुहूर्तावर बाळाचे सिद्धेश हे नाव ठेवण्यात आले. आता तो तीन महिन्याचा झाला. बाबांच्या कृपेने तो मजेत आहे.

अशीच साईबाबांची कृपादृष्टी आपणा सर्वांवर राहो हीच साईचरणी प्रार्थना.

# भक्तांची माऊली-श्रीसाईबाबा

— **श्री. ए. एस्. फर्नांडीस.**
चमणकरवाडी, उभादांडा, वरचे माड,
मु. वेंगुर्ला, ता. सिंधुदुर्ग, ४१६५१६.

सदगुरू वाचोनी सांपडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी॥
आपणासारिखे करिती तात्काळ। नाही काळवेळ तया लागी॥
लोह परिसाची न साहे उपमा।सद्‌गुरू महिमा अगाधीचि॥
तुका म्हणे कैसे आंधळे हे जन। गेले विसरून खऱ्या देवा॥॥

या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे हा संसार रूपी भवसागर तरावयास सद्‌गुरू श्री साईबाबांशिवाय तरणोपाय नाही. त्यांचे आपण अनन्य भावाने पाय धरावे. त्यांच्यावर आपण भार घालावा व निश्चिंत मनाने |असावे, व आपले सत्कर्म आचरावे. मग त्यांना आपल्यासारखे करायला काळ वेळ लागत नाही. लोखंड आणि परिस यांची तुलना करून शोभत नाही. लोखंड हे लोखंडच. परंतु लोखंडाला परीसाचा स्पर्श होताच त्याचे

सोने होते. त्याचप्रमाणे सद्‌गुरू महिमा अगाध आहे. त्या सद्‌गुरू श्रीसाईबाबांचे आपण पाय धरल्यानंतर आपल्या जीवनाचे सोने झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणजेच आपल्या जीवनाचे सार्थक होते. श्रीसंत तुकाराम महाराज म्हणतात, "आपण सर्व लोक आंधळे आहोत. आपल्याला खरा देव कोणता हे सुद्धा समजत नाही. आपण भ्रामक समजुतींना बळी पडतो. भोंदू साधूंना भजतो. त्यांच्याकडे आपण जाऊन सुखाची याचना करतो. परंतु त्यांच्याकडून आपल्याला सुख मिळण्यापेक्षा दुःखच, निराशाच पदरी पडते. म्हणून आपण सद्‌गुरू श्रीसाईबाबांना अनन्य शरण जावे.

आपले मानवी जीवन अनेक सुख दुःखाचे मिश्रण आहे. त्या सुखदुःखांना आपण तोंड देऊन त्यातून मार्ग काढला पाहिजे. जो तो आपापल्या पूर्व जन्मांतील कर्माच्या फलाप्रमाणे सुख अगर दुःख भोगीत असतो. दुःखाशिवाय सुख आणि सुखाशिवाय दुःख असूच शकत नाही.

मनुष्य जीवन हे क्षणभंगुर आहे. ते शाश्वत असे जीवन नाही. तर आपण शाश्वत सुखाच्या मागे लागले पाहिजे. याकरिता "साईभक्ती" या साधनाची कास धरून आपला मार्ग आखला पाहिजे

आपले साईबाबा हे महान संत होते. साईबाबा हे साक्षात् अवतारी पुरूष होते. साईबाबा हे साक्षात् परब्रम्ह होते.साईबाबा परमेश्वर होते. ईश्वर हा एकच असतो. त्यांची नावे अलग अलग असतात. साईबाबांनी त्यांच्या जीवनात अनेक चमत्कार करून दाखविले. पाण्याने पणत्या पेटविल्या. हरवलेली घोडी दाखविली. चिलीम पेटविण्यासाठी चिमटा दगडावर आपटून विस्तव उत्पन्न केला, उदी देऊन गोर गरीब, दीन दुबळ्यांचे, दुःखी जीवांचे जीवन आनंदी केले. स्वतः डोक्याला चिंधी, अंगात कफनी, हाती करवंटी या वेषात ते जीवन जगले.

साईबाबांजवळ जातीभेद, धर्मभेद नव्हता. बाबांच्या भक्तांत सर्व धर्मिय लोक होते. आजही ते आहेत. हिंदु मुस्लिम हे दोन्ही साईचे भक्त होते. साईच्या पाशी हिंदू, मुस्लिम, ख्रिस्त पारशी, शीख असा भेदभाव नव्हता. म्हणूनच सारेच जण साईच्या प्रेमाचे चाहते होते व त्या साऱ्यानाच साईप्रेमाचा लाभ झाला.

तो हा साई संतवर। ईश्वराचा दुजा अवतार।
डोई तयाच्या पायांवर। ठेविता कृपावर ठेवील॥ श्री साई सच्चरित अध्याय ११-ओवी १४९ |

आपण श्री माऊलीच्या चरण कमलावर अनन्य भक्तीने डोके (डोई) ठेवावे. म्हणजे ती माय माऊली आपणावर कृपाकर ठेविल्याशिवाय राहणार नाही.

आपली साईबाबांवरील भक्ती खाली दर्शविल्याप्रमाणे असावी. एखादी मांजरी आपल्या पिल्लांना दुध पाजून बाहेर गेल्यावर तिची पिल्ले तिच्या मागून परत जातात व पुन्हा त्या मांजरीला लुंचतात. ती मांजरी काही वेळ गुरगुरते. परंतु थोड्याच वेळात ती जमिनीवर पहुडताच ती शांतपणे आपल्या पिल्लांना दूध पाजते. त्या मांजरीच्या पिल्लांच्या तीक्ष्ण नख प्रहारांनी त्या मातेची ओटी दूधाने भरते व त्यातून दूधाच्या धारा वाहू लागतात. ती आपल्या पिल्लांना जवळ कवटाळते व त्यांना मनोसक्त दूध पाजते.

जैसी त्या बाळांची अनन्य भक्ति। मातेसी करी दुग्धोत्पत्ति ॥
तैसीच तुमची साईपदासक्ति। द्रवतील चित्तीं साईतें। श्री साईसच्चरित अध्याय -१५ ओवी १७

ज्या प्रमाणे त्या बाळांचे आपल्या आईवर अनन्य प्रेम असते. त्या उत्कट प्रेमामुळेच त्या आईला दुधाची उत्पत्ती होते. त्याचप्रमाणे आपण श्री साई चरण कमलांची आसक्ती धरली पाहिजे. आपण साईबाबांची सेवा करावी. आपण कोणतीही गोष्ट करताना साईबाबांची आठवण करावी, म्हणजे कोणतेही कठीण कार्य असले तरी साईकृपेने पार पडेल.

मुंबई नगरामध्ये शेट हरिश्चंद्र पितळे नावाचे सद्‌गृहस्थ होते. त्यांचा एक मुलगा होता. तो नेहमी आजारी पडत असे. त्या मुलाला वारंवार फिटस् येत असत व तो बेशुद्ध पडत असे. त्या आजारपणामुळे ते अगदी दुःखी झाले होते. गावातील सर्व डॉक्टर, वैद्य झाले. परदेशी वैद्य झाले. पण त्याला काहीच गुण येईना. फक्त साधुसंतांच्या भेटी घेणे शिल्लक राहिले होते.

सन १९१० साली मुंबई प्रांतात श्री संत दासगणू महाराजांची किर्तने झाली त्या किर्तनामधून त्यांनी सद्‌गुरू श्री साईबाबांची ओळख करून दिली. ज्यावेळी ते कीर्तन करीत त्यावेळी ते आपल्या समोर श्री साईबाबांची प्रतिमा ठेवून कीर्तन करीत असत. ज्यावेळी ते साईबाबांचे गुणगान गात, त्यावेळी त्यांचे अंतःकरण गहिंवरून येई व श्रोत्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहत असत. त्यामुळे साईबाबांची कीर्ती सगळीकडे पसरली. त्यावेळी शिरडी ह्या छोट्याशा गावाला पंढरपूरचे क्षेत्राचे स्वरूप आले. व विविध प्रकारचे लोक शिरडीच्या यात्रेची वारी करण्यासाठी येऊ लागले.

श्री संत दासगणू महाराजांनी आपल्या किर्तनातून साईभक्तीचा प्रसार केला. साईबाबांच्या उदी प्रसादाने भूत-पिशाच्चे पळतात, त्याचप्रमाणे आशिवादनि नाना प्रकारच्या पीडा टळतात. साईबाबांच्या दृष्टीक्षेपाने कोणत्याही प्रकारच्या बाधा निवारण होतात. अशा प्रकारे दासगणूंच्या कथा-किर्तनातून, त्यांच्या प्रासदिक ग्रंथातून श्री साईबाबांचे महात्म्य वाढीस लागले. त्यामुळे पितळे यांची श्रीसाईबाबांस पाहण्यास उत्कंठा वाढली. ते आपल्या मुलाबाळांस बरोबर घेऊन सहपरिवार शिरडीला आले. त्यांनी प्रथम आपल्या मुलास बाबांच्या पायांवर घातले व आपण बाबांस साष्टांग लोटांगण घातले. इतक्यात तेथे एक विपरीत दृश्य घडले. श्रीसाईबाबांची व त्या मुलाची दृष्टादृष्ट होताच मुलगा बेशुद्ध पडला. त्या मुलाने आपले डोळे गरागरा फिरविले. हे पाहून त्याचे आईबाप म्हणजे पितळे कुटुंब गडबडले. तो मुलगा भूमीवर पडताच त्याच्या तोंडातून फेस येऊ लागला. त्याचा श्वास निघून गेला असे वाटू लागले. तो मुलगा मरण पावला असे समजून त्या मुलाच्या आईवडिलांची भितीने गाळण उडाली. यापूर्वी त्या मुलाला अनेक झटके येऊन गेले होते. परंतु इतका वेळपर्यंत त्याला परत शुद्धीवर येण्यास वेळ लागला नव्हता. ही 'न भूतो न भविष्यति' अशी प्राणांतिक गति पाहून त्या मुलाची माता आक्रोश करू लागली.

त्या मुलाची आई म्हणू लागली, "आम्ही आलो कशासाठी आणि हे झाले काय? आम्ही आलो बाळाच्या उपायासाठी, तर हा झाला अपाय, असे हे श्रीसाईबाबांचे पाय

घातकी आहेत काय? तर हा आमचा येण्याचा खटाटोप व्यर्थ आहे. चोरांच्या भितीने घरात जावे, ते घरच अंगावर कोसळून पडावे, तशी आमची ही स्थिती झाली. वाघ खाईल म्हणून गाई पळून जातात, तर त्यांना वाटेत भेटतो कसाई, तसेच हे आमचे झाले. वाटेतील पांथस्थ (वाटसरू) उन्हात तापला म्हणून वृक्षच्या छायेत येऊन बसला. तर तो वृक्षच त्याच्या अंगावर कोसळून पडावा, तशी ही आमची अवस्था झाली. असे नाना प्रकारचे विकल्प त्यांच्या मनात आले.

हे पाहून श्री साईबाबांनी त्यांना आश्वासन देऊन सांगितले. तुम्ही जरा मनात धीर धरा. तुम्ही तुमच्या मुलास बिऱ्हाडी घेऊन जा. थोड्या वेळानंतर त्याला परत शुद्धी येईल व तो जागा होईल. उगाच घाई करू नका. पुढे असे केल्यानंतर श्रीसाईबाबांची अमृतवाणी खरी ठरली. त्यांचा मुलगा परत शुद्धीवर आला. पितळे सहकुटुंब आनंदित झाले. त्यांच्या मनातील वाईट विचार नाहीसे झाले.

वाड्यात नेल्यानंतर ताबडतोब त्यांचा मुलगा शुद्धीवर आला. त्यामुळे त्याच्या आईबापाना अत्यानंद झाला. पितळे पत्नीसमवेत बाबांच्या दर्शनाला येऊन अति नम्रतेने त्यांनी बाबांना साष्टांग नमस्कार घातला. ते आपल्या मुलाला पाहून उठून बसले व त्यांनी बाबांचे आभार मानले. ते बाबांचे पाय चेपीत बसले. एवढ्यात बाबा हसत हसत पितळ्यांना म्हणाले, "तुझ्या मनामध्ये संकल्प-विकल्प उठले होते, तुझ्या मनामध्ये विविध प्रकारचे विचार-तरंग उठले होते ते आता तरी शांत झाले आहेत काय?

'ठेवील निष्ठा धरील सबूरी। तयासी श्री हरी रक्षील॥" (श्री साईसच्चरित अध्याय २६, ओवी ८३)

तर बाबा म्हणतात, "जो माझ्यावर दृढ श्रद्धा ठेवील, तसेच सबूरी धरील. त्यालाच ईश्वर रक्षील. श्रद्धा म्हणजे दृढ भावना, भक्ति वा निष्ठा होय."

'तुम्ही कोणी कुठेही असा। भावे मजपुढे पसरिता पसा।
मी तुमचिया भावा सरिसा। रात्रंदिसा उभाच।।

श्री साईबाबांनी आपणांस असे सांगितले आहे की, "तुम्ही कुठेही असा. तुम्ही अंतःकरण पूर्वक माझी प्रार्थना करा. म्हणजे मी तुमच्या हांकेला धावून येईन. अगदी आर्ततेने तुम्ही माझी विनवणी करा. म्हणजे मी तुमच्या मागे-पुढे उभा आहे समजा."

"जरी मी गेलो हे शरीर टाकून
तरीही धावेन भक्तांसाठी॥"

जरी मी हे शरीर टाकून गेलो, तरी मी जीवंत आहे. आणि याची प्रचिती तुम्ही घ्या. अशी श्री साईबाबांनी ग्वाही दिली आहे. म्हणजे साईबाबा हे गेले नाहीत. ते नित्य जीवंत आहेत. व नित्य जीवंतच राहणार. श्री साईबाबा हे जन्ममरणातील आहेत. ते सर्व कालीन आहेत, ते सर्व स्थळी आहेत. ज्यावेळी हिरण्यकश्यपूने भक्त प्रल्हादाला विचारले कि, तुझा नारायण आहे तरी कोठे? तेव्हा प्रल्हादाने त्याला उत्तर दिले. ह्या समोर दिसणाऱ्या खांबात देखील माझा नारायण आहे. त्यावळी हिरण्यकश्यपूने त्या खांबावर लाथ मारली. लगेच त्या खांबातून नरसिंह रूपाने भगवान विष्णूला प्रगट व्हावे

लागले. त्याचवेळी जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी आपले श्री साईबाब आहेत. आपल्या भक्तांच्या समीप आहेत. त्यांच्या अंतःकरणात आहेत.

''मग जो गाई वाडें कोंडे।
माझे चरित्र माझे पवाडे।
तयाचिया मी मागेपुढे।
चोहिंकडे उभाचि॥ (श्री साईसच्चरित अध्याय ३-ओवी १२)

या करिता प्रत्येक मुनष्याने, प्रत्येक साईभक्ताने श्रद्धा व सबुरी या दोन गोष्टींची कास धरून श्रीसाईबाबांची भक्ती करावी. त्यासाठी आपण नित्यनेमाने श्री साईबाबांचे नामस्मरण (जप), प्रार्थना, नित्यनेमाने आरती, पोथी वाचन ह्या गोष्टी करण्याची दक्षता पाळावी. म्हणजे आपल्यावर सद्गुरू श्री साईबाबांची कृपा झाल्याशिवाय राहाणार नाही.

अशा या अनंत कोटि ब्रम्हांडनायक राजाधिराज योगिराज परब्रम्ह सच्चिदानंद सद्गुरू श्री साईबाबांना माझे कोटी कोटी प्रमाण!!

॥जय श्री साई समर्थ॥

# श्री साईनाम स्मरण

— श्री. प्रभाकर कोळमकर
बी.ए.बी.एड. एल.एल.बी.
१९ गुंफा दर्शन, दत्तपाडा
बोरीवली, मुं. ६६.

श्री साईलीलातील वेगवेगळ्या थरातील भिन्न भिन्न व्यवसायातील लहान-थोर भक्तांनी प्रसिद्ध केलेले अनुभव वाचले म्हणजे श्रीबाबांचे अस्तित्व या विश्वास आहे याचा भक्कम पुरावाच वाटतो. जणु काय बाबांच्या प्रत्यक्ष सहवासाचा भक्तांनी प्रसिद्ध केलेला कबुलीजबाबच! पंचतत्त्वांकित विश्वाच्या अणुरेणूत साक्षात् असलेल्या श्री बाबांच्या उपस्थितीचा भक्तांनी सिद्ध केलेला साक्षात् पंचनामाच!

असंख्य भक्तांनी श्रीबाबांच्या केवळ नामस्मरणानेच चिंतनाने असंख्य संकटांवर मात केलेली आहे. नामस्मरणाने नामजपाने- भक्तांना कवच कुंडले धारण करायला लावणारी श्रीसाई माऊली साक्षात् प्रेम, कर्णाचा दानशूर अवतारच होय! श्रद्धा-भक्तीरूपी कवच कुंडलातून मिळालेले मनोधैर्य-सबुरी- म्हणजे श्रीबाबांनी भक्ताला दिलेली उदार देणगीच!

साई-स्मरण म्हणजे मनाला मिळालेले भक्कम चिलखत! या चिलखताला भवताप भेदूच शकत नाहीत. या नामस्मृती चिलखतामुळेच भक्ताला निर्भय, निश्काम, निःस्वार्थी, निरामय अशी उच्च, श्रेष्ठ अवस्था प्राप्त होत असते.

व्यावहारिक अडचणीमुळे भक्त हताश होत नाही. कारण श्रीबाबांच्या अमृतमयी, प्रेम-प्रेरणामयी नामस्मरणाने भक्त अखंडीत, चिरंतन, आनंदमय अवस्थेत असतो.

श्रीबाबांच्या भक्तीने मनाला प्रेममय विश्वास प्राप्त होतो. या विश्वासातच मनःशांतीचे भक्कम सामर्थ्य असते आणि या मनःशांतीमुळेच भक्ताची वाटचाल जीवनातील सुख-समृद्ध-वैभवाकडे होत आहे. नामस्मरण हा मार्गदीप आहे. निबिड अंधःकारात-अज्ञानात श्रीबाबा-श्रीसाई सतत मार्गदर्शन करीत असतात. भक्ताने विश्वासाने सोपविलेला भार श्रीसाई माऊली लीलया सांभाळीत असतात कारण हा भार नित्य पूर्ण श्रद्धा-सबुरीने भरलेला आहे.

भक्त-जीवनातील दुःख म्हणजे जणू काय सद्‌गुरू श्रीसाई माऊलींनी घेतलेली कठीण परीक्षाच! या परीक्षेतील भक्त-विद्यार्थी श्रीसद्‌गुरु साईकडून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण होतो त्याला श्रीसाई सुखपूर्ण मनःशांती, वैभव प्राप्त करून देतात.

"ठेविले साईनी तैसेचि रहावे
चित्ती असू द्यावे समाधान...."

अशा समाधानी चित्त-वृत्तीत रममाण होवून श्रीसाईमाऊलीचे गुणगान करणारा भक्त सतत आनंदीच असतो. पराजयाची त्याला खंत नसते व पराक्रमाचा वृथा अभिमानही नसतो. सतत संयमाने असा भक्त वावरत असतो. गीतेतील श्रीभगवंतांची शिकवण व आधुनिक काळातील श्रीसाई माऊलीची शिकवण समान तत्त्वांवर आधारलेली आहे. भगवान श्रीकृष्णानी 'साई' नाव धारण करून गीतेतील अमरतत्त्वांची पुन्हा ओळख करून दिली आहे.

जो जो मज भजे जैसा जैसा भावे
तैसा तैसा पावे मी ही त्यासी... असे श्रीसाई माऊलीचे वचन आहे. भाव म्हणजे भक्ताची पूर्ण समर्पित भावना श्रीसाईचरणाशी अखंडीत सतत हवी म्हणजेच श्रीबाबांशी अतूट नाते! जन्मजन्मांतरीचे चिरंतन भाव बन्धनच! या भाव-बन्धनातूनच श्रीसाई भक्ताला मुक्ती दिल्याशिवाय मुक्तच होत नाहीत. या प्रेम-भाव-बंधनामुळेच भक्ताची काळजी श्रीभगवंत साईना सतत घ्यावी लागते. भक्ताची तळमळ श्रीसाईमाऊलीला सतत जाणवते व श्रीसाई भक्ताला भव-ताप-बंधनातून मुक्त करीत असतात.

अतींद्रिय शक्ती म्हणजेच श्रीसाईमाऊलीच्या प्रेमभाव भक्तीतून मिळालेली शांत प्रवृत्ती-चैतन्यमयी प्रेरणा! या चैतन्यशक्तीमुळेच भक्त सदा सर्वकाळ सर्वत्र निर्भय अवस्थेत वावरत असतो. विश्वातील जडमय विकारपाशात तो गुंतून पडत नाही. भक्त मुक्तच राहतो. कोणताही विकारपाश त्याला स्पर्शूच शकत नाही. श्रीसाईचरणाशी-श्रीसाईगुरु माऊलीशी लीन झालेला भक्त सदा सर्वदा सर्वकाळी 'साईनामात' तल्लीनच झालेला असतो यामुळे त्याची मानसिक विचार-चिन्तन अवस्था उच्च श्रेष्ठ असते.

'वृक्षवेली आम्हा सोयरे
वनचरे...'

अशा भावश्रद्धामयतेने भक्त सर्व विश्वाकडे पहात असतो. श्रीसन्त श्रेष्ठ भक्त तुकारामांना झालेल्या साक्षात् अनुभव म्हणजे वृक्ष, वेली आणि वनचरे ही सर्व त्यांची प्रेमळ

नातलग मंडळीच!

'सर्व विश्वचि माझे घर...'

असा सिद्धान्त-विचार प्रसविणारी श्रीभक्त ज्ञान माऊली सारखी भक्त-सन्त-मंडळी विश्वात्मक देवाला अतिप्रिय असतात! आणि म्हणूनच अशा भक्तांची अंतःकरणे तळमळ, जाणीवा श्रीभगवन्त सतत जाणत असतात. श्रीभगवन्त साईचे भक्त जागृती, स्वप्नी हाच अनुभव सतत घेत आहेत कारण त्यांचे मति अविचलपणे साई-गुरुचरणाशी स्थीर आहे.

'नाथा घरी विठू पाणी भरी...'

'झाला महार पंढरीनाथ...' इ. शब्दा-शब्दातून भगवंत सद्‌गुरुच्या प्रेम निधानाचे कृपा-साऊलीचे रहस्य आपोआपच उलगडते आणि भगवन्त 'भावा' चा भूकेला

नम्र झाला भूता,

त्याने जिंकिले भगवन्ता...' इ. काव्य-शब्द-सूरातून प्रगट होणारी भगवन्ताची प्रेमभावना ऊराशी सतत कवटाळून धारण करीत भक्त विश्वातील सर्व कठीण प्रसंगातून (व्यक्त/अव्यक्त) परीक्षातून उत्तीर्ण होत असतो. अभक्तांना इतरे जनाना- तो अेक विलक्षण चमत्कार वाटतो पण सच्चा भक्त सद्‌गुरुला पूर्ण शरण गेलेला भक्त- सहज लीलया मानवी जीवन संघर्षातून वैभवाकडे जीवन्मुक्त शांती-समृद्धीकडे वाटचाल करीत असतो. सद्‌गुरु साईच्या सतत स्मरणाने अभ्यासाने भक्ताची चित्‌शक्ती वाढतच असते यामुळेच भक्त विकारपाशानी दुर्बळ होत नाही. त्याचे मनोबल नाम-स्मरण शक्तीने सततच वाढतच असते.

## श्री.रामकृष्ण रेवणकर यांचे निधन

श्री साईलीलाच्या अंबरनाथच्या सिद्धहस्त लेखिका शशिकला रेवणकर यांचे पती श्री. रामकृष्ण रेवणकर यांचे मंगळवार ता. ४-३-८६ रोजी अंबरनाथ येथे हृदयविकाराचा झटका येऊन अचानक वयाचे ३४ वे वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन लहान मुले आहेत.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# श्री साईबाबांची धूनी माता

— डॉ. सुमन खानविलकर
बॉंबे-पूना रोड, लोणावळा.

नमस्कार माते तुला नि तुझ्या सान्निध्यात सतत रमणाऱ्या माझ्या माऊलीला. दयेच्या सागरा साईनाथाला, तसेच दिव्यरुप अग्नी नारायणाला तुझ्या हृदयेश्वराला नमस्कार.

माते किती प्रेमळ आहेस तू याची साक्ष पटविण्यासाठी साईंनी तुला सतत त्यांच्या भक्तासमोर ठेवली आहे.

तुला निर्माण करण्याचा बाबांचा हेतू फार थोर आहे.

तसे पाहिले तर धुनीचे कार्य थंडी वाऱ्यापासून संरक्षण करणे. मग बाबांना थंडी वाजत होती काय?

छे. बाबांना नव्हे जे भक्तजन संसाररुपी सागरात बुचकळ्या मारून गारठून गेलेले त्रासून बाबांकडे येत त्यांना या पवित्र ठिकाणी आल्यावर जी हुडहुडी भरलेली असे, भितीने जीव कासाविस झालेला असे त्याचे निवारण करण्यासाठी ही धूनी निर्माण केली.

माणूस कितीही चांगला असो कि वाईट असो मनाने अगर तनाने त्याच्या हातून कितीही वाईट कर्मे घडलेली असोत, रोगी असो भोगी असो, पापी असो पुण्यवंत असो, दयावंत असो क्रूर असो. त्याच्यातला आत्मा एकदा का पंचतत्वात विलीन झाला कि ज्या व्यक्तीला नातेवाईक, सगेसोयरे, मुले माणसे प्रेमाने आदराने विचारत असतात, त्याची त्यांना गरज वाटत असते.

त्याच सर्वांना तो एका क्षणात भयदायक नि नको वाटतो. त्याला ते अग्नी नारायणाच्या स्वाधीन करतात.

काय ही या बुद्धीवंत माणसाची शेवटी अवस्था होते पहा.

पण अग्नी नारायणा तू किती श्रेष्ठ आहेस तो देह पाप करूनच वाढलेला असो की पुण्यात सदा रममाण असो, गरीब असो अगर श्रीमंतीत लोळलेला असो. लहानाचा असो मोठ्याचा असो, रोगी किंवा निरोगी, सुंदर अथवा कुरुप, साधूसंतांचा असो की चोरांचा असो.

तू या कशाचाच कधी विचार करत नाहीस. तू आपल्या पवित्र हातानीच नव्हे तुझ्या त्या तेजोमय सहस्त्र करानी जवळ घेतोस, नुसताच घेत नाहीस मायेने कुरवाळून त्याला आपल्यात सामावून घेतोस.

या भल्या बुऱ्या जगातले कटू अनुभव घेऊन तो निराश झालेला, खऱ्या खुऱ्या प्रेमाला पारखा झालेला माणूस तुझ्या कुशीत शांतपणे विसावतो. एरवी थोडीशी जरी झळ लागली की कुरकुर करणारा या वेळी बिलकूल कुरकुरच करत नाही. कारण जगाचे खरे स्वरुप कळून चुकलेले असते.

ज्याच्यात तुम्हाला शेवटी विलीन व्हायचे आहे ज्याच्या सहस्त्र सुंदर नि तेजस्वी करांच्या प्रेमळ मिठीत विसावायचे आहे.

या देहातील आत्मा पंचतत्वात विलीन झाल्यावर नातेवाईकांनी, प्रेमीजनानी, टाकून दिलेला निरोपयोगी देह पण आपले जीवापाड प्रेम असणाऱ्या या देहाला सारी बरी वाईट कर्तृत्वे विसरून आपल्या मिठीत नव्हे, कारण मिठीतून माणूस परत सुटू शकतो पण याची प्रेम करण्याची अजब तऱ्हा आहे. तुमचा मागमुसही रहात नाही त्याचे रुपांतर राखेत होते.

माणूस या जगात किती निर्दयपणा दाखवतो. तिसऱ्या दिवशी पहाण्यास जातो पूर्ण जळाला की शिल्लक आहे. राख पाहिली की तो भरतो, चार दोन हाडे गोळा करतो. घराच्या बाहेर झाडाला नाहीतर वळचणीला बांधून ठेवतो. ज्याने कष्ट करून घर बांधले. त्या घरात तुम्हाला सुख देण्यासाठी रात्रंदिवस कष्ट केले, त्याच्या चार हाडांना घरात ठेवता येत नाही. राखसुद्धा नदी समुद्रात टाकली जाते. हाडेसुद्धा गंगेत सोडली जातात.

एकूण काय पुरा नजरेआड झाल्याशिवाय प्रेमीजनांना चैन पडत नाही. दिवस करतात त्यावेळी सुद्धा परत येऊ नका असे काही म्हणतात म्हणे.

एवढे सारे असले तरी प्रत्येक माणूस मायाजाळात फसतोच.

ती राख माणसाला सांगत असते अरे अशीच तुझी राख होणार आहे. तेव्हा या माझ्या राखेला साक्षी ठेवून तुझे पावित्र्य राख, तुझी ईश्वर भक्ती राख, विवेक वैराग्य राख, अरे हे जग कितीही गोजीरवाणे, सुख विलासी दिसो तुझ्या मनात पक्के राख की शेवट तुझी पण राख होणार.

तरी आतापासूनच या धूनीतल्या राखेला कपाळी धारण कर पोटात घे म्हणजे ती राख होण्याची तुला भिती वाटणार नाही. संसारातला तसेच या देहाचा असार पणा खरा खुरा तुझ्या लक्षात येईल.

हे बघ जीवा राख या शब्दाला उलट केलं की काय अर्थ होतो "खरा".

आपण देहालाच खरा मानत असल्यामुळे आपणांस मरणाची भीती वाटते पण खरा चालक आत्मा आहे. हे विसरतो नि अज्ञानाची पट्टी डोळ्याला बांधून देहाची जपणूक करतो नि परमेश्वराला विसरतो.

मरा या शब्दाचा उलट अर्थ जितका पवित्र नि पापनाशक आहे तितकेच या राखेत पावित्र्य आहे. आणि म्हणूनच बाबांनी धूनी पेटवून ठेवली आणि लोकांना उदी देवू लागले. त्यामुळे लोक प्रभूपदी लीन होऊ लागले नि सुखी झाले.

हा अग्नी नारायण कितीतरी रुपानी आपल्या सहवासात, शरीरात सतत असतो. सुर्याच्या किरण रुपाने प्रेम करतो, अग्नी जेवण शिजवून देतो. दिव्याच्या रुपाने तसेच आपला जठराग्नी त्यामुळे अन्न पचते, भूक लागते असा कोणत्या ना कोणत्या रुपाने आपणास मदत करत असतो.

एवढेच नव्हे तर आपल्या या देहाला चालना देणारा, बोलवता हाच आहे कारण आपण म्हणतो ना अरेरे त्याची प्राण ज्योत मालवली म्हणजे आत्मा हा ज्योत आहे किती जवळचा संबंध आहे याच्याशी आपला.

खरे तर आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की याच्याच सान्निध्यात आपल्याला जायचे आहे. शेवटी काही करा याच्याच मांडीवर विसावायचे आहे.

हाच आपल्याला माणसे टाकणार तेव्हा जवळ करणार आहे ह मनात राख.

धूनीचे सुद्धा हेच व्रत तिच्यात कधी बाभळीची, सागाची, आंब्याची तर कधी चंदनाची लाकडे घातली जातात पण यात कधीच दुजाभाव होत नाही, बरेवाईट सामावून घेणे, सर्वांवर सारखेच प्रेम करणे इतकेच तिला माहीत, साऱ्याचीच राख होते. मानवा जागा हो नि आपले आयुष्य सत्कर्मरत नि परमेश्वराच्या नामात घालव. असे सांगण्यासाठीच श्री साईनाथानी धूनीची स्थापना केली. नि तिच्यातल्या राखेला स्वतःच्या पवित्र हाताने स्पर्श करून तिचे नाव उदी ठेवीले. ती उदी लोकांना रोग मुक्त, संकट मुक्त करते अशा या साईकृपेच्या धुनी मातेला माझे शतशः नमस्कार असोत.

साऱ्या जगाला भस्म करण्यासाठी अग्नीचा एक कण पुरे होतो, तसे बाबांच्या या धुनीतल्या उदीत सामर्थ्य आहे. मानवाला उद्धरण्याचे.

ओम शांती

# ॥ साई तारी त्याला कोण मारी । ।

— श्री. प्रकाश क्षीरसागर,
महाबळेश्वर.

साई तारी त्याला कोण मारी या वचनाचे प्रत्यय येणारी एक घटना माझ्या आयुष्यात घडली. मी ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणचा एक मामुली माणूस आणि त्याच्या मागे काही पुढारी (स्थानिक) असा गट करून आम्हाला राहत्या घराची जागा सोडावयास लावण्यासाठी आटोकाट प्रयत्न करून आम्हांला अतिशय त्रस्त केले. कोणताही मानवी उपाय न राहिल्याने आम्ही श्री साईबाबांना या संकटातून आमचे रक्षण करावे म्हणून मनोभावे हाक मारली. असे सांगताच काही ध्यानी मनी नसताना आमचे संकट निवारण झाले. अशीच साईबाबांची कृपादृष्टी रहावी हीच बाबांच्या चरणी प्रार्थना.

खरोखरीच कोणी वाया जाणार नाही. अशी श्रद्धा असल्यावर आणि श्री साईमाउलीची जबरदस्त कृपा असल्यावर आपण पामर काय दाखवणार? ९-८-८३ रोजी आम्ही सगळे शिर्डीहून पुण्याला आलो आणि सौ. आईला के.इ.एम. हॉस्पीटलमध्ये ऑपरेशनसाठी दाखल केले. ऑपरेशन आधीच ठरले होते.

१८-८-८३ रोजी सकाळी ७॥ वाजता आईला ऑपरेशन थिएटरमध्ये नेले. ऑपरेशनसाठी २ तास लागले. ऑपरेशननंतर २ दिवसांनी आईची तब्येत अचानक जास्त झाली. त्यादिवशी अखंड साईबाबांचे नामस्मरण करून सौ. आईला बरे वाटावे म्हणून मनापासून प्रार्थना केली. अन् खरोखरीच सौ. आई लवकर बरी होऊन घरी आली. तेव्हा या जगात माऊलीशिवाय आपण कोणाला हाक मारणार. तिच्याशिवाय आपले कोण आहे?

# ।। साक्षात्कार ।।

— श्री बबन डी. येरम.
१/५, कल्याणजी देवजी चाळ
चिरागनगर, घाटकोपर मुं.८६

अनन्यभावे चिंतुनी भजती भक्त जे मला।
सदा मिसळले त्यांचा मी योगक्षेम चालवी।।

(गीताई-९/२२)

"या श्लोकाची आठवण मला झाली व मन आनंदाने भरून आले. त्याच्या असीम कृपेची साक्ष पटली. त्याने दाखविलेला साक्षात्कार मला त्याच्यावरची श्रद्धा बळकट करण्यास सहाय्यभूत ठरला. मी विसरू शकत नाही ती घटना!"

माझे मित्र श्री. श्रीराम दांडेकर मला श्रीसाईलीलेची एक दिव्य अनुभूती सांगत होते. मी त्यांचे बोल जसेच्या तसे श्रीसाईलीलेच्या वाचकांना उपलब्ध करण्यासाठी लेखणी सरसावून बसलो. त्यांच्या साईभक्तीत मीही तद्रूप झालो. त्यांनी सांगितलेली घटना अशी —

माझं लग्न ठरलं. कल्याणच्या एका लग्न हॉलमध्ये आम्हाला आदल्या रात्रीच मुक्कामाला जायचे होते. काही धार्मिक विधी उरकायचे होते. एक रिक्षा ठरवून मी स्वतः बहिण व आई असे तिघे रिक्षेत बसलो. महत्त्वाच्या सामानापैकी एक छोटी पेटी रिक्षेत आमच्या मागच्या बाजुला असलेल्या जागेत ठेवली. बहिणीनेच ही पेटी माझ्याकडे दिली होती ज्यात दहा-बारा तोळे सोन्याचे दागिने होते.

हॉलजवळ रिक्षा येताच आम्ही उतरलो. इतर छोटे सामान घेऊन हॉलमध्ये आलो. हॉलमध्ये येताच बहिणीने विचारले की मी तुजवळ दिलेली पेटी न विसरता घेतलीस ना? मी विचार करू लागलो अन् काळजाचं पाणी पाणी झालं. ती पेटी रिक्षातच राहून गेली होती. आणि रिक्षावाला निघून गेला होता.

मामांना ही हकिकत सांगितली. सर्व चिंताग्रस्त झाले. विवाहासारख्या मोठ्या व महत्त्वाच्या समारंभात एक काळजीचं कारण घडलं होतं. रिक्षा ज्या दिशेला निघून गेली त्या दिशेला मामा निघून गेले.

रात्री साडेबारा वाजेपर्यंत शोधाशोध केली पण व्यर्थ! कल्याण सारख्या मोठ्या शहरात तो रिक्षावाला शोधणार कसा?

रात्र वाढतच होती. झोप काही लागत नव्हती. शेवटी श्रीसाईबाबांची आठवण मनाला स्पर्श करून गेली. धास्तावलेल्या मनानेच बाबांना कळकळीने विनवू लागलो, बाबा, या भक्ताची लाज राखा. निष्काळजीपणामुळे आमची एक पेटी रिक्षातून राहून गेली आहे. फार मोठा ऐवज त्यात आहे. आमचे हे संकट निवारण करा. आम्ही शिरडीला येऊन आपले दर्शन घेऊ व पंधरा नारळांचे तोरण आपल्या दारी बांधू.' ही नवसवजा प्रार्थना मी केली व स्वस्थ बसलो.

साधारण रात्रौ एकच्या सुमारांस एक रिक्षावाला येऊन म्हणाला की येथील कोणाची पेटी रिक्षात राहून गेली होती काय? हे ऐकताच वडिल, ताबडतोब म्हणाले की आमच्याच एका पेटीचा घोळ झाला. समोरच त्याच्या हातातील पेटी पहाताच सर्वांना हायसं वाटलं. आमच्या जवळची किल्ली त्या रिक्षा ड्रायव्हरला दाखवून आम्ही खात्री पटवून दिली.

श्री. शिंदे असे रिक्षा ड्रायव्हरचे नाव होते. त्यास शंभर रूपये देऊ केले. पण त्यानी नम्रतापूर्वक नकार दिला. आमच्या सर्वांच्या विनंतीवरून त्यास ते बक्षिस घ्यावयास भाग पाडले. पुन्हा पुन्हा त्याचे आभार मानून त्यास निरोप दिला.

लग्नकार्य व्यवस्थित व आनंदात पार पडलं. श्री साईबाबांनी संकटकाळी मारलेल्या हाकेला ओ देऊन आमची सुटका केली व त्याच्यावर श्रद्धा ठेवण्यास ह्या एका साक्षात्काराची भर पडली.

नंतर ताबडतोब आम्ही उभयता शिरडीला बाबांच्या दर्शनाला गेलो व पंधरा नारळांचे तोरण तेथे देऊन आलो.

धन्य ते साईबाबा व धन्य त्यांची लीला जी भक्तांवर मायेची पखरण करण्यास सदैव तयार असते.''

भक्तांच्या हाकेला सदा ओ देई।
तीच साई माझी आई ।।

# मी पडले पण बाबांनीच सावरले

— सौ. पद्मावती वैद्य
जीवनआशा,
पेडर रोड, मुंबई - २६.

पू. श्रीसाईनाथांचे बद्दल व त्यांनी दिलेल्या अनुभवाबद्दल लिहावे तेवढे थोडेच आहे.

त्याचे अस झालं की, आमचेकडे एकदा रात्री फोन आला १०-११ चा सुमार असेल मी झोपले होते. पण फोन आला म्हणून उठले व घ्यायला जात होते तर माझा पाय अडखळून मी जोरात पालथी पडले. नाकातून रक्त वाहू लागले. डोक जोरात आपटल. नौकर काय कराव, रक्त कशाला पुसावे कळेना. तेवढ्यात कुणीतरी माझ्या पाठीवरून हात फिरवत आहे व उपरणे पांढरे पुढे करून सांगत आहे की हे घे पुसायला. असा भास झाला. मी तेवढ्यात त्यांना सांगतेय एव्रढ स्वच्छ उपरणे नको. लहान रुमाल द्या. तेवढ्यात माझ्या मुलाने उधड केला होता. पण पाठीवरून हात फिरवून उपरणे पुसायला देणार कुणीच दिसल नाही. मुलानी रुमाल दिला, बर्फ फिरवला रक्त थांबले. मला तर फार लागले नाही. डोकं मात्र आपटल्यामुळे दुखलं २ दिवस बस.

पण हे कसं घडलं? तर मी रोज सकाळी पू. बाबांना गुढगे टेकून नमस्कार करते. व त्यांना प्रार्थना करते बाबा माझ्या पाठीवरून हात फिरवता कां? व तसा ते फिरवतात असं मानते. त्या मुळेच खरोखर वेळ आल्यावर बाबांनीच पाठीवरून हात फिरवला असंच मी समजते व तेच खरं आहे.

दुसरा अनुभव माझी मुलगी डिसेंट्रीने खूप आजारी झाली. ५ दिवस झाले कशाने गुण नाही. नाना तऱ्हेची औषध उपाय केले. पण बरंच वाटेना. मग शेवटी मी बाबांची उदी औषधात घालून दिली व बाबांना प्रार्थना केली की बाबा हिला आता गुण पडू दे आणि खरंच चमत्कार व्हावा तसा तिला गुण आला. दुसरे तिसरे दिवशीच ती हिंडू फिरू लागली. पू. बाबांचे उपकार आहेत.

असे मला आलेले कित्येक अनुभव आहेत. कधीही कळवळून प्रार्थना करावी व पू. बाबांनी ती ऐकावी. असंच नेहमी घडतं. मी पण माझ्या मनावर कुठलाही ताण पडला की लगेच पू. बाबांची प्रार्थना करते व सांगतेः बाबा योग्य असेल तर तुम्ही सर्व करालच आणि लगेच अनुभव येतोच. मात्र श्रद्धा जबर हवीच. मला तर सवयच लागली आहे की पू. बाबांना सर्व सांगूनच करायचे. त्यांना सांगितल्याशिवाय काही करत नाही, कांहीही मागत नाही. पण जे जे घडतं ते सर्व त्यांना सांगते व ते ऐकून त्यांना योग्य वाटेल तेच होतं. कांहीही झाले तरी त्यांची इच्छा तशी होती म्हणून समाधान मानते.

माझी तब्येत बरी नसते वय झालंय. तेंव्हा बाबांच्याचरणी माझी प्रार्थना आहे की, एकतर बरं तरी करा अगर पायाशी घेवून जा. माझी सर्व मनकामना पू. बाबांनी पूर्ण केली आहे. त्यांची कृपादृष्टी असावी हीच विनंती करते.

१५ दिवस माझा नातू आजारी होता. घसा, खोकला. पण एका रात्री त्याला इतका जोरदार ठसका लागला की तो घाबरा गुबरा झाला. वय लहान घशात आडकलंय करून ओरडायला लागला. आमच्या तोंडचे पाणी पळालं, किती औषधं दिली, कशाने थांबेना. थकून गेलं मूल. मग मीच पू. बाबांची प्रार्थना केली की बाबा कसंही करून ह्याचा ठसका थांबवा, आणि आश्चर्याची गोष्ट की ५-१० मिनीटात ठसका थांबला. आडकलेलं आता गेलं म्हणायला लागला. डॉक्टरी उपाय चालूच होते. पण बाबांनी हाक ऐकली. मुलगा रात्री स्वस्त झोपला. अनुभव लिहिन म्हटलं होते म्हणून लिहित आहे. आपण जेवढी श्रद्धा ठेवावी तेवढा अनुभव येतोच. साई माऊली ही सर्वांची आई आहे, सर्वांची मनोकामना पूर्ण होते.



# दर्शनापुरती दृष्टी आली

— श्री. र.श्री. पुजारी
रमानिवास
९९२, सदाशिव पेठ
पुणे - ३०.

श्री. नाना आणि सौ. पार्वतीबाई साठे हे दांपत्य पाऊणशेच्या घरातील. मातृपितृभक्त पुत्र श्रीराम साठे मुंबईस मोठ्या हुद्यावर. सूनबाई आणि नातवंडेही सुविद्य आणि सुसंस्कृत. तरीही हे दांपत्य पुणे शहराच्या मोहात अडकून पुण्यास राहाण्याचा हट्ट घेणारे. गात्रे विकल होऊनही स्वावलंबी जीवन जगणारे. अशा वयात त्यांना एका आपत्तीस तोंड द्यावे लागले. ती आपत्ती म्हणजे सौ. पार्वतीबाईंचें अंधत्व.

चार ऑपरेशन होऊनही पार्वतीबाईंचे अंधत्व तिळभरही कमी होईना. अखेर परम साईभक्त कै. काकासाहेब अवस्थी एक दिवस घरी आले. म्हणाले, "यांना एका डोळ्याने निश्चित दिसू लागेल."

याचे प्रत्यंतर लगेच आले. पाचव्या ऑपरेशनमुळे त्यांच्या एका डोळ्यास थोडेसे दिसू लागले. ते केवढे? तर फोटोतील साईबाबांचे दर्शन एकदाच होण्यापुरते! अर्थात् हा 'अनुभव' त्यांनी साईलीलेत दिला. तो ऑगस्ट ७७ च्या साईलीलेत छापूनही आला.

ही लीला करून साठे पतिपत्नींना श्रीबाबांनी स्वतःकडे ओढून घेतले. ते दोघे शिरडीस जाऊन आले. कै. नानासाहेब रासने वगैरे श्रेष्ठ साईभक्त त्यांच्या घरी येऊ लागले. यामधूनच पुढे अनुभवकथन, पोथीवाचन इत्यादी सत्संग वाढू लागला. तरीही सौ. साठे अंधत्वामुळे सबंध दिवस घालवावा कसा या चिंतेत पडत.

अशा वेळी पुण्यातील संतभक्त सत्कवी श्रीराम आठवले त्यांच्या घरी येऊ लागले. निरनिराळ्या संतांच्या जीवनातील महत्त्वाच्या लीला वर्णन करणारी गीते रचून ती सौ. साठे यांना ऐकवू लागले. ती गीते ऐकून ऐकून सौ. साठे यांना पाठ होऊ लागली. त्यामुळे त्यांची त्रिकाल उपासना आकार घेऊ लागली. सिद्ध होऊ लागली.

या उपासनेमधून साठे पतिपत्नींना नवनवीन 'अनुभव' येऊ लागले. नित्य अशांत असणारे मन शांत होण्याच्या मार्गास लागले.

तथापि काही सात्विक आकांक्षा मनात उरल्याच. आयुष्यात आपण एकवार काशीयात्रा करावी ही वासना विशेष त्रास देऊ लागली. तथापि परावलंबी जिण्यामुळे ही वासनाही त्यांनी मनात दडपून ठेवली. मौन पाळले.

अशा मनःस्थितीत गेल्या श्रावणात त्या मुंबईस गेल्या. त्यावेळी सूनबाई सौ. सुधा साठे म्हणाल्या, "तुमचे सर्व झाले. पण काशीयात्रा काही अजून घडली नाही. तरी ती आपण करून घेऊ."

सौ. सुनबाई एम्.ए.बी.एड्. जेष्ठ शिक्षिका. त्यांनी अर्धपगारी रजा घेतली. स्वतःच्या जबाबदारीवर आपल्या वृद्ध सासूसासऱ्यांना त्रिस्थळी घडविली. त्यांना अगदी फुलासारखे

नेले आणि परत आणले.

काशीस विश्वनाथास अभिषेक, गयेस श्राद्धादी कर्मे, प्रयागास धार्मिक विधी — हे सारे सशास्त्र करीत असताना सहप्रवासी यात्रेकरू म्हणाले, "आजीबाई, या तुमच्या खऱ्या कोण? या सूनबाई काही वाटत नाहीत. कन्या वाटतात."

पण याहून आश्चर्य म्हणजे सौ. साठे यांना काशीस गयेस आणि प्रयागास महत्त्वाचे तेवढे दिसण्यापुरती दृष्टी आली! सर्व ठिकाणी दर्शन उत्तम झाले!

# उदीमुळे एका मुलाला जीवदान मिळाले

— सौ. सरोजिनी मुळ्ये
६ नाथ मंदिर कॉलनी
इंदूर.

● वर्ष दीड वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. आमच्या शेजारी एक सिंधी कुटुंब राहते. त्यांचा दोघांचाही श्री साईबाबांवर अतिशय विश्वास आहे. जेंव्हा जेंव्हा मी शिर्डीला गेले तेंव्हा त्या बाईने मला नारळ घेऊन बाबांच्या पायाला लावून मला प्रसाद घेऊन या असे सांगितले.

पुढे तिला दिवस राहिले. दिवस राहिल्यापासून सारखे तिच्या पोटात दुखे व सारखा स्राव होत असे. डॉ. नी खूप औषधे दिली तिला शेवटपर्यंत अगदी निजून राहण्यास सांगितले.

मी शिर्डीहून आल्यावर तिला नारळ देण्यास गेले तेव्हा तिने ही गोष्ट मला सांगितली. मी शिर्डीहून बरोबर उदी आणली होती ती तिला दिली व रोज पोटाला चोळ असे सांगितले. संपली तर मी आणखी देईन असे सांगितले. त्याप्रमाणे त्या बाईने उदी पोटाला चोळली व बाबांच्या कृपेने तिचा त्या दिवसापासून स्राव थांबला. त्या दोघांही पती-पत्नीला उदीमुळेच हा चमत्कार घडला याची पूर्ण खात्री पटली. पोट दुखणेही अजिबात थांबले.

ती इतकी कंटाळली होती की डॉ. च्या मागे लागली की हा गर्भ काढून टाका पण उदीमुळे तो गर्भ वाढीला लागला व पुढे कांहीही त्रास झाला नाही. पुढे तिचे दिवस भरल्यावर ऑपरेशन करावे लागले. ती ऑपरेशनला दवाखान्यात जाण्याचेपूर्वी उदी लावून मला सांगून गेली.

आश्चर्याची गोष्ट ही की कांहीही त्रास न होता ऑपरेशन, व्यवस्थित होईन तिला गोरा व गोजिरवाणा मुलगा झाला. पुढे त्याच्या गळ्यात तिचे श्रीबाबांचे लॉकेट सोन्यामध्ये मढवून सोन्याच्या साखळीत त्याच्या गळ्यात घातले. ते अद्यापही गळ्यातच आहे. ती दोघे त्या मुलाला घेऊन शिर्डीला बाबांच्या पायावर घालण्यास घेऊन जाणार आहेत.

त्या दोघांनी श्रद्धा व सबुरी धरून पुत्र रत्नाचा असा लाभ मिळविला.

# कथा ही श्री साईची!

— श्री. मुकेश कामत,
कामत निवास, वाडगावफाटा,
मु.पो. अलिबाग, जि. रायगड.

अहोरात्र भक्तांसाठी
तळमळ करी हा जगजेठी
आपुल्या प्रिय भक्तांसाठी
अशक्य ते शक्य करितसे
जरी संकटी कोणी भक्त
सापडला असेल खास
तयांसि सोडविण्या त्वरीत
धांव घेई श्री साई ।।

श्रीसाईबाबा....

या नावात अमृताची गोडी आहे. मातेचे वात्सल्य आणि पित्याचे छत्र आहे. शिर्डीत प्रगटलेला हा साधु लाखो व्यक्तीचे दैवत बनलेला आहे. हा कोण? हा कुठून आला? याचे जीवनकार्य काय? याचा काही पत्ता नाही. अशी बेपत्ता व हातात कसलीही सत्ता नसलेली व्यक्ती या व्यक्तीसमोर सर्व तऱ्हेची सत्ता असलेली मंडळी वाकतात आणि बाबा त्यांच्या सर्व जीवनाला वळण देतात, चालना देतात. सुखीसमृद्धी त्यांना प्राप्त होते. मग हे जन त्यांच्या भजनी लागले तर नवल ते काय?

बाबा शिर्डीत प्रगट झाले. परंतु त्यांचे मातापिता कोण? त्यांचा जन्म कुठे झाला? याचा कसलाच पुरावा सापडत नाही. बाबांच्या सान्निध्यात जे भक्त होते ते या गोष्टीची माहिती करून घेण्यासाठी खुप प्रयत्न करीत होते. परंतु यासंबंधी कसलीच माहीती त्यांच्या हयातीत त्यांना मिळाली नाही. बाबांच्या तोंडून या संबंधी काही शब्द येतील आणि तर्काने ही माहीती आपण हुडकून काढू असे वाटणाऱ्यांनाही या माहीतेचा कधी सुगावा लागला नाही. रात्रं-दिवस बाबांच्या सहवासात असणाऱ्यांनाही 'मी परमेश्वराचा सेवक आहे!' एव्हढेच बाबांच्या मुखातून ऐकायला मिळे आणि त्यातच संतोष मानून त्यांनी बाबांची दृढ भक्ती चालविली.

ऋषीचे कुळ आणि नदीचे मूळ शोधू नये असे म्हणतात. बाबांच्या हयातीत ज्या गोष्टीचा पत्ता लागला नाही. त्या गोष्टी आपण आता कशासाठी शोधायच्या? कोण कुठे जन्मला? याला काय महत्व द्यायचे. मनुष्याचे महत्त्व जन्मावरून मोजता येत नाही. साईबाबा आपल्यासमोर प्रगट आहेत ते जीवनच महत्त्वाचे आहे.

'श्रीसाईबाबांचे' स्मरण ही काही हृदयात वेगळीच आनंद निर्माण करणारी गोष्ट आहे.

साईबाबांच्या समकालीन एक विभूती श्री. माणिक प्रभु निजाम राज्यात होते. त्यांच्या

चरित्रात साईबाबांचा ओझरता उल्लेख आहे. त्यात म्हटले आहे. एक तेजःपुंज कांतीचा फकीर माणिक प्रभूंच्या दरबारात आला. त्याच्या हातात लोटा होता तो लोटा प्रभूंपुढे धरून तो — म्हणाला, प्रभू तो इतना लोटा भर दे... त्यावेळी प्रभूंचे बंधु तात्या महाराज शास्त्रीमंडळी बरोबर वेदातांच्या गोष्टी करीत बसले होते, त्यास हाक मारून प्रभूंनी तो लोटा रुपयांनी भरून देण्यास सांगितले. जवळचे सर्व पैसे संपून गेले तरी तो लोटा भरत नाही असे पाहून त्यांनी तो प्रभूंच्या हातात दिला. आणि तात्या परत वेदातांच्या चर्चेकडे वळले. प्रभूंनी मात्र तो लोटा हातात घेतला आणि त्यात दोन खारका-फुलांमुळे तत्काळ भरून गेला. तेव्हा प्रभू स्मित करीत म्हणाले. 'साई ये लेव!' असे म्हणून तो लोटा फकिराला दिला. फकिरही तसाच. त्याला त्या पैशाचे काय? त्यांनी त्यातील दोन खारका आणि फुले काढून घेतली तो प्रसाद मानुन कपाळाला लावून ते म्हणाले 'इतनाही मेरे कु बस है!' असे म्हणून नंतर त्यांनी तो लोटा प्रभूंकडे ओतला. त्यातून जो रुपयाचा ढीग बाहेर पडला तो लोट्याच्या जवळ जवळ पाच पट होता. फकिराने प्रभूंकडे मस्तक नमविले आणि तिथुन निघुन गेला. तेव्हा बोलण्यात रंगलेल्या तात्या महाराजांकडे प्रभू वळून म्हणाले, तात्या काही माणसे कशी येतात, कशासाठी येतात हे न पाहता निरर्थक कोरडा काथ्याकुट काय करीत बसला आहेस? त्या फकिरांचा लोटा तुला भरता येईना मग त्याने ओतलेल्या रुपयांचा ढीग तर निरखून 'पहा!' ते पाहून तात्या चकित झाले. नंतर त्यांनी त्या फकिराची सर्वत्र शोधाशोध सुरू केली परंतु तो कुठेच दिसेना? फकिराला हिंदी भाषेत 'साई' म्हणतात. साई म्हणजे साधुपुरुष. साधुपुरुषांचा संचार जेथे असतो तोच साईसंचार मानावा. निजामात साई संचार होता असे माणिक प्रभूंच्या चरित्रात दिसून येते.

वयाच्या सोळाव्या वर्षी शिर्डी गावात निंबाच्या झाडाखाली साईबाबा प्रगट झाले त्यावेळी त्यांच्या अंगात पांढरी लांब कफनी कमरेला कमरबंध, काखेत सटका, एका हातात टमरेल, दुसऱ्या हातात झोळी, डोक्यास बांधलेले पांढरे फडके, त्याला मागे गाठ होती. आणि पायात काही नव्हते. अनवाणी. त्यावेळी त्यांची कोणी चौकशी विचारपुसही करीत नव्हते ते विहीरीच्या सांडपाण्याचे पाणी पीत असत आणि लेंडीबागेच्या कुंपणात घुसून आत बसत असत. लोक त्यांना वेडा म्हणत. त्यावेळी लोकांना हा वेडा वाटणारा माणूस आज लाखो लोकांना आपल्यासाठी वेड लावणारा अवतारी पुरुष आहे हे सांगितले असते तर कुणालाच ते खरे वाटले नसते. निंबाच्या झाडाखाली बाबा झोपत. त्यांना कुणी विचारले तर सांगत "हम तो साई है, बहुत दूरसे आये है!" उन असो पाऊस असो, थंडी असो बाबांना छाया होती त्या निंबाच्या झाडाची!

बाबा हिंदू की मुसलमान? हे ही कुणास सांगता यावयाचे नाही. मुसलमान म्हणावे तर त्यांच्या भक्तगणात हिंदूचीच संख्या अधिक. हिंदू म्हणावे तर त्यांचे भक्त मुसलमानही आहेत. मशीद-मंदिर बाबांना सारखीच प्रिय होती. निंबाच्या झाडाखालून आपले वास्तव्य हालवून बाबा एका मोडक्या मशिदीत रहावयास गेले. त्या मशिदीला बाबांनी नाव दिले 'द्वारकामाई!'

अशा या द्वारकामाईत एकदा काही पठाण नमाज पडण्यासाठी आले होते. तिथे येऊन पाहतात तो काय मशिद गाई-म्हशीच्या शेणाने सारवलेली होती. जागा ओली होती. म्हणून पठाणांनी तिथे नमाज पडायचे नाही. असे ठरविले तेव्हा श्री साईबाबा म्हणाले, तुम्ही अवश्य नमाज पडा. तुमच्या वस्त्रांना अजिबात डाग लागणार नाही, अखेर बाबांचे त्यांनी मानले, आणि नमाज पडायला सुरवात केली. आश्चर्य काय? — त्यांच्या कपड्याला जरा सुद्धा डाग लागला नाही. हा चमत्कार पाहून बाबांच्या चरणांवर त्या पठाणांनी लोटांगण घातले आणि त्यांना 'वल्ली अल्ला' असे मानू लागले.

एकेका चमत्काराने बाबांजवळ अशी माणसे येऊ लागली जी त्यांच्याजवळ आली ती त्यांची बनत. शिर्डीत गणपतराव कोते म्हणून एक धार्मिक गृहस्थ होते. कुटुंब प्रमुखाचा आपल्या कुटुंबावर संस्कार होत असतो. त्यांच्या पत्नी बायजाबाई अशाच बाबांच्या दर्शनाला गेल्या तेव्हा त्याना पाहताच बाबा चटकन उभे राहीले आणि ओथंबलेल्या प्रेमाने बाबांनी त्यांना 'मामी' म्हणून हाक मारली त्या दिवसापासून बाबा जिवंत असेपर्यंत त्या बायजाबाईच्या हातची बाबांनी भाकरी खाल्ली. बाबांनी भाकरी खाल्ल्याशिवाय बायजाबाई तोंडात पाणी घेत नसे. धन्य ती माऊली जिच्यावर बाबांची पूर्ण कृपादृष्टी होती.

बाबांना आयुष्यभर भाकर खावु घातली. बाबांचा असा एकही दिवस गेला नाही की ज्या दिवशी बायजाबायची भाकरी खाल्ली नाही.

बाबा शिर्डीत प्रकट होतानाची हकिगत अशी सांगितली जाते की शिर्डीच्या काहीं व्यक्तीना खंडोबा देवाने असा दृष्टांत दिला की या बालकाने लिंबाच्या झाडाखाली बारा वर्षे तपःश्चर्या केली आहे. लिंबाच्या झाडाखाली खोदा अशा दृष्टातांमुळे ती जागा खोदली तर तिथे एक विटाचा थर चुनेगच्ची चौकौनासारखी जागा होती. बाबांनी सांगितले ही माझ्या गुरुची जागा आहे. दर गुरुवारी व शुक्रवारी इथे धुप लावीत जा सर्वांचे कल्याण होईल. अशी बाबांची गुरुभक्ती ही होती. आपण आपल्या गुरुची बारा वर्षे भक्ती केली. त्या वयोवृद्ध महात्माचा मलोत्सर्गही साफ करीत होतो.

असाच एक चमत्कार आहे. बाबा अग्निपूजक असल्यामुळे त्यांनी सतत धुनी पेटत ठेविली आहे. आजही आपण शिर्डीला गेलो असता ती अजूनही पेटती धुनी जळताना पाहतो. या धुनीने एकदा पेट घेतला. पेटलेल्या ज्वाळा मशिदीच्या तक्तपोशी जावून पोहचल्या. यावेळी बाबा मात्र शांतपणे त्या ज्वालांकडे पहात होते. त्याच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेश नव्हता. संबंध मशिद जळून खाक होईल या भीतीने सर्वांची एकच तारांबळ उडाली. ही परिस्थिती न्याहाळून बाबांनी मग स्वतःच सटका हातात घेतला व तो खांबावर आपटीत म्हणाले

'सबुर, सबुर हट की माघार! आणि काय चमत्कार त्या सटक्याच्या फटक्याबरोबर अग्नी शांत होत गेला. सर्वांना आनंद झाला.

कणाकणात भगवान आहे. चैतन्य आहे याचा साक्षात्कार शिर्डीतील उदीत होतो. काहीतरी अनुभूती असल्याशिवाय शिर्डीला जावयास कुणीही निघाला की त्यांना लोक

सांगतात 'आमच्यासाठी अुदी आणा! उदीसंबंधी अशी एक कहाणी आहे की,

एका गरीब म्हातारीचे शेत सावकाराने कर्जापोटी खाऊन टाकले होते. हा अन्याय सहन न होणारी जी मंडळी होती त्यानी म्हातारीला 'कोर्टात खटला कर' असा सल्ला दिला. या सल्ल्याप्रमाणे ती कोर्टात गेली. परंतु त्या बिचारीची कोर्टात फजिती होण्याची पाळी आली.

शेवटी कुणीतरी श्रद्धेने म्हातारीला सुचविले तू शिर्डीला जावुन श्री साईबाबांचे दर्शन घे सर्व सुरळीत होईल. म्हातारी शिर्डीस गेली. बाबांचे तिने दर्शन घेतले. बाबांनी तिला उदी दिली, ती घेऊन ती आली रोज ती स्नान करून ती उदी कपाळाला लावायची व बाबांचे ध्यान करायची असा नित्यक्रम चालला असता. कोर्टाच्या तारखेचा दिवस उजाडला.

न्यायमूर्तीनी म्हातारीच्या बाजुने न्याय दिला. सावकाराची फजिती झाली. माणूस श्रद्धेने तरतो, श्रद्धा माणसाला बळ देते. चैतन्य देते.

साईबाबांच्या उदी या विषयावर चमत्कार गोळा केले. तर त्यांच्यावर भला मोठा ग्रंथ तयार होईल. जी गोष्ट उदीची तीच दृष्टांताची बाबा अनेकांना स्वप्नात जावुन दृष्टांत देतात. हे दृष्टांत अनेकाकडून मी ऐकले आहेत. कुणी भक्त अडचणीत आला तर बाबा त्याची अडचणीतून मुक्तता कशी करतील हे सांगता येत नाही. बाबांनी मला बोलविले म्हणून मी आलो. हेच वाक्य भक्ताकडून ऐकावयास मिळते.

बाबा जेव्हा देहरूपाने शिर्डीस वावरत होते तेव्हा त्यांना भेटावयास तिथे लोक जात परंतु आज त्यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठीही लोक येतात. या लाखो भक्तांच्या हृदयापाशी बाबांनी कसे संधान बांधले आहे. हे महत्वाचे आहे. लाखो लोक हृदय मात्र एक असेच जणु समिकरण आहे.

आणि या एक हृदयात अशी श्रद्धा वावरत आहे.

मात्र माझे करा स्मरण
विश्वासयुक्त अंतःकरण
ठेवा करा निष्काम भजन
कृत कल्याण पावाल!!!

माणसाच्या जीवनात प्रत्येक क्षणी श्रद्धेला महत्व आहे. जीवनातील प्रत्येक क्षण आपण श्रद्धेनेच जगत असतो. त्यामुळे आपणास कुठलीतरी शक्ती जागवीत असते बाबांनी संबध जीवनाचे सार दोनच शब्दात सांगितले आहे. 'श्रद्धा' आणि 'सबुरी' हे दोन शब्द म्हणजे मंत्र आहेत. श्रद्धा माणसाला तारते. सन्मार्गावर ठेवते वाईट मार्गाला जाऊ देत नाही. आणि 'सबुरी' माणसाच्या जीवनाला वळण लावते.

काका महाजनी म्हणून शिर्डीला सतत बाबांना भेटावयास जाणारे त्याचे भक्त होते. ते ठक्कर नांवाच्या सॉलिसिटरकडे नोकरी करीत होते. एकदा ते बाबांकडे गेले असता. शिर्डीला आठ दिवस राहीले. मालक ठक्कर मनातून चिडले. त्यांनी काकांना जाब विचारला तेव्हा काका म्हणाले. 'बाबांनी आज्ञा दिल्याशिवाय कसे येऊ' हे उत्तर ऐकुन ठक्करना अधिक राग आला, आणि हा साधु कोण हे त्यांनी पाहण्याचे ठरविले. आणि

एका शिमग्याच्या रजेत ते काकांबरोबर शिर्डीला गेले. काका बाबांकडे गेले तेव्हा आपल्या देवतासमोर त्यांनी द्राक्षे ठेवली. बाबांनी ती द्राक्षे समोर असलेल्या मंडळींना वाटली. त्यातील काही द्राक्षे प्रसाद म्हणून ठक्कर यानांही दिली. बिया असलेली द्राक्षे ठक्करना आवडत नव्हती. परंतु समोरच्या साक्षात्कारी महापुरुषाने दिलेला प्रसाद ठक्कर नाकारणार कसा. एवढी हिंमत त्यांचे जवळ नव्हती. त्यांनी ती द्राक्षे तोंडात टाकली आणि आश्चर्य घडले.

ठक्कर यांनी खाल्लेल्या एकाही द्राक्षात एकही बी नव्हती परंतु बाकी मंडळीनी खाल्लेल्या द्राक्षात बिया होत्या. एवढेच होऊनही बाबांसंबंधी त्यांच्या मनात संशय आला आणि मनातल्या मनात ठक्कर म्हणाले, हा जर खराखुरा साधु असेल तर आता माझ्या मनात जे आहे ते अंतर ज्ञानाने जाणुन काकांना आता बाबा द्राक्षे देतील तरच मी त्यांना मानीन असे ठक्कर मनात म्हणाले. त्याच क्षणी बाबांनी मागे पाहीले. काकांना हाक मारली व द्राक्षे दिली. झाले ठक्कर मनातुन एकदम विरघळले तरीही त्यांचे मन बाबांना नमस्कार करायला तयार होईना.

ठक्कर मुंबईला जाण्यासाठी निघाले तेव्हा बाबांचा निरोप घेण्यासाठी बाबांजवळ गेले तेव्हा बाबा बोलू लागले. मी दक्षिणा घेतो. पण त्याच्या दसपट देतो परंतु माणूस कसल्यातरी बाबतीत समाधानी असतो का? निरर्थक विवंचना करण्याची त्याला खोडच लागलेली असते. संपत्ती, आरोग्य आहे तरी पण कसली तरी चिंता मनुष्य करीत असतो. याला काय म्हणावे बाबांच्या या बोलण्याची सत्यता ठक्करना पटली त्यांच्या हृदयावर या शब्दांचा ठसा असा उमटला की ते बाबांचे परमभक्त झाले.

भक्ती म्हणजे परमेश्वरासाठी स्वतःला विसरण्याची महान शक्ती. सत्पुरुष म्हणजे परमेश्वराचा अंत त्यात साईबाबा म्हणजे 'सबका मालिक एक' हा संदेश देत. या महान संदेशात जातीभेद, धर्मभेद, पक्षभेद, रंगभेद सारे गळुन पडतात. तिथे कुणी लहान मोठा नाही. गरीब श्रीमंत नाही. हीन-दीन नाही. म्हणून असे महापुरुष ज्ञानदेवानी वर्णन केल्याप्रमाणे —

आप परु नाही
चैतन्य जैसा!!

असे असतात. सारे भेद तेथे विसरून जातात.

बाबांच्यात कुणाला राम दिसतो, कुणाला रहीम दिसतो, कुणाला येशु दिसतो, कुणाला बौद्ध दिसतो, शिर्डीला कुणीही जावे. त्यांच्या समाधीजवळ बसावे. मनातील दुःख, आशा, आकांक्षा, हेतु सांगावेत आणि बाबांनी त्या सर्वांचे समाधान करावे.

हा अजब चमत्कार आजही अनेकांच्या जीवनात घडतो. आणि म्हणूनच 'शिर्डीचे साईबाबा' हे भारतीयवासीयांच्या हृदयातले दैवत बनले. आणि आता केवळ भारतापुरते मर्यादीतच राहीले नाही. संबंध जगात त्यांचा संचार चालू आहे.

बाबांच्या अजब गोष्टी आपणास ऐकावयास मिळतील त्यात सत्यता आहे. आंधळ्यालाही डोळे देणे हे चमत्कार जिथे होतात तिथे अंधदृष्टीला डोळस दृष्टी का नाही मिळणार?

एक साधु फकिर शिर्डीला होऊन गेला. त्याला स्वतःच्या जीवनाची फिकीर कधी नव्हती. स्वतःचा संसार त्यानी कधी केला नाही. म्हणून हजारो भक्तांच्या जीवनात ते सुख-समृद्धी निर्माण करीत असतात.

हा अनुभव ज्यांना येतो ते परत-परत शिर्डीस जातात. केवळ समाधीचे दर्शन घेण्यासाठी. त्या समाधीत त्यांना समाधान देण्याचे सामर्थ्य आहे. ते नसते तर कशाला तिथे लोक गेले असते. म्हणून एवढेच म्हणावेसे वाटते.

शिर्डीच्या श्री साईबाबांच्या समाधीजवळ श्रद्धेने जा. सबुरीने घ्या. आपल्या जीवनात निश्चित समाधान मिळेल. कारण आपल्याला मिळावे अशा अखंड इच्छेने जगणारा सिद्ध साक्षात्कारी चैतन्य पुरुष, आपले दैवत श्रीसाईबाबा त्या समाधीत शांतपणे विसावलेले आहेत. सर्वांवर त्यांची कृपादृष्टी आहे.

श्री साईलीला अपार
जो साई ध्यानी निरंतर
तयाचा सुखी संसार
जगामाजी होईल!!
जे भक्त भाविक कोणी
लागेल श्रीसाई चरणी
गुंतुनी श्री साई ध्यानी
जगी सुखी जाहले!!
अहोरात्र भक्तांसाठी
तळमळ करी हा जगजेठी
आपल्या प्रिय भक्तांसाठी
अशक्य ते शक्य करीतसे!!
जरी संकट कोणी भक्त
सापडला असेल खास
तयासी सोडविण्या त्वरीत
धाव घेई श्री साई!!

# सोन्याचे मंगळसूत्र परत

— सौ. रेखा नारायण दीक्षित
बी-११, मधुमनीषा सोसायटी,
सांताक्रुझ (पूर्व).
मुंबई - ४०० ०५५.

दयाळू कृपाळू साईमाऊलीला माझे शतशः प्रणाम. तिच्याच इच्छेने माले गेलेले सोन्याचे मंगळसूत्र परत मिळाले. त्याचे असे झाले — २७ जून १९८५ ला मी कुर्ला स्टेशनवर गाडीत चढत होते. २५-२६ ला भयंकर पाऊस झाल्याने गाड्या नियमीत धावत होत्या. २७ ला तर गाडीला फार गर्दी होती. गाडीतून उतरणाऱ्या बायका भराभर उतरल्या नाहीत. तेवढ्यात मी गर्दीतून गाडीत चढत असतांना माझ्या गळ्यांतील मंगळसूत्र कोणीतरी खेचले. मला लगेच समजले. मी हाताने धरण्याचा प्रयत्न केला. पण उपयोग झाला नाही. एक पाय गाडीत व एक प्लॅटफॉर्मवर. मी आजूबाजूला पाहिले तर कोणी दिसलेच नाही. माझ्या तोंडचे पाणी पळाले. मी घाबरून "मंगळसूत्र, मंगळसूत्र" असे ओरडले. डोळ्यापुढे अंधारी आली. तेवढ्यात गाडी सुटली. मी प्लॅटफॉर्मवर शोधाशोध केली. तेव्हा एका बाईने मला मंगळसूत्रातील १ वाटी दिली. बस्स. आता काय करायचे? तेवढ्यात एका पोलिसाला मी सांगितले. त्याने तक्रार करण्यासाठी कुर्ला रेल्वे पोलिस स्टेशनवर नेले. तेथे समोरच पू. साईबाबांचा व दत्तगुरुंचा फोटो होता. त्या दिवशी गुरुवार होता. मी फोटोला नमस्कार करून सांगितले, "माझे सौभाग्यलेणे मला परत मिळू दे मी माझा अनुभव साईलीला अंकात देईन." ४ महिने झाले. मी मधून मधून चौकशी करीत होते. ५ हजारांचा फटका बसल्यामुळे मी तर एकदम नर्व्हस झाले होते. पण पू. बाबांच्या शक्तीवर माझा पूर्ण विश्वास होता. रोज सकाळी उठतांना मी मनोमन प्रार्थना करायची, "मला माझं सोभाग्यलेणं लवकर मिळू दे." आणि खरंच एक दिवस मला पोलिस ऑफिसमधून फोन आला. तुम्ही मंगळसूत्र ओळखायला या. माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले. माझी गुरुमाऊली किती दयाळू, कृपाळू आहे. रीतसर सर्व घडून १९-११-१९८५ ला माझे गेलेले मंगळसूत्र मलापरत मिळाले. माझी श्रद्धा वृद्धींगत झाली. कळकळीने केलेली प्रार्थना मनोमन पोचली. फक्त श्रद्धा आणि सबुरी यांनीच माझे काम फत्ते झाले. या विज्ञानयुगात ती शक्ती कार्यरत आहे याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला. धन्य झाले मी. खरोखर निष्ठेने, नियमाने तुम्ही त्याची याद कराल तर तो धावून मदत केल्याशिवाय रहाणार नाही.

जय साईमाऊली. जय श्री स्वामी समर्थ.

## छोट्या साईभक्तांसाठी

# संत रामदास

दासनवमी (माघ वद्य ९) हा रामदासांचा अवतार समाधीदिन. रामदास हे रामाचे निस्सीम भक्त व उपासक होते. श्रद्धा व विवेक ह्यांच्या जोरावर त्यांनी 'समर्थ' ही पदवी मिळवली. अन्य संतांहून रामदास हे अगदी वेगळे होते. 'आधी प्रपंच करावा नेटका। मग करावे परमार्थ विवेका।' असे सांगणारे पहिले संत म्हणजे रामदास होत. मुसलमानी सत्तेच्या अमलाखाली चिरडल्या गेलेल्या आणि केवळ परमार्थाच्या मागे लागून निष्क्रीय व अचेतन बनलेल्या समाजास जागे करण्यास रामदासांनीच आरंभ केला. सर्वात प्रथम त्यांनी जागोजाग मठस्थापना करून मुसलमानांच्या वाढत्या धर्मप्रचारास व राज्यास आळा घालण्याचा प्रयत्न केला. अज्ञानी लोकांना देशाची स्थिती कळावी म्हणून उपदेश सुरू केला. धर्मरक्षण हे सर्वश्रेष्ठ काम मानले म्हणूनच ते म्हणतात —

धर्मासाठी मरावे । मरोनी अवघ्यांसी मारावे।<br>
मारता मारता घ्यावे । राज्य आपुले॥

रामदासांनी प्रथम जर काही खूणगाठ बांधली असेल तर ती ही की, महाराष्ट्राला प्रतिकारक्षम बनवायचे आहे. त्यासाठी अगोदर बलोपासनेची आवश्यकता आहे यासाठी त्यांनी धनुर्धारी राम आणि हनुमान ही दैवते निवडली आणि ठिकठिकाणी मठ स्थापन केले. परमेश्वराचे अधिष्ठान हवेच. पण प्रयत्न सोडता कामा नये हे त्यांचं सूत्र आजही सर्वांनाच मान्य होण्याजोगे आहे.

रामदास हे संत असले तरी त्यांना कलेची आवड होती. त्यांच्या वैराग्यवृत्तीत अरसिकतेला थारा नव्हता. रूपलावण्य व स्वरमाधुर्य यांना ते तुच्छ वा निषिद्ध मानीत नव्हते. फक्त कलेचा उपयोग केवळ करमणुकीसाठी न होता परमेश्वराच्या सेवेसाठी झाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

असे सर्वच गोष्टीत इतर संतांच्या तुलनेत वेगळेपणा असलेले रामदास पराक्रमापुढे ईश्वरासही गौणस्थान देत असत. म्हणूनच 'यत्न तो देव जाणावा' असा आजही सत्य वाटणारा उपदेश त्यांनी केला.

रामदासांचा उपदेश सर्व लहान थोरांना उपयुक्त ठरणारा आहे. हस्ताक्षर हे माणसाच्या मनोप्रवृत्तीचे द्योतक समजले जाते. त्या हस्ताक्षरासंबंधी संत रामदासांचे विचार विद्यार्थ्यांना निश्चितच मार्गदर्शक ठरतील. त्यांच्याच शब्दात ते विचार असे —

वाटोळें सरळे। मोकळें। वोतलें मसीचे काळे।<br>
कुळकुळीत वोळी चालल्या। ढाळें मुक्तमाळा जैशा॥ २॥<br>
अक्षर मात्र तितुके नीट। नेमस्त पैस काने नीट।<br>
आडव्या मात्रा त्याही नीट। आर्कुली वेलांट्या॥ ३॥<br>
पहिले अक्षर जें काढिले। ग्रंथ संपेतो पाहात गेलें।

# मला आलेले बाबांचे अनुभव

— श्री. मधुकर शामराव राणे
३७३ अ शनवार पेठ पुणे -

मला श्रीसाईबाबांची भक्ति करण्याची प्रेरणा झाली. साधारण सन् १९५५ ला हैद्राबादला असताना अगोदरची गोष्ट घडलेली आहे. आमच्या घरातील सर्वजण दत्ताचे फोटोला (आरती) नमस्कार दररोज करत होतो. परंतु एकदा असे झाले की, रात्री मला स्वप्नात दत्ताच्या फोटोच्या जागी साईबाबा दिसू लागले. उठल्यावर मी माझ्या वडिलांना स्वप्नातील गोष्ट सांगितली तर ते म्हणाले साईबाबा हे दत्ताचेच अवतार आहेत. तेव्हापासून मला बाबांबद्दल जास्तच ओढ लागली. आमच्याकडे सर्वांची साईबाबांवर श्रद्धा व भक्ति आहे.

मी हैद्राबाद येथे एस.टी. (निझामस्टेट रेल्वे) मध्ये कामाला होतो. मला दरवर्षी रेल्वे पास मिळत होता. हैद्राबाद ते मुंबई मनमाड मार्गे मी पास काढला. मी पहिल्यांदाच शिर्डीला जाण्यासाठी निघालो. मनमाड आल्यावर मनमाड ते कोपरगाव तिकिट काढायला वेळ मिळाला नाही. कारण हैद्राबादची गाडी उशीरा आली. त्याकरिता कोपरगावची गाडी सुटण्याची वेळ झाली. मी व माझ्या बसेस्चे पॅसेंजर गाडीत चढलो. गाडीत बसल्यावर शेजारील लोकांना सहज सांगितले की, माझ्याजवळ तिकीट नाही. गार्ड किंवा चेकरला सांगण्यास वेळ मिळाला नाही. गाडीत खूप गर्दी होती. एक गृहस्थ म्हणाले की, माझ्याजवळ एक जादा तिकीट आहे. मित्र येणार होता. तो आला नाही तर ते तुम्हांला देऊ कां? मी होय म्हणालो. तिकीट घेतले. खाली उतरल्यावर पैसे देतो असे म्हटले ते होय म्हणाले. उतरल्यावर स्टेशनवर सगळीकडे शोधले तर ते कुठेच दिसले नाहीत. साक्षात् बाबांनीच तिकीट आणून दिले असे सर्वजण म्हणाले.

एकदा असे झाले की १९५६ मध्ये माझी बदली हैद्राबादहून औरंगाबादला झाली. एक वर्षांनी माझी पत्नी व मुले शिर्डीला गेली. रजेमुळे मला त्यांच्याबरोबर जाता आले नाही. माझ्या खिशात दोन पास होते. एक नवा दुसरा जुना (तारीख संपलेला) एक पास मी न पाहताच दिला होता. सर्वजण निघून गेल्यावर मी खिशात पाहिले तर नवीन पास माझ्याजवळ होता. जुना पास पत्नीबरोबर दिला होता. लगेच मी ऑफिसमध्ये जाऊन तिथे सांगितले की, स्टेशनवर जाऊन फोन किंवा टेलीग्राम करतो, तेव्हा तेथील लोक म्हणाले तुम्ही काही काळजी करू नका. साईबाबा सर्व पाहून घेतील. चमत्कार असा झाला की, जाता येता दोन बेळा पास चेक झाला. परंतु काहीही न होता सर्व मंडळी खुशाल परत आली. अशा तऱ्हेने बाबांच्यावर सर्व भार टाकल्यामुळे ते माझ्या हाकेला धावून आले.

आम्ही २, ३ वर्षापूर्वी कोल्हापूरला मुलाकडे गेलो असतांना मला मुलीचे पत्र मुंबईहून आले की, तिच्या ५ वर्षाच्या मुलीचा किडलेला दात भूल देऊन २०० रु. खर्च करून काढायचा होता. तिला भूलीची भिती वाटत असल्यामुळे आईला पाठवून कळवले की, भूलीला (ऑपरेशनला) भिवू नकोस कारण साईबाबा आपले पाठीराखे आहेत. मी दररोज बाबांच्या देवळांत जाऊन जप, पोथी वाचत होतो. ३, ४

वेळा दवाखान्यातून नातीला घरी पाठवत होते. कारण सर्दी, ताप, खोकला असल्यामुळे तारीख पुढे ढकलली जात होती. आम्ही ६ महिन्यानंतर पुण्याला आलो. माझ्या मुलीला व नातीला पुण्याला बोलाविले. डॉ. श्रीकांत शारंगपाणी यांच्याकडे दात दाखविण्याकरिता नेले. १० रु. देऊन भूल न देता दात काढला. यावेळेस पण बाबा माझ्या हाकेला धावून आले होते.

त्यांच्या पुस्तकातले वचनच आहे की —

नित्य मी जीवंत। जाणा हेचि सत्य।
नित्य ह्या प्रचित अनुभवे।

असे मला अनेक अनुभव आलेले आहेत. त्यातले काही वर दिलेले आहेत.

# अवतारालाही अवतार संपवावा लागला-

**सौ. उषा अधिकारी,**
सावित्री सदन, बंदर रोड रत्नागिरी

श्री विष्णूने दुर्जनांना ऱ्हास आणि सज्जनांचा सांभाळ करण्यासाठी दशावतार घेतले. यातले काही प्राण्यांच्या रुपात होते. या दशावतारात परशुराम हा चिरंजीव असा अेकच अवतार आहे. बाकी अवतारामध्ये अवतार कार्य पूर्ण झाल्यावर देहत्याग केलेला आहे. राम आणि कृष्ण हे परमेश्वराचे विशेष गाजलेले अवतार. राम अवतारात राक्षसांचा संहार करायचा होता, भरतभूमीवर रामराज्य चालवायचे होते, राजनीतीचा धडा लोकांना शिकवायचा होता हे कार्य होते. कृष्णरुपात दैत्यांच्या विलक्षण त्रासातून भरतभूमीला मुक्त करायचे होते. याच अवतारात परमेश्वराच्या अगाध, अघटीत लीलांचे दर्शन घडवायचे होते. मानवरुपात राहिल्याने साध्या मानवासारखे देहव्यापार- भोग भोगूनही दाखवायचे होते. राम अवतारात वानरांसारख्या प्राण्यांची मदत घेऊन बलाढ्य राक्षसांचा संहार करून भरतभूमीत रामराज्य म्हणजे सुखाचे राज्य लोकांना दाखवून रामाने शरयू नदीत देहत्याग केला. कृष्ण अवतारात पांडवांच्या रथाचे सारथ्य करून कुरुक्षेत्रावर भगवतगीता अर्जुनाला सांगून त्याच्यात वीरश्री निर्माण करून कुरुपुत्रांचा व त्यांचे पाठीशी उभे राहिलेल्या दुष्टांचा संहार करण्याचे कार्य करवून सामान्य माणसाप्रमाणे एका सामान्य व्याधाच्या हातून मृत्यूचा स्वीकार कृष्णाने केला.

आपले बाबा म्हणजे कृष्णच. बाबांचे शिरडीत आगमन होण्यापूर्वी आपल्या भरतभूमीमधे हिंदूमुस्लीम भयंकर वाद होता. श्रीबाबांचा अवतार त्यासाठीच होता. मानवजात ही एकच जात. जाती जमाती माणसाने निर्माण केल्या आहेत, परमेश्वराकडे जातपात हा भेद नाही. हे लोकांना त्यांच्या सहवासात राहून पटवून द्यायचे होते. परस्परात आपलेपणा, प्रेम निर्माण करायचे होते. हे कार्य सोपे नव्हते. समाजकंटकांकडून कितीतरी त्रास, अवहेलना सहन करायला लागणार होती. अर्थात हे बाबांना कठीण नव्हते. श्रीबाबा हे प्रत्यक्ष अवतारच होते. त्यांनी ते तोंडाने सांगितले नाही पण त्यांच्या विविध लीला, त्यांचे

अचाट सामर्थ्य, निसर्गावर असलेली त्यांची अफाट सत्ता यांनी ते सिद्धच झाले होते. श्रीबाबा शिरडीत ६० वर्षे वास्तव्य करुन होते. रुई, निमगाव, राहाते या तीन गावापलिकडे ते कुठेही गेले नाहीत- त्यांनी आगगाडी कधी पाहिलेली नव्हती, तरी सगळे वेळापत्रक त्यांना तोंडपाठ असे. भक्तांच्या बहात्तर पिढ्यांचा ते इतिहास सांगत. आपले किती जन्माचे संबंध आहेत ते सांगत. पुढे होणाऱ्या गोष्टी त्यांना आधीच कळत. ते पूर्ण अंतर्ज्ञानी होते. श्रीबाबांनी आपल्या सहवासात आलेल्या, श्रद्धा सबुरी ठेवणाऱ्या भक्तांना मोक्षपदाला| नेले. भक्तांवर मातेसारखें प्रेम केले. भक्तांना कधीही कसलाही उपदेश न करता त्यांचे आचरण सुधारले. त्यांच्यात बंधुभाव निर्माण केला.

प्रारंभी फकीर म्हणून शिरडीत आगमन झाले तेव्हा लोक त्यांना वेडा समजत. मुले टिंगल करीत. पण बायजाबाई पाटील मात्र त्यांना देवच समजत. पाठोपाठ रानावनात हिंडूनही त्यांना प्रेमाचे चार घास भरवत. त्यांचे ८।१० वर्षांचे लाडके लेकरु या आपल्या मानल्या मामाला हट्टाने नवीन कपडे घालायला लावी. बाबा बायजाबाईचा भाव पाहून मशिदीत राहायला लागल्यावर तात्या तिथे झोपायला लागला. कोवळे ८।१० वर्षे वय. सधन पाटलांचा एकुलता एक लाडका लेक. पण बायजाबाईने त्याविरुद्ध चकार शब्द काढला नाही. आपले सुदैवी पोर देवाच्या सहवासात राहिले तर त्यात त्याचेच कल्याण आहे ही ती भक्तिमान स्त्री जाणून होती. ती बाबांवर तात्या-इतकीच माया करीत होती. तिचा मृत्यू होण्यापूर्वी तिने तान्या बाळाला बाबांच्या स्वाधीन करून म्हटले होते की याचा नीट सांभाळ करा. लेकरु द्वाड आहे, तापट आहे. श्रीबाबांनी त्यांना वचन दिल्यावर बायजाबाई सुखाने मरणाला सामोऱ्या गेल्या. श्रीबाबांना पुढचे भाकीत आधीच कळत असल्याने तात्यांचा मृत्यूकाळ दिसू लागला होता. तो एका रात्री स्वप्नात त्यांनी रामचंद्र पाटलांच्या कानावर घातला होता. त्याला ते खरेही वाटले होते आणि खरोखरच तात्या आजारी पडला आणि श्रीबाबांचे भाकीत खरे होणार असे दिसू लागले. पण बायजाबाईला दिलेले वचन बाबा विसरले नव्हते. त्यांनी आपल्या निर्वाणाची कुणालाही कल्पना न देता तात्याच्या मृत्यूच्या बरोबर वेळेला स्वतः समाधी घेतली. श्रीबाबांचा आर्युदाय संपत आला होता त्याचा अर्थ नव्हे. श्रीबाबा म्हणत असत "मी मरुन जाईन पण दिलेला शब्द आणि वचन पुरे करीनच करीन या मशिदीत बसून मी असत्य भाषण कधीच करीत नाही." त्याप्रमाणेच श्रीबाबा वागले- रामाने सामान्य माणसांप्रमाणे १४ वर्षे वनवास भोगला. श्रीकृष्णाने स्यमंतक मण्याची चोरी केल्याचा आरोप सहन केला. श्रीबाबांनी वेडा, खुळा वगैरे विशेषणे स्वतःना लावून घेतली. राम-कृष्णांनी राजवैभव तरी भोगले. आपल्या या शिरडीतल्या राजाने मात्र कसलेच उपभोग भोगले नाहीत. भिक्षा मागूनच पोट भरले. सामान्यांसारखेच राहिले.. आपले असामान्य दाखवता दाखवता विजयादशमीच्या साडेतीन मुहूर्तातील| एका सुमुहूर्तावर सामान्य माणसाप्रमाणे भुर्रकन अनंतात विलीन झाले. अवतारालाही आपला अवतार प्रेमळ भक्तासाठी संपवावा लागाला.

# बी. एड. ला प्रवेश बाबांनी दिला

**सौ. प्रमिला लिलाधर धडाडे**
एम. ए. बी. एड.
अशोकनगर, नागपूर.

**"जरी हे शरीर गेलो मी टाकून ॥
तरी मी धावेन भक्तांसाठी"**

शिरडी येथील साईबाबांच्या दर्शनाला आम्ही सर्वजण ५ डिसेंबर १९८४ रोजी गेलो. गुरूवारला सायंकाळी आरतीच्या वेळी मी मंदिरात उपस्थित होते. आरती संपल्यानंतर साईबाबांच्या मंदिरात मी बसले. त्यावेळी मला "साईबाबांची ११ वचने" लिहिलेला बोर्ड दिसला. औत्सुक्यापोटी मी तो बोर्ड वाचला. त्यातील 'जरी हे शरीर गेलो मी टाकून। तरी मी धावेन भक्तांसाठी' हे वचन वाचल्याबरोबर मला त्यांच्या वचनाची प्रचिती आलेल्या अनुभवाची आठवण झाली.

माझे पती एम. ए. झालेले असून ते 'जे.सी. डी. गर्ल्स हायस्कूल' नागपूर येथे नोकरीवर आहेत. फार दिवसांपासून बी.एड. होण्याची त्यांची इच्छा होती. पाच वर्षांपासून ते सारखे बी.एड. ट्रेनींगला ॲडमिशन मिळावी म्हणून फॉर्म भरत होते. पण ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यांना बी.एड. साठी ॲडमिशन मिळत नव्हती. ३ वर्षापूर्वी तर नागपूरच्या बी.एड. ट्रेनिंग कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळणार होती व तसे आश्वासन पण मिळाले होते. पण ऐन वेळेवर कमी पर्सेन्टेजनमुळे ॲडमिशन मिळाली नाही. त्यामुळे ते मनोमन जरा निराश झाले. मला देखील वाईट वाटत होते.

मी मग साईबाबांना शरण गेले. त्यांना विनंती केली, "साईबाबा, हे ॲडमिशन करिता इतके प्रयत्न करतात. पण ह्यांची ॲडमिशन होत नाही आणि बी.एड. करण्याची ह्यांची फार फार इच्छा आहे. तेव्हा साईबाबा जर तुम्ही आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करता, अडीअडचणीच्या वेळी साथ देता तर मग माझ्या मिस्टरांना ॲडमिशन का मिळू देत नाही? कसेही करा. पण ह्यांना जवळपास कुठे तरी ॲडमिशन मिळू द्या. जर तुम्ही माझ्या मिस्टरांना ॲडमिशन मिळू दिली तर आम्ही शिरडीला तुमच्या दर्शनास येऊ." अशा प्रकारचे साईबाबांना साकडे घातले. जर खरोखर तुम्ही भक्तांची इच्छा पूर्ण करणारे भक्तवत्सल असाल, तर माझी ही इच्छा पूर्ण कराल, नाही तर नाही असेही मी अज्ञानीपणाने म्हटले."

पुन्हा ह्यांनी १९८४ च्या उन्हाळ्यात नियमितपणे बी.एड. करण्यासाठी फॉर्म भरला. पण नंबर काही लागतच नाही. तेव्हा ह्यांच्यापेक्षा मी जास्त दुःखी व निराश झाले. कारण मी बी.एड. आहे. माझ्या मिस्टरांची माझ्यापेक्षा कमी डिग्री असू नये. ही माझी इच्छा म्हणून ह्यांना ॲडमिशन मिळाली नाही की, मला वाईट वाटायचे. नागपूरचे बी.एड. ट्रेनिंग कॉलेज सुरू झाले.

आणि ----- अगदी अकस्मात ऑगस्ट महिन्यामध्ये एक बंद लिफाफा पोस्टाने घरी आला. मी तो लिफाफा फोडून वाचायला सुरुवात केली. त्यात लिहिले होते, 'यावर्षी

काटोलला 'नवीरा महाविद्यालयामध्ये' बी.एड. ट्रेनींग कॉलेज सुरू करण्याची सरकारने परवानगी दिली आहे. तेव्हा आपल्याला ॲडमिशन पाहिजे असल्यास १५०० रु. नगदी भरावे' ते पत्र वाचून मला अतिशय आनंद झाला. कारण 'ॲडमिशन मिळणार' म्हणून माझी आशा पालवली. मी धावतच देवघरात गेले व साईबाबांच्या फोटोकडे बघून भारावलेल्या अंतःकरणाने म्हटले, "बाबा तुमची लीला किती अगाध आहे. किती सहजतेने, घर बसल्या तुम्ही ह्यांना ॲडमिशन मिळू देण्याचे स्वप्न पूर्ण केले. खरंच बाबा, तुम्ही आपल्या भक्तांवर सदैव कृपादृष्टी ठेवता व त्यांची इच्छा पूर्ण करता. पण आम्ही पामर मात्र, तुमची लीला समजून घेऊ शकत नाही. कारण आम्ही 'पी हळद अन् हो गोरी' अशा प्रवृत्तीचे लोक. खरोखरच बाबा, तुमच्यावर श्रद्धा ठेवली तर तुम्ही भक्तांची इच्छा पूर्ण केल्याशिवाय राहत नाही. त्याकरीता भक्तांजवळ सबुरी असायला हवी." अशा प्रकारे बाबांनी, घर बसल्या अगदी सहजतेने, ह्यांना बी.एड. ला ॲडमिशन मिळवून देण्याची, माझी कितीतरी दिवसांची इच्छा पूर्ण केली, व आता ते बी.एड. ट्रेनींग बाबांच्या कृपेने पास देखील झालेले आहेत.

आणि या सर्व प्रकारावरून "जरी हे शरीर गेलो मी टाकून, तरी मी धावेन भक्तांसाठी' या त्यांच्या वचनाची प्रचिती येते. तेव्हा सर्व साई भक्तांना माझी आग्रहाची विनंती आहे की, त्या साईवर तुम्ही श्रद्धा ठेवा म्हणजे तुम्हाला सबुरीचे फळ मिळेलच मिळेल.

"श्री सच्चिदानंद सद्‌गुरू साईनाथ महाराज की जय"

●●●●●●

# साईबाबांच्या द्वारकामाईने कोणाकोणाला वाचविले

— श्री. माधव गजानन गोरे.
विनायक बाग,
बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला (पश्चिम), मुंबई : ४०० ०७०.

**लोहाराची मुलगी**

अेका धनत्रयोदशीला बाबांनी धूनीत हात घालून दूरवर रहात असलेल्या मुलीला भट्टीत पडत असताना वाचविले.

**भिमाजी पाटील**

क्षयरोगी भिमाजी पाटलाला जेव्हा द्वारकामाईत आणले तेव्हा बाबा म्हणाले या द्वारकामाईत तुझे आता पाऊल पडले तेव्हा तुला नक्की दुखण्यापासून आराम पडणार व त्याप्रमाणे भिमाजी पाटील क्षय मुक्त झाला.

**बाळा शिंपी**

जेव्हा बाळा शिंपी याचा हिवताप जाईना तेव्हा तो अेक दिवस द्वारकामाईत आला व बाबांना आपले दुःख सांगितले. बाबांनी त्याला सांगितले "लक्ष्मीआईच्या देवळाजवळच्या काळ्या कुत्र्याला दहिभात खाऊ घाल" त्याप्रमाणे बाळाने केल्याबरोबर त्याचा हिवताप नाहीसा झाला.

**बापूसाहेब बुट्टी**

अेकदा शिर्डीत असताना बापूसाहेब बुट्टींना सारख्या वांत्या व जुलाब होऊ लागले, तेव्हा भक्तांनी त्यांना बाबांसमोर द्वारकामाईत आणले. तेव्हा बाबांनी त्यांच्यासमोर बोट हलवून सांगितले "आता शौचास होता कामा नये व वांतीही येता कामा नये" त्याप्रमाणे दोन्ही व्याधींनी पलायन केले व बापूसाहेब खडखडीत बरे झाले.

**आळंदीचे स्वामी**

अेकदा ह्या स्वामींना कर्णरोगाने बेजार केले म्हणून ते द्वारकामाईत आले तेव्हा बाबांनी त्यांना आशीर्वाद दिला "अल्ला अच्छा करेगा" नंतर स्वामी पुण्यास निघून गेले व ८ दिवसातच त्यांचा कर्णरोग बरा झाला.

**काका महाजनी**

अेकदा काका महाजनींना जुलाबाने अगदी हैराण केले तेव्हा बाबांनी द्वारकामाईच्या सभामंडपात अेक शेंगदाण्याची थैली पडली होती त्यातील दाणे उचलले व ते सोलून काकांना खायला दिले व नंतर त्यांना पाणी प्यायला दिले व त्या क्षणापासून काकांचे जुलाब बंद झाले.

**श्री दत्तोपंत**

हरदा शहरचे श्री. दत्तोपंत पोटशूळाच्या व्याधीने १४ वर्षे गांजले होते. तेव्हा अेक दिवस ते शिरडीला द्वारकामाईत आले व बाबांना आपल्या व्याधीबद्दल सांगितले. तेव्हा बाबांनी त्यांना विभूती दिली व डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला व तेव्हापासून त्यांचा पोटशूळ पूर्ण बरा झाला.

**डॉक्टर पिल्ले**

नारुग्रस्त डॉक्टर पिल्ले अेकदा द्वारकामाईत बाबांच्या शेजारी बसले होते. तेव्हा थोड्यावेळाने संध्याकाळ झाली म्हणून अब्दूल पणत्या पेटविण्याकरिता द्वारकामाईत आला व पणत्या लावता लावता अब्दूलचा पाय चुकून पिल्यांच्या नारुग्रस्त पायावर पडला व त्यातून नारु बाहेर पडले व पिल्यांना अेकदम आराम पडला.

**मालेगावच्या डॉक्टरांचा पुतण्या**

अेकदा डॉक्टरांच्या पुतण्याला दाढ्याव्रण झाला होता. खूप औषधे झाली, परंतु गुण येईना. म्हणून डॉक्टर त्याला घेऊन शिर्डीला आले, व द्वारकामाईत येऊन बाबांना रोगाबद्दल निवेदन केले, बाबांनी त्यांना अुदी दिली व रोज व्रणावर फासावयास सांगितली. व त्याप्रमाणे ८ ते १५ दिवसात त्या पुतण्याला उत्तम गुण आला.

**शामा**

अेकदा शामाला सर्पदंश झाला तेव्हा लोकांनी त्यांना उचलून द्वारकामाईत आणले, तेव्हा बाबांनी शामाला पाहून खालील उद्‌गार काढले, "चढू नको भटुरड्या वर। चढशील तर खबरदार। चल निघ जा खाली उतर" हे उद्‌गार अर्थात सर्पविषाला उद्देशून होते व त्याप्रमाणे शामा विषमुक्त होऊन बरा झाला.

# बाळाला बरे वाटले

जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी

## तरी मी धावेन भक्तांसाठी

**सौ. कल्पना एस्. पोतदार**
९४ एम्/७१ जनता नगर
ताडदेव रोड
मुंबई — ४०० ०३४.

हे साईबाबांचे वचन खरोखरीच सार्थ आहे. माझ्या बहिणीला १२ ऑक्टोबर १९८५ रोजी शस्त्रक्रिया करून पहिला मुलगा झाला. दहा बारा दिवसानंतर त्या मुलाची तब्येत बिघडली. म्हणून त्याला गिरगावातील एका मोठ्या डॉक्टरांना दाखविले. त्यांनी त्याला न्युमोनीया झाला आहे असे सांगून हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यास सांगितले. अकरा दिवस त्या हॉस्पीटलमध्ये त्याला ठेवले. तेथे त्याला ऑक्सिजनवर ठेवले. जवळजवळ वीस औषधाच्या बाटल्या, इंजेक्शने झाली. चार वेळा त्याचा एक्स-रे काढला. रक्त, लघवी, संडास सर्व तपासले परंतु अजिबात त्या बाळाला गुण आला नाही. म्हणून आम्ही तेथून त्याला दुसऱ्या मोठ्या डॉक्टरांकडे नेले. जन्मतः त्याचे वजन दोन किलो होते. नवीन डॉक्टरांनी वजन केले तेव्हा ते एक किलो सातशे ग्रॅम भरले. म्हणजे वजन खूपच कमी झाले. आम्ही सर्व काळजीत पडलो. साईबाबांचा धावा करू लागलो. त्या डॉक्टरांनी त्याला भाटिया हॉस्पीटलमध्ये ठेवण्यास सांगितले. त्या मुलासाठी परदेशी दुधाचा डबा चालू करण्यास सांगितले. त्या दुधाने त्याला बरे वाटले. त्याचा कफ कमी झाला. नंतर एकाएकी त्याला संडास सुरू झाला. ताप येऊ लागला. डॉक्टरानी त्याचे तोंडाने दूध पिणे बंद केले, व त्याला नाकात नळी घालून दूध देऊ लागले. चार एक्स-रे काढले. बेरीयम हे पांढरे औषध प्यायला देऊन एक्स-रे काढला. डॉक्टर म्हणत, अन्ननलिकेत काही तरी दोष असावा असे चाळीस टक्के वाटते. नाकातली नळी किती दिवसानी काढणार असे डॉक्टरांना विचारले असता ते म्हणाले, किती दिवसानी काय विचारता? किती महिन्यानी काढणार असे विचारा. या त्यांच्या वाक्याने आम्ही खूपच

घाबरलो. बाळाची आई तर काळजी करून बारीक होत चालली. मधून मधून बाळाला शंभर पर्यंत ताप येऊ लागला. त्या हॉस्पीटलमध्ये एक महिना झाला. परंतु बाळाची तब्येत सुधारेना. शेवटी ते हॉस्पीटल आम्ही सोडले, व बाळाला दादरला आठवले डॉक्टरांकडे आणले. त्यांनी परत त्याचे रक्त, लघवी, संडास सर्व तपासले. दादरला कश्यप हॉस्पीटलमध्ये त्याला ठेवले. त्याला रक्ताची जरूरी आहे असे डॉक्टरांनी सांगितले. त्याप्रमाणे त्याला शंभर सीसी रक्त चढवले. नंतर बेरीयमच्या साह्याने एकस-रे मध्ये काही दोष आढळल्यास त्याचे ऑपरेशन करावे लागेल असे डॉ. आठवले व डॉ. लोकेश्वर यानी सांगितले. बाळाला आता तोंडाने थोडे थोडे दूध देऊ लागले. आम्ही साईबाबांचा धावा सुरू केला. नवस केला. आमच्या बाळाचा फोटो निर्दोष असू दे म्हणून साईबाबांना विनवणी केली, आणि साईबाबांच्या कृपाप्रसादाने बाळाच्या छातीच्या काढलेल्या फोटोत बिलकुल दोष नाही असे डॉक्टरानी सांगितले. आमचे सर्वांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले. साईबाबांच्या कृपेने आमचा बाळ सात दिवसात बरा झाला. गुरूवारी त्याला डॉक्टरांनी घरी पाठवले. साईनिकेतनमध्ये जाऊन साईबाबांच्या चरणावर आम्ही बाळाला ठेवले, व घरी आणले. २६ डिसेंबर ८५ रोजी दत्तजयंतीच्या शुभ मुहूर्तावर बाळाचे सिद्धेश हे नाव ठेवण्यात आले. आता तो तीन महिन्याचा झाला. बाबांच्या कृपेने तो मजेत आहे.

अशीच साईबाबांची कृपादृष्टी आपणा सर्वांवर राहो हीच साईचरणी प्रार्थना.

# भक्तांची माऊली-श्रीसाईबाबा

— **श्री. ए. एस्. फर्नांडीस.**
चमणकरवाडी, उभादांडा, वरचे माड,
मु. वेंगुर्ला, ता. सिंधुदुर्ग, ४१६५१६.

सदगुरू वाचोनी सांपडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी॥
आपणासारिखे करिती तात्काळ। नाही काळवेळ तया लागी॥
लोह परिसाची न साहे उपमा।सद्गुरू महिमा अगाधीचि॥
तुका म्हणे कैसे आंधळे हे जन। गेले विसरून खऱ्या देवा॥॥

या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे हा संसार रूपी भवसागर तरावयास सद्गुरू श्री साईबाबांशिवाय तरणोपाय नाही. त्यांचे आपण अनन्य भावाने पाय धरावे. त्यांच्यावर आपण भार घालावा व निश्चिंत मनाने असावे, व आपले सत्कर्म आचरावे. मग त्यांना आपल्यासारखे करायला काळ वेळ लागत नाही. लोखंड आणि परिस यांची तुलना करून शोभत नाही. लोखंड हे लोखंडच. परंतु लोखंडाला परीसाचा स्पर्श होताच त्याचे

सोने होते. त्याचप्रमाणे सद्‌गुरू महिमा अगाध आहे. त्या सद्‌गुरू श्रीसाईबाबांचे आपण पाय धरल्यानंतर आपल्या जीवनाचे सोने झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणजेच आपल्या जीवनाचे सार्थक होते. श्रीसंत तुकाराम महाराज म्हणतात, "आपण सर्व लोक आंधळे आहोत. आपल्याला खरा देव कोणता हे सुद्धा समजत नाही. आपण भ्रामक समजुतींना बळी पडतो. भोंदू साधूंना भजतो. त्यांच्याकडे आपण जाऊन सुखाची याचना करतो. परंतु त्यांच्याकडून आपल्याला सुख मिळण्यापेक्षा दुःखच, निराशाच पदरी पडते. म्हणून आपण सद्‌गुरू श्रीसाईबाबांना अनन्य शरण जावे.

आपले मानवी जीवन अनेक सुख दुःखाचे मिश्रण आहे. त्या सुखदुःखांना आपण तोंड देऊन त्यातून मार्ग काढला पाहिजे. जो तो आपापल्या पूर्व जन्मांतील कर्माच्या फलाप्रमाणे सुख अगर दुःख भोगीत असतो. दुःखाशिवाय सुख आणि सुखाशिवाय दुःख असूच शकत नाही.

मनुष्य जीवन हे क्षणभंगुर आहे. ते शाश्वत असे जीवन नाही. तर आपण शाश्वत सुखाच्या मागे लागले पाहिजे. याकरिता "साईभक्ती" या साधनाची कास धरून आपला मार्ग आखला पाहिजे

आपले साईबाबा हे महान संत होते. साईबाबा हे साक्षात् अवतारी पुरूष होते. साईबाबा हे साक्षात् परब्रम्ह होते.साईबाबा परमेश्वर होते. ईश्वर हा एकच असतो. त्यांची नावे अलग अलग असतात. साईबाबांनी त्यांच्या जीवनात अनेक चमत्कार करून दाखविले. पाण्याने पणत्या पेटविल्या. हरवलेली घोडी दाखविली. चिलीम पेटविण्यासाठी चिमटा दगडावर आपटून विस्तव उत्पन्न केला, उदी देऊन गोर गरीब, दीन दुबळ्यांचे, दुःखी जीवांचे जीवन आनंदी केले. स्वतः डोक्याला चिंधी, अंगात कफनी, हाती करवंटी या वेषात ते जीवन जगले.

साईबाबांजवळ जातीभेद, धर्मभेद नव्हता. बाबांच्या भक्तांत सर्व धर्मिय लोक होते. आजही ते आहेत. हिंदु मुस्लिम हे दोन्ही साईचे भक्त होते. साईच्या पाशी हिंदू, मुस्लिम, ख्रिस्त पारशी, शीख असा भेदभाव नव्हता. म्हणूनच सारेच जण साईच्या प्रेमाचे चाहते होते व त्या साऱ्यानाच साईप्रेमाचा लाभ झाला.

तो हा साई संतवर। ईश्वराचा दुजा अवतार।
डोई तयाच्या पायांवर। ठेविता कृपावर ठेवील॥ श्री साई सच्चरित अध्याय ११-ओवी १४९ |

आपण श्री माऊलीच्या चरण कमलावर अनन्य भक्तीने डोके (डोई) ठेवावे. म्हणजे ती माय माऊली आपणावर कृपाकर ठेविल्याशिवाय राहणार नाही.

आपली साईबाबांवरील भक्ती खाली दर्शविल्याप्रमाणे असावी. एखादी मांजरी आपल्या पिल्लांना दुध पाजून बाहेर गेल्यावर तिची पिल्ले तिच्या मागून परत जातात व पुन्हा त्या मांजरीला लुंचतात. ती मांजरी काही वेळ गुरगुरते. परंतु थोड्याच वेळात ती जमिनीवर पहुडताच ती शांतपणे आपल्या पिल्लांना दूध पाजते. त्या मांजरीच्या पिल्लांच्या तीक्ष्ण नख प्रहारांनी त्या मातेची ओटी दूधाने भरते व त्यातून दूधाच्या धारा वाहू लागतात. ती आपल्या पिल्लांना जवळ कवटाळते व त्यांना मनोसक्त दूध पाजते.

जैसी त्या बाळांची अनन्य भक्ति। मातेसी करी दुग्धोत्पत्ति॥
तैसीच तुमची साईपदासक्ति। द्रवतील चित्तीं साईतें। श्री साईसच्चरित अध्याय -१५ ओवी १७

ज्या प्रमाणे त्या बाळांचे आपल्या आईवर अनन्य प्रेम असते. त्या उत्कट प्रेमामुळेच त्या आईला दुधाची उत्पत्ती होते. त्याचप्रमाणे आपण श्री साई चरण कमलांची आसक्ती धरली पाहिजे. आपण साईबाबांची सेवा करावी. आपण कोणतीही गोष्ट करताना साईबाबांची आठवण करावी, म्हणजे कोणतेही कठीण कार्य असले तरी साईकृपेने पार पडेल.

मुंबई नगरामध्ये शेट हरिश्चंद्र पितळे नावाचे सद्गृहस्थ होते. त्यांचा एक मुलगा होता. तो नेहमी आजारी पडत असे. त्या मुलाला वारंवार फिटस् येत असत व तो बेशुद्ध पडत असे. त्या आजारपणामुळे ते अगदी दुःखी झाले होते. गावातील सर्व डॉक्टर, वैद्य झाले. परदेशी वैद्य झाले. पण त्याला काहीच गुण येईना. फक्त साधुसंतांच्या भेटी घेणे शिल्लक राहिले होते.

सन १९१० साली मुंबई प्रांतात श्री संत दासगणू महाराजांची किर्तने झाली त्या किर्तनामधून त्यांनी सद्गुरू श्री साईबाबांची ओळख करून दिली. ज्यावेळी ते कीर्तन करीत त्यावेळी ते आपल्या समोर श्री साईबाबांची प्रतिमा ठेवून कीर्तन करीत असत. ज्यावेळी ते साईबाबांचे गुणगान गात, त्यावेळी त्यांचे अंतःकरण गहिंवरून येई व श्रोत्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहत असत. त्यामुळे साईबाबांची कीर्ती सगळीकडे पसरली. त्यावेळी शिरडी ह्या छोट्याशा गावाला पंढरपूरचे क्षेत्राचे स्वरूप आले. व विविध प्रकारचे लोक शिरडीच्या यात्रेची वारी करण्यासाठी येऊ लागले.

श्री संत दासगणू महाराजांनी आपल्या किर्तनातून साईभक्तीचा प्रसार केला. साईबाबांच्या उदी प्रसादाने भूत-पिशाच्चे पळतात, त्याचप्रमाणे आशिवार्दाने नाना प्रकारच्या पीडा टळतात. साईबाबांच्या दृष्टीक्षेपाने कोणत्याही प्रकारच्या बाधा निवारण होतात. अशा प्रकारे दासगणूंच्या कथा-किर्तनातून, त्यांच्या प्रासदिक ग्रंथातून श्री साईबाबांचे महात्म्य वाढीस लागले. त्यामुळे पितळे यांची श्रीसाईबाबांस पाहण्यास उत्कंठा वाढली. ते आपल्या मुलाबाळांस बरोबर घेऊन सहपरिवार शिरडीला आले. त्यांनी प्रथम आपल्या मुलास बाबांच्या पायांवर घातले व आपण बाबांस साष्टांग लोटांगण घातले. इतक्यात तेथे एक विपरीत दृश्य घडले. श्रीसाईबाबांची व त्या मुलाची दृष्टादृष्ट होताच मुलगा बेशुद्ध पडला. त्या मुलाने आपले डोळे गरागरा फिरविले. हे पाहून त्याचे आईबाप म्हणजे पितळे कुटुंब गडबडले. तो मुलगा भूमीवर पडताच त्याच्या तोंडातून फेस येऊ लागला. त्याचा श्वास निघून गेला असे वाटू लागले. तो मुलगा मरण पावला असे समजून त्या मुलाच्या आईवडिलांची भितीने गाळण उडाली. यापूर्वी त्या मुलाला अनेक झटके येऊन गेले होते. परंतु इतका वेळपर्यंत त्याला परत शुद्धीवर येण्यास वेळ लागला नव्हता. ही 'न भूतो न भविष्यति' अशी प्राणांतिक गति पाहून त्या मुलाची माता आक्रोश करू लागली.

त्या मुलाची आई म्हणू लागली, "आम्ही आलो कशासाठी आणि हे झाले काय? आम्ही आलो बाळाच्या उपायासाठी, तर हा झाला अपाय. असे हे श्रीसाईबाबांचे पाय

घातकी आहेत काय? तर हा आमचा येण्याचा खटाटोप व्यर्थ आहे. चोरांच्या भितीने घरात जावे, ते घरच अंगावर कोसळून पडावे, तशी आमची ही स्थिती झाली. वाघ खाईल म्हणून गाई पळून जातात, तर त्यांना वाटेत भेटतो कसाई, तसेच हे आमचे झाले. वाटेतील पांथस्थ (वाटसरू) उन्हात तापला म्हणून वृक्षच्या छायेत येऊन बसला. तर तो वृक्षच त्याच्या अंगावर कोसळून पडावा, तशी ही आमची अवस्था झाली. असे नाना प्रकारचे विकल्प त्यांच्या मनात आले.

हे पाहून श्री साईबाबांनी त्यांना आश्वासन देऊन सांगितले. तुम्ही जरा मनात धीर धरा. तुम्ही तुमच्या मुलास बिऱ्हाडी घेऊन जा. थोड्या वेळानंतर त्याला परत शुद्धी येईल व तो जागा होईल. उगाच घाई करू नका. पुढे असे केल्यानंतर श्रीसाईबाबांची अमृतवाणी खरी ठरली. त्यांचा मुलगा परत शुद्धीवर आला. पितळे सहकुटुंब आनंदित झाले. त्यांच्या मनातील वाईट विचार नाहीसे झाले.

वाड्यात नेल्यानंतर ताबडतोब त्यांचा मुलगा शुद्धीवर आला. त्यामुळे त्याच्या आईबापाना अत्यानंद झाला. पितळे पत्नीसमवेत बाबांच्या दर्शनाला येऊन अति नम्रतेने त्यांनी बाबांना साष्टांग नमस्कार घातला. ते आपल्या मुलाला पाहून उठून बसले व त्यांनी बाबांचे आभार मानले. ते बाबांचे पाय चेपीत बसले. एवढ्यात बाबा हसत हसत पितळ्यांना म्हणाले, "तुझ्या मनामध्ये संकल्प-विकल्प उठले होते, तुझ्या मनामध्ये विविध प्रकारचे विचार-तरंग उठले होते ते आता तरी शांत झाले आहेत काय?

'ठेवील निष्ठा धरील सबूरी। तयासी श्री हरी रक्षील॥" (श्री साईसच्चरित अध्याय २६, ओवी ८३)

तर बाबा म्हणतात, "जो माझ्यावर दृढ श्रद्धा ठेवील, तसेच सबूरी धरील. त्यालाच ईश्वर रक्षील. श्रद्धा म्हणजे दृढ भावना, भक्ति वा निष्ठा होय."

'तुम्ही कोणी कुठेही असा। भावे मजपुढे पसरिता पसा।
मी तुमचिया भावा सरिसा। रात्रंदिसा उभाच।।

श्री साईबाबांनी आपणांस असे सांगितले आहे की, "तुम्ही कुठेही असा. तुम्ही अंतःकरण पूर्वक माझी प्रार्थना करा. म्हणजे मी तुमच्या हांकेला धावून येईन. अगदी आर्ततेने तुम्ही माझी विनवणी करा. म्हणजे मी तुमच्या मागे-पुढे उभा आहे समजा."

"जरी मी गेलो हे शरीर टाकून
तरीही धावेन भक्तांसाठी॥"

जरी मी हे शरीर टाकून गेलो, तरी मी जीवंत आहे. आणि याची प्रचिती तुम्ही घ्या. अशी श्री साईबाबांनी ग्वाही दिली आहे. म्हणजे साईबाबा हे गेले नाहीत. ते नित्य जीवंत आहेत. व नित्य जीवंतच राहणार. श्री साईबाबा हे जन्ममरणातील आहेत. ते सर्व कालीन आहेत, ते सर्व स्थळी आहेत. ज्यावेळी हिरण्यकश्यपूने भक्त प्रल्हादाला विचारले कि, तुझा नारायण आहे तरी कोठे? तेव्हा प्रल्हादाने त्याला उत्तर दिले. ह्या समोर दिसणाऱ्या खांबात देखील माझा नारायण आहे. त्यावळी हिरण्यकश्यपूने त्या खांबावर लाथ मारली. लगेच त्या खांबातून नरसिंह रूपाने भगवान विष्णूला प्रगट व्हावे

लागले. त्याचवेळी जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी आपले श्री साईबाब आहेत. आपल्या भक्तांच्या समीप आहेत. त्यांच्या अंतःकरणात आहेत.

''मग जो गाई वाडें कोंडे।
माझे चरित्र माझे पवाडे।
तयाचिया मी मागेपुढे।
चोहिंकडे उभाचि॥ (श्री साईसच्चरित अध्याय ३-ओवी १२)

या करिता प्रत्येक मुनष्याने, प्रत्येक साईभक्ताने श्रद्धा व सबुरी या दोन गोष्टींची कास धरून श्रीसाईबाबांची भक्ती करावी. त्यासाठी आपण नित्यनेमाने श्री साईबाबांचे नामस्मरण (जप), प्रार्थना, नित्यनेमाने आरती, पोथी वाचन ह्या गोष्टी करण्याची दक्षता पाळावी. म्हणजे आपल्यावर सद्‌गुरू श्री साईबाबांची कृपा झाल्याशिवाय राहाणार नाही.

अशा या अनंत कोटि ब्रम्हांडनायक राजाधिराज योगिराज परब्रम्ह सच्चिदानंद सद्‌गुरू श्री साईबाबांना माझे कोटी कोटी प्रमाण!!

॥जय श्री साई समर्थ॥

# श्री साईनाम स्मरण

**— श्री. प्रभाकर कोळमकर**
बी.ए.बी.एड. एल.एल.बी.
१९ गुंफा दर्शन, दत्तपाडा
बोरीवली, मुं. ६६.

श्री साईलीलातील वेगवेगळ्या थरातील भिन्न भिन्न व्यवसायातील लहान-थोर भक्तांनी प्रसिद्ध केलेले अनुभव वाचले म्हणजे श्रीबाबांचे अस्तित्व या विश्वास आहे याचा भक्कम पुरावाच वाटतो. जणु काय बाबांच्या प्रत्यक्ष सहवासाचा भक्तांनी प्रसिद्ध केलेला कबुलीजबाबच! पंचतत्त्वांकित विश्वाच्या अणुरेणूत साक्षात् असलेल्या श्री बाबांच्या उपस्थितीचा भक्तांनी सिद्ध केलेला साक्षात् पंचनामाच!

असंख्य भक्तांनी श्रीबाबांच्या केवळ नामस्मरणानेच चिंतनाने असंख्य संकटांवर मात केलेली आहे. नामस्मरणाने नामजपाने- भक्तांना कवच कुंडले धारण करायला लावणारी श्रीसाई माऊली साक्षात् प्रेम, कर्णाचा दानशूर अवतारच होय! श्रद्धा-भक्तीरूपी कवच कुंडलातून मिळालेले मनोधैर्य-सबुरी- म्हणजे श्रीबाबांनी भक्ताला दिलेली उदार देणगीच!

साई-स्मरण म्हणजे मनाला मिळालेले भक्कम चिलखत! या चिलखताला भवताप भेदूच शकत नाहीत. या नामस्मृती चिलखतामुळेच भक्ताला निर्भय, निश्काम, निःस्वार्थी, निरामय अशी उच्च, श्रेष्ठ अवस्था प्राप्त होत असते.

व्यावहारिक अडचणीमुळे भक्त हताश होत नाही. कारण श्रीबाबांच्या अमृतमयी, प्रेम-प्रेरणामयी नामस्मरणाने भक्त अखंडीत, चिरंतन, आनंदमय अवस्थेत असतो.

श्रीबाबांच्या भक्तीने मनाला प्रेममय विश्वास प्राप्त होतो. या विश्वासातच मनःशांतीचे भक्कम सामर्थ्य असते आणि या मनःशांतीमुळेच भक्ताची वाटचाल जीवनातील सुख-समृद्ध-वैभवाकडे होत आहे. नामसमरण हा मार्गदीप आहे. निबिड अंधःकारात-अज्ञानात श्रीबाबा-श्रीसाई सतत मार्गदर्शन करीत असतात. भक्ताने विश्वासाने सोपविलेला भार श्रीसाई माऊली लीलया सांभाळीत असतात कारण हा भार नित्य पूर्ण श्रद्धा-सबुरीने भरलेला आहे.

भक्त-जीवनातील दुःख म्हणजे जणू काय सद्गुरू श्रीसाई माऊलींनी घेतलेली कठीण परीक्षाच! या परीक्षेतील भक्त-विद्यार्थी श्रीसद्गुरु साईकडून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण होतो त्याला श्रीसाई सुखपूर्ण मनःशांती, वैभव प्राप्त करून देतात.

"ठेविले साईनी तैसेचि रहावे
चित्ती असू द्यावे समाधान...."

अशा समाधानी चित्त-वृत्तीत रममाण होवून श्रीसाईमाऊलीचे गुणगान करणारा भक्त सतत आनंदीच असतो. पराजयाची त्याला खंत नसते व पराक्रमाचा वृथा अभिमानही नसतो. सतत संयमाने असा भक्त वावरत असतो. गीतेतील श्रीभगवंतांची शिकवण व आधुनिक काळातील श्रीसाई माऊलीची शिकवण समान तत्त्वांवर आधारलेली आहे. भगवान श्रीकृष्णानी 'साई' नाव धारण करून गीतेतील अमरतत्त्वांची पुन्हा ओळख करून दिली आहे.

जो जो मज भजे जैसा जैसा भावे
तैसा तैसा पावे मी ही त्यासी... असे श्रीसाई माऊलीचे वचन आहे.

भाव म्हणजे भक्ताची पूर्ण समर्पित भावना श्रीसाईचरणाशी अखंडीत सतत हवी म्हणजेच श्रीबाबांशी अतूट नाते! जन्मजन्मांतरीचे चिरंतन भाव बन्धनच! या भाव-बन्धनातूनच श्रीसाई भक्ताला मुक्ती दिल्याशिवाय मुक्तच होत नाहीत. या प्रेम-भाव-बंधनामुळेच भक्ताची काळजी श्रीभगवंत साईना सतत घ्यावी लागते. भक्ताची तळमळ श्रीसाईमाऊलीला सतत जाणवते व श्रीसाई भक्ताला भव-ताप-बंधनातून मुक्त करीत असतात.

अतींद्रिय शक्ती म्हणजेच श्रीसाईमाऊलीच्या प्रेमभाव भक्तीतून मिळालेली शांत प्रवृत्ती-चैतन्यमयी प्रेरणा! या चैतन्यशक्तीमुळेच भक्त सदा सर्वकाळ सर्वत्र निर्भय अवस्थेत वावरत असतो. विश्वातील जडमय विकारपाशात तो गुंतून पडत नाही. भक्त मुक्तच राहतो. कोणताही विकारपाश त्याला स्पर्शूच शकत नाही. श्रीसाईचरणाशी-श्रीसाईगुरु माऊलीशी लीन झालेला भक्त सदा सर्वदा सर्वकाळी 'साईनामात' तल्लीनच झालेला असतो यामुळे त्याची मानसिक विचार-चिन्तन अवस्था उच्च श्रेष्ठ असते.

'वृक्षवेली आम्हा सोयरे
वनचरे...'

अशा भावश्रद्धामयतेने भक्त सर्व विश्वाकडे पहात असतो. श्रीसन्त श्रेष्ठ भक्त तुकारामांना झालेल्या साक्षात् अनुभव म्हणजे वृक्ष, वेली आणि वनचरे ही सर्व त्यांची प्रेमळ

नातलग मंडळीच!

'सर्व विश्वचि माझे घर...'

असा सिद्धान्त-विचार प्रसविणारी श्रीभक्त ज्ञान माऊली सारखी भक्त-सन्त-मंडळी विश्वात्मक देवाला अतिप्रिय असतात आणि म्हणूनच अशा भक्तांची अंतःकरणे तळमळ, जाणीवा श्रीभगवन्त सतत जाणत असतात. श्रीभगवन्त साईचे भक्त जागृती, स्वप्नी हाच अनुभव सतत घेत आहेत कारण त्यांचे मति अविचलपणे साई-गुरुचरणाशी स्थीर आहे.

'नाथा घरी विठू पाणी भरी...'

'झाला महार पंढरीनाथ...' इ. शब्दा-शब्दातून भगवंत सद्‌गुरुच्या प्रेम निधानाचे कृपा-साऊलीचे रहस्य आपोआपच उलगडते आणि भगवन्त 'भावा' चा भूकेला

नम्र झाला भूता,

त्याने जिंकिले भगवन्ता...' इ. काव्य-शब्द-सूरातून प्रगट होणारी भगवन्ताची प्रेमभावना ऊराशी सतत कवटाळून धारण करीत भक्त विश्वातील सर्व कठीण प्रसंगातून (व्यक्त/अव्यक्त) परीक्षातून उत्तीर्ण होत असतो. अभक्तांना इतरे जनाना- तो अेक विलक्षण चमत्कार वाटतो पण सच्चा भक्त सद्‌गुरुला पूर्ण शरण गेलेला भक्त- सहज लीलया मानवी जीवन संघर्षातून वैभवाकडे जीवन्मुक्त शांती-समृद्धीकडे वाटचाल करीत असतो. सद्‌गुरु साईच्या सतत स्मरणाने अभ्यासाने भक्ताची चित्‌शक्ती वाढतच असते यामुळेच भक्त विकारपाशानी दुर्बळ होत नाही. त्याचे मनोबल नाम-स्मरण शक्तीने सततच वाढतच असते.

## श्री.रामकृष्ण रेवणकर यांचे निधन

श्री साईलीलाच्या अंबरनाथच्या सिद्धहस्त लेखिका शशिकला रेवणकर यांचे पती श्री. रामकृष्ण रेवणकर यांचे मंगळवार ता. ४-३-८६ रोजी अंबरनाथ येथे हृदयविकाराचा झटका येऊन अचानक वयाचे ३४ वे वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन लहान मुले आहेत.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# श्री साईबाबांची धूनी माता

— डॉ. सुमन खानविलकर
बाँबे-पूना रोड, लोणावळा.

नमस्कार माते तुला नि तुझ्या सान्निध्यात सतत रमणाऱ्या माझ्या माऊलीला. दयेच्या सागरा साईनाथाला, तसेच दिव्यरुप अग्नी नारायणाला तुझ्या हृदयेश्वराला नमस्कार.

माते किती प्रेमळ आहेस तू याची साक्ष पटविण्यासाठी साईंनी तुला सतत त्यांच्या भक्तासमोर ठेवली आहे.

तुला निर्माण करण्याचा बाबांचा हेतू फार थोर आहे.

तसे पाहिले तर धुनीचे कार्य थंडी वाऱ्यापासून संरक्षण करणे. मग बाबांना थंडी वाजत होती काय?

छे. बाबांना नव्हे जे भक्तजन संसाररुपी सागरात बुचकळ्या मारून गारठून गेलेले त्रासून बाबांकडे येत त्यांना या पवित्र ठिकाणी आल्यावर जी हुडहुडी भरलेली असे, भितीने जीव कासाविस झालेला असे त्याचे निवारण करण्यासाठी ही धूनी निर्माण केली.

माणूस कितीही चांगला असो कि वाईट असो मनाने अगर तनाने त्याच्या हातून कितीही वाईट कर्मे घडलेली असोत, रोगी असो भोगी असो, पापी असो पुण्यवंत असो, दयावंत असो क्रूर असो. त्याच्यातला आत्मा एकदा का पंचतत्वात विलीन झाला कि ज्या व्यक्तीला नातेवाईक, सगेसोयरे, मुले माणसे प्रेमाने आदराने विचारत असतात, त्याची त्यांना गरज वाटत असते.

त्याच सर्वांना तो एका क्षणात भयदायक नि नको वाटतो. त्याला ते अग्नी नारायणाच्या स्वाधीन करतात.

काय ही या बुद्धीवंत माणसाची शेवटी अवस्था होते पहा.

पण अग्नी नारायणा तू किती श्रेष्ठ आहेस तो देह पाप करूनच वाढलेला असो की पुण्यात सदा रममाण असो, गरीब असो अगर श्रीमंतीत लोळलेला असो. लहानाचा असो मोठ्याचा असो, रोगी किंवा निरोगी, सुंदर अथवा कुरुप, साधूसंतांचा असो की चोरांचा असो.

तू या कशाचाच कधी विचार करत नाहीस. तू आपल्या पवित्र हातानीच नव्हे तुझ्या त्या तेजोमय सहस्त्र करानी जवळ घेतोस, नुसताच घेत नाहीस मायेने कुरवाळून त्याला आपल्यात सामावून घेतोस.

या भल्या बुऱ्या जगातले कटू अनुभव घेऊन तो निराश झालेला, खऱ्या खुऱ्या प्रेमाला पारखा झालेला माणूस तुझ्या कुशीत शांतपणे विसावतो. एरवी थोडीशी जरी झळ लागली की कुरकुर करणारा या वेळी बिलकूल कुरकुरच करत नाही. कारण जगाचे खरे स्वरुप कळून चुकलेले असते.

ज्याच्यात तुम्हाला शेवटी विलीन व्हायचे आहे ज्याच्या सहस्त्र सुंदर नि तेजस्वी करांच्या प्रेमळ मिठीत विसावायचे आहे.

या देहातील आत्मा पंचतत्वात विलीन झाल्यावर नातेवाईकांनी, प्रेमीजनानी, टाकून दिलेला निरोपयोगी देह पण आपले जीवापाड प्रेम असणाऱ्या या देहाला सारी बरी वाईट कर्तृत्वे विसरून आपल्या मिठीत नव्हे, कारण मिठीतून माणूस परत सुटू शकतो पण याची प्रेम करण्याची अजब तऱ्हा आहे. तुमचा मागमुसही रहात नाही त्याचे रुपांतर राखेत होते.

माणूस या जगात किती निर्दयपणा दाखवतो. तिसऱ्या दिवशी पहाण्यास जातो पूर्ण जळाला की शिल्लक आहे. राख पाहिली की तो भरतो, चार दोन हाडे गोळा करतो. घराच्या बाहेर झाडाला नाहीतर वळचणीला बांधून ठेवतो. ज्याने कष्ट करून घर बांधले. त्या घरात तुम्हाला सुख देण्यासाठी रात्रंदिवस कष्ट केले, त्याच्या चार हाडांना घरात ठेवता येत नाही. राखसुद्धा नदी समुद्रात टाकली जाते. हाडेसुद्धा गंगेत सोडली जातात.

एकूण काय पुरा नजरेआड झाल्याशिवाय प्रेमीजनांना चैन पडत नाही. दिवस करतात त्यावेळी सुद्धा परत येऊ नका असे काही म्हणतात म्हणे.

एवढे सारे असले तरी प्रत्येक माणूस मायाजाळात फसतोच.

ती राख माणसाला सांगत असते अरे अशीच तुझी राख होणार आहे. तेव्हा या माझ्या राखेला साक्षी ठेवून तुझे पावित्र्य राख, तुझी ईश्वर भक्ती राख, विवेक वैराग्य राख, अरे हे जग कितीही गोजीरवाणे, सुख विलासी दिसो तुझ्या मनात पक्के राख की शेवट तुझी पण राख होणार.

तरी आतापासूनच या धूनीतल्या राखेला कपाळी धारण कर पोटात घे म्हणजे ती राख होण्याची तुला भिती वाटणार नाही. संसारातला तसेच या देहाचा असार पणा खरा खुरा तुझ्या लक्षात येईल.

हे बघ जीवा राख या शब्दाला उलट केलं की काय अर्थ होतो "खरा".

आपण देहालाच खरा मानत असल्यामुळे आपणांस मरणाची भीती वाटते पण खरा चालक आत्मा आहे. हे विसरतो नि अज्ञानाची पट्टी डोळ्याला बांधून देहाची जपणूक करतो नि परमेश्वराला विसरतो.

मरा या शब्दाचा उलट अर्थ जितका पवित्र नि पापनाशक आहे तितकेच या राखेत पावित्र्य आहे. आणि म्हणूनच बाबांनी धूनी पेटवून ठेवली आणि लोकांना उदी देवू लागले. त्यामुळे लोक प्रभूपदी लीन होऊ लागले नि सुखी झाले.

हा अग्नी नारायण कितीतरी रुपानी आपल्या सहवासात, शरीरात सतत असतो. सुर्याच्या किरण रुपाने प्रेम करतो, अग्नी जेवण शिजवून देतो. दिव्याच्या रुपाने तसेच आपला जठराग्नी त्यामुळे अन्न पचते, भूक लागते असा कोणत्या ना कोणत्या रुपाने आपणास मदत करत असतो.

एवढेच नव्हे तर आपल्या या देहाला चालना देणारा, बोलवता हाच आहे कारण आपण म्हणतो ना अरेरे त्याची प्राण ज्योत मालवली म्हणजे आत्मा हा ज्योत आहे किती जवळचा संबंध आहे याच्याशी आपला.

खरे तर आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की याच्याच सान्निध्यात आपल्याला जायचे आहे. शेवटी काही करा याच्याच मांडीवर विसावायचे आहे.

हाच आपल्याला माणसे टाकणार' तेव्हा जवळ करणार आहे ह मनात राख.

धूनीचे सुद्धा हेच व्रत तिच्यात कधी बाभळीची, सागाची, आंब्याची तर कधी चंदनाची लाकडे घातली जातात पण यात कधीच दुजाभाव होत नाही, बरेवाईट सामावून घेणे, सर्वांवर सारखेच प्रेम करणे इतकेच तिला माहीत, साऱ्याचीच राख होते. मानवा जागा हो नि आपले आयुष्य सत्कर्मरत नि परमेश्वराच्या नामात घालव. असे सांगण्यासाठीच श्री साईनाथानी धूनीची स्थापना केली. नि तिच्यातल्या राखेला स्वतःच्या पवित्र हाताने स्पर्श करून तिचे नाव उदी ठेवीले. ती उदी लोकांना रोग मुक्त, संकट मुक्त करते अशा या साईकृपेच्या धुनी मातेला माझे शतशः नमस्कार असोत.

साऱ्या जगाला भस्म करण्यासाठी अग्नीचा एक कण पुरे होतो, तसे बाबांच्या या धुनीतल्या उदीत सामर्थ्य आहे. मानवाला उद्धरण्याचे.

ओम शांती

# ॥ साई तारी त्याला कोण मारी । ।

— **श्री. प्रकाश क्षीरसागर,**
महाबळेश्वर.

साई तारी त्याला कोण मारी या वचनाचे प्रत्यय येणारी एक घटना माझ्या आयुष्यात घडली. मी ज्या ठिकाणी राहतो त्या ठिकाणचा एक मामुली माणूस आणि त्याच्या मागे काही पुढारी (स्थानिक) असा गट करून आम्हाला राहत्या घराची जागा सोडावयास लावण्यासाठी आटोकाट प्रयत्न करून आम्हांला अतिशय त्रस्त केले. कोणताही मानवी उपाय न राहिल्याने आम्ही श्री साईबाबांना या संकटातून आमचे रक्षण करावे म्हणून मनोभावे हाक मारली. असे सांगताच काही ध्यानी मनी नसताना आमचे संकट निवारण झाले. अशीच साईबाबांची कृपादृष्टी रहावी हीच बाबांच्या चरणी प्रार्थना.

खरोखरीच कोणी वाया जाणार नाही. अशी श्रद्धा असल्यावर आणि श्री साईमाउलीची जबरदस्त कृपा असल्यावर आपण पामर काय दाखवणार? ९-८-८३ रोजी आम्ही सगळे शिर्डीहून पुण्याला आलो आणि सौ. आईला के.इ.एम. हॉस्पीटलमध्ये ऑपरेशनसाठी दाखल केले. ऑपरेशन आधीच ठरले होते.

१८-८-८३ रोजी सकाळी ७॥ वाजता आईला ऑपरेशन थिएटरमध्ये नेले. ऑपरेशनसाठी २ तास लागले. ऑपरेशननंतर २ दिवसांनी आईची तब्येत अचानक जास्त झाली. त्यादिवशी अखंड साईबाबांचे नामस्मरण करून सौ. आईला बरे वाटावे म्हणून मनापासून प्रार्थना केली. अन् खरोखरीच सौ. आई लवकर बरी होऊन घरी आली. तेव्हा या जगात माऊलीशिवाय आपण कोणाला हाक मारणार. तिच्याशिवाय आपले कोण आहे?

# ।। साक्षात्कार ।।

— श्री बबन डी. येरम.
१/५, कल्याणजी देवजी चाळ
चिरागनगर, घाटकोपर मुं.८६

अनन्यभावे चिंतुनी भजती भक्त जे मला।
सदा मिसळले त्यांचा मी योगक्षेम चालवी ।।

(गीताई-९/२२)

"या श्लोकाची आठवण मला झाली व मन आनंदाने भरून आले. त्याच्या असीम कृपेची साक्ष पटली. त्याने दाखविलेला साक्षात्कार मला त्याच्यावरची श्रद्धा बळकट करण्यास सहाय्यभूत ठरला. मी विसरू शकत नाही ती घटना!"

माझे मित्र श्री. श्रीराम दांडेकर मला श्रीसाईलीलेची एक दिव्य अनुभूती सांगत होते. मी त्यांचे बोल जसेच्या तसे श्रीसाईलीलेच्या वाचकांना उपलब्ध करण्यासाठी लेखणी सरसावून बसलो. त्यांच्या साईभक्तीत मीही तद्रूप झालो. त्यांनी सांगितलेली घटना अशी —

माझं लग्न ठरलं. कल्याणच्या एका लग्न हॉलमध्ये आम्हाला आदल्या रात्रीच मुक्कामाला जायचे होते. काही धार्मिक विधी उरकायचे होते. एक रिक्षा ठरवून मी स्वतः बहिण व आई असे तिघे रिक्षेत बसलो. महत्त्वाच्या सामानापैकी एक छोटी पेटी रिक्षेत आमच्या मागच्या बाजुला असलेल्या जागेत ठेवली. बहिणीनेच ही पेटी माझ्याकडे दिली होती ज्यात दहा-बारा तोळे सोन्याचे दागिने होते.

हॉलजवळ रिक्षा येताच आम्ही उतरलो. इतर छोटे सामान घेऊन हॉलमध्ये आलो. हॉलमध्ये येताच बहिणीने विचारले की मी तुजजवळ दिलेली पेटी न विसरता घेतलीस ना? मी विचार करू लागलो अन् काळजाचं पाणी पाणी झालं. ती पेटी रिक्षातच राहून गेली होती. आणि रिक्षावाला निघून गेला होता.

मामांना ही हकिकत सांगितली. सर्व चिंताग्रस्त झाले. विवाहासारख्या मोठ्या व महत्त्वाच्या समारंभात एक काळजीचं कारण घडलं होतं. रिक्षा ज्या दिशेला निघून गेली त्या दिशेला मामा निघून गेले.

रात्री साडेबारा वाजेपर्यंत शोधाशोध केली पण व्यर्थ! कल्याण सारख्या मोठ्या शहरात तो रिक्षावाला शोधणार कसा?

रात्र वाढतच होती. झोप काही लागत नव्हती. शेवटी श्रीसाईबाबांची आठवण मनाला स्पर्श करून गेली. धास्तावलेल्या मनानेच बाबांना कळकळीने विनवू लागलो, बाबा, या भक्ताची लाज राखा. निष्काळजीपणामुळे आमची एक पेटी रिक्षातून राहून गेली आहे. फार मोठा ऐवज त्यात आहे. आमचे हे संकट निवारण करा. आम्ही शिरडीला येऊन आपले दर्शन घेऊ व पंधरा नारळांचे तोरण आपल्या दारी बांधू.' ही नवसवजा प्रार्थना मी केली व स्वस्थ बसलो.

साधारण रात्रौ एकच्या सुमारास एक रिक्षावाला येऊन म्हणाला की येथील कोणाची पेटी रिक्षात राहून गेली होती काय? हे ऐकताच वडिल, ताबडतोब म्हणाले की आमच्याच एका पेटीचा घोळ झाला. समोरच त्याच्या हातातील पेटी पहाताच सर्वांना हायसं वाटलं. आमच्या जवळची किल्ली त्या रिक्षा ड्रायव्हरला दाखवून आम्ही खात्री पटवून दिली.

श्री. शिंदे असे रिक्षा ड्रायव्हरचे नाव होते. त्यास शंभर रूपये देऊ केले. पण त्यानी नम्रतापूर्वक नकार दिला. आमच्या सर्वांच्या विनंतीवरून त्यास ते बक्षिस घ्यावयास भाग पाडले. पुन्हा पुन्हा त्याचे आभार मानून त्यास निरोप दिला.

लग्नकार्य व्यवस्थित व आनंदात पार पडलं. श्री साईबाबांनी संकटकाळी मारलेल्या हाकेला ओ देऊन आमची सुटका केली व त्याच्यावर श्रद्धा ठेवण्यास ह्या एका साक्षात्काराची भर पडली.

नंतर ताबडतोब आम्ही उभयता शिरडीला बाबांच्या दर्शनाला गेलो व पंधरा नारळांचे तोरण तेथे देऊन आलो.

धन्य ते साईबाबा व धन्य त्यांची लीला जी भक्तांवर मायेची पखरण करण्यास सदैव तयार असते."

भक्तांच्या हाकेला सदा ओ देई।
तीच साई माझी आई ।।

# मी पडले पण बाबांनीच सावरले

— सौ. पद्मावती वैद्य
जीवनआशा,
पेडर रोड, मुंबई - २६.

पू. श्रीसाईनाथांचे बद्दल व त्यांनी दिलेल्या अनुभवाबद्दल लिहावे तेवढे थोडेच आहे.

त्याचे अस झालं की, आमचेकडे एकदा रात्री फोन आला १०-११ चा सुमार असेल मी झोपले होते. पण फोन आला म्हणून उठले व घ्यायला जात होते तर माझा पाय अडखळून मी जोरात पालथी पडले. नाकातून रक्त वाहू लागले. डोक जोरात आपटल. लौकर काय कराव, रक्त कशाला पुसावे कळेना. तेवढ्यात कुणीतरी माझ्या पाठीवरून हात फिरवत आहे व उपरणे पांढरे पुढे करून सांगत आहे की हे घे पुसायला. असा भास झाला. मी तेवढ्यात त्यांना सांगतेय एवढ स्वच्छ उपरणे नको. लहान रुमाल द्या. तेवढ्यात माझ्या मुलाने उधड केला होता. पण पाठीवरून हात फिरवून उपरणे पुसायला देणार कुणीच दिसल नाही. मुलानी रुमाल दिला, बर्फ फिरवला रक्त थांबले. मला तर फार लागले नाही. डोकं मात्र आपटल्यामुळे दुखलं २ दिवस बस.

पण हे कसं घडलं? तर मी रोज सकाळी पू. बाबांना गुढगे टेकून नमस्कार करते. व त्यांना प्रार्थना करते बाबा माझ्या पाठीवरून हात फिरवता कां? व तसा ते फिरवतात असं मानते. त्या मुळेच खरोखर वेळ आल्यावर बाबांनीच पाठीवरून हात फिरवला असंच मी समजते व तेच खरं आहे.

दुसरा अनुभव माझी मुलगी डिसेंट्रीने खूप आजारी झाली. ५ दिवस झाले कशाने गुण नाही. नाना तऱ्हेची औषध उपाय केले. पण बरंच वाटेना. मग शेवटी मी बाबांची उदी औषधात घालून दिली व बाबांना प्रार्थना केली की बाबा हिला आता गुण पडू दे आणि खरंच चमत्कार व्हावा तसा तिला गुण आला. दुसरे तिसरे दिवशीच ती हिंडू फिरू लागली. पू. बाबांचे उपकार आहेत.

असे मला आलेले कित्येक अनुभव आहेत. कधीही कळवळून प्रार्थना करावी व पू. बाबांनी ती ऐकावी. असंच नेहमी घडतं. मी पण माझ्या मनावर कुठलाही ताण पडला की लगेच पू. बाबांची प्रार्थना करते व सांगते: बाबा योग्य असेल तर तुम्ही सर्व करालच आणि लगेच अनुभव येतोच. मात्र श्रद्धा जबर हवीच. मला तर सवयच लागली आहे की पू. बाबांना सर्व सांगूनच करायचे. त्यांना सांगितल्याशिवाय काही करत नाही, काहीही मागत नाही. पण जे जे घडतं ते सर्व त्यांना सांगते व ते ऐकून त्यांना योग्य वाटेल तेच होतं. कांहीही झाले तरी त्यांची इच्छा तशी होती म्हणून समाधान मानते.

माझी तब्येत बरी नसते वय झालंय. तेंव्हा बाबांच्याचरणी माझी प्रार्थना आहे की, एकतर बरं तरी करा अगर पायाशी घेवून जा. माझी सर्व मनकामना पू. बाबांनी पूर्ण केली आहे. त्यांची कृपादृष्टी असावी हीच विनंती करते.

१५ दिवस माझा नातू आजारी होता. घसा, खोकला. पण एका रात्री त्याला इतका जोरदार ठसका लागला की तो घाबरा गुबरा झाला. वय लहान घशात आडकलंय करून ओरडायला लागला. आमच्या तोंडचे पाणी पळालं, किती औषधं दिली, कशाने थांबेना. थकून गेलं मूल. मग मीच पू. बाबांची प्रार्थना केली की बाबा कसंही करून ह्याचा ठसका थांबवा, आणि आश्चर्याची गोष्ट की ५-१० मिनीटात ठसका थांबला. आडकलेलं आता गेलं म्हणायला लागला. डॉक्टरी उपाय चालूच होते. पण बाबांनी हाक ऐकली. मुलगा रात्री स्वस्त झोपला. अनुभव लिहिन म्हटलं होते म्हणून लिहित आहे. आपण जेवढी श्रद्धा ठेवावी तेवढा अनुभव येतोच. साई माऊली ही सर्वांची आई आहे, सर्वांची मनोकामना पूर्ण होते.

# दर्शनापुरती दृष्टी आली

— श्री. र.श्री. पुजारी
रमानिवास
९९२, सदाशिव पेठ
पुणे - ३०.

श्री. नाना आणि सौ. पार्वतीबाई साठे हे दांपत्य पाऊणशेच्या घरातील. मातृपितृभक्त पुत्र श्रीराम साठे मुंबईस मोठ्या हुद्यावर. सूनबाई आणि नातवंडेही सुविद्य आणि सुसंस्कृत. तरीही हे दांपत्य पुणे शहराच्या मोहात अडकून पुण्यास राहाण्याचा हट्ट घेणारे. गात्रे विकल होऊनही स्वावलंबी जीवन जगणारे. अशा वयात त्यांना एका आपत्तीस तोंड द्यावे लागले. ती आपत्ती म्हणजे सौ. पार्वतीबाईंचें अंधत्व.

चार ऑपरेशन होऊनही पार्वतीबाईंचे अंधत्व तिळभरही कमी होईना. अखेर परम साईभक्त कै. काकासाहेब अवस्थी एक दिवस घरी आले. म्हणाले, "यांना एका डोळ्याने निश्चित दिसू लागेल."

याचे प्रत्यंतर लगेच आले. पाचव्या ऑपरेशनमुळे त्यांच्या एका डोळ्यास थोडेसे दिसू लागले. ते केवढे? तर फोटोतील साईबाबांचे दर्शन एकदाच होण्यापुरते! अर्थात् हा 'अनुभव' त्यांनी साईलीलेत दिला. तो ऑगस्ट ७७ च्या साईलीलेत छापूनही आला.

ही लीला करून साठे पतिपत्नींना श्रीबाबांनी स्वतःकडे ओढून घेतले. ते दोघे शिरडीस जाऊन आले. कै. नानासाहेब रासने वगैरे श्रेष्ठ साईभक्त त्यांच्या घरी येऊ लागले. यामधूनच पुढे अनुभवकथन, पोथीवाचन इत्यादी सत्संग वाढू लागला. तरीही सौ. साठे अंधत्वामुळे सबंध दिवस घालवावा कसा या चिंतेत पडत.

अशा वेळी पुण्यातील संतभक्त सत्कवी श्रीराम आठवले त्यांच्या घरी येऊ लागले. निरनिराळ्या संतांच्या जीवनातील महत्त्वाच्या लीला वर्णन करणारी गीते रचून ती सौ. साठे यांना ऐकवू लागले. ती गीते ऐकून ऐकून सौ. साठे यांना पाठ होऊ लागली. त्यामुळे त्यांची त्रिकाल उपासना आकार घेऊ लागली. सिद्ध होऊ लागली.

या उपासनेमधून साठे पतिपत्नींना नवनवीन 'अनुभव' येऊ लागले. नित्य अशांत असणारे मन शांत होण्याच्या मार्गास लागले.

तथापि काही सात्विक आकांक्षा मनात उरल्याच. आयुष्यात आपण एकवार काशीयात्रा करावी ही वासना विशेष त्रास देऊ लागली. तथापि परावलंबी जिण्यामुळे ही वासनाही त्यांनी मनात दडपून ठेवली. मौन पाळले.

अशा मनःस्थितीत गेल्या श्रावणात त्या मुंबईस गेल्या. त्यावेळी सूनबाई सौ. सुधा साठे म्हणाल्या, "तुमचे सर्व झाले. पण काशीयात्रा काही अजून घडली नाही. तरी ती आपण करून घेऊ."

सौ. सुनबाई एम्.ए.बी.एड्. जेष्ठ शिक्षिका. त्यांनी अर्धपगारी रजा घेतली. स्वतःच्या जबाबदारीवर आपल्या वृद्ध सासूसासऱ्यांना त्रिस्थळी घडविली. त्यांना अगदी फुलासारखे

नेले आणि परत आणले.

काशीस विश्वनाथास अभिषेक, गयेस श्राद्धादी कर्मे, प्रयागास धार्मिक विधी — हे सारे सशास्त्र करीत असताना सहप्रवासी यात्रेकरू म्हणाले, "आजीबाई, या तुमच्या खऱ्या कोण? या सूनबाई काही वाटत नाहीत. कन्या वाटतात."

पण याहून आश्चर्य म्हणजे सौ. साठे यांना काशीस गयेस आणि प्रयागास महत्त्वाचे तेवढे दिसण्यापुरती दृष्टी आली! सर्व ठिकाणी दर्शन उत्तम झाले!

# उदीमुळे एका मुलाला जीवदान मिळाले

— **सौ. सरोजिनी मुळ्ये**
६ नाथ मंदिर कॉलनी
इंदूर.

● वर्ष दीड वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. आमच्या शेजारी एक सिंधी कुटुंब राहते. त्यांचा दोघांचाही श्री साईबाबांवर अतिशय विश्वास आहे. जेंव्हा जेंव्हा मी शिर्डीला गेले तेंव्हा त्या बाईने मला नारळ घेऊन बाबांच्या पायाला लावून मला प्रसाद घेऊन या असे सांगितले.

पुढे तिला दिवस राहिले. दिवस राहिल्यापासून सारखे तिच्या पोटात दुखे व सारखा स्त्राव होत असे. डॉ. नी खूप औषधे दिली तिला शेवटपर्यंत अगदी निजून राहण्यास सांगितले.

मी शिर्डीहून आल्यावर तिला नारळ देण्यास गेले तेव्हा तिने ही गोष्ट मला सांगितली. मी शिर्डीहून बरोबर उदी आणली होती ती तिला दिली व रोज पोटाला चोळ असे सांगितले. संपली तर मी आणखी देईन असे सांगितले. त्याप्रमाणे त्या बाईने उदी पोटाला चोळली व बाबांच्या कृपेने तिचा त्या दिवसापासून स्त्राव थांबला. त्या दोघांही पती-पत्नीला उदीमुळेच हा चमत्कार घडला याची पूर्ण खात्री पटली. पोट दुखणेही अजिबात थांबले.

ती इतकी कंटाळली होती की डॉ. च्या मागे लागली की हा गर्भ काढून टाका पण उदीमुळे तो गर्भ वाढीला लागला व पुढे कांहीही त्रास झाला नाही. पुढे तिचे दिवस भरल्यावर ऑपरेशन करावे लागले. ती ऑपरेशनला दवाखान्यात जाण्याचेपूर्वी उदी लावून मला सांगून गेली.

आश्चर्याची गोष्ट ही की कांहीही त्रास न होता ऑपरेशन, व्यवस्थित होईन तिला गोरा व गोजिरवाणा मुलगा झाला. पुढे त्याच्या गळ्यात तिचे श्रीबाबांचे लॉकेट सोन्यामध्ये मढवून सोन्याच्या साखळीत त्याच्या गळ्यात घातले. ते अद्यापही गळ्यातच आहे. ती दोघे त्या मुलाला घेऊन शिर्डीला बाबांच्या पायावर घालण्यास घेऊन जाणार आहेत.

त्या दोघांनी श्रद्धा व सबुरी धरून पुत्र रत्नाचा असा लाभ मिळविला.

●●●●●●●●●●●●

# कथा ही श्री साईची!

— श्री. मुकेश कामत,
कामत निवास, वाडगावफाटा,
मु.पो. अलिबाग, जि. रायगड.

अहोरात्र भक्तांसाठी
तळमळ करी हा जगजेठी
आपुल्या प्रिय भक्तांसाठी
अशक्य ते शक्य करितसे
जरी संकटी कोणी भक्त
सापडला असेल खास
तयांसि सोडविण्या त्वरीत
धांव घेई श्री साई ।।

श्रीसाईबाबा....

या नावात अमृताची गोडी आहे. मातेचे वात्सल्य आणि पित्याचे छत्र आहे. शिर्डीत प्रगटलेला हा साधु लाखो व्यक्तीचे दैवत बनलेला आहे. हा कोण? हा कुठून आला? याचे जीवनकार्य काय? याचा काही पत्ता नाही. अशी बेपत्ता व हातात कसलीही सत्ता नसलेली व्यक्ती या व्यक्तीसमोर सर्व तऱ्हेची सत्ता असलेली मंडळी वाकतात आणि बाबा त्यांच्या सर्व जीवनाला वळण देतात, चालना देतात. सुखीसमृद्धी त्यांना प्राप्त होते. मग हे जन त्यांच्या भजनी लागले तर नवल ते काय?

बाबा शिर्डीत प्रगट झाले. परंतु त्यांचे मातापिता कोण? त्यांचा जन्म कुठे झाला? याचा कसलाच पुरावा सापडत नाही. बाबांच्या सान्निध्यात जे भक्त होते ते या गोष्टीची माहिती करून घेण्यासाठी खुप प्रयत्न करीत होते. परंतु यासंबंधी कसलीच माहीती त्यांच्या हयातीत त्यांना मिळाली नाही. बाबांच्या तोंडून या संबंधी काही शब्द येतील आणि तकनि ही माहीती आपण हुडकून काढू असे वाटणाऱ्यांनाही या माहीतेचा कधी सुगावा लागला नाही. रात्रं-दिवस बाबांच्या सहवासात असणाऱ्यांनाही 'मी परमेश्वराचा सेवक आहे!' एव्हढेच बाबांच्या मुखातून ऐकायला मिळे आणि त्यातच संतोष मानून त्यांनी बाबांची दृढ भक्ती चालविली.

ऋषीचे कुळ आणि नदीचे मूळ शोधू नये असे म्हणतात. बाबांच्या हयातीत ज्या गोष्टीचा पत्ता लागला नाही. त्या गोष्टी आपण आता कशासाठी शोधायच्या? कोण कुठे जन्मला? याला काय महत्व द्यायचे. मनुष्याचे महत्त्व जन्मावरून मोजता येत नाही. साईबाबा आपल्यासमोर प्रगट आहेत ते जीवनच महत्त्वाचे आहे.

'श्रीसाईबाबांचे' स्मरण ही काही हृदयात वेगळीच आनंद निर्माण करणारी गोष्ट आहे.

साईबाबांच्या समकालीन एक विभूती श्री. माणिक प्रभु निजाम राज्यात होते. त्यांच्या

चरित्रात साईबाबांचा ओझरता उल्लेख आहे. त्यात म्हटले आहे. एक तेजःपुंज कांतीचा फकीर माणिक प्रभूंच्या दरबारात आला. त्याच्या हातात लोटा होता तो लोटा प्रभूंपुढे धरून तो — म्हणाला, प्रभू तो इतना लोटा भर दे... त्यावेळी प्रभूंचे बंधु तात्या महाराज शास्त्रीमंडळी बरोबर वेदातांच्या गोष्टी करीत बसले होते, त्यास हाक मारून प्रभूंनी तो लोटा रुपयांनी भरून देण्यास सांगितले. जवळचे सर्व पैसे संपून गेले तरी तो लोटा भरत नाही असे पाहून त्यांनी तो प्रभूंच्या हातात दिला. आणि तात्या परत वेदातांच्या चर्चेकडे वळले. प्रभूंनी मात्र तो लोटा हातात घेतला आणि त्यात दोन खारका-फुलांमुळे तत्काळ भरून गेला. तेव्हा प्रभू स्मित करीत म्हणाले. 'साई ये लेव!' असे म्हणून तो लोटा फकिराला दिला. फकिरही तसाच. त्याला त्या पैशाचे काय? त्यांनी त्यातील दोन खारका आणि फुले काढून घेतली तो प्रसाद मानुन कपाळाला लावून ते म्हणाले 'इतनाही मेरे कु बस है!' असे म्हणून नंतर त्यांनी तो लोटा प्रभूंकडे ओतला. त्यातून जो रुपयाचा ढीग बाहेर पडला तो लोट्याच्या जवळ जवळ पाच पट होता. फकिराने प्रभूंकडे मस्तक नमविले आणि तिथुन निघुन गेला. तेव्हा बोलण्यात रंगलेल्या तात्या महाराजांकडे प्रभू वळून म्हणाले, तात्या काही माणसे कशी येतात, कशासाठी येतात हे न पाहता निरर्थक कोरडा काथ्याकुट काय करीत बसला आहेस? त्या फकिरांचा लोटा तुला भरता येईना मग त्याने ओतलेल्या रुपयांचा ढीग तर निरखून पहा!' ते पाहून तात्या चकित झाले. नंतर त्यांनी त्या फकिराची सर्वत्र शोधाशोध सुरू केली परंतु तो कुठेच दिसेना? फकिराला हिंदी भाषेत 'साई' म्हणतात. साई म्हणजे साधुपुरुष. साधुपुरुषांचा संचार जेथे असतो तोच साईसंचार मानावा. निजामात साई संचार होता असे माणिक प्रभूंच्या चरित्रात दिसून येते.

वयाच्या सोळाव्या वर्षी शिर्डी गावात निंबाच्या झाडाखाली साईबाबा प्रगट झाले त्यावेळी त्यांच्या अंगात पांढरी लांब कफनी कमरेला कमरबंध, काखेत सटका, एका हातात टमरेल, दुसऱ्या हातात झोळी, डोक्यास बांधलेले पांढरे फडके, त्याला मागे गाठ होती. आणि पायात काही नव्हते. अनवाणी. त्यावेळी त्यांची कोणी चौकशी विचारपुसही करीत नव्हते ते विहीरीच्या सांडपाण्याचे पाणी पीत असत आणि लेंडीबागेच्या कुंपणात घुसून आत बसत असत. लोक त्यांना वेडा म्हणत. त्यावेळी लोकांना हा वेडा वाटणारा माणूस आज लाखो लोकांना आपल्यासाठी वेड लावणारा अवतारी पुरुष आहे हे सांगितले असते तर कुणालाच ते खरे वाटले नसते. निंबाच्या झाडाखाली बाबा झोपत. त्यांना कुणी विचारले तर सांगत "हम तो साई है, बहुत दूरसे आये है!" उन असो पाऊस असो, थंडी असो बाबांना छाया होती त्या निंबाच्या झाडाची!

बाबा हिंदू की मुसलमान? हे ही कुणास सांगता यावयाचे नाही. मुसलमान म्हणावे तर त्यांच्या भक्तगणात हिंदूचीच संख्या अधिक. हिंदू म्हणावे तर त्यांचे भक्त मुसलमानही आहेत. मशीद-मंदिर बाबांना सारखीच प्रिय होती. निंबाच्या झाडाखालून आपले वास्तव्य हालवून बाबा एका मोडक्या मशिदीत रहावयास गेले. त्या मशिदीला बाबांनी नाव दिले 'द्वारकामाई!'

अशा या द्वारकामाईत एकदा काही पठाण नमाज पडण्यासाठी आले होते. तिथे येऊन पाहतात तो काय मशिद गाई-म्हशीच्या शेणाने सारवलेली होती. जागा ओली होती. म्हणून पठाणांनी तिथे नमाज पडायचे नाही. असे ठरविले तेव्हा श्री साईबाबा म्हणाले, तुम्ही अवश्य नमाज पडा. तुमच्या वस्त्रांना अजिबात डाग लागणार नाही, अखेर बाबांचे त्यांनी मानले, आणि नमाज पडायला सुरवात केली. आश्चर्य काय? — त्यांच्या कपड्याला जरा सुद्धा डाग लागला नाही. हा चमत्कार पाहून बाबांच्या चरणांवर त्या पठाणांनी लोटांगण घातले आणि त्यांना 'वल्ली अल्ला' असे मानू लागले.

एकेका चमत्काराने बाबांजवळ अशी माणसे येऊ लागली जी त्यांच्याजवळ आली ती त्यांची बनत. शिर्डीत गणपतराव कोते म्हणून एक धार्मिक गृहस्थ होते. कुटुंब प्रमुखाचा आपल्या कुटुंबावर संस्कार होत असतो. त्यांच्या पत्नी बायजाबाई अशाच बाबांच्या दर्शनाला गेल्या तेव्हा त्याना पाहताच बाबा चटकन उभे राहीले आणि ओथंबलेल्या प्रेमाने बाबांनी त्यांना 'मामी' म्हणून हाक मारली त्या दिवसापासून बाबा जिवंत असेपर्यंत त्या बायजाबाईच्या हातची बाबांनी भाकरी खाल्ली. बाबांनी भाकरी खाल्ल्याशिवाय बायजाबाई तोंडात पाणी घेत नसे. धन्य ती माऊली जिच्यावर बाबांची पूर्ण कृपादृष्टी होती.

बाबांना आयुष्यभर भाकर खावु घातली. बाबांचा असा एकही दिवस गेला नाही की ज्या दिवशी बायजाबायची भाकरी खाल्ली नाही.

बाबा शिर्डीत प्रकट होतानाची हकिगत अशी सांगितली जाते की शिर्डीच्या काही व्यक्तींना खंडोबा देवाने असा दृष्टांत दिला की या बालकाने लिंबाच्या झाडाखाली बारा वर्षे तपःश्चर्या केली आहे. लिंबाच्या झाडाखाली खोदा अशा दृष्टांतामुळे ती जागा खोदली तर तिथे एक विटाचा थर चुनेगच्ची चौकोनासारखी जागा होती. बाबांनी सांगितले ही माझ्या गुरुची जागा आहे. दर गुरुवारी व शुक्रवारी इथे धुप लावीत जा सर्वांचे कल्याण होईल. अशी बाबांची गुरुभक्ती ही होती. आपण आपल्या गुरुची बारा वर्षे भक्ती केली. त्या वयोवृद्ध महात्माचा मलोत्सर्गही साफ करीत होतो.

असाच एक चमत्कार आहे. बाबा अग्निपूजक असल्यामुळे त्यांनी सतत धुनी पेटत ठेविली आहे. आजही आपण शिर्डीला गेलो असता ती अजूनही पेटती धुनी जळताना पाहतो. या धुनीने एकदा पेट घेतला. पेटलेल्या ज्वाळा मशिदीच्या तक्तपोशी जावून पोहचल्या. यावेळी बाबा मात्र शांतपणे त्या ज्वालांकडे पहात होते. त्याच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेश नव्हता. संबंध मशिद जळून खाक होईल या भीतीने सर्वाची एकच तारांबळ उडाली. ही परिस्थिती न्याहाळून बाबांनी मग स्वतःच सटका हातात घेतला व तो खांबावर आपटीत म्हणाले

'सबुर, सबुर हट की माघार! आणि काय चमत्कार त्या सटक्याच्या फटक्याबरोबर अग्नी शांत होत गेला. सर्वांना आनंद झाला.

कणाकणात भगवान आहे. चैतन्य आहे याचा साक्षात्कार शिर्डीतील उदीत होतो. काहीतरी अनुभूती असल्याशिवाय शिर्डीला जावयास कुणीही निघाला की त्यांना लोक

सांगतात 'आमच्यासाठी उदी आणा! उदीसंबंधी अशी एक कहाणी आहे की,

एका गरीब म्हातारीचे शेत सावकाराने कर्जापोटी खाऊन टाकले होते. हा अन्याय सहन न होणारी जी मंडळी होती त्यानी म्हातारीला 'कोर्टात खटला कर' असा सल्ला दिला. या सल्ल्याप्रमाणे ती कोर्टात गेली. परंतु त्या बिचारीची कोर्टात फजिती होण्याची पाळी आली.

शेवटी कुणीतरी श्रद्धेने म्हातारीला सुचविले तू शिर्डीला जावुन श्री साईबाबांचे दर्शन घे सर्व सुरळीत होईल. म्हातारी शिर्डीस गेली. बाबांचे तिने दर्शन घेतले. बाबांनी तिला उदी दिली, ती घेऊन ती आली रोज ती स्नान करून ती उदी कपाळाला लावायची व बाबांचे ध्यान करायची असा नित्यक्रम चालला असता. कोर्टाच्या तारखेचा दिवस उजाडला.

न्यायमूर्तींनी म्हातारीच्या बाजुने न्याय दिला. सावकाराची फजिती झाली. माणूस श्रद्धेने तरतो, श्रद्धा माणसाला बळ देते. चैतन्य देते.

साईबाबांच्या उदी या विषयावर चमत्कार गोळा केले. तर त्यांच्यावर भला मोठा ग्रंथ तयार होईल. जी गोष्ट उदीची तीच दृष्टांताची बाबा अनेकांना स्वप्नात जावुन दृष्टांत देतात. हे दृष्टांत अनेकाकडून मी ऐकले आहेत. कुणी भक्त अडचणीत आला तर बाबा त्याची अडचणीतून मुक्तता कशी करतील हे सांगता येत नाही. बाबांनी मला बोलविले म्हणून मी आलो. हेच वाक्य भक्ताकडून ऐकावयास मिळते.

बाबा जेव्हा देहरूपाने शिर्डीस वावरत होते तेव्हा त्यांना भेटावयास तिथे लोक जात परंतु आज त्यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठीही लोक येतात. या लाखो भक्तांच्या हृदयापाशी बाबांनी कसे संधान बांधले आहे. हे महत्वाचे आहे. लाखो लोक हृदय मात्र एक असेच जणु समिकरण आहे.

आणि या एक हृदयात अशी श्रद्धा वावरत आहे.

मात्र माझे करा स्मरण<br>
विश्वासयुक्त अंतःकरण<br>
ठेवा करा निष्काम भजन<br>
कृत कल्याण पावाल!!!

माणसाच्या जीवनात प्रत्येक क्षणी श्रद्धेला महत्व आहे. जीवनातील प्रत्येक क्षण आपण श्रद्धेनेच जगत असतो. त्यामुळे आपणास कुठलीतरी शक्ती जागवीत असते बाबांनी संबध जीवनाचे सार दोनच शब्दात सांगितले आहे. 'श्रद्धा' आणि 'सबुरी' हे दोन शब्द म्हणजे मंत्र आहेत. श्रद्धा माणसाला तारते. सन्मार्गावर ठेवते वाईट मार्गाला जाऊ देत नाही. आणि 'सबुरी' माणसाच्या जीवनाला वळण लावते.

काका महाजनी म्हणून शिर्डीला सतत बाबांना भेटावयास जाणारे त्याचे भक्त होते. ते ठक्कर नांवाच्या सॉलिसिटरकडे नोकरी करीत होते. एकदा ते बाबांकडे गेले असता. शिर्डीला आठ दिवस राहीले. मालक ठक्कर मनातून चिडले. त्यांनी काकांना जाब विचारला तेव्हा काका म्हणाले. 'बाबांनी आज्ञा दिल्याशिवाय कसे येऊ' हे उत्तर ऐकुन ठक्करना अधिक राग आला, आणि हा साधु कोण हे त्यांनी पाहण्याचे ठरविले. आणि

एका शिमग्याच्या रजेत ते काकांबरोबर शिर्डीला गेले. काका बाबांकडे गेले तेव्हा आपल्या देवतासमोर त्यांनी द्राक्षे ठेवली. बाबांनी ती द्राक्षे समोर असलेल्या मंडळींना वाटली. त्यातील काही द्राक्षे प्रसाद म्हणून ठक्कर यानांही दिली. बिया असलेली द्राक्षे ठक्करना आवडत नव्हती. परंतु समोरच्या साक्षात्कारी महापुरुषाने दिलेला प्रसाद ठक्कर नाकारणार कसा. एवढी हिंमत त्यांचे जवळ नव्हती. त्यांनी ती द्राक्षे तोंडात टाकली आणि आश्चर्य घडले.

ठक्कर यांनी खाल्लेल्या एकाही द्राक्षात एकही बी नव्हती परंतु बाकी मंडळींनी खाल्लेल्या द्राक्षात बिया होत्या. एवढेच होऊनही बाबांसंबंधी त्यांच्या मनात संशय आला आणि मनातल्या मनात ठक्कर म्हणाले, हा जर खराखुरा साधु असेल तर आता माझ्या मनात जे आहे ते अंतर ज्ञानाने जाणुन काकांना आता बाबा द्राक्षे देतील तरच मी त्यांना मानीन असे ठक्कर मनात म्हणाले. त्याच क्षणी बाबांनी मागे पाहीले. काकांना हाक मारली व द्राक्षे दिली. झाले ठक्कर मनातुन एकदम विरघळले तरीही त्यांचे मन बाबांना नमस्कार करायला तयार होईना.

ठक्कर मुंबईला जाण्यासाठी निघाले तेव्हा बाबांचा निरोप घेण्यासाठी बाबांजवळ गेले तेव्हा बाबा बोलू लागले. मी दक्षिणा घेतो. पण त्याच्या दसपट देतो परंतु माणूस कसल्यातरी बाबतीत समाधानी असतो का? निरर्थक विवंचना करण्याची त्याला खोडच लागलेली असते. संपत्ती, आरोग्य आहे तरी पण कसली तरी चिंता मनुष्य करीत असतो. याला काय म्हणावे बाबांच्या या बोलण्याची सत्यता ठक्करना पटली त्यांच्या हृदयावर या शब्दांचा ठसा असा उमटला की ते बाबांचे परमभक्त झाले.

भक्ती म्हणजे परमेश्वरासाठी स्वतःला विसरण्याची महान शक्ती. सत्पुरुष म्हणजे परमेश्वराचा अंत त्यात साईबाबा म्हणजे 'सबका मालिक एक' हा संदेश देत. या महान संदेशात जातीभेद, धर्मभेद, पक्षभेद, रंगभेद सारे गळुन पडतात. तिथे कुणी लहान मोठा नाही. गरीब श्रीमंत नाही. हीन-दीन नाही. म्हणून असे महापुरुष ज्ञानदेवांनी वर्णन केल्याप्रमाणे —

आप परु नाही
चैतन्य जैसा!!

असे असतात. सारे भेद तेथे विसरून जातात.

बाबांच्यात कुणाला राम दिसतो, कुणाला रहीम दिसतो, कुणाला येशु दिसतो, कुणाला बौद्ध दिसतो, शिर्डीला कुणीही जावे. त्यांच्या समाधीजवळ बसावे. मनातील दुःख, आशा, आकांक्षा, हेतु सांगावेत आणि बाबांनी त्या सर्वांचे समाधान करावे.

हा अजब चमत्कार आजही अनेकांच्या जीवनात घडतो. आणि म्हणूनच 'शिर्डीचे साईबाबा' हे भारतीयवासीयांच्या हृदयातले दैवत बनले. आणि आता केवळ भारतापुरते मर्यादीतच राहीले नाही. संबंध जगात त्यांचा संचार चालू आहे.

बाबांच्या अजब गोष्टी आपणास ऐकावयास मिळतील त्यात सत्यता आहे. आंधळ्यालाही डोळे देणे हे चमत्कार जिथे होतात तिथे अंधदृष्टीला डोळस दृष्टी का नाही मिळणार?

एक साधु फकिर शिर्डीला होऊन गेला. त्याला स्वतःच्या जीवनाची फिकीर कधी नव्हती. स्वतःचा संसार त्यानी कधी केला नाही. म्हणून हजारो भक्तांच्या जीवनात ते सुख-समृद्धी निर्माण करीत असतात.

हा अनुभव ज्यांना येतो ते परत-परत शिर्डीस जातात. केवळ समाधीचे दर्शन घेण्यासाठी. त्या समाधीत त्यांना समाधान देण्याचे सामर्थ्य आहे. ते नसते तर कशाला तिथे लोक गेले असते. म्हणून एवढेच म्हणावेसे वाटते.

शिर्डीच्या श्री साईबाबांच्या समाधीजवळ श्रद्धेने जा. सबुरीने घ्या. आपल्या जीवनात निश्चित समाधान मिळेल. कारण आपल्याला मिळावे अशा अखंड इच्छेने जगणारा सिद्ध साक्षात्कारी चैतन्य पुरुष, आपले दैवत श्रीसाईबाबा त्या समाधीत शांतपणे विसावलेले आहेत. सर्वांवर त्यांची कृपादृष्टी आहे.

श्री साईलीला अपार
जो साई ध्यानी निरंतर
तयाचा सुखी संसार
जगामाजी होईल!!
जे भक्त भाविक कोणी
लागेल श्रीसाई चरणी
गुंतुनी श्री साई ध्यानी
जगी सुखी जाहले!!
अहोरात्र भक्तांसाठी
तळमळ करी हा जगजेठी
आपल्या प्रिय भक्तांसाठी
अशक्य ते शक्य करीतसे!!
जरी संकट कोणी भक्त
सापडला असेल खास
तयासी सोडविण्या त्वरीत
धाव घेई श्री साई!!

# सोन्याचे मंगळसूत्र परत

**— सौ. रेखा नारायण दीक्षित**
बी-११, मधुमनीषा सोसायटी,
सांताक्रुझ (पूर्व).
मुंबई - ४०० ०५५.

दयाळू कृपाळू साईमाऊलीला माझे शतशः प्रणाम. तिच्याच इच्छेने माले गेलेले सोन्याचे मंगळसूत्र परत मिळाले. त्याचे असे झाले — २७ जून १९८५ ला मी कुर्ला स्टेशनवर गाडीत चढत होते. २५-२६ ला भयंकर पाऊस झाल्याने गाड्या नियमीत धावत होत्या. २७ ला तर गाडीला फार गर्दी होती. गाडीतून उतरणाऱ्या बायका भराभर उतरल्या नाहीत. तेवढ्यात मी गर्दीतून गाडीत चढत असतांना माझ्या गळ्यांतील मंगळसूत्र कोणीतरी खेचले. मला लगेच समजले. मी हाताने धरण्याचा प्रयत्न केला. पण उपयोग झाला नाही. एक पाय गाडीत व एक प्लॅटफॉर्मवर. मी आजूबाजूला पाहिले तर कोणी दिसलेच नाही. माझ्या तोंडचे पाणी पळाले. मी घाबरून "मंगळसूत्र, मंगळसूत्र" असे ओरडले. डोळ्यापुढे अंधारी आली. तेवढ्यात गाडी सुटली. मी प्लॅटफॉर्मवर शोधाशोध केली. तेव्हा एका बाईने मला मंगळसूत्रातील १ वाटी दिली. बस्स. आता काय करायचे? तेवढ्यात एका पोलिसाला मी सांगितले. त्याने तक्रार करण्यासाठी कुर्ला रेल्वे पोलिस स्टेशनवर नेले. तेथे समोरच पू. साईबाबांचा व दत्तगुरुंचा फोटो होता. त्या दिवशी गुरुवार होता. मी फोटोला नमस्कार करून सांगितले, "माझे सौभाग्यलेणे मला परत मिळू दे मी माझा अनुभव साईलीला अंकात देईन." ४ महिने झाले. मी मधून मधून चौकशी करीत होते. ५ हजारांचा फटका बसल्यामुळे मी तर एकदम नर्व्हस झाले होते. पण पू. बाबांच्या शक्तीवर माझा पूर्ण विश्वास होता. रोज सकाळी उठतांना मी मनोमन प्रार्थना करायची, "मला माझं सोभाग्यलेणं लवकर मिळू दे." आणि खरंच एक दिवस मला पोलिस ऑफिसमधून फोन आला. तुम्ही मंगळसूत्र ओळखायला या. माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले. माझी गुरुमाऊली किती दयाळू, कृपाळू आहे. रीतसर सर्व घडून १९-११-१९८५ ला माझे गेलेले मंगळसूत्र मलापरत मिळाले. माझी श्रद्धा वृद्धींगत झाली. कळकळीने केलेली प्रार्थना मनोमन पोचली. फक्त श्रद्धा आणि सबुरी यांनीच माझे काम फत्ते झाले. या विज्ञानयुगात ती शक्ती कार्यरत आहे याचा मी प्रत्यक्ष अनुभव घेतला. धन्य झाले मी. खरोखर निष्ठेने, नियमाने तुम्ही त्याची याद कराल तर तो धावून मदत केल्याशिवाय रहाणार नाही.

जय साईमाऊली. जय श्री स्वामी समर्थ.

## छोट्या साईभक्तांसाठी

# संत रामदास

दासनवमी (माघ वद्य ९) हा रामदासांचा अवतार समाधीदिन. रामदास हे रामाचे निस्सीम भक्त व उपासक होते. श्रद्धा व विवेक ह्यांच्या जोरावर त्यांनी 'समर्थ' ही पदवी मिळवली. अन्य संतांहून रामदास हे अगदी वेगळे होते. 'आधी प्रपंच करावा नेटका। मग करावे परमार्थ विवेका।' असे सांगणारे पहिले संत म्हणजे रामदास होत. मुसलमानी सत्तेच्या अमलाखाली चिरडल्या गेलेल्या आणि केवळ परमार्थाच्या मागे लागून निष्क्रीय व अचेतन बनलेल्या समाजास जागे करण्यास रामदासांनीच आरंभ केला. सर्वात प्रथम त्यांनी जागोजाग मठस्थापना करून मुसलमानांच्या वाढत्या धर्मप्रचारास व राज्यास आळा घालण्याचा प्रयत्न केला. अज्ञानी लोकांना देशाची स्थिती कळावी म्हणून उपदेश सुरू केला. धर्मरक्षण हे सर्वश्रेष्ठ काम मानले म्हणूनच ते म्हणतात —

धर्मासाठी मरावे । मरोनी अवघ्यांसी मारावे।
मारता मारता घ्यावे । राज्य आपुले॥

रामदासांनी प्रथम जर काही खूणगाठ बांधली असेल तर ती ही की, महाराष्ट्राला प्रतिकारक्षम बनवायचे आहे. त्यासाठी अगोदर बलोपासनेची आवश्यकता आहे यासाठी त्यांनी धनुर्धारी राम आणि हनुमान ही दैवते निवडली आणि ठिकठिकाणी मठ स्थापन केले. परमेश्वराचे अधिष्ठान हवेच. पण प्रयत्न सोडता कामा नये हे त्यांचं सूत्र आजही सर्वांनाच मान्य होण्याजोगे आहे.

रामदास हे संत असले तरी त्यांना कलेची आवड होती. त्यांच्या वैराग्यवृत्तीत अरसिकतेला थारा नव्हता. रूपलावण्य व स्वारमाधुर्य यांना ते तुच्छ वा निषिद्ध मानीत नव्हते. फक्त कलेचा उपयोग केवळ करमणुकीसाठी न होता परमेश्वराच्या सेवेसाठी झाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

असे सर्वच गोष्टीत इतर संतांच्या तुलनेत वेगळेपणा असलेले रामदास पराक्रमापुढे ईश्वरासही गौणस्थान देत असत. म्हणूनच 'यत्न तो देव जाणावा' असा आजही सत्य वाटणारा उपदेश त्यांनी केला.

रामदासांचा उपदेश सर्व लहान थोरांना उपयुक्त ठरणारा आहे. हस्ताक्षर हे माणसाच्या मनोप्रवृत्तीचे द्योतक समजले जाते. त्या हस्ताक्षरासंबंधी संत रामदासांचे विचार विद्यार्थ्यांना निश्चितच मार्गदर्शक ठरतील. त्यांच्याच शब्दात ते विचार असे —

वाटोळें सरळे। मोकळें। वोतलें मसीचे काळे।
कुळ्कुळीत वोळी चालल्या। ढाळें मुक्तमाळा जैशा॥ २॥
अक्षर मात्र तितुके नीट। नेमस्त पैस काने नीट।
आडव्या मात्रा त्याही नीट। आर्कुली वेलांट्या॥ ३॥
पहिले अक्षर जें काढिले। ग्रंथ संपेतो पाहात गेलें।

मनाचा धडा करून मी कामासाठी जाण्याचा माझा निर्णय पक्का केला. माझा आतला आवाज मला "जा" म्हणूनच सारखा साथ देत होता. त्या जोरावरच मी माझ्या पत्नीस मी ऑफिस कामासाठी बाहेरगावी जात आहे असे सांगितले. तर तिने आपली प्रसंगास धरूनच नकार घंटा वाजविलीच. पण तरीही मी मनाचा हिय्या करून शनिवारी सकाळी ९.०० वाजता जावई श्री साईबाबांचे दर्शनास घरी आले असताना त्यांना स्पष्ट व स्वच्छ विचारले की, "बाळासाहेब, मी आज ऑफिस कामासाठी बाहेर गावी जात आहे व रात्री परत येत आहे तर, तुम्ही मी जाऊ की नको ते स्पष्ट सांगा?" त्यांनाही प्रश्न पडला. शेवटी सासरे व जावई हेच नाते बोलत होते व शेवटी त्यांनी जड अंतःकरणाने मला जाण्यास संमती दिली. तेवढ्यावर मी थांबलो नाही तर ते घरी येण्यापूर्वीच मी श्री साईबाबांना प्रार्थना करून त्यांची संमती घेतली होती व नंतर पत्नी व जावई ह्यांचे खास समाधानासाठी व श्री साईबाबांचा परवानगीरूपी आदेश त्यांना स्पष्टच समजावा म्हणून दोन चिठ्या तयार केल्या. एकीवर "आज जा" व दुसरीवर "आज जाऊ नको" असे लिहीले होते व आधीच पुजा करून श्री साईबाबांना सांगून मी त्या दोन चिठ्या त्यांचे चरणाजवळ ठेवल्या व जावयांची वाट पहात बसलो. ते आले आणि मी त्यांचेबरोबर तोंडी चर्चा केली. लगेच त्यांनी होकार देताच त्यांना देवघरात श्री साईबाबांचे पुढे नेले व त्यातली एक चिठ्ठी उचला व वाचा असे सांगितले. झाले आता कसोटीची व सत्याची वेळ आली. जावयांनी चिठ्ठी उचलली व उघडली व वाचली, तर ती चिठ्ठी "आज जा" हीच निघाली. सर्वांनाच फारच आश्चर्य वाटले व मला आनंद झाला. कारण "सत्य संकल्पाचा दाता भगवान सर्व करी पूर्ण मनोरथ" ह्या वचनाप्रमाणे माझे सर्व सत्य मानून व कर्तव्यकर्म श्रेष्ठ मानून व वरिष्ठांच्या आज्ञा तंतोतंत पालन करणारा व अधिकारी व सेवा हीच दैवते मानणारा मी, माझे बाजूनेच त्यांनी कौल दिला व जाण्याचा निश्चय पक्का करून मी सर्व तयारी केली व ति. मामांना भेटण्यास गेलो. तेथे त्यांना उदी लावली व जवळच बाहेर श्री दत्तात्रयाचे देऊळ आहे तेथेच कळवळून प्रार्थना केली व स्पष्ट सांगितले "सर्व काही उद्या, आज काही नाही, मी रात्री येतोच, मला फसवु नका, मला दगा देऊ नका माझा अपेक्षाभंग करू नका. मला दोष येऊ देऊ नका, जावई-सासरे ह्यांचे नात्यात अंतर पडू देऊ नका. अशी आर्त व कळकळीची प्रार्थना मी श्री दत्तात्रयाचे पुढे केली. घरी थोडेसे जेवण केले व कपडे घालून श्री साईबाबांचे पुढे बसलो. उदी लावली व श्री साईबाबांना पुन्हा पुन्हा वरीलप्रमाणे प्रार्थना केली व नेहमीप्रमाणे मी श्री साईबाबांची मूर्ती बरोबर घेऊन ताबडतोब पुन्हा पुन्हा श्री साईबाबांना सांगितले, "मला फसवू नका, सर्व काही उद्या आज काही नाही" झाले मी ताबडतोब एस.टी. गाडीने इच्छित ठिकाणी गेलो. सर्व काम केले. सर्व काम संपूर्णपणे यशस्वी झाले व त्या आनंदात मी मामांची सारखी आठवण काढीत मी श्री देवीचे दर्शनास गेलो. तेथे श्री देवीची ओटी भरली. थोडा नाष्टा केला व रात्री १०.३० वाजता निघून रात्री १.४५ वाजता दवाखान्याच्या दारात आलो. दार बंद होते. पण मी बाहेरूनच माझ्या जावयांची गाडी नं. २८८४ पाहिली.

मी आनंदी झालो व समाधानी झालो. माझा माझ्यावर विश्वास बसेना म्हणून मी रिक्शा ड्रायव्हरला पुन्हा नंबर पहाण्यास सांगितला. त्यानेही तोच नंबर सांगितला. ह्याचा अर्थ काय तर ति. मामा सुखरूप आहेत. कसलीही वाईट घटना घडली नाही. ह्याच उर्मीत मी माझ्या सद्गुरूचे शतशः आभार मानून व पुन्हा पुन्हा त्यांना धन्यवाद देऊन व माझा शब्द तुम्ही मानलात व मला धोका दिला नाही. यावरून हे श्री साईबाबांनी सत्य करून दाखविले व मी त्यामुळेच समाधानी झालो. श्री साईबाबांनी व श्री दत्तात्रयांनी माझे आर्त हाकेला ओ दिली. धन्य ते साईबाबा, आपले एकनिष्ठ भक्ताची अब्रु अशी वाचवतात व सांभाळतात. नंतर मी रात्री २.०० वाजता घरी गेलो व समाधानाने झोपलो.

दिनांक २४।११।१९८५ ला सकाळी ९.०० वाजता पुन्हा मी दवाखान्यात गेलो. मला पाहून सर्वांनाच आनंद झाला व मी जिंकलो व मला श्री साईबाबांनी तारले ह्या आनंदातच मी ति. मामांना हाका मारून जागे केले. चौकशी केली, त्यांचे मुखात श्री साईबाबांची उदी घातली, व कपाळास लावली. व १ तास थांबून घरी आलो. आणि बरोबर १.१५ वाजता श्री साईबाबांनी श्री. मामांची दिपज्योत मालवली. असे हे माझे श्री साईबाबा आहेत व त्यांनी माझी आर्त हाक ऐकली. अशा माझ्या सदगुरूंचे कितीही म्हणून उपकार मानावेत तेवढे थोडेच आहेत. म्हणून मी म्हणालो की, श्री साईबाबांनी वरील प्रसंगात आपले खालील वचन सिद्ध करून दाखविले आहे. ते असे की, "जरी हे शरीर गेलो मी टाकून ।। तरी मी धावेन भक्तासाठी ।। .

# वाट जाते शिरडीच्या गावा

ही वाट दूर जाते शिरडीच्या गावा
माझ्या मनाचे पाखरू धावते साईच्या मंदिरा
भाविकांची दाटी मंदिरी साईच्या दर्शना
मूक भाव कितीकांचे साईच उमजती
अंतरीचा उमाळा साईच समजती
न सांगता समजते ते साईला
शब्द न उरले बोलण्याला
मूक झाली वाणी उर आला भरूनी
हात तो आशीर्वादाचा सदैव असे शीरी
साईच्या डोळ्यातील भाव तो दिलासा
जणु म्हणती ठेव श्रद्धा धरी सबुरी

— **सौ. कलावती वसंतराव चव्हाण**
कैलास भुवन ब्लॉक नं. १
पं. दिन दयाळ रोड डोंबिवली (पश्चिम) जिल्हा ठाणे

# साईभक्ती — साईशक्ती

— श्री. गणेश शांताराम बडगुजर
'साईप्रसाद' पवनानगर
एस्.टी. कॉलनीमागे
सांगवीगाव, पुणे-४११ ०२७

॥ जो जो मज भजे, जैसा जैसा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी॥

शिर्डीनगरी हे साईबाबांचे पवित्र तिर्थक्षेत्र चारही धामात मिळणारा आनंद नुसत्या श्री साईबाबांच्या दर्शनाने मिळतो. म्हणून आजकाल भक्त प्रेमाने 'साईधाम' 'शिर्डीधाम' असेही म्हणतात . सद्‌गुरू साईबाबा एक महान संत या शिर्डीनगरी प्रगटलेले साक्षात् परमेश्वर अवतार घेऊनच ते ईश्वररूपी असूनही त्यांचे जीवन अगदी सामान्याहूनी सामान्य असे होते. अंगी कफनी, डोईस चिंधी हातात करोटे इतक्या साध्या वेशात ते जीवन जगले, आणि मिळणाऱ्या चार-दोन तुकड्यांवर त्यांनी आपला उदरनिर्वाह चालविला. बाबा नुसते सामान्य जीवन जगले नव्हे तर गरीबांपासून श्रीमंतापर्यंत लहानापासून मोठ्यापर्यंत, रंकापासून राजापर्यंत सर्वांना जीवनाचा खराखुरा अर्थ त्यांनी समजावून सांगितला. नुसते श्रीमंत असून चालत नाही तर त्याला गरीबांची जाणीव हवी. त्यांची दुःखे दूर करण्यासाठी त्यांनी झटले पाहिजे. नुसते वयाने मोठे असून चालत नाही तर त्याला लहानांची जाणीव हवी. माणूसकी नावाची गोष्ट त्याच्याकडे हवी. मनाचा मोठेपणा त्याच्याकडे हवा. नुसता मोठेपणाही काय कामाचा? प्रत्यक्ष कृती हवी, झटण्याची, दुःख निवारण्याची, दिनदुबळ्यांना जवळ करण्याची, त्यांच्या दुःखावर हळूवार फूंकर घालून त्यांना आनंद प्राप्त करण्यासाठी झटणे हीच खरी प्रभूसेवा. ईश्वरसेवा. चमत्काराशिवाय नमस्कार नाही म्हणून लोकांची परमेश्वरावरील श्रद्धा, सेवा, भक्ती वाढावी म्हणून बाबांना नानाविध चमत्कर दाखवावे लागले. तेव्हा कुठे लोकांची त्यांच्यावर श्रद्धा बसली. लोक त्यांच्या सेवेस लागले पण केव्हा? बाबांनी पाण्याने पणत पेटवून लोकांना दिपविले. हरविलेला घोडा दाखवून दिला. नुसता चिमटा जमिनीवर आपटून विस्तव निर्माण केला. लोकांची दुःख नुसत्या उदी प्राशनाने, उदी लावल्याने दूर केलीत असे विविध चमत्कार त्यांनी लोकांना दाखविले. त्यांनी चमत्कार दाखविले नसते तर ते एक सामान्य गोसावीच राहीले असते. ते ढोंगी नसते तरी त्यांना लोकांनी ढोंगी साधू-बुवाच म्हटले असते. पण त्यांनी ईश्वरी बळाने चमत्कार दाखविले तेव्हा त्यांच्यातील परमेश्वराची लोकांना ओळख पटली. तेव्हा बाबांचे भक्त वाढलेत. मशीद शेणाने लिंपलेली असताना त्यावर बसून पठाण नमाज पडले. पण त्यांच्या कपड्यास तीळमात्र डाग पडले नाहीत तेव्हा कुठे पठाणांनी बाबांच्या चरणावर लोळण घेतले. ते नमाज पडण्यास जेव्हा आले व त्यांनी शेणाने लिंपलेली मशीद पाहून रागाने लाल झाले व म्हणाले,

अन्याय केला बघू घोर
ओले आहे नमाज घर
गाई म्हशींच्या शेणाने
त्यावर बाबा त्यांना म्हणाले,
नमाज पडा निश्चिंती
तीळमात्र न लागेल माती
गुडग्याशी आपुल्या।

आणि खरोखरच नमाज पडल्यावर पठाणांच्या गुडघ्याला माती लागली नाही. तेव्हा त्या पठाणांनी बाबांच्या चरणावर लोळण घेतले. एक पठाण बोलला, 'आपण आहात वली अल्ला!' पठाणांच्या वाक्यावर बाबा त्याला म्हणाले, 'यात नाही अपराधा। भावे भजा भगवंत। साह्य तुम्हां होईल तो।

'सर्वाभूती परमेश्वर एकची' हे बाबांना दाखवून द्यायचे होते. जात-पात-धर्म हे माणसांनीच निर्माण केलेले आहेत. बाबा हिंदू होते कि मुसलमान होते हे आजवर कुणालाही न उलगडलेले कोडे आहे. 'धर्म-जात-पात तुम्हास हवेच कशासाठी?' असा खडा सवाल बाबा त्याची धर्म-जात विचारणाऱ्याला करीत. बाबांना हेच सिद्ध करायचे होते की, 'कुणीही उच्च-नीच, गरीब-श्रीमंत नाही. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. देवाजवळ कुठलाही भेदभाव नसतो. शेवटी 'परमेश्वर एकची' भक्तांची विविध प्रकारची संकटे दूर करण्यासाठी परमेश्वराला नवनवीन अवतार घ्यावे लागले.

माणसाच्या मनात 'श्रद्धा' हवी आणि 'सबुरी' हवी तरच तो खरा साईभक्त आणि त्याची भक्ती खरी साईभक्ती. त्या साई भक्तीच्या बळावर होणारे बाबांचे दृश्य अदृश्य दर्शन, चमत्कार, विविध अनुभव हिच खरी साईभक्ती. बाबांनी सांगून ठेवलेलेच आहे की, 'बाबा रे! तुझे भोग तुला भोगलेच पाहिजे. त्यात तर मला' बदल करता येणार नाही. जन्म-मरण, सुख-दुःख कुणाला चुकले? साक्षात् परमेश्वरालाही ते चुकले काय? आणि सुख-दुःख जे काय आपण ह्मणतो ते खरोखरीच सुख आहे काय? उलट क्षणिक सुखासाठी मनुष्य दुःखाच्या दरीतही कोसळण्याचा संभव असतो. शेवटी जीवन तरी काय? नश्वरच. आज ना उद्या ते नाश पावणाराच. त्यापेक्षा स्वार्थ साधून परमार्थ साधलेला कितीतरी पटीने चांगला. तुम्ही भक्ती करा, पुजन करा, भजन करा, परमेश्वराचे गुणगान गा आणि परमेश्वराला प्राप्त करून घ्या. प्रभु तुमची भक्ती पाहून त्याची शक्ती दाखविल्याशिवाय राहणार नाही. आणि परमेश्वराला प्राप्त करून घेतल्यावर त्यास उणे काय? केवळ बाबा 'श्रद्धा-सबुरी' मंत्राने, उदी प्राशन केल्याने, नुसते नामस्मरण केल्याने भक्ताच्या हाकेला धावून येतात. म्हणूनच बाबा म्हणतात.

'शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसा कोणी।

'श्रद्धा' म्हणजे 'साईभक्ती' आणि 'सबुरी' ने मिळणारे फळ म्हणजे 'साईशक्ती' होय.

धन्य धन्य ती शिर्डीनगरी
आम्हा दिनांची पंढरी आहे हो।

असे साईध्यानात म्हटलेले आहे. आणि खरोखरीच भक्तांची ती पंढरीच आहे. आणि बाबा भक्तांची विठाई माऊली आहे. म्हणून सांगतो,

पाऊस आला
चिखल झाला
कशाला जातात इतक्या दूर
शिर्डी आपुले पंढरपूर

।श्री अनंत कोटी ब्रम्हांड नायक श्री राजाधिराज
योगिराज सच्चिदानंद सदगुरू साईबाबा की जय।
"साई चरणी कोटी कोटी प्रणाम।"

# "तव चरणी पाहू दे साई"

श्वासांत साई, घासांत साई
तव चरणी पाहू दे साई
माझी मलाच 'परछाई'।। धृ.।।
अभ्यंग-स्नानी, गुलाबपाणी
विश्वरूप साई दावि चक्रपाणी
जागतांच तू, जाग येई।। १।।
कारुण्य नेत्री, मुद्रा प्रसन्न
पाहतां एकचित्ती, हरपे देहभान
नामे एक 'साई', वेदना पळूनी जाई।। २।।
थाळीत उरे जेव्हा, एक अन्नकण
तृप्त होती तरी, अगणित मुनिजन
द्रौपदीसखा कृष्णसाई, अजि शिर्डीत पुन्हा येई।। ३।।

— **विजय द. हजारे एम्.ए.**
सी/६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड
बोरीवली पूर्व मुंबई-४०० ०६६

# — श्री साईनाथांनी घेतलेली परीक्षा —

— श्री. दिनकर स. वर्दम
११, कांबळी बिल्डिंग, २ रा माळा
खो.नं. ६, टोपीवाला लेन
लॅमिंग्टन रोड, मुंबई- ७

ही गोष्ट आहे, माझे आजोबा कै. रामशेट आपाशेट वर्दम ऊर्फ दादा वर्दम यांनी आम्हा नातवंडांना सांगितलेली, माझे आजोबा कै. दादा वर्दम हे सन १९५८ साली साईचरणी विलीन झाले. ते सतत नामस्मरण करीत असत. कोणते नाम ते घेत असत ते काही आम्हाला समजलेले नाही. परंतु आमच्या गावी म्हणजे 'कुडाळ' (जि. सिंधुदुर्ग) येथे बरेच लोक दादा वर्दम यांच्या हाताने तीन गाठी मारून दिलेल्या दोऱ्याने व्याधीमुक्त होत असत. त्यांच्या हातून मंत्रून घेतलेला दोरा जनावरांना म्हणजे गाई म्हशींनासुद्धा बांधीत असत हे सर्व आम्ही लहान असताना पहात होतोच. शिवाय रात्री घरी आल्यावर ते नवनाथ ग्रंथाचा एक एक अध्याय रोज वाचीत असत व आम्हाला गोष्टीही सांगत असत. या आमच्या पुण्यवान आजोबांना शिरडीत श्रीसाई समाधिस्त होण्यापूर्वी शिरडीला जाऊन प्रत्यक्ष श्री साईभगवंताचे दर्शन घेण्याचा लाभ मिळाला होता, त्यावेळी श्री साईंनी आजोबांची जी परीक्षा घेतली ती घटना आम्हाला आजोबांनी सांगितली ती अशी—

माझे आजोबा कै. दादा वर्दम हे आपल्या १४ वर्षे वयाच्या लहान भावाला बरोबर घेवून शिरडीला गेले होते (हे लहान भाऊ म्हणजे आमचे धाकटे आजोबा श्री. राजाराम आपाशेट वर्दम कुडाळ मुक्कामी आज हयात आहेत) ज्यावेळी हे दोघे बंधू शिरडीला गेले त्यावेळी बाबा मशिदीत होते. कै. दादा वर्दम यांच्या खिशात ५ रु. च्या १२ नोटा म्हणजे एकूण ६० रु. होते त्या काळातील ६० रु. म्हणजे आजच्या जमान्यातील ६०० रु. होत असो, माझ्या आजोबांकडे श्री. साईंनी दक्षिणा मागितली व आजोबांनी ५ रु. दक्षिणा दिली तेव्हा श्री साई म्हणाले 'और लाव' पुन्हा ५ रु. दिले तेव्हा म्हणाले 'और लाव' अशा प्रकारे ११ वेळा ५-५ रु. दिल्यावर शेवटचे ५ रु. राहिले असताना "और लाव" असे म्हटल्यावर माझ्या आजोबांनी शेवटचे ५ रु. दिले व माझी परीक्षा पाहू नका' अशी विनंती केली त्यावेळी श्रीबाबा ओरडले व त्यांना म्हणाले "अब जाव" मग माझे आजोबा बंधूसह कोपरगावपर्यंत चालत आले व मुंबईला परतण्यासाठी पैसे खिशात नसताना गाडीत बसले. गाडी सुटताना अचानक एक टि.सी. आला व त्याने गाडीच्या खिडकीतून हात घालून आजोबांच्या हातात २ तिकीटे दिली व गाडीने वेग घेतला तिकीटे तपासून पाहिली असता ती मुंबईचीच होती. ही तिकीटे खिशात ठेवण्यासाठी आजोबांनी खिशात हात घातला तेव्हा त्यांना नोटांचे पुडके म्हणजेच ५ रु. च्या १२ नोटा ज्या बाबांना अर्पण केल्या होत्या त्या सर्व जशाच्या तशा खिशात असल्याचे आढळून आले. शिरडी ते कोपरगावपर्यंत चालत येवून गाडीत बसे पर्यंत खिशात एकही पैसा नव्हता. परंतु गाडी सुटताना साईरूपी टी.सी.ने तिकीटे देणे व

सर्वच्या सर्व ६० रुपये खिशात सापडणे या श्रीसाईनाथांच्या लीलेने माझे आजोबा थक्क झाले. परंतु त्याचबरोबर आपण श्रीसाईबाबांनी घेतलेल्या परीक्षेत पास झालो याचा परम आनंदही झाला. असे आहेत लीला नाटकी आमचे श्री साई, आणि त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेऊन त्यांच्या परीक्षेला उतरणारे आमचे पुण्यवान आजोबा दादा वर्दम; आणि म्हणून दादा वर्दम यांचा नातू म्हणवून घ्यायला मला अभिमान वाटतो. आज आमच्याकडून जी काही साईसेवा साईभक्ती घडते ती आमच्या आजोबांचीच पुण्याई आहे, आणि म्हणूनच आम्हाला दरवर्षी शिरडीला जाण्याचा योग येतो. साई माऊली आम्हाला शिरडीला बोलावून घेतात भरपूर प्रेम देतात. यापुढे श्री साईनाथांनी आम्हाला कधीही दूर लोटू नये अशी श्री साईनाथांचे चरणी प्रार्थना करतो.

# दर्शन द्यावे साईदेवा

दर्शन द्यावे साईदेवा।
धीर मजसी धरवेना।।

चरणावरती मस्तक नमूनी।
पुजन करीते तुला स्मरूनी।।

तव आशीर्वाद मिळावा।
आस मनी नसे दुसरी।।

तुझी कृपा मजवर असू दे।
तुझ्या चरणी हे मस्तक नमू दे।।

तव आशीर्वादा मी भुकेली।
नमन हे साईदेवा तुजला।।

तुझ्याविना शांती नसे मनाला।
तुझ्या दर्शनाची गोडी मनाला।।

तुझी छाया नित्य शिरी असू दे।
तुझ्या चिंतनी मन माझे रमू दे।।

दर्शन द्यावे साईदेवा।
धीर मजसी धरवेना।।

— **कु. रंजना बाळकृष्ण बोऱ्हाडे**
पट्ठे बापूराव मार्ग, बस डेपोसमोर,
महाराज बिल्डींग, प. मजला,
खो.नं. ३१, मुंबई-४०० ००८

# हे साईऽऽ तू आई आहेस....

— श्री. अशोक माहिमकर,*
श्रीस्वामी समर्थ मंदिर,
पो. जंजिरा मुरूड (जि. रायगड)

अनन्य चिंतन। करिती जे जन। साई
दयाधन। तयापाठी ।।

जीवनामध्ये व भक्तिमध्ये अनन्य चिंतनाचे, नामजपाचे महत्त्व फार आहे.

आपण विज्ञानाचे सहाय्याने कितीही उड्या मारल्या तरी आपले हात आकाशाला टेकू शकत नाहीत व रडारच्या सहाय्याने येणारे वादळ ओळखू शकलो तरी थोपवू शकत नाही!

विश्वसंचालक निसर्गशक्तीने काही गोष्टी तिचे हाती पक्क्या ठेवल्या आहेत. म्हणूनच श्रद्धापूर्वक त्या शक्तीला शरण, त्या शक्तीला मानून आपले जीवनाची वाटचाल करायची. त्या शक्तीसारख्या तेजस्वी अशा थोर योगीराज विभूतींमध्ये ती परमेश्वरी निसर्गशक्ती पाहून त्या विभूतींनी दिलेला 'नामजप' मंत्र मनात ठेवायचा की आपण निर्भय, प्रसन्न व उत्साही होतो.

श्रद्धा 'नामजप' करीत राहीले की त्या थोर विभूतीमधील तेजाच्या लहरी (करंटस्) आपल्यामध्ये हळूहळू संचारू लागतात. शरीरातील व मनातील मरगळ, नैराश्य निघून जाते... तरतरी येऊ लागते व आपले मनोबल वाढू लागते. एका प्रचंड आश्वाराची जाणीव होते राहून आपण निर्भय, आनंदमय होतो!

हेही विज्ञान आहे, हे अश्रद्ध नवीन पिढीने विसरू नये.

नित्य श्रीसाईना 'साईऽऽ' अशी तळमळीने साद घालायची... डोळ्यात पाणी आले पाहिजे. जोपर्यंत देवाचे नावाने आपल्या डोळ्यात पाणी येत नाही, तोपर्यंत सारे फुकट!

आणि अडी अडचणी निवारणासाठी, चांगल्यासाठी 'मस्का' ही लावायचा नाही.

तर, हे साईऽऽ तू आई आहेस. 'तेरे फुलोंसे भी प्यार— तेरे कांटोंसेभी प्यार!' माझ्या ओंजळीत फुले टाक नाहीतर काटे टाक, पण फक्त दोन्ही वेळेला माझेकडे तुझी पहायची दृष्टी मायेची ठेव. तू माझी आई आहेस.

आईने मायेने दिलेली शाबासकी (फुले) आणि आईने मायेने दिलेला मार (काटे) ही दोन्ही मुलाचे कल्याणच करतात! फुले व काटे सारखेच आहेत. आमचा पहायचा दृष्टीकोन चुकतो. फुले ही आनंदाचा सुगंध देतात, तर काटे हे 'काट्याने काटा निघतो' या उक्तीप्रमाणे अडचणींचा काटा काढून अंती आनंदच देतात.

येथेच तर सारी खुबी आहे. ही खुबी ज्याने जाणली तो जीवन जिंकला!

आम्ही जीवनात श्रद्धा, सबुरी व हिंमत ढळू द्यायची नाही.

।। श्रीसाई समर्थ—हिंमत समर्थ ।।

*या लेखाचे लेखक श्री. अशोक माहिमकर यांचे नुकतेच देहावसान झाले. त्यांच्या स्मृतीस आमचे अभिवादन.

# बाबांनी भक्ताची लाज राखली

— श्री. वि.गो. पाठक
सविता सदन
साईनाथ रोड मालाड (प.)
मुंबई- ६४

इ.स.१९८५ च्या गणेश उत्सवात घडलेली घटना

मला एका कोळी गृहस्थाकडे श्री सत्यनारायणाची पूजा करण्यास आमच्या गुरूजीने मला सांगितले. ह्या कोळी लोकांत थोडी निराळी पद्धत असते. आमच्या गुरूजींनी मला सर्व समजावून सांगितले व ते दुसरीकडे कामासाठी निघून गेले. कोळी लोक मखराच्या चारी कोपऱ्यात चार तांब्याचे लहान तांबे (गडू) ठेवतात व त्याच्यावर लहान ताम्हण तूपाने भरून त्यात फुलवात लावायची असते, व ती सुद्धा पोथी वाचायच्या वेळी. ह्या पद्धतीला फार महत्व देतात.

मी त्याप्रमाणे मांडणी केली व पूजेला सुरवात केली. सर्व पूजाविधि व्यवस्थित पार पडला. मी पोथी (कथा) वाचावयास सुरवात केली. पाचवा अध्याय संपूर्ण झाला. आरती मंत्र पुष्पांजली करून मालकासह सर्वांना तीर्थप्रसाद दिला. मी सुद्धा घेतला. थोड्यावेळाने मालकाची परवानगी घेवून रात्रौ ८.३० ला घरी आलो. मला एकदम मखरातल्या फुलवाती प्रज्वलीत न केल्याचे माझ्या लक्षात आले. माझ्या छातीत धस्स् झाले. मी घाबरून गेलो. कारण उद्या आपल्याला मालकाचे दोन शब्द खावे लागणार. गुरूजींना व आपल्याला मान खाली घालावी लागणार. मी पुनः रात्री त्यांच्या घरी जाण्याचा विचार केला परंतु घरच्या मंडळींनी विरोध केला. आता काय करणार! योगायोगाने रोजची संध्याकाळची बाबांची आरती व्हायची होती. आरती केली व श्रीबाबांना हात जोडून मनोमन प्रार्थना केली, 'आता तुम्हीच माझी लाज राखणार, दुसरे कोण?' पुनः पुनः बाबांना विनंती केली.

रात्री जेवण तर गोड लागले नाहीच व रात्री झोपसुद्धा आली नाही. सकाळी ५ वाजता उठलो आंघोळ करून श्रीबाबांची पुनः प्रार्थना करून उत्तरपूजेसाठी त्यांचे घरी गेलो. दरवाजा बंद होता. बेल दाबली, परंतु छातीत धडधड होत होते. कारण मालक काय बोलेल ते ऐकावे लागेल. दरवाजा उघडला गेला. मालक हसतच पुढे आले. 'या भटजी बसा, लवकर आलात.' पाट बसावयास दिला व घरात चहासाठी सांगून मालक आंघोळीला निघून गेले. माझे लक्ष मखरातल्या फुलवातीकडे गेले. मालक आंघोळीला गेल्याची संधी साधून मी चारी फुलवाती प्रज्वलीत केल्या व पाटावर येऊन बसलो व श्री सत्यनारायणाची व बाबांची पुनः प्रार्थना केली. माझ्या जीवात जीव आला. मला हायसे वाटले. थोड्याच वेळात मालक चहा घेऊन आले. चहा घेतला फारच गोड लागला. नंतर उत्तर पूजा केली.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्यांचेकडे देवाच्या पाया पडण्यास पुष्कळ लोक येऊन गेले. मालक व त्यांचे नातेवाईक मंडळी रात्री भजन व पत्ते खेळण्यासाठी देवासमोरच बसली होती. परंतु रात्रभर देवाजवळ बसलेल्या मंडळींचे किंवा मालकाचे वा कुणाचेही लक्ष त्या फुलवातीकडे गेले नाही. श्रीबाबांनी त्या सर्वांची नजरबंदी करून आपल्या भक्ताची लाज राखली.

खरोखरीच बाबांची किमया अगाध आहे.

श्री बाबांच्या चरणी माझे शतशः प्रणाम!

*******

# = कासवी =

**— सौ. भावना जेऊरकर**
डोंबिवली

साई सच्चरितकार कै. गोविंदराव दाभोलकरजींनी अध्याय १९ मध्ये साईबाबांचे व साईभक्तांचे नाते कोणत्या प्रकारे व कसे असावे याविषयी वर्णन केले आहे. ओव्या क्रमांक १११ ते ११३ यामध्ये त्यांनी स्पष्टपणे कथन केले आहे ते असे —

कासवी नदीचे ऐल कांठीं। तिची पिल्ले पैल तटीं।
ना दूध, ना ऊब केवळ दृष्टी। देई पुष्टी बाळका॥ १११॥

कासवीण आपल्या बाळांना कधीच दूध पाजत नाही. आपल्या पिल्लांना कधीच कुशीत घेत नाही एवढेच नाही तर माय कासवी नदीच्या एका काठी असेल अन् तिची पिल्ले दुसऱ्या काठी असली तरी तिच्या केवळ प्रेमळ दृष्टीने ती आपल्या बाळांचे रक्षण करीत असते. फक्त तिच्या ममतेची दृष्टीच आपल्या बाळांना वाढवत असते; त्यांचे पालनपोषण करीत असते.

अर्थात् बाबा आपणा सर्वांस कासवीण रूपी आईप्रमाणे आहेत. शिर्डी क्षेत्री ही साई आई राहून जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत तिची जी भक्तरुपी पिल्ले विखुरलेली आहेत त्यांच्यावर केवळ बाबांची कृपादृष्टीची नजरच आधार देण्यास सदैव कारणीभूत होत असते. बाबांच्या प्रेमळ, कृपाळू कनवाळू नजरेलाच आपण सर्वजण आतुरलेले असतो; असले पाहिजे.

पिलियां सदा आईचे ध्यान। न लगे काहीच करणे आन
न लगे दुग्ध ना चारा, ना अन्न। माता निरीक्षण पोषण त्या॥ ११२॥

कासवीणीची बाळे दूर राहूनही सदा आईच्याच विचारात गढून गेलेली असतात त्याप्रमाणे साईभक्त, साईप्रेमी यांनी साईमाऊलीचे चिंतनात नेहमीच मग्न राहिले पाहिजे. माय कासवी आपल्या बाळांना अन्नपाणी, चारा भरवत नाही. मात्र तिचे नेत्रपटल हेच तिच्या पिल्लांचे पोषण करण्यास पुरे होतात. जर आपण साईप्रेमिकांनी आपल्या साई

आईचे निरंतर ध्यान केले, स्मरण केले, तर ती कनवाळू आई आपल्या पिल्लांवर लेकरांवर कृपादृष्टीची नजर ठेवल्याशिवाय राहिल काय? नव्हे ही साई आई आपणा सर्वांवर कृपादृष्टी ठेवेलच.

हें जे निरीक्षण कूर्मदृष्टी। ही तो प्रत्यक्ष अमृतवृष्टी
पिलियां लाधे स्वानंद पुष्टि। एक्य सृष्टी गुरू शिष्यां।। ११३ ।।

कासवीणीचे आपल्या बाळांच्या प्रति जे निरीक्षण असते; तिची मायेची दृष्टी तिच्या पिल्लांना जणू अमृताची वृष्टी असते. आपल्या आईच्या नजरेतील आनंद पिल्लांना वाढवत असतो. कासवीण व तिची पिल्ले दृष्टादृष्टीतच एकमेकांची नाती जाणतात, उमजतात, स्वतःला धन्य मानत असतात.

साई प्रेमीकांनो! आपणही साईभक्तीत इतके एकरुप झाले पाहिजे की, साईंच्या नजरेतून आईची ममता, वात्सल्य प्रेम हे भाव वाहत असतात ते आपल्याला प्राशन करता आले पाहिजे. आपली साईंवर एवढी अढळ श्रद्धा असली पाहिजे की, साईंच्या कृपादृष्टीतील अमृत पिण्याची क्षमता आपल्यात आली पाहिजे.

याच अध्यायात ओवी क्रमांक ७३ मध्ये बाबा आपणा सर्वांना सांगतात —

तू मजकडे अनन्य पाहीं। पाहीन तुजकडे तैसाच मी ही।। ७३ ।।

इतकी सोपी भक्ती बाबा आपल्याला करावयास सांगतात. कासवी-पिल्लांचे, हरणी-पाडसाचे, माय-लेकराचे नाते म्हणजे अगदी जवळचे अतूट असे ममतेचे नाते जोडून जर साई-आई आपणास दिलासा देते तर मग आपण का बरे साई-आईपासून वंचित व्हावयाचे? म्हणून मला साई-आईबद्दल म्हणावेसे वाटते,

"साई! पाहतो तुला माय कासवी रुपात
तुझी पिल्ले आम्ही, वाढू तुझ्या कृपेत."

# साई मज दिसला

दर्शना आलो साई शिरडी भावफुलांची माळ घेऊनी
मस्तक ठेऊनि तुझीया चरणी चित्त रंगले तुज पाहूनी
प्रेम बहरूनी हर्ष फुलला कलियुगी मज साई दिसला
गंगा यमुना नयनी भरता जळीं स्थळीं मज साई दिसला
चित्त रंगले साई पूजिता अमृत प्याला ओठी भरला
धुवुनी निघाले अंतःकरण कांस धरिता सत्संगाची साई मज दिसला

**— श्री. बा. बा. चमणकर**
'सुलक्ष्मी', बंगला क्रमांक १५
कैलास नगर, डोंबिवली (पश्चिम)

# श्री साईनाथांची अशी कृपा

— सौ. नीलम डी. देशपांडे
११३९ ई-साईक्स एक्सटेंशन
कोल्हापूर

श्री साईनाथांची किमया अगाध आहे. त्यांच्या आशीवार्दाने अशक्य ते शक्य झाल्याचे अनेक अनुभव सर्व साईभक्तांना वेळोवेळी येतच असतात. साईंच्या दरबारी आलेला भक्त कधीही विन्मुख होऊन मागे परतत नाही.

जाणा येथे आहे सहाय्य सर्वास।
मागे जे जे ज्यास ते ते लाभे।।

या त्यांच्या उक्तींची प्रचीती प्रत्येकाला पदोपदी येतच असते. सगळेच अनुभव काही मासिकातून प्रसिद्ध करता येणार नाहीत. तरी सुद्धा एक अनुभव आता येथे देत आहे.

श्रीसाईबाबांच्या कृपेने माझे लग्न झाले. लग्नानंतर सव्वा वर्षातच एक अनपेक्षित ऑपरेशन झाले. अर्थात् त्याहीवेळी बाबांच्या कृपादृष्टीनेच मी त्या प्रसंगातून वाचले. (तेव्हा बाबांनी माझे कसे काय रक्षण केले ते नोव्हे. १९८१ च्या अंकात प्रकाशित झालेच आहे.) पण त्या ऑपरेशननंतर संतती प्राप्तीचा प्रश्न फार अवघड होऊन बसला. ॲलोपॅथीक सर्व उपचार घेऊन झाले. अशीच ३ वर्षे लोटली. 'दोष काही नाही' म्हणून डॉक्टर सांगत , पण यश कुणालाही येत नव्हते. मी माझा सर्व भार, काळजी साईबाबांवर टाकून राहिले होती. ज्यांनी माझे लग्न केले तो माझा परमेश्वर संसार फुलविल्याशिवाय राहणार नाही म्हणून आशा धरून साईंना विनवीत राहिले. अशातच १९८४ च्या संक्रातीच्या दिवशी ती. सौ. आई साई चरणी विलीन झाली. ते दुःख विसरण्यासाठी फेब्रुवारीत मी माझ्या वडिलांबरोबर शिरडीस गेले. तेथे अभिषेक-पुजा झाली. माझ्या ओटीत प्रसादाचा नारळ घातला गेला. तो तसाच घेऊन मी समाधी मंदिरातील मूर्तीच्या पायावर नमस्कारासाठी वाकले. आणि काय सांगू! मूर्तीवरील फुले पटापट माझ्या पाठीवर बरसली. भाऊ पाठीमागे होतो. त्याला विचारले, 'काय पडले?' तो म्हणाला, 'तुला बाबांनी प्रसाद दिला.' आणि तेथून पुढे वर्षाच्या आतच गोड प्रसादाप्रमाणेच गोड मुलगी मला दिली. आता ती दिसामासी वाढते आहे. काही किरकोळ तब्येतीच्या तक्रारी आहेत त्याही श्रीबाबा दूर करून माझ्या (म्हणजे त्यांच्याच) बाळीला लवकर सुदृढ करतील असा मला दृढविश्वास आहे. तिलाही साईंनी आपल्या भक्तीची गोडी देऊन कृपेचा हस्त ठेवावा हीच नाथांच्या चरणी नम्र प्रार्थना.

# श्री साईबाबांचे नमस्कार करायला लावणारे चमत्कार

— श्री. सत्यवान गायकवाड
३९९ नवी खडकी
येरवडा पुणे-४११००६.

खरे आणि खोटे
जाणे तोचि जाणे,
सद्‌गुरू बाबांचे
फाटके तुटके नेसतो रे
परि नमस्कारास चमत्कार दाखवितो रे

संतांचे जीवन चमत्कारांनी भरलेले असते. चमत्काराशिवाय नमस्कार नसतो हे खरे असले तरी — नमस्काराकरिता चमत्कार संत — सज्जन दाखवित नसतात. कार्यात अडथळे निर्माण झाल्यास, भक्त दुःखाने गांजल्यास, तन्निवारणार्थ कार्याचा एक भाग म्हणून या गोष्टी त्यांना कराव्या, लागतात. येशू खिस्ताच्या चरित्रात चमत्कार आहेत. ज्ञानेश्वरांनी देखील कुटाळखोरांना उत्तर म्हणून रेड्याच्या तोंडून वेद बोलून दाखविले. पाठीवरून अग्नी काढून त्यावर मांडे भाजले. "इंद्रियाद्वारे प्राप्त झालेले ज्ञान अपूर्ण असते कारण इंद्रियांची शक्ति संकुचित सीमीत असते. माणसाचा आत्मा ईश्वराचे मंदिर आहे. आत्मा नेहमी सांगत असतो ईश्वरावर विश्वास ठेवा.

सत्य कृपाळू परमेश्वराने ह्या धरतीवर श्री साईबाबांच्या आत्म्याला (दुसऱ्या मनुष्याच्या शरीरात) पाठवून त्यांच्याकरवी आमच्यासारख्या पामर दासांना स्वतःच्या सत्य अमर धर्माचे सत्य ज्ञान कथन करविले. त्याचबरोबर श्री साईबाबांनी जीवंतपणी स्वतःच्या आचरणाने सर्व मानवांना सबळ पुरावा दाखवून दिला की सर्व जगाचे खरेखुरे मालक एकमेव सत्य कृपाळू परमेश्वर हे पृथ्वीतलावर असलेल्या मानवाला चमत्काराशिवाय नमस्कार नाही हे निश्चित आहे.

### गंगायमुना

एकदा शुभपर्वकाल आलेला पाहून दासगणूंच्या मनात गंगायमुनांच्या संगमावर प्रयाग क्षेत्रात स्नान करण्याचा विचार आला. शिरडीला बाबांच्या परवानगीशिवाय कुणाही भक्तांचे पान हालत नसे. दासगणू नम्रपणे बाबांजवळ गंगास्नानाला जाण्याची परवानगी मागण्यास गेले. बाबा मधुर स्मित करून मिस्किलपणे म्हणाले, "अरे वेड्या, इतक्या लांब तीर्थस्नानाला जाण्याची काय जरूरी आहे? आपले प्रयाग इथेच आहे. मनामध्ये दृढविश्वास मात्र पाहिजे" इतके बोलतात तो खरोखरच अद्‌भुत चमत्कार पाहून दासगणूंनी गहिवरून आज्ञा शिरसावंद्य मानून पायांवर डोके ठेवले आणि बाबांच्या दोन्ही अंगुष्ठांतून गंगायमुनांच्या पवित्र पाण्याच्या झरा झुळझुळ वाहू लागला. हा चमत्कार पाहून दासगणूंना गहिवरून आले. त्यांचे डोळे पाण्याने भरून आले आणि बाबांची अगाध लीला पाहून मनाच्या पूर्ण आनंदी स्थितीत त्यांना खालील भक्तिपर पद लिहिण्याची स्फूर्ति झाली.

अगाध शक्ति अघटित लीला तव सद्‌गुरूराया।
जडजीवांते भवि ताराया तूं नौका सदया॥
वेणीमाधव आपण होऊनि प्रयाग पद केले।
गंगायमुनाद्वय अंगुष्ठी प्रवाह दाखविले॥

## विठ्ठलाचे दर्शन

श्रीसंत दासगणू महाराजांना पंढरपूरला जाऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. तेव्हा श्रीबाबांनी त्यांना तिथल्या तिथेच शिरडीत साक्षात् श्री पांडुरंगाचे दर्शन घडविले आणि मग दासगणूंच्या तोंडून शिरडी माझे पंढरपूर साईबाबा रमावर या सुंदर अभंगाची निर्मिती झाली.

## पणत्यांत पाणी घालून त्या तेवत ठेवल्या

श्री बाबांना दिवे लावून रोषणाई करण्याची मनस्वी आवड होती. बाबा मशिदीतल्या चार कोपऱ्यात चार पणत्या, रात्रीच्या वेळी लावून ठेवीतच असत पण त्याशिवाय त्या पवित्र लिंबाच्या झाडाखाली एक, शनि मंदिरात एक आणि मारुतीच्या देवळात एक अशा तीन पणत्या रात्रीच्या वेळी लावून ठेवीत. या साऱ्या पणत्या तेवत ठेवण्यासाठी श्री बाबांना दररोज तेलाची गरज भासे त्यासाठी ते दररोज संध्याकाळी गावातील वाण्यांकडे तेलाची भिक्षा मागत असत. जमा केलेले तेल पणत्यांत घालून द्वारकामाई रोषणाईने सुशोभित करावी आणि समोरील दगडावर बसून त्या रोषणाईकडे एकटक पहात बसणे हा श्री बाबांचा नित्याचा छंद होता. त्यांच्या या नित्याच्या कार्यक्रमाला गावातले वाणी कंटाळले. रोज तेलाची भिक्षा मागणाऱ्या या वेड्या फकिरास तेल द्यायचे नाही असे त्या सर्वांनी ठरविले. हातात टमरेल घेऊन समोरच वाण्याच्या दारावर जाऊन ते उभे राहिले व म्हणाले तेलीदादा थोडे तेल टाका. त्यावर वाणी म्हणाला अरेरे काय करावे माझ्याकडे तुम्हाला देण्याकरिता बिलकूल तेल नाही. माफ करा. आणि पुढे जा. बाबा दोन तीन वाण्यांकडे गेले. परंतु श्री बाबांना तेलाचा एक थेंब देखील कुणी दिला नाही. बाबांना या गोष्टीचा बिलकुल राग आला नाही. उलट यांना कायमचे आपलेसे करण्यासाठी व रुपये-आणे-पैच्या शुष्क व्यवहारातून परमार्थाकडे खेचून घेण्यासाठी हीच एक सुवर्णसंधी आहे असे मानून ते द्वारकामाईकडे परतले. बाबांच्या पाठोपाठ ते वाणीसुद्धा बाबा कसे काय पणत्या पेटवणार म्हणून फजिती पहाण्यास द्वारकामाईच्या बाहेर लपून उभे राहिले. बाबांनी आपले मन एकाग्र केले आणि मडक्यातील पाणी टमरेलात घेऊन ते पणतीमध्ये भरू लागले. पाण्याने भरून झाल्यावर त्यानी एकेका पणतीची वात काडीने पेटवायला सुरवात केली आणि काय आश्चर्य पाण्याने भरलेल्या पणत्या पेटल्या आणि द्वारकामाई प्रकाशात न्हाऊन निघाली. या चमत्कारामुळे सर्वांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला, आणि सर्वांनी बाबांच्या पायांवर डोके ठेवले. केलेल्या कृतिची क्षमा मागितली. बाबा देव आहेत अशी खात्री झाली. बाबांचा चमत्कार पाहून सर्वांनी साष्टांग नमस्कार केला आणि लोटांगण घातले.

## श्री शंभो साईनाथ

मेघा हा डेप्युटी कलेक्टर साठे यांचे घरी आचारी होता. जातीने ब्राह्मण, परंतु शिक्षणाचा मुळीच गंध नव्हता. त्याच्या तोंडून सदा न कदा 'नमः शिवाय' असे देवाचे नाव बाहेर पडायचे. नित्यनियमाने तो शंकराची पूजा करी. एक दिवस या मेघाला साठेसाहेबांनी आपल्याबरोबर बाबांच्या दर्शनाला शिरडीच्या मशिदीत नेण्याचा विचार केला. परंतु या मेघाला कोणीतरी सांगितले होते की साईबाबा हे काही हिंदू साधू नव्हेत ते मुसलमान फकीर आहेत. परंतु हिंदूंना ते 'धर्मात्मा' तर 'मुसलमानाना' 'अवलिया फकीर' वाटायचे हे मेघाला माहित नव्हते. शंकराची पूजा सोडून एका मुसलमान फकीराची पूजा करायची हे ऐकून मेघाला फार वाईट वाटले. साठेंनी त्याची समजूत घातली व बाबांच्या खऱ्या स्वरुपाची थोडी ओळख करून दिली तेव्हा थोडे समाधान पावून मेघा बाबांच्या दर्शनास गेला द्वारकामाईच्या आवारात पाय ठेवताच श्री बाबा मोठ्याने ओरडले. आणि म्हणाले "खबरदार वर आलास तर' चालता हो. मुसलमानाकडे कशाला आलास?" बाबांनी पहिल्या भेटीतच मेघाच्या मनातील भाव ओळखला व त्याला साक्षात् शंकराचे दर्शन घडविले. हा चमत्कार पाहून मेघाने बाबांच्या पायावर लोटांगण घातले. साष्टांग नमस्कार केला आणि या वेळेपासून रोज दीड तास श्री बाबांची तो आरती करू लागला.

## श्रीरामप्रभूची मंगलमूर्ति दिसू लागली

सन १९०९ च्या नाताळात एक डॉक्टर आपल्या मित्राबरोबर शिरडीस गेले होते. हे डॉक्टर रामभक्त होते. आणि स्वतःला स्नानसंध्याशील कर्मठ ब्राह्मण समजत. त्यांचे सोवळे ओवळे फार कडक असल्यामुळे "आपण या मुसलमान फकीराच्या मशिदीत येणार नाही" अशा काही अटी कबूल करूनच डॉक्टर आपल्या मित्राच्या आग्रहास्तव केवळ गंमत म्हणून शिरडीला आले होते.

या डॉक्टरांच्या मित्राची श्री बाबांवर अढळ श्रद्धा आणि भक्ति होती ज्या वेळी मशिदीत हे दोघे दर्शनाकरिता निघाले तेव्हा डॉक्टरांचे मित्र म्हणाले डॉक्टर आपणास मी दुराग्रह किंवा हट्ट करीत नाही. तेथे गेल्यानंतर आपण योग्य वाटेल असे वागा असे म्हणून ते दोघेही मशिदीत गेले आणि श्रीबाबांच्या पायावर प्रथम डॉक्टरांच्या मित्रांनी नमस्कार केला. त्याच्या पाठोपाठ डॉक्टरांनी सुद्धा साष्टांग नमस्कार केला. मागे वळून पहातो तो त्यांच्या डॉक्टर मित्रांनी बाबांच्या चरणांवर डोके ठेवले. हा चमत्कार पाहून त्यांना विचारले आपण असे करण्याचे प्रयोजन काय तेव्हा डॉक्टर म्हणाले अरे चुकलो द्वारकामाईत शिरताच मला साईबाबांच्या जागी श्रीरामप्रभूंची मंगल मूर्ति दिसू लागली. धन्यधन्य साईनाथा! तुझी लीला अगाध आहे. या तुमच्या दासाला क्षमा करा. पुनः कधीही असा अहंकार आणि गर्व बाळगणार नाही.

## प्लेगच्या साथीचे पलायन

सुमारे १९१० मध्ये शिरडी गावात प्लेगची साथ सुरू झाली ती इतकी भयंकर होती की गावचे स्मशान अवस्थेत रूपांतर होण्याची वेळ आली. शिरडीमधील लोकांनी

अशा संकटकाळी बाबांकडे धाव घेतली. बाबांनी अंतरज्ञानाने शिरडीवरील संकटाची वेळ ओळखून दोन चार बाया बोलवून चार पायल्या गहू दळले आणि ते पीठ गावच्या वेशीवर नेऊन टाकण्यास सांगितले. लगेच माणसे मृत्युमुखी पडण्याचे बंद झाले. हा श्री बाबांचा चमत्कार पाहून शिरडीमधील लोकांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले सर्वांनी बाबांच्या चरणावर डोके ठेवले आणि साष्टांग नमस्कार केला.

**टांगेवाल्याचा चमत्कार**

एकदा बाबांचे परमभक्त नानासाहेब चांदोरकर हे जामनेरला मामलेदार असताना त्यांची मुलगी प्रसूति वेदना सहन न होऊन ओरडू लागली. पहिल्याच बाळंतपणी तिला घरी आणले होते. अशा संकटसमयी नानांनी श्री बाबांची एकसारखी आठवण आणि आर्तस्वराने हाक मारली. ही हाक शिरडीमध्ये श्री बाबांना ऐकू गेली. ताबडतोब खानदेशात निघालेल्या रामगीरबुवाजवळ उदी आणि आरती-आरती साईबाबा सौख्य दातारा जीवा- ही उतरवून देऊन नानासाहेबांकडे पाठविली. रामगीरबुवांना अपरात्री चाळीस गावच्या रेल्वे स्टेशनवर उतरावे लागले. तेथे टांगेवाल्याच्या रूपाने बाबा प्रकट होऊन त्यांना बाबांनी नानांच्या वाड्यात सोडले आणि श्रीबाबा अदृश्य झाले. आणलेली उदी पाण्यात देऊन कपाळाला लावली तोच मुलगी सुखरूप बाळंत झाली. हा चमत्कार पाहून चांदोरकरांना गहिवरून आले. डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. व श्रीबाबांना साष्टांग नमस्कार केला.

श्री साईबाबांनी असे कितीतरी चमत्कार केले आणि आजसुद्धा श्री बाबा चमत्कार करून नमस्कार करावयास लावत आहेत. हे सच्चा साईभक्ताने ओळखले पाहिजे.

साई केली आराधना बीज दळोनिया।
प्रसन्न होई ईश्वर साई त्यांच्या भक्तिद्वारे ।।
भक्तांची लाज राखी वेळोवेळी ईश्वर साई।
स्वधर्माचे रक्षण होई चमत्कारापायी ।।

*****

# माझा शिरडीतील पहिला अनुभव

**— श्री. शं.ग. सारंगधर**
अ/८ साई-कुटीर, डहाणूकर वाडी दत्त मंदिर मार्ग,
कांदिवली (पश्चिम) मुंबई-४०० ०६७

१९५१ सालची ही गोष्ट आहे. त्यावेळी मी मुंबईत ठाकुरद्वारी राहात होतो. एके रात्री मी फणसवाडीतून जात असताना तेथील प्रेमळ विठ्ठल मंदिरातून आरतीचे स्वर कानी आले. देवळात आरती चाललेली दिसत नव्हती. पण स्वर मात्र लक्ष वेधून घेत होते. मी आत गेलो. देवाच्या गाभाऱ्यामागे आरती चालू होती. प्रदक्षिणेच्या मार्गात

बरीच गर्दी होती. मी तेथेच थांबलो. आरती प्रार्थना आटोपल्यावर गर्दीबरोबर मी पण पुढे सरकू लागलो. पाठीमागे एका संताच्या प्रतिमेसमोर भक्तजन नतमस्तक होऊन पुढे जात होते. मी पण शीर नमवून नमस्कार केला. चौकशी करता कळले की ती प्रतिमा शिरडीच्या संतांची — श्री साईबाबांची होय.

त्यावेळपर्यंत मला साईबाबांची काहीच माहिती नव्हती. पण आता त्यांचेबद्दल माझ्या मनात कुतुहल निर्माण झाले. भक्तांना आपल्याकडे ओढून आणणाऱ्या या संताची मी जिज्ञासेने जो जो अधिक माहिती मिळवू लागलो तो तो मनातील आर्तता जास्त वाढू लागली. मी वारंवार आरतीला हजर राहू लागलो.

बाबा आता हयात नाहीत. त्यांचे निर्वाण होऊन बरीच वर्षे लोटली. आता त्यांचे सदेह दर्शन होणे नाही. ही जाणीव मन उदास करून टाकीत असे.

शिरडी गाव मूळचे एक लहानसे खेडेगाव. पण श्री साईसच्चरितात त्याचे वर्णन कसे केले आहे पहा :—

गाव शिरडी आधी लहान। साई सहवासे झाला महान।
त्याचेनि झाला अति पावन। त्याचेनि तीर्थपण तयाला।
(सा.स.अ. ३९ ओ. ३)

इथे बसून भक्तांच्या सुखदुःखाची त्यांनी काळजी वाहिली. आता ते हयात नाहीत म्हणून उदास होण्याचे काय कारण. सच्चरितकार दिलासा देतात :—

आता काय शिरडींत। समर्थ झाले ब्रह्मीभूत।
ऐसी न शंका यावी मनांत। मरणातीत श्रीसाई।
(सा.स.अ. ४३ ओ. ७४)

शिवाय श्रीबाबांनी सांगितले आहेना —

नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे।

मी नसलो तरी समाधीतून माझी हाडे तुमच्याशी बोलतील असे आश्वासन पण त्यांनी दिले आहे. श्री. बाबांचे बोल खोटे कसे असतील? या बोलावर विश्वास ठेवून त्या पावन क्षेत्राचे दर्शन घ्यावे म्हणून शिरडीला जाण्याचे मी निश्चित केले. ऑफिसातून रजा घेऊन एक दिवस प्रस्थान केले. रात्रीच्या गाडीने निघालो व शिरडीला पहाटेच्या सुमारास पोहोचलो. बस शिरडीजवळ येत असताना पहाटेच्या अंधारात समाधी मंदिराच्या कळसावरील तळपणारा दिवा आकाशातील ताऱ्याप्रमाणे वाटला. नकळत माझे कर जुळले.

बसमधून उतरताच हमालाने सामान उचलून आम्हाला ऑफिसात नेले. त्यावेळी ऑफिस गुरु-पादुकास्थानासमोरील जागेत होते. तेथे नाव, गाव, पत्ता लिहून घेतल्यावर समाधी मंदिराच्या वर मागील बाजूच्या एका खोलीची चावी देऊन हमालाबरोबर जाण्यास सांगितले. समाधी मंदिरातील काकड आरती संपून समाधी स्नानाचा कार्यक्रम चालू होता. सामान खोलीत ठेवून वरूनच तो सोहळा पाहत उभा राहिलो. समाधीवरील गॅलरीच्या कठड्याला त्या वेळी जाळी नव्हती. ती नंतर लावण्यात आली. श्रीसाईबाबांच्या पुतळ्याची

प्रतिष्ठापना पण १९५४ साली झाली. तत्पूर्वी त्याजागी एक सुंदर प्रतिमा होती. जी आता बाबांच्या वापरातील वस्तूंच्या काच घरात ठेवली आहे.

स्नान उरकल्यावर प्रथम समाधी मंदिरात जाऊन श्रीबाबांचे दर्शन घेतले. यावेळी. अभिषेक सोहळा चालू होता. मध्यान आरतीच्या वेळची प्रसन्न शांतता आणि गांभीर्य व अखेरीस भालदार-चोपदारांनी दिलेली ललकारी यांनी मी प्रभावित झालो. मला हा अनुभव नवीनच होता. दुपारचे भोजन संस्थानच्या भोजनगृहात घेऊन थोडी विश्रांती घेतल्यावर खाली उतरलो.

प्रथम द्वारकामाईत गेलो. ही मूळची एक पडकी उपेक्षित मशिद. श्रीबाबांच्या वास्तव्याने तिचे एका पवित्र धर्मस्थानात रूपांतर झाले. 'द्वारकामाई' असे तिचे नामाभिधान झाले.

मोठी कृपाळू ही मशिदमाई। ही भोळ्या भाविकांची ही आई।
एकदा हिचे जो अंकी बैसला। बेडा तयाचा पार पडला।
(सा.स.अ. २२)

असे या द्वारकामाईचे महत्व श्रीबाबांनी वर्णन केले आहे. शिरडी गावचा पुढील अर्धशतकाचा इतिहास इथेच घडला. श्रीबाबांच्या किर्तीचा परिमल देशी-परदेशी येथूनच पसरला. विना प्रचार. ज्या शिलेवर श्रीबाबा बसत ती पावन शिला इथेच आहे. येथील त्या अखंड पेटणाऱ्या धुनीतील उदी कपाळाला लावली आणि पुढे निघालो.

श्रीबाबा एक दिवसाआड ज्या चावडीत झोपत ती द्वारकामाईच्या बाजूलाच आहे. समोर थोड्या पावलावर श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे यांचे घर आहे, श्रीबाबांना याच रोज जेवू घालत. यांनाच श्रीबाबांनी निर्वाण समयी नऊ रुपये दिले. जे त्यांनी तस्वीरीत मढवून ठेवले आहेत. श्रीबाबांना जेवू घालण्याचे भाग्य लाभलेल्या या भाग्यवंत माऊलीच्या चरणांना वंदन करून खाली उतरलो.

रविवार शिरडीचा बाजार. थोड्या अंतरावर श्रीखंडोबाचे देऊळ आहे. मराठवाड्यातील धूप खेड्याच्या श्री. चांदूभाई पाटील यांच्या घरच्या लग्न वऱ्हाडाबरोबर आलेले श्रीबाबांना "आवो साईबाबा" म्हणून हाक मारली. जे नाव श्रीबाबांना कायमचे चिकटले व ते श्रीसाईबाबा म्हणून ते त्रिखंडात अजरामर झाले. परतताना वाटेत लेंडी बागेत जरा फिरलो.

शेवटी गुरूपादुकास्थानात आलो. 'ही जागा माझ्या गुरूचे समाधीस्थान' म्हणून श्रीबाबा सांगत. येथील ज्या निंबवृक्षाखाली श्रीबाबा ध्यानस्त बसत त्या बाजूच्या फांदीची पाने कडू लागत नाहीत. 'या ठिकाणी गुरुवारी व शुक्रवारी उद जाळीत जा. तुमचे कल्याण होईल.' असे श्रीबाबा सांगत.

संध्याकाळच्या आरतीची वेळ झाली म्हणून लगबगीने समाधी मंदिरात आलो. रात्री शेजारती आटोपल्यावर मंदिर बंद होते ते पुन्हा पहाटे "घनशाम सुंदरा" या भूपाळीने उघडते.

गुरुवारचा रात्रीचा पालखीचा सोहळा पाहाण्याची फार इच्छा होती. पण बुधवारी आम्हाला जागा सोडणे भाग होते. त्यावेळी गावात राहण्याची सोय नव्हती व श्री. साठे यांच्या वाड्यातील खोल्या व समाधी मंदिराच्या पुढील खोल्या एवढीच संस्थानतर्फे

निवासाची सोय होती. म्हणून गुरुवारसाठी येणाऱ्या भक्तांकरीता आम्हाला खोली खाली करून देणे भाग होते. गुरुवारचा पालखीचा सोहळा पाहायला मिळणार नाही म्हणून मनाला चुटपूट लागून राहिली होती. मन तळमळत होते. पण इलाज नव्हता.

शेवटचा उपाय म्हणून संस्थानच्या अधिकाऱ्यांना शुक्रवार सकाळपर्यंत वेळ वाढवून देण्याची विनंती केली. पण त्यांनीही आपली असाह्यता प्रगट केली. निराश होऊन जागा खाली करून देण्याच्या तयारीस लागलो. पण थोड्या वेळानी संस्थानच्या शिपायाने ऑफिसमध्ये मला बोलाऊन नेले. एक अर्ज लिहून घेतला व मला शुक्रवार पर्यंत मुदत वाढवून मिळाली. माझ्या मनाची तळमळ जाणून श्रीबाबांनीच हे केले असे मी समजतो. गुरुवारचा रात्रीचा पालखीचा सोहळा पाहाण्याची माझी इच्छा पूर्ण झाली. हा श्रीबाबांचा कृपा-प्रसाद असे मी मानतो. असा हा माझा शिरडीतील पहिला अनुभव!

# साई माऊली

— श्री. पी.के. गीध
शासकीय वसाहत
वांद्रा पूर्व

"अनंत कोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज परब्रह्म श्री सच्चिदानंद सद्‌गुरू साईनाथ महाराज की जय."

"नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य।। नित्य घ्या प्रचित अनुभवें।।
शरण मज आला आणि वाया गेला।। दाखवा दाखवा ऐसा कोणी।।
जो जो मज भजे जैशा जैशा भावे।। तैसा तैसा पावे मीही त्यासी।।

वरील बाबांच्या वचनाचे आम्हाला अनेक अनुभव आले आहेत व अजूनही येत आहेत. त्यापैकी दोन अनुभव खालीलप्रमाणे आहेत. परमेश्वराच्या इच्छेशिवाय काहीच घडत नाही हेच खरे. भगवान श्रीकृष्णानी श्रीमद्‌भगवत् गीतेंत सांगितले आहे की, माझ्या सत्तेशिवाय झाडाचे पानसुद्धा हलत नाही.

त्याचे असे झाले की, नेहमीप्रमाणे डिसेंबर १९८३ च्या शेवटच्या गुरुवारी सहकुटुंब शिर्डीस जाण्याचा आमचा बेत होता. यावेळी आमच्याबरोबर डोंबिवली येथील आमचे नातेवाईकही येणार होते. म्हणून मुंबई सेंट्रलहून एस्.टी. ने न जाता डोंबिवलीहून आम्ही एस्.टी. ने शिर्डीला जाणार होतो. दिवस भराभर जात होते. डिसेंबर महिन्यातला शेवटचा

बुधवार उजाडला. आम्ही सर्व आनंदात होतो. परंतु बुधवारी ऑफिसला जाणे भाग होते. कारण शिर्डीला जाण्यासाठी मी गुरुवार ते शनिवार अशी तीन दिवस रजा घेतली होती. मुंबईच्या धावपळीच्या जीवनाची आपणास कल्पना आहेच. सकाळी ऑफिसला जाताना फारच घाई होते. बुधवारी सकाळी मी स्टोव्हवर गरम पाणी घेऊन स्नानगृहाकडे जात असताना माझ्या हातातील गरम पाण्याचे भांडे निसटले व भांड्यातील गरम पाणी माझ्या मांडीवर सांडले. मांडी खूपच भाजली व दाह होऊ लागला.

तशा स्थितीत मी कशीतरी आंघोळ केली व नैमित्तिक पूजा करून मांडीला परमपूज्य साईबाबांची संजीवनी उदी लावली. त्याशिवाय दुसरे कोणतेही औषध न लावता मी ऑफिसला गेलो. त्याच दिवशी दुपारी माझी पत्नी व मुले डोंबिवलीला गेली. ऑफिस सुटल्यावर संध्याकाळी मीही डोंबिवलीला गेलो. माझ्या मांडीला फोड आले. अंगात ताप झाला. उद्यापर्यंत मी नक्कीच आजारी पडणार अशी मला भिती वाटू लागली. पायाने धड चालताही येत नव्हते. काही सुचत नव्हते. उद्या तर आम्हाला शिर्डीला जावयाचे होते. मनात विचार आला की, अशा परिस्थितीत शिर्डीला जाणे रद्द झाले तर सर्वांचे आनंदावर विरजण पडेल. त्या रात्री झोपण्यापूर्वी मी बाबांची मनोमन प्रार्थना केली की, बाबा मला उद्या बरे वाटू द्या व आम्हा सर्वांना तुम्ही शिर्डीला घेवून जा. तसे झाले तर या अनुभवाचा लेख मी श्री साईलीला मासिकात देईन. खरोखरच एका रात्रीत मला फारच बरे वाटले. बाबा माझ्या नवसाला पावले. सकाळी माझी तब्येत एकदम ठणठणीत झाली. सर्वांना आनंद झाला. कारण ठरल्याप्रमाणे आम्हाला शिर्डीला जाता येणार होते.

गुरुवारी सकाळी आम्ही डोंबिवलीहून निघालो तो संध्याकाळी ५ वाजता शिर्डी मुक्कामी सुखरुप पोहोचलो. शिर्डीला गेल्यानंतर मुंबईला परत येण्यासाठी एस्.टी. चे रिझर्व्हेशन केले व राहण्यासाठी संस्थानची जागाही मिळाली.

गुरूस्थान, समाधी मंदिर, द्वारकामाई, लेंडीबाग, चावडी याठिकाणी दर्शनाला जाणे व समाधी मंदिरातील आरत्यांना हजर राहणे व संस्थानच्या भोजनगृहात जेवण घेणे असा आमचा कार्यक्रम शुक्रवार संध्याकाळपर्यंत व्यवस्थित चालू होता. दिवस आनंदात जात होते. परंतु अदयाप माझी कसोटी संपली नव्हती. शुक्रवारी संध्याकाळचे जेवण न घेता काहीतरी लाईट घ्यावे म्हणून त्या रात्री आम्ही वडा-पाव व भजी खाल्ली. दुर्दैवाने भजी व पाव आम्हाला शिळे मिळाले. त्यामुळे रात्री मला त्रास झाला. पोट दुखू लागले व चढले, श्वासोच्छ्वासास त्रास होऊ लागला. ढेकरही येत नव्हती. अस्वस्थपणा वाटू लागला. झोप येत नव्हती किंवा चैनही पडत नव्हती. बरोबरची सर्व माणसे झोपी गेली जसजशी रात्र होत गेली तसतसा त्रास वाढू लागला. मी खोलीच्या बाहेर व पुन्हा खोलीत अशा येरझारा मारू लागलो. रात्रीच्या वेळी औषध कोठे मिळणार. रस्त्यावरही सामसूम होती. माझ्याकडे एकच औषध होते. ते म्हणजे बाबांची उदी. ती मी पाण्यातून घेत होतो व पोटाला लावत होतो. तसेच बाबांचे नामस्मरणही करत होतो. त्रास वाढत होता इतका की माझा माझ्यावरचा विश्वास डळमळीत होऊ लागला. आता

आपला शेवट जवळ आला आहे असे मला वाटू लागले. मनात विचार येत होते की, रात्रीच माझे काही बरे-वाईट झाले तर माझ्याबरोबर आणलेल्या दहा माणसांचे काय होईल? श्री समर्थ साईबाबांचे नामस्मरण मी चालूच ठेवले. बाबा भक्तांचा अंत पाहतात परंतु त्याचा ते अंत करीत नाहीत याचा मला यावेळी अनुभव आला. पहाटे मला डुलकी लागली व थोडेसे बरे वाटू लागले. सकाळी मी उठलो प्रथम थोडा गरम चहा घेतला व माझ्या कुटुंबियांसह बाहेर पडलो. तो दिवस शनिवारचा होता. आमचे एस्.टी. चे रिझर्व्हेशन या दिवसाचे सकाळच्या सातच्या गाडीचे होते. परंतु सकाळच्या सातच्या एस्.टी. ने जाणे मला शक्य नसल्याने आम्ही ते रिझर्व्हेशन रद्द करून दुपारच्या दोनच्या एस्.टी. चे रिझर्व्हेशन केले. गावात थोडी खरेदी केली. तोपर्यंत दुपारच्या आरतीची वेळ झाली म्हणून मी माझी मुलगी व भाची आरतीला गेलो. आरती संपल्यानंतर समाधी मंदिरातून बाहेर पडत असताना आमचे साईभक्त मित्र श्री. गाळवणकर (पार्ले) हे आम्हाला भेटले. त्यांनी आम्हा तिघांना साईभक्त श्रीमती आम्माकडे जेवावयास नेले. जेवणात अनेक उत्तम पदार्थ होते. परंतु मी मात्र फक्त दही भातच जेवलो. देवाचा प्रसाद व दहीभात खाल्ल्यामुळे मला बरीच हुशारी वाटली. वास्तविक कालच्या अजीर्णावर मला दही भाताचीच आवश्यकता होती. हे सर्वज्ञ साईबाबांना अगोदरच माहित होते. म्हणून त्यांनी माझी सोय श्रीमती आम्माकडे केली. हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. कारण श्री. गाळवणकर हे आम्हाला अचानक भेटले. त्यांनी आम्हाला कधीही न पाहिलेल्या आम्माकडे जेवावयास नेले. तेथे मला हवा असणारा नेमका दही भातच मिळाला. आपल्या भक्ताची बाबा कशी काळजी वाहतात त्याचे हे एक उदाहरण आहे, अशा रीतीने माझ्यावर आलेले दुसरे संकटही श्रीबाबांच्या कृपाशिर्वादाने निवारण झाले. आम्ही आम्माकडून जेवून निघालो तोपर्यंत आमच्या गाडीची सुटण्याची वेळ झाली होती. म्हणून आम्ही आमचे खोलीवरचे सामान घेवून एस्.टी. स्टँडवर आलो. तितक्यात मुंबईला जाणारी गाडी लागली. रिझर्व्हेशन असल्यामुळे आम्हाला बसावयास जागा मिळाली व थोड्याच वेळात गाडी सुरू झाली. आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. त्या रात्री ११ वाजता आम्ही वांद्रे मुक्कामी श्रीसाई समर्थांच्या आशीर्वादाने सुखरूप पोहचलो.

असे आहेत आपले भक्तवत्सल भक्ताभिमानी

शिर्डी निवासी श्री समर्थ साईबाबा. त्यांना पुनश्च कोटी कोटी साष्टांग नमस्कार.

अशा या भक्तवत्सल साईमाऊली जवळ मी काय मागणार हेचि दान देगा वरदान! तुझा विसर न व्हावा!

# साईकृपेचा वर्षाव

**कु. तेजस्विनी दामोदर तारळेकर**
''कृष्ण-कुंज' घ.नं. १७०९, 'ई' वार्ड
राजारामपुरी ७ वी गल्ली
कोल्हापूर-४१६ ००१

साईबाबांचा कृपावर्षाव सर्व भूमात्रांवर अखंड होत असतो. फक्त साईभक्तांवरच नाही, केवळ मनुष्यमात्रावरच नाही; तर साईभक्त नसणाऱ्यांवरही आणि मानवेतर प्राण्यांवरही कृपावर्षाव होतो. साईबाबा न मानणारे व (त्यांच्या मते) दुसऱ्या देवतांची, संतांची भक्ति करणारे हे त्या त्या रूपात बाबांनाच भजतात व त्यांची कृपा मिळवितात. कारण सर्वत्र सर्व देवदेवतांच्या संतमहंताच्या रूपात बाबाच भरून राहिले आहेत. पूर्वसुकृताच्या योगे या जन्मी अनेक मानवेतर प्राण्यांनीही बाबांची कृपा मिळविली आहे. असे आपण साईसच्चरितात वाचतोच!

आपल्या प्रारब्धाने आपल्या प्रापंचिक आणि पारमार्थिक वाटचालीत काही अडीअडचणी येतात. त्यावेळी आपण अनन्यभावाने बाबांची करूणा भाकली तर बाबा त्या अडचणी दूर करून आपला मार्ग निष्कंटक करतात आणि त्या मार्गावर आपली वाटचाल वेगाने व सुखाने होत राहते.

परमार्थप्राप्ति (बाबांचा अखंड सहवास) करण्याच्या प्रयत्नात प्रारब्धाने जेव्हा अडचणी उभ्या राहतात तेव्हा ते प्रारब्ध (न टळणारे असे मानले जाते) बाबा भक्तांच्या प्रेमाखातर सहज दूर करतात. त्यानंतर बाबांचे प्रत्यक्ष दर्शन, आवाज, स्पर्श असे अनुभव प्राप्त होतात. ही प्रत्यक्ष अनुभूति मी घेतली आहे.

याचप्रमाणे प्रपंचातील अडचणीवर बाबांच्या कृपेने मात करता येते. याची उदाहरणे तर हरगडी अनुभवण्यास मिळतात. तूर्त त्यातील दोन उदाहरणे साईभक्तांसमोर ठेवत आहे.

माझा भाऊ पोलीस प्रॉसिक्युटर म्हणून सांगली जिल्ह्यात काम करतो आहे. काही वर्षापूर्वी त्याची बदली सांगलीहून रत्नागिरी जिल्ह्यात खेड-दापोली येथे झाली. घरी हा एकटाच पुरुष, तोही इतक्या लांब जाणार म्हणून आम्ही खूप काळजीत होतो. त्याच्याबरोबर आम्हा सर्वांना इथे घर सोडून जाणे शक्य नव्हते. लहानपणापासून आम्ही सर्व कुटुंबीय कधीही एकमेकांना सोडून राहिलो नाही. याशिवाय दुसरी अडचण म्हणजे आम्ही सर्व शाकाहारी असल्याने तिकडे कोकणात भावाच्या जेवणाचा प्रश्नही कठीण होता.

जेव्हा काहीच सुचेनासे होते, तेव्हा बाबांशिवाय कुणाकडे मागणार? बाबाही जणू भक्तांच्या हाकेची वाटच पाहत असतात. बाबा आमच्या हाकेला धावून आले. आणि एका महिन्यात त्याची बदली पुन्हा सांगलीला झाली.

एकदा माझी दुसऱ्या क्रमांकाची भाची चि. देवयानी ही दोन वर्षाची असताना अचानक आजारी पडली. तिच्या अंगावर पुरळ उठले. सारखी आग होऊ लागली.

कधीही न रडणारी, ती सारखी रडू लागली. त्यातच तिला ताप आला आणि जुलाब सुरू झाले. दिवसातून खूपवेळा तिला जुलाब झाल्याने ती पार थकून निपचित पडून राहिली. तिला रडण्याचीही शक्ति उरली नाही. डॉक्टरी उपाय सुरूच होते. पण काहीही कमी नव्हते. शेवटी डॉक्टरांनी सांगितले, 'आता जर हिचे जुलाब कमी झाले नाही तर बालरोग तज्ञाकडे दवाखान्यात ठेवावे लागेल. आमचे तर हातपाय गळून गेले.

आम्ही बाबांचा धावा केला. आणि कधीही अपवाद न करता धावून येणारे बाबा आमच्या हाकेला धावले. रात्रभर तिला शांत झोप लागली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ती ठणठणीत बरी झाली.

अशी ही साईकृपा अगाध आहे. या कृपेचा वर्षाव आम्हा सर्वांवर असाच अखंड होत राहो ही बाबा चरणी प्रार्थना. त्यांच्या चरणी माझे सर्वांसह कोटी कोटी प्रणाम!

''श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय!'

# साई ऋण मुक्त आम्ही होऊ का?

**— श्री. मधुकर अंबाडे**
अंबाडे हाऊस, लकडी पुलासमोर
बडोदा

एक प्रश्नार्थक शीर्षक! एक असा प्रश्न की ज्याचं उत्तर शोधता, शोधता, कदाचित एखादा सामान्य भक्तही अंतरमूख होऊन, त्यालाही जागृती प्राप्त व्हावी! जन्माचं सार्थक व्हावं, जीवन उजळून निघावं, उत्तर शोधण्यानं! बाबा! तुझी भक्ती म्हणजे शांतीच्या संपत्तीचा अक्षय ठेवा! बाबा! तुमच्यासारखे महानसंत ईश्वरी अवतार ह्या भूमिवर जर प्रगटले नसते, तर आज नास्तिकतेचं, स्वच्छंदीपणाचं काहूर माजलं असतं. कदाचित मानव धर्मच नष्ट झाला असता. किंबहुना श्रद्धा म्हणजे काय, हेच आम्हाला समजलं नसतं. हे कृपावंत साई! दयावंत साई! तुझ्या कृपेला ना अंत, ना पार! परमार्थ कर्णाचा तू अवतार! निराधाराचा तू एकमेव आधार! हे बाबा! रामकृष्ण तू! येशुख्रिस्त तू! गुरुनानक तू! पैगंबर तू! अग्नीदेव तू/ वरुणदेव तू! सूर्यदेवही तू! मातापिता तू! भक्तांकित साई तू! वर्णनातीत साई तू! कलीकाळी लीलाधारी, गिरिधर गोपाल तू! सर्वत्र तूचि तू!

''भाव तेथे देव'' ''देव भावाचा भुकेला'' ''जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव'' ह्या सर्व उक्तिंची प्रचिती आणून देणाऱ्या साई! श्रद्धा-सबुरीचा अनमोल मंत्रदोर विनासायास भक्तांच्या हाती देणाऱ्या साईनाथा! प्रत्यक्ष आपल्या चर्मचक्षुने आजही तुला देहस्वरुपात पहाणारे शिक्षित आणि दीक्षित भक्त, आजच्या युगात अनेक असताना; आणि श्रद्धा आस्था अंतरी असलेल्या कुणाही भक्ताला तसा अनुभव करून देण्यास तू

समर्थ असताना, आजच्या विज्ञान युगातील मानवाने देखील का साशंक रहावं? भक्ताचा केवळ प्रेमभाव पाहून त्याचा अंकित होणारा कृपावंत, दयावंत महासंत साई! विवेक रूपानं सर्व हृदयस्थ व्यक्त असणाऱ्या हे साई देवा! आम्हाला श्रद्धेची ओळख करून देणाऱ्या माझ्या साईराया! तुला अनंत कोटी दंडवत!

योग्य काळी, उचित समयी म्हणजे धर्मग्लानी संभवित असताना इ.स. १८५४ साली एका निम्बवृक्षातली, तेजस्वी अशा बाल योग्याच्या रूपात तू प्रगटलास. असंख्य जीवांना मोक्ष-दान दिलंस. कृष्णरूपात अर्जुनाला दिलेलं वचन तू पाळलंस!

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानम धर्मस्य तदाऽऽत्मानं सृजान्यहम्॥

[ज्या ज्या वेळी धर्माचा ऱ्हास होतो आणि अधर्म माजतो, त्या त्या वेळी मी स्वतः जन्म (अवतार) घेतो.]

हे साई! धर्म रक्षणार्थ तू भूतली अवतरलास. श्रीकृष्णानं रथात बसून गीता सांगितली आणि तू एका सामान्य शिलेवर बसून सनातन धर्माचं महान तत्वज्ञान सहज भावे सोप्या शब्दात सांगितलंस.

"ईश्वर एकच आहे, सर्वांवर प्रेम करा, सर्व प्राणीमात्रांवर दया करा, आपला धर्म सोडू नका, पण परधर्माची निंदाही करू नका. द्रव्य लोभार्थ कुणाचंही वाईट करू नका. ऋण करून सण साजरा करू नका. कुणाचीही मेहनत फुकट घेऊ नका. संतोषातच सुख आहे. लहान मुलं ही देवाच्या दारातील फुलं आहेत. त्यांना जास्तीत जास्त प्रेम द्या. दीन दुःखीतांना उपेक्षू नका. धर्मांध होऊन भांडू नका. सूडवृत्ती ठेवू नका. जशी कृती तसा जन्म माणसास घ्यावा लागतो. भोग हे जन्मोजन्मी भोगावेच लागतात. श्रद्धा सबुरी सोडू नका. कुणालाही दुखवू नका. कुणाचंही कटु वचन सहन करा पण वाईट बोलू नका. मी माझ्या भक्तांसाठी सातासमुद्रापार असलो तरी धावून येईन. विश्वास ठेवा. माझे वाक्य प्रमाण माना मी नित्य जीवंत आहे. ह्याची नित्य प्रचिती अनुभववानं घेऊन पहा. माझ्या भक्तांना मी अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची हमी देतो. ह्या पेक्षा अधिक एका फकीराकडून तुम्हाला काय हवं?"

दिव्य आणि अद्‌भूत साई चमत्काराद्वारे आजही अखंड साईज्ञानगंगा वहात आहे! हे साई! अनेक भक्तांचे अनेक रोग, असाध्य रोग, प्राणघातक रोग! तीव्र वेदना देणाऱ्या दुर्धर व्याधी तू स्वतः अंगीकारून भक्तांना जीवनमुक्त केलंस, रोगमुक्त केलंस, भोगमुक्त केलंस. शत्रुत्व ठेवणाऱ्याशीही शत्रुत्व न ठेवणं, हे आपल्या वर्तनानं तू आम्हाला शिकवलंस. मानव कल्याणार्थ आपलं उभं आयुष्य खर्ची घातलंस. तुझा एक महान भक्त तात्या कोते! त्याची महान आई, बायजाबाई! त्या आईला दिलेल्या वचनाला तू जागलास. तात्याला जीवदान दिलंस, आणि तू मृत्यू स्वीकारलास! प्राण जातील पण वचन जाणार नाही, ही रघुकुलातील परंपरा टिकवलीस हे साई! तू काय म्हणून नाही केलंस? आणि आजही काय नाही करीत? उदी रूपात संजीवनीच तू आज आमच्या

हाती दिलीस. भाविक भक्तांसाठी आजही प्रत्यक्षात प्रगटणारा तू! परमेश्वर! परमात्मा! अल्लाह! मालिक!! सर्वांवर मातृवत प्रेम करणारा तू! हे साई! केवळ आपल्या छबी दर्शनानं आजही भक्तांना ध्यानभोगाचा अनमोल, अनुपम आनंद प्रदान करणारा तू! दूर राहून केवळ दृष्टीक्षेपानं कासवीच्या पिलांप्रमाणे आमचं पालन पोषण करणारा तू! वेळोवेळी आर्त हाकेला धावून येणारा तू! मानवाला पश्चातापाच्या पवित्र गंगेत न्हाऊ घालणारा तू! आम्ही शरण तुला भगवंता!!

करुणाळू! कृपाळू! दयाळू साई! आमच्या अज्ञानत्वावर दयाद्र होऊन, तू आपल्या अलौकिक शक्तीने अव्यक्तातून व्यक्त होऊन, आपल्या प्रचंड योग शक्तीच्या सामर्थ्यानं मानवासाठी, प्राणीमात्रांसाठी ह्या भूमिवर मानवरूप धारण केलंस. आपल्या दिव्य आणि अलौकिक चमत्काराद्वारे मानव-मनी श्रद्धेचं बीज पेरलंस. आम्हाला सद्मार्गावर प्रत्यक्ष हाताला धरून तू आणलंस. एक महान पथ प्रदर्शक होऊन विवेक रूपानं आमच्यातच विद्यमान| राहिलास. आम्हाला सर्वस्व अर्पण करूनही तू परम दानी, नामानिराळा राहिलास. तूच दिलेल्या आमच्यातील अद्भूत शक्तींना आम्ही जर नाही ओळखलं, तर ह्यात दोष कोणाचा? तुझा हात सोडून देऊन, तुझ्यापासून विमूख होऊन, मायेच्या अंधकारात आम्ही भटकत राहिलो, तर त्यात दोष कोणाचा? अज्ञानाचा, संदेहाच्या अंधकारात एखाद्या शिळेवर आम्हीच आमचं मस्तक आपटून घेण्यासारखी स्थिती आम्ही आमची करून घेतली तर ह्यात दोष कोणाचा?

वरुण देवाला आदेश देऊन पर्जन्य थांबविला होता ह्या साईनं! तंत्रमंत्रावाचून अग्नी प्रगटवला होता ह्या साईनं! मशिदीतील अग्नीज्वाला शांत केल्या होत्या ह्याच साईनं! गणाधीशाचा गणाधीश तू! योगेश्वर दत्तराज तू! कैलासपती महादेव तू! योगीयांचा योगीराज तू! ब्रह्मदेव तू! आद्यशक्ती गायत्री तू! ब्रह्मा-विष्णू-महेश्वर तू! शिवशंकर तू! पंढरपूरचा विठ्ठल तू! द्वारकाधीश तू!! मर्यादा पुरुषोत्तम रामही तू!!!

संत चुडामणी तूच! संतांचा संतही तूच! हदयातील भगवंतही तूच! आधाराचा आधारही तूच! देवाचा देवही तूच! हे देवाधिदेवा, साई देवा! अनंत कोटी ब्रह्माण्डनायका! साई सर्वेश्वरा! सर्वात्मका! राजाधिराज, साई महाराज! सर्वांचा सनातन सारथी! परब्रह्म! परम् गुरू! सद्गुरू! तुझा त्रिवार जय जयकार! साई त्रिवार जय जयकार!! बाबा! त्रिवार जय जयकार!!!

वर्णनातीत, शब्दातीत असलेल्या साईचं वर्णन आम्ही मानव काय करू शकणार? कर्ता करविता तू साई! शेवटी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्मरण झाल्यावाचून रहात नाही — "बोलविता धनी वेगळाची"

भूतलावरील हिंडल्या फिरल्या प्रत्यक्ष देहधारी ह्या साई देवाची एकदा का मनाल ओळख पटली की मग आपोआप नाद सूरात हृदयमंदिरी शब्द घुमू लागतात ते असे —

गगनात तारका, शिरडीत द्वारका
साईबाबांसारखा, देव नाही देव नाही

प्राणीमात्रांवरील तुझ्या अनंत कृपेमुळे आम्ही तुझे फार फार ऋणी आहोत. हे साई! दीन दुबळा पराधीन मानव केवळ तुझ्या अमोघ अशा कृपाछत्राखालीच स्वाधीन आणि चिन्मय राहू शकतो. आम्ही मानव तुझे अनंत ऋणी आहोत; परंतु फक्त एकाच गोष्टीमुळे आम्ही ऋणमुक्त होऊ शकतो, जर आम्ही आस्थेपूर्वक, श्रद्धा-विश्वासपूर्वक ह्या मायावी जगात मायावी न बनता, प्रमादवश न होता, अहंकार रहित होऊन, संयमशील होऊन, सहनशील होऊन, सात्विक होऊन, सदाकाळ तुझेच होऊन राहिलो तर! सातत्यानं तुझ्या नवविधा भक्तीत आत्मीयतेने दंग राहिलो तर! बाबा! तुझ्याच दिलेल्या शक्तीने आम्ही ऋणमुक्त होऊ शकतो खरे, पण तुझ्याच कृपेने! हे साई!! तुझ्याच कृपेने!!!

# साई चुकवा जन्म-मरण फेरा

साई चुकवा जन्म-मरण फेरा,
पुन्हा नको हा संसार पसारा ।। ध्रु. ।।
साई- श्रध्देने राहा जीवनात,
साई- नामाने व्हा पुण्यवंत,
सारे विश्व शेवटी नाशवंत,
तरीही निष्काम कर्म न विसरा ।। १ ।।
प्रयत्न करीता प्रचीती येते,
जीवा-शिवाचे नाते जुळते,
सारे जग गुरूमय भासते,
परमात्म्याची अंती आस धरा ।। २ ।।
षड्रिपु गळतील आपोआप,
मन होईल दान्त नि शांत,
साईच भरला चराचरात,
अनुभवावर या विश्वास करा ।। ३ ।।

— **सौ. संगीता दिलीप गोडबोले**
(एम्.ए.,बी.एड्)
'परिमल' प्लॉट नंबर ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, पुणे ४११ ०४४.

# एक शोध — साईरामाचा!

— श्री. चकोर आजगांवकर
(उपसचिव, अर्थखाते, महाराष्ट्र)
वाय् ११/१७० सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

- कबीरानी म्हटले आहे की "हे वेड्या भक्ता! तुझा राम जर मूर्तीत रहातो आहे तर मग विश्वात कोण बरे नांदतो आहे? तुझा अल्ला जर मशिदीत रहात असेल तर बाहेर सर्वत्र कोण बरे ओतप्रोत भरलेला आहे?"

- खरा राम व रहीम हे एकदेशीय नाहीत. तो रामरहीम विश्वात्मक आहे. त्याला शोधायचे असेल तर तुमच्या हृदयात शोधा, तुमच्या श्वासांत धुंडा! त्या साईरामाची धुनी तुमच्या अंतरात जळते आहे. त्या साईकृष्णाची द्वारकामाई ही तुमच्याा प्राणाप्राणात भरलेली आहे. प्रत्येक नरनारी हे त्या साईचेच स्वरूप आहे.

- कबीर आणि साईबाबा हे एकाच तत्वाचे दोन अवतार आहेत. दोघांच्या जन्मकथात व शिकवणुकीत साम्य आहेत. जात धर्म पंथातील सान्या बंधनापलिकडील देव त्यांनी पाहिला. करूणेत आणि मानवसेनेत त्यांनी भगवतसेवा पाहिली.

- भगवंताचे कबीरानी पाहिलेले रूप पुढील पंक्तीत प्रतिबिंबित झाले आहे. देव भक्ताला सांगतो. आहे :—

**"वणवण मज का धुंडित फिरशी? मी तर हृदयनिवासी।
मशिद मंदिरी मी नच वसतो, ना काबा कैलासी---
बसे न दुर्घट गिरिशिखरावर, व्यापी न प्रस्तराशी
दरिखोऱ्यामधी वाट न चुकलो, बद्ध न जडदेहासी।
न उत्सवी मी, नच व्रतकर्मी, ना मुंडणि संन्यासी---
नगरशिवेच्या पैल वसे मी, विजनाच्या छायेशी।
रामरसी समरसलो आहे, त्रिकुटपीठ शिखराशी
शोध मला मी, खेळत बसलो तुझ्याच श्वासोच्छवासी।
गगनोपम मी शून्य महाली, उन्मन महदाकाशी
मी तर "सोहं" भाव दिव्यतर अजपाजम अविनाशी।"**

- माझा शोध श्वासात अखंड चाललेल्या अजपाजपात घ्यावयास प्रत्यक्ष श्री साईराम सांगताहेत!

# "साईइच्छा बलियेसी"

— आशिष हजारे
बोरिवली, मुंबई-४०० ०६६.

गेल्या जुलै महिन्यातली गोष्ट! बाबांच्या कृपेने माझ्या प्रयत्नाला यश आले आणि चांगल्या मार्कांनी मी माझी बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालो. भाईंची साईप्रसाद गुरूपौर्णिमा विशेषांक शिरडीला साईचरणी प्रकाशित करण्याची मनोकामना १ ते ३ जुलै दरम्यान बाबांनी पुरविली तशीच मला माझ्या इच्छेप्रमाणे पुढील शिक्षणासाठी हव्या त्या शाखेत व मुंबईतील कॉलेजातच प्रवेश मिळण्याची माझी इच्छाही बाबांनी पुरविली तो दिवस होता गुरूवार दिनांक ११.७.८५ फी वगैरे भरून येताना भाई म्हणाले,

"आशू तुला बाबांनी ॲडमिशन दिली आता एखाद्या शनिवारी-रविवारी आपण दोघे शिरडीला जाऊन येऊ या नंतर कधीतरी" ह्यावर मला नकळत मी चटकन उत्तरलो. "भाई, नंतर कशाला, उद्या रात्रीच निघू या "अरे, आत्ताच मी जाऊन आलो..." पण त्यांना बोलू न देता मी हट्ट केला तेव्हा साहजिक ते तयार झाले. आमच्या बरोबर आमचे देशपांडे भावोजी (भाईंच्या सविताताईचे यजमान व आण्णा प्रधानांचे जावई) येण्यास तयार झाले मम्मीची परवानगी घेऊन आमची तिघांची स्वारी शुक्रवारी रात्री रेल्वेने मनमाडला तेथून एस.टी.ने शनिवारी १३.७.८५ रोजी पहाटे शिरडी क्षेत्री पोहचली. अभ्यंगस्नान काकडारती उरकून अभिषेक साईसत्यनारायणाच्या पूजेच्या तिकीटस्‌ही काढल्या. छानपैकी साईबाबांचे दर्शन झाले. मनासारखा अभिषेक झाला. 'आशू, आल्यासारखे तू साईसत्यनारायणाची पूजा करून घे, असे म्हणून माझे एकट्याचेच पूजेचे तिकीट भाईंनी काढले होते. पूजेची वेळ होती एक वाजताची अभिषेक वगैरे उरकेपर्यंत मध्यान्ह झाली. मध्यान्हारती झाल्यावर 'भोजनगृहातील साईप्रसाद' संपेल म्हणून तेथे जाऊन जेवण घेतले. व साधारण पाऊणच्या सुमारास परतलो. वाटेत पूजेची पावती शोधली तो ती माझ्याकडे नव्हती की भाईंकडे वा भावोजींकडेही नव्हती. मग रूमवर जाऊन सर्व कपडे बॅगा तपासल्या पावती हरवली होती. मी खूपच निराश झालो. "बाबांची इच्छा नसावी माझ्या हातून साईसत्यनारायणाची पूजा व्हावी अशी" पण भाईंनी मला धीर दिला, व म्हणाले "आपण पूजेच्या तेथे जाऊन बघूया.. साईइच्छा बलियेसी... मी मराठे भटजींना सांगून बघतो." जवळ पावती नसताना तेथे जाणे मला पटले नाही. पण भाई-भावोजींचा आग्रह! समाधीमंदिराच्या वर मला घेऊन भाई गेले ते ओरडतच.... "अहो मराठे, माझ्या मुलाला पूजेसाठी आणले पण त्याची पावतीच हरवली हो कुठे.. नंबर साधारण ६९-७० च्या दरम्यान असावा..." ते ऐकून मराठेनी "अहो या या हजारे.. तुमचीच वाट पहातोय मी... आत्ताच जरावेळापूर्वी कुणीतरी येऊन ही पहा पावती दिलीय" असे म्हणत हातातली पावती दाखवली. आश्चर्य म्हणजे तिचा नंबर ७० होता. मी पाणावलेल्या डोळ्यांनी भाईंकडे बघितलं. त्यांनी माझ्या पाठीवर थोपटले. मराठे भटजींना धन्यवाद देऊन आम्ही साईसमोर नतमस्तक झालो. मला मात्र पूजा करतानाही त्यांचे शब्द आठवत होते. "साईइच्छा बलियेसी"

# वेताळास मुक्ती मिळाली

— सौ. निर्मला चं. मालवणकर
साई-स्मृति, दादर.

संतांच्या सहवासात फार दिवस राहिल्याने व त्यांचे वागणे आपल्या आचरणात आणल्याने काही काळाने शिष्यांस पण कळत न कळत सिद्धी प्राप्त होते. समर्थ रामदासांचे शिष्य कल्याण स्वामीत तंतोतंत समर्थांचीच योग्यता उतरली होती.

संत हे आपल्या शिष्यांची योग्यता पाहातात व तात्काळ आपल्या सारखे करतात.

संत शिरोमणी साईबाबा ह्यांच्याकडे पण बरेच अंतःकरणापासून श्रद्धा ठेवणारे भक्तगण होते. त्यांनी मुळात "श्रद्धा व सबुरी" हाच तर मंत्र सर्वांना दिला होता.

बाबांचे काही चमत्कार ज्ञात व काही अज्ञात आहेत. त्यांच्या वेळच्या भक्तांकडून जेव्हा आपणास एकादी गोष्ट त्यांच्या चमत्काराविषयी कळते. तेव्हा आपणास एक खरा खरा आनंद होतो व हा आनंद आपल्यासारख्या साईभक्तांस कळावा अशी एक अंतःकरणात ओढ उत्पन्न होते. व म्हणूनच मी त्यांच्या वेळच्या श्री भाऊसाहेब तर्खडांचा अनुभव लिहित आहे.

शिर्डीत पूर्वी बरेच जंगल होते. बाबांच्या लेंडी बागेत घनदाट झाडी होती. ते स्नानास जावयाचे तेथे पण फार झाडी होती म्हणूनच ते योग सामर्थ्याने जांभळीच्या झाडावर आपल्या आतड्या धुवून वाळत घालत असत.

प्रातःर्विधीस ओढ्याच्या काठी लांब रानात त्यावेळेस जात असत.

एकदा भाऊ असेच भल्या पहाटे गेले असताना, एक भला मोठा नाग त्यांच्याकडे येताना पाहिला त्यांनी धीराने डोळेबंद करून "बाबा बाबा" म्हणावयास सुरुवात केली. हळूच थोडे डोळे उघडे करून पाहिले तर तो तोंड फिरवून निघून जाताना दिसला. इतक्यात एक मोठा आक्राळ विक्राळ कोंबडा त्यांच्या अंगावर धावत येताना दिसला. त्यांनी परत डोळे बंद करून बाबांचे स्मरण केले. दोन मिनिटाने डोळे उघडून पाहतात तर ९-१० वर्षाचा मुलगा त्यांना म्हणत होता ही माझी जागा आहे, तू येथून जा. ते काही भितीने जागेवरून हलूच शकले नव्हते. तसा तो मुलगा मोठा मोठा होऊ लागला, तेव्हा ते मटकन् खालीच बसले व जमीनीवरची माती घेऊन बाबा ही तुमची उदी असे म्हणून ती माती त्याच्या अंगावर टाकली. त्या बरोबर धूर होऊन तो आकाशात उडू लागला. भाऊ गर्भगळीत होऊन धावत द्वारकामाईत आले.

ते येण्यापूर्वी बाबा द्वारकामाईत फार आनंदात होते व आपल्या भक्तांना म्हणत होते आज भाऊने वेताळाला मुक्ति दिली. पण लोकांना त्याचा काही अर्थ कळला नव्हता

येवढ्यात भाऊ आले. त्यांनी बाबांच्या पायावर साष्टांग लोळण घातली त्यांचे सर्व अंग पाण्याने ओलेचिंब झाले होते. सर्व भक्तांच्या समोर झालेला हा प्रकार त्यांनी सांगितला तेव्हा बाबा म्हणाले "अरे भाऊ त्या ओढ्याकाठच्या वेताळाला मुक्ति दिली तो स्वर्गात गेला."

तेव्हा भक्तांना मघाच्या बोलण्याचा अर्थ कळला. संत आपल्या भक्तांकडून काय

काय कार्य करून घेतात हे भक्तांना प्रथम कळत नाही, व जेव्हा कळते तेव्हा त्यांचा आनंद द्विगुणीत होतो, व ते बाबांच्या चरणी भक्तीभावाने लीन होतात.

"श्री सत्च्चिदानंद सद्गुरू साईबाबा की जय"

★★★★★★★★★★

# — समाधीस ज्याचे लागतील पाय —

— श्री. विजय यशवंत सहामते
"साईनिवास" मु.पो. चिंचणी
तालुका-डहाणू, जिल्हा-ठाणे.

भारत भूमी ही साधु संताची भूमी, संतांच्या पावन पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत कितीतरी संत समाधीस्त झाले आहेत. त्यांची चिरकाल आठवण रहावी. त्यांच्या वचनांची स्मृती कायम रहावी व जेणे करून त्यांच्या उपदेशाने प्रत्येकांनी आपले जीवन सुखी करून घ्यावे ह्या साठीच त्यांच्या समाधीची आज आवश्यकता आहे.

समाधी म्हणजेच मांगल्याचे प्रतीक एखाद्या संताची समाधी अथवा देवतेची मूर्ती पाहिल्यानंतर आपोआपच दोन्ही कर जुळले जातात. मनातील विचारांचे वादळ क्षणिक का होईना क्षमते व आपण त्या समाधीशी अथवा मूर्तीशी एकरूप होतो. आपल्यातील मीपणा, अहंपणा विरघळतो, द्वैत, अद्वैत नाहिसे होते.

ज्ञानेश्वर महाराजांनी जिवंत समाधी घेतली जिवंत समाधी घेणे हे काही सामान्य माणसाचे काम नाही. संतानी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. गुणांना जिंकलेले असते. ते परमेश्वराशी एकरूप झालेले असतात. परमेश्वर चिंतनात ते विलीन होतात आणि परमेश्वर स्थानापर्यंत पोहोचतात. धन्य ते संत— तेव्हाच आपण त्यांच्या समाधीची पूजा करतो. त्यांना परमेश्वर मानतो. सामान्यातून असामान्य होणे ह्याला सुद्धा परमेश्वरी संकेत असावा लागतोच. महाराष्ट्राला संताची पुण्यभूमी समजले जाते ते ह्या संताच्या पवित्र कार्यामुळेच. संत हे द्रष्टे असतात ह्याची प्रचिती सुद्धा आपणाला आज येत आहे कारण आजची स्फोटक व दुर्दर परिस्थिती, आमचे कपटी आचार, विचार माणसांतील स्पृश्यास्पृश्य भेदभाव, आज आम्ही कुठल्या संस्कृतीला पोहोचलो आहोत आमच्यातील माणुसकी लोप पावत आहे. परंतु संतांची चरित्रे जर आम्ही पाहिली तर त्यान आजच्या पिढीला चांगल्या मार्गाला कसे न्यावे हेच सांगितले आहे. परोपकार, मानवाची कर्तव्ये, श्रद्धा, सबूरी, निष्काम कर्मयोग इ. वर सुंदर विवेचन आढळते— खरोखर आजच्या युगात मनशांतीसाठी संताची वागणूक आचरणात आणणेच इष्ट ठरेल.

समाधीस ज्याचे लागतील पायः- परंतु हे पाय लागण्यास सुद्धा भाग्य लागते. कर्म धर्म संयोगाने चांगली माणसे भेटतात आचार विचार एकत्र येऊन त्या स्थळांना भेटी दिल्या जातात. तेथील मनःशांतीचा आनंद उपभोगूनच तो आनंद दुसऱ्याना कसा लुटता

येईल ते आपणच पहातो. व एक प्रकारचे आमचे स्नेह वाढून आम्ही त्या समाधिशी लीन होतो. आमच्यातील मी तू पणाचे बंधन वादावादी अहंपणा इ. दूर होतो. आम्ही सर्व प्रकारचे साई बंधु भगिनी 'समाधीपाशी एकत्र येतो— आमचे विश्व एक कुटुंब बनते. मनशांती लाभते. धन्य त्या संतांच्या समाध्या.

शिर्डी येथील श्री साईबाबांची समाधीसुद्धा आज संपूर्ण मानव जातीस सांगते आहे. बाबांनो एक व्हा हिन्दू मुस्लीम ख्रिस्त, ईसाई तुम्ही सगळी माझी बालके अहात तुम्ही एक एक आपसात का झगडता? येथे कुणी कुणाचे नाही. नग्न आलो नग्न जावयाचे आहे. आपण संसाराची काळजी का करावी'' अल्ला सबका भला करेगा. पूजेतील फुलापेक्षा श्रद्धा-सबूरीचे निर्माल्यच मला हवे आहे. मला दिखाऊ वस्तू नको आहेत. धर्माने व नेकीने वागा ईश्वर तुमचे कल्याण करीलच. परंतु आज आम्हाला बाबांच्या वचनांची खरोखरच आवश्यकता आहे. समाधीस निव्वळ दर्शन देऊन आमचे कल्याण होणार नाही तर त्यांच्या आशिर्वादाने त्यांची शिकवण जर आम्ही थोड्या प्रमाणात जरी आचरणात आणली तरी आमच्या भाग्योदयाचे क्षितिज खूप लांब नाही. ते क्षितिज जवळ आणण्यास आमच्या साईचे आशिर्वाद आमच्या पाठीशी आहेत फक्त मनोधैर्य मात्र आम्ही ठेवले पाहिजे बाबांनी म्हटलेच आहे. माझ्या समाधीची जो पायरी चढेल दुःख हे हरेल सर्व त्याचे तेव्हा यंदाच्या वर्षी श्री साईनाथास एकच विनंती बाबा तूच क्षणकर्ता, बुद्धीदाता, पालन कर्ता आम्ही तुझ्या चरणाशी (समाधीशी) येतो व येऊ परंतु आमच्यातील विचारांचे जाळे तोडण्यास ह्या कलीयुगांतील फक्त तुझेच हात समर्थ आहेत. अन्यथा आम्ही कुठल्या थराला पोहोचू ह्याची कल्पना ह्या क्षणी तरी करता येत नाही.

# चित्तशुद्धी हाच आत्मानंद

— श्री. प्रमोद बी. रायसोनी
१६४, समर्थ नगर, औरंगाबाद.

चित्तशुद्ध असती तर शत्रु मित्र होती
व्याघ्रही न खाती सर्प तया ।।

खरोखर माणसाचे चित्त शुद्ध पाहिजे. जीवनात खरी साधना हीच होय. मनावर चांगले संस्कार करण्यासाठीच हा सर्व खटाटोप भक्ती, पूजा-तीर्थ, गुरु करणे हे सर्व चित्तशुद्धीसाठीच होय.

आता चित्तशुद्धी कशी करावी म्हणजे आपणास परमानंद मिळेल. ह्यासाठी आपण आपले योगीराज शिर्डीचे साईबाबा काय उपाय करत हे पाहू. बाबा नेहमी कुत्र्यास भाकरी टाकत, झाडांना पाणी घालीत, गोरगरीबांना अन्न देत, काहींना द्रव्यदान करत व

स्वतः नित्य नियमाने ५ घरातून भिक्षा मागत हा सर्व खटाटोप चित्त शुद्धीसाठी कलीयुगात दानाला अत्यंत महत्व आहे.

ज्याप्रमाणे पीठाच्या गिरणीत जाण्यापूर्वी आपण धान्याचे नीट दळण करतो. त्यातील घाण माती, गोटे काढतो त्याचप्रमाणे आपल्या मनाला जे अनेक जन्मापासून काही वाईट संस्कार आहे ते दान देऊन चित्तशुद्ध करून ते काढणे. चित्त शुद्धीमुळे मन स्वच्छ बनते, दानामुळे चित्तशुद्धी होते. एकदा मन शुद्ध पवित्र झाले की आपणास सर्व प्राणीमात्रात सर्वत्र प्रेमाचा पूर वहातो असे दिसते, मग शत्रु जे आपल्या मनातच असतात ते नष्ट होतात मनात एकच ध्वनी कंप पावतो. सोऽहम् सर्वत्र परमेश्वर दिसतो ह्यासाठी ह्या चित्तशुद्धीची साधना फार महत्वाची आहे. जीवन सफल होण्यासाठी जीवनात आत्मानंद येण्यासाठी चित्तशुद्ध हवे. थोडक्यात

**मन → दान → चित्तशुद्ध → आत्मानंद → साई → साक्षात्कार→**

# धाव धाव श्री साईनाथा

धाव धाव श्री साईनाथा समर्था
तुझविन नाही मज कोणी त्राता ।। धृ ।।
दमली वाचा थकली काया
काही दिसेना काही सुचेना
दाखव वाट ही मोक्षाची आता ।। १ ।।
तुझ्या कृपेने संसारी नच उणे
व्याधीने त्रस्त वाटे नको हे जिणे
तव दर्शनाची आस मज साईनाथा ।। २ ।।
या घरकुलात पुण्यवान सारी
साईमय ही सगळी झाली
भेटीसाठी या ऐकूनी हाक अनंता ।। ३ ।।
सकलांची करता बाबा दुःखे दूर
माझाच न पडावा तुम्हा तसाच विसर
आता सबुरी न उरली साई भगवंता ।। ४ ।।

**— सौ. रेखा भा. माहीमकर**
अमरज्योती को.हौ. सोसायटी,
बिल्डिंग नं. २२, फ्लॅट नं. १६, २ रा मजला,
चार बंगला, जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम),
मुंबई-४०० ०५८.

# शिरडीवृत्त

## माहे जानेवारी ८६

या महिन्यात श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

**कीर्तन** — १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई- कीर्तनकार प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.
२) ह.भ.प. विश्वनाथ महाराज सुराळेकर, तालुका- वैजापूर.
३) ह.भ.प. श्रीमती जानकीबाई इंगळे, गोरेगांव.

**प्रवचन** — ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**भजन, गायन, वादन, नृत्य इ.** — १) श्री. भोलानाथ समेळ, गिरगाव. २) श्री. नंदकुमार सारंगधर, गिरगाव. ३) श्री. रतनलाल शर्मा, धंतोली, नागपूर. ४) श्री. वासुदेव दयाळ, नागपूर. ५) सौ. दिप्ती दिनकर मातोंडकर, डोंबिवली. ६) सौ. मंजिरी मुतालिक, नौपाडा. ७) ह.भ.प. सदाशिव कृष्ण पुराणिक (रेडिओ स्टार) आळंदी. ८) श्री. विजयकुमार, सिकंदराबाद. ९) श्री वैभव कला दरबार, कोल्हापूरचे पुढील वीस कलाकार सर्वश्री सुभाष हिलगे. १०) श्री. प्रकाश हिलगे. ११) श्री. उदयराज पवार. १२) श्री. विजय दळवी. १३) श्री. अशोकराव उपाध्ये. १४) श्री. सुरेश मोरे. १५) श्री. बाबू पवार. १६) श्री. गुलाब देसाई. १७) श्री. धीरज वावारेकर. १८) श्री. मामा बेडेकर. १९) श्री. अशोक चव्हाण. २०) श्री. संभाजी. २१) श्री. बाळासाहेब शिंदे. २२) कु. आशू वराळे. २३) कु. लता पाटील. २४) कु. राजश्री शिंदे. २५) कु. कल्पना अंधारे. २६) कु. शुभांगी पेंडसे. २७) कु. अरुणा वाकरेकर. २८) श्रीमती माई वराळे. २९) श्री. किशोर दादाजी जाधव, चंद्रपूर. ३०) सौ. प्रमिला दत्तात्रय पैठणकर, नासिक. ३१) सौ. संगीता संजय धुरु, सोपारा निर्मळ. ३२) श्री. शिवराम बाबूराव बिडवे, संगमनेर. ३३) श्री. अरुण ओंकारदास सोमाणी, संगमनेर. ३४) श्री. पुंडलीक महाराज आळंदी. ३५) श्री साईकृपा भजन मंडळ, वडाळा. ३६) श्री गोपाळनारी भजन मंडळ, खार. ३७) श्री. विजय धोंडू साखरकर, गोरेगांव. ३८) डॉ. एस. के. खरवंडीकर, अहमदनगर. ३९) वेदशास्त्र संपन्न द.ग. पाठकशास्त्री, अहमदनगर. ४०) सुपर स्टार ऑर्केस्ट्रा मुंबईचे पुढील तीस कलाकार सर्वश्री मनोहर पांडूरंग वाळवे. ४१) श्री. एकनाथ मिराशी. ४२) श्री. समर्थ नारायण आयरे. ४३) श्री. सुधीर शिरवडकर. ४४) श्री. प्रकाश राणे. ४५) श्री. अरुण राणे. ४६) श्री. अरुण शिर्के. ४७) श्री. सूर्यकांत तिळवे. ४८) श्री. चंद्रकांत तिळवे. ४९) श्री. सिद्धार्थ पांचाळ. ५०) श्री. दिपक तांबे. ५१) श्री. तानाजी हडसे. ५२) कु. कलावती परब. ५३) श्री. अविनाश पेडणेकर. ५४) श्री. नारायण विठोबा आयरे. ५५) श्री. संजय आयरे. ५६) श्री. सुनील आयरे. ५७) श्री. सुरेश

आयरे. ५८) श्री. संजय नार्वेकर. ५९) श्री. सुदाम पांचाळ. ६०) श्री. सुनील ठाकूर. ६१) श्री. संजय मिराशी. ६२) श्री. दिलीप राणे. ६३) श्री. शंकर काशे. ६४) श्री. शालीग्राम शर्मा. ६५) श्री. रमेश मिराशी. ६६) श्री. रमेश कांबळी. ६७) श्री. अशोक झाड. ६८) श्री. अशोक परब. ६९) श्री. चंद्रकांत मिस्त्री. ७०) श्री. मनोहर विष्णू परब, मुंबई. ७१) श्री. सुरेश गणपत म्हात्रे, चेंबूर. ७२) श्री दत्तगुरु प्रासादीक भजनी मंडळ, जोगेश्वरी. ७३) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई. ७४) श्री साईधाम मित्र मंडळ, अविनाश तावडे, मुंबई. ७५) जादुगार एस. व्ही. कुमार, देवळाली, नासिक. ७६) सौ. जयश्री विजयलाल सिसोदे, नासिक रोड. ७७) सौ. वीना बन्सीलाल शिसोदे. ७८) श्री. आंबादास गोपाळ बेरे, दादर. ७९) श्री. भालचंद्र पाटील हिरगांवकर, संचालक, संगीता महाडीक तमाशा मंडळ, पुणे. ८०) श्री. आबासाहेब भैलूमे, कर्जत. ८१) श्री. बबन किसन समुद्रा, कर्जत. ८२) श्री. बाबा बळवंत भैलूमे. ८३) श्री. भाऊराव निवृत्ती भैलूमे. ८४) विशानक्षी अभिशंकर, बंगलोर. ८५) पांडूरंग भजनी मंडळ, रायलसीमा. ८६) ह.भ.प. बाबूराव नरोडे, रेडीओस्टार, कोपरगांव. ८७) श्री. बाळाराम कुलकर्णी, सावळी विहीर. ८८) श्री. हीरालाल उपाध्याय, सावळी विहीर. ८९) मालती कपिलेश्वरी, मुंबई. ९०) श्री साईनाथ भजनी मंडळ, परेल. ९१) श्री अवधूत प्रासादिक मंडळ, बोरीवली. ९२) श्री. शिवराम गोविंद घोगले, ताडदेव. ९३) श्री. एस. बी. शेरे, डोंबिवली. ९४) श्री साईनाथ गीतधारा भजनी मंडळ, ताडदेव. ९५) श्री. महादेव सन्याप्पा मुगळीकर, कोल्हापूर, ९६) श्री जंगबहादूर लोकगीत पार्टी, वाराणसी.

**प्रजासत्ताक दिन** — दि. २६ जानेवारी १९८६ रविवार रोजी सकाळी ७.३० वाजता संस्थानमध्ये माननीय कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्नेसाहेब यांचे शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. गावातील प्रतिष्ठित नागरिक, श्रींच्या दर्शनासाठी आलेले साईभक्त, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी-विद्यार्थीनी, संस्थान कर्मचारी, सेवेकरी, बॅण्डपथक, होमगार्डस्, पोलीस उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थितांना चहापान दिल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

**बक्षीस समारंभ** — सन १९८५ सालाकरिता- उत्कृष्ट स्वच्छता कामगारासाठी ठेवलेले सौ. सुशीलाबाई शंकरराव गोडखिंडी पारितोषिक (चांदीचे पदक) श्रीमती चाँदबी शेख पठाण, कायम स्वच्छता कामगार. श्री साईबाबा संस्थान शिरडी याना देण्यात आले. तसेच सन १९८५ सालाकरिता श्री साईनाथ रुग्णालयातील उत्कृष्ट कामगारांसाठी ठेवलेले श्री. अशोक शंकरराव गोडखिंडी पारितोषके (चांदीचे पथक) श्री. माधव मुरलीधर घारे, कायम वॉर्ड बॉय, साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा संस्थान शिरडी याना देण्यात आले.

**हवापाणी** — शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवेत गारवा असतो.

# मार्च १९८६

या महिन्यात साईभक्तांची दर्शनासाठी गर्दी मोठ्या प्रमाणात होती काही कलाकारांनी श्रीच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तनः-** १) ह.भ.प. श्री. मधुकर सूर्यवंशी, संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे शिर्डी

३) ह.भ.प. लक्ष्मण आनंदा मिरजकर, सांगली.

**प्रवचनः-** १) ह.भ.प. विश्वनाथ बंडू सहाने. सुराळे वैजापूर

२) ह.भ.प. रघुनाथ विठोबा व्हले व्हलेवाडी, राजगुरुनगर

**भजन, गायन, वादन इ.:-** १) श्री. बी. सत्यनारायण, शिकंदराबाद. २) श्री. भालचंद्र सस्वरुपे, रायसेन. ३) सौ. अंजनी निवृत्ती जाधव, आळे. ४) श्री. गोकुळ घोडके, राहता. ५) श्री. रतनकुमार काशीकर, पुणे. ६) श्री. नंदकुमार भाडवलकर, पुणे. ७) श्री. गंगाधर जाधव, पुणे. ८) श्री. नंदकुमार दत्तसेवक, पुणे. ९) श्री. पी.यु. पिल्ले, डॉ. नागेश्वरराव, विजयवाडा. १०) कुमार सुहास वैद्य, नासिक. ११) श्री. नंदकुमार सामंत, बोरीवली. १२) श्री. अरविंद हंबर्डे, बोरीवली. १३) सौ. शोभना म. आवळे, विलेपार्ले. १४) श्री. रतनलाल शर्मा, नागपूर. १५) श्री. शिवाजी दत्तात्रय बोडके, माण. १६) श्री. आर.ए. राऊत, बोरीवली. १७) श्री. महादेव अनंतराव किर्लोस्कर, कोल्हापूर. १८) श्री. भिकाजी मात्रळेराम गरगुळे, राजुरी. १९) श्रीमती उषा खचाळ, मुंबई. २०) श्रीमती मोसमी चक्रवर्ती, पुणे. २१) श्री. रामा चक्रवर्ती, पुणे. २२) सौ. प्रतिभा देऊसकर, ठाणे. २३) श्री. कृष्णा गावस, गोरेगाव. २४) पंडीत संगीतरत्न, नन्हेबाबू कुँवर, बिदर. २५) श्री. बी.एस्. शंभरकर, डोंबिवली. २६) कु. आशा, बिदर.

**हवापाणीः-** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# एप्रिल १९८६

# रामनवमी उत्सव कार्यक्रम

या महिन्यात साईभक्तांची श्री साईबाबांच्या दर्शनासाठी बरीच गर्दी होती. श्री सच्चिदानंद साईनाथ महाराज शिरडी श्री रामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे गुरूवार दि. १७।४।८६ ते शनिवार दि. १९।४।८६ पर्यंत ३ दिवस साजरा झाला. दिवसेंदिवस श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढते त्यामुळे उत्सवात कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानने एक महिना अगोदर पासूनच तयारी ठेवली होती. त्यामुळे योजलेले सर्व कार्यक्रम व्यवस्थीत पार पडले.

**उत्सवाचा प्रारंभ दिन- गुरूवार दि. १७.४.८६—** रोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ६ वाजता श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरूस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर झाल्यावर श्री साई सच्चरीत अध्याय वाचनास सुरुवात झाली. दुपारी ४.३० ते ६.३० पर्यंत ह.भ.प. श्री. मनू महाराज, कोकलेगावकर, नांदेड यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्रौ ७.३० ते ९.०० व ११.०० ते पुढे श्री. जयवंत कुलकर्णी, पार्श्वगायक, सिने-गायक मुंबई यांचा गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९.१५ ते ११.०० श्रींचे पालखीची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली स्थानिक लोकांनीच व भक्त मंडळींनी गारूड भारूड कार्यक्रम केले. श्री. रघुनाथ सांडभोर, सिने-कलाकार पुणे यांचा भारूड कार्यक्रम झाला. त्यानंतर वाद्यांचे गजरात श्रींची पालखी मिरवणूक समाधी मंदिरात आली. शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस दिवसः- शुक्रवार दि. १८.४.८६** रोजी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनास भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ६ वाजता श्रींच्या फोटोची व श्री साईसच्चरीत ग्रंथ वाचन समाप्तीची मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर गावातून कावडी मिरवणूकीचा मोठा कार्यक्रम झाला. शिरडीतील भाविक मंडळी व साईभक्त आदले दिवशी रात्री कोपरगावमुक्कामी जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन नऊ मैल पायी चालत आले. सकाळी ६.३० वाजता संस्थान विश्वस्तांनी पूजा केल्यावर अंदाजे बाराशे ते तेराशे कावडींची मिरवणूक वाजत गाजत गावातून निघाली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यानंतर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर कावडी आणणाऱ्या प्रत्येकाने बाबांच्या समाधीस स्नान घातले.

सकाळी १०.३० ते १२.३० पर्यंत ह.भ.प. मनू महाराज कोकलेगावकर, नांदेड यांचे रामजन्म कीर्तन झाले. सायंकाळी ४ वाजता श्रींच्या निशाणांची व ४.४५ वा. श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक आल्यावर धुपारती झाली. रात्रौ १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवले होते.

**उत्सवाचा सांगता दिन- शनिवार दि. १९.४.८६** नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त ह.भ.प. मनू महाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे गोपाळकाला कीर्तन १०.३० वा. सुरू झाले. दहीहंडी व मध्यान्ह आरती झाल्यानंतर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७.३० ते १० श्री. के. राजकुमार केतकर, नटराज नृत्य निकेतन ठाणे यांचा नृत्य कार्यक्रम झाला. रात्रौ १० वा. शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**हवापाणी-** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे —

**कीर्तन-** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. १) ह.भ.प. श्री. मनू महाराज कोकलेगांवकर, नांदेड ३) ह.भ.प. विश्वनाथ बंडू सहाने सुराळे (वैजापूर)

**प्रवचन —** ह.भ.प. विश्वनाथ बंडू सहाने सुराळे.

**भजन, गायन, वादन, नृत्य इ. —** १) पंडीत नन्हे बाबू कुंवर संगीत रत्न, बिदर. २) श्री. बी.एस. शंभरकर डोंबिवली. ३) कु. आशा बिदर. ४) श्रीमती नटेश्वरी गुप्ता हैद्राबाद. ५) श्री साईबाबा भजनी मंडळ शिर्डी. ६) श्री. डॉ. कोमल मुजुमदार जमशेदपूर ७) श्री अनंत महाजनी ग्वाल्हेर ८) श्री. रमाकांत जोशी. नांदेड. ९) श्री. कचरूलाल तरटे नांदेड १०) श्री अनिल पंढरीनाथ उत्तरवाल नांदेड ११) श्री श्रीराम सातर्डेकर परेल. १२) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. १३) श्री. अशोक बाळकृष्ण कदम ठाणे १४) श्री. मनोहर बाळकृष्ण कदम १५) श्री. प्रसाद कुलकर्णी कल्याण १६) श्री. जी.मल्हेरा, पुणे १७) श्रीकला हटंगडी, मुंबई. १८) श्री. अरविंद म्हात्रे. १९) सौ. सरला म्हात्रे. २०) मंजूळा हटंगडी. २१) सरीता कोडकनी. २२) रतना, मुंबई. २३) श्री. राम दत्तात्रय दैठणकर, पुणे. २४) श्री. सखाराम राधूजी गुरव, कोपरगाव. २५) श्री. कृष्णा यादव मरके, अहमदनगर. २६) श्री. गोपाळ पाराशर, मुंबई. २७) श्री. दिनेश शंकर आमले, वडाळा. २८) श्री. सुधीर संभाजी सावंत, परळ. २९) श्री. शशीकांत दत्तात्रय चिंचोरे, राहता.. ३०) श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, पुणे. ३१) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. ३२) श्री. अनंत राणे, वांद्रा. ३३) सौ. स्नेहलता भाटे, शिर्डी. ३४) सौ. कमलाबाई देशपांडे, शिर्डी. ३५) श्रीमती लिलावती गुजराथी, शिर्डी. ३६) श्री. हरकचंद चंद्रभान रूनवाल, आलेगाव. ३७) श्री. चंद्रसेन साळगावकर, विलेपार्ले. ३८) सौ. सविता सुरेश गिजरे, पुणे. ३९) शेखर नटवरलाल विसपुते, शिर्डी. ४०) भरत नटवरलाल विसपुते ४१) श्री. शाहू भोसले, भायखळा. ४२) श्री. दौलत शर्मा, मुंबई. ४३) श्री. छब्बू शंकर कदमल सिन्नर ४४) संजय केशव पराडकर, दादर. ४५) श्री. नितीन डिस्कळकर, दादर. ४६) नितीन कोरगावकर, भांडूप. ४७) श्री. कचरू तरटे, नांदेड. ४८) श्री. रमाकांत जोशी, नांदेड. ४९) श्री. अनिल उत्तरवार, नांदेड. ५०) श्री. अनिल परभनवण, नांदेड. ५१) श्री विश्वास पंडीत जोशी, राजगुरूनगर. ५२) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती. ५३) अन्नपुर्णादेवी, शिर्डी. ५४) कुमार कुलकर्णी, पाथर्डी. ५५) श्री. शांताराम मिराणे, शिर्डी. ५६) श्री. विद्युत विबूराज नाईक, मुंबई. ५७) निर्मला नायडू, शिर्डी. ५८) श्री. अशोक चिंतामण राऊत, मुंबई. ५९) के. नागविरथा, हैदराबाद. ६०) श्री. सिद्धेश्वर पीसे, बार्शी. ६१) श्री. डी.जी. करडोले, वैजापूर. ६२) श्री. बी.एम. कुलकर्णी, वैजापूर. ६३) श्री. ललीतकुमार जोशी, शिर्डी. ६४) श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र वैद्य, शिर्डी. ६५) श्री. वाल्मिक कचरू शेलार, वैजापूर. ६६) श्री. मधुसुदन औटी, गणेशनगर. ६७) वामन टाकसाळी, पुणतांबा. ६८) श्री. रघुनाथ सोनवणे, पुणतांबे. ६९) श्री. दिगंबर उद्‌वराव भातोडे, राहता. ७०) श्री. शशीकांत दत्तात्रय नांगरे, राहता. ७१) श्री. रामदास भाऊसाहेब फाकटकर, नारायणगाव. ७२) श्री. शंकर गणपतराव शेळके, कोल्हापूर. ७३) अनिता खेडकर, संगमनेर. ७४) अलका खेडकर, संगमनेर. ७५) मधुकर पुंडलीक सकट, गांगलगाव. ७६) श्री. शहाजी

थोरात, सांगली. ७७) श्री. चैत्राम कोंडीबा लाखे, शिरवळ. ७८) श्री. पुंजाबा दवंगे, शिर्डी. ७९) सौ. भारती ईश्वरलाल मेहता, सांताक्रूझ. ८०) श्री. विष्णू दयाळ रवीदास, उन्नाव. ८१) श्री. गुंडोपंत आबा मेमान, कोल्हापूर. ८२) श्री. भिकन वसंतराव पवार, शिर्डी. ८३) श्री. शेख नबाब उमरपटेल, अस्तगाव. ८४) श्री. साहेबराव रामचंद्र देवकुडे, सायगाव. ८५) श्री. ज्ञानोबा तात्या वाडेकर, शिर्डी. ८६) श्री. पी.डी. जाधव, मुंबई. ८७) श्री. गजानन मित्रमंडळ, पुणे. ८८) श्री. मधुकर उपासनी, कान्हेगाव. ८९) श्री. वसंत दामोदर रासने, पुणे. ९०) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. ९१) श्री. चतुर्धन नागरे, शिर्डी. ९१) श्री. शांताराम मिराणे, शिर्डी. ९३) श्री. माणिक साळी, शिर्डी. ९४) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिर्डी. ९५) श्री. बारावकर काका, शिर्डी. ९६) श्री. के. राजकुमार केतकर, ठाणे. ९७) श्री. किशोर तेलवणे. ९८) श्री. सुरेश करमरकर. ९९) सौ. निर्मला धारवाडकर. १००) श्री. जनार्दन मयेकर. १०१) श्री. यशवंत मोरे. १०२) श्री. राजेंद्र भोसले. १०३) कु. राजश्री करमरकर. १०४) श्री. विनायक केतकर. १०५) श्रीमती इंदिरा. १०६) श्री. सतीश नागेशराव, मुंबई. १०७) श्री. शशीकांत दळवी. १०८) श्री. बारकूशेठ मांडवकर. १०९) श्री. सुरेश अंजर्लेकर. ११०) श्री. वसंत जोशी. १११) श्री. विलास पावसकर. ११२) श्री. यशवंत नाईक. ११३) श्री. अरविंद पवार. ११४) श्री. मारुती मांजरेकर. ११५) श्री. चंद्रकांत विनेरकर. ११६) श्री. नारायण कदम. ११७) श्री. सुधाकर शिंत्रे. ११८) श्री. आत्माराम बंगाल. ११९) श्री. एकनाथ बंगाल. १२०) श्री. अनंत बंगाल. १२१) श्री. शरद गायकवाड. १२२) श्री. सुभाष कांबळी. १२३) श्री. बबलू मिस्त्रा. १२४) श्री. अरुण उबाळे. १२५) श्री. रमेश घाडीगावकर. १२६) श्री. रविंद्र परब. १२७) श्री. शशीकांत जाधव. १२८) श्री. मोहन बोलांडे. १२९) श्री. अजय गिरोडकर. १३०) श्री. दशरथ पवार. १३१) श्री. नागेश कंठक. १३२) श्री. अशोक कानडे. १३३) श्री. अरविंद जामखंडेकर. १३४) श्री. किशोर कदम. १३५) श्री. अनिल चव्हाण. १३६) श्री. शशांक तावडे. १३७) श्री. बाळाराम मोगरे. १३८) श्री. सुनील साळवी. १३९) श्री. नरेश नाईक. १४०) श्री. रमेश भाईसाहेब, १४१) श्री. सुकदेव नांदवीकर. १४२) श्री. रविंद्र कुलकर्णी. १४३) श्री. नंदकुमार चव्हाण. १४४) श्री. राजू शिर्के. १४५) श्री. मिलींद कांबळी. १४६) श्री. अनिल पुराणिक. १४७) श्री. अरुण चव्हाण. १४८) श्री. चंद्रकांत फाळके. १४९) श्री. कृष्णा पाटणकर. १५०) श्री. विलास परळकर. १५१) श्री. अविनाश सी. कुत्तरकर. १५२) सौ. अलका द. पवार. १५३) श्री. विलास महाडीक. १५४) श्री. एस.एस. वाघ, साकरवाडी. १५५) श्री. पी.आर. यादव, लक्ष्मीवाडी. १५६) श्री. एच.ए. पटेल. १५७) सौ. एम.एच. पटेल. १५८) श्री. आंबोडकर. १५९) कॅप्टन गोपाल शेट्टी. १६०) राजेश पळसकर. १६१) उमेश पावसकर. १६२) कै. तुकाराम खेडकर लोकनाट्यमंडळ, नारायणगाव. १६३) मूनीभाई. १६४) विजय डेकोरेटर्स. १६५) विष्णू महादेव राऊत. १६६) श्री. के.टी. टिकू, मुंबई. १६७) विवेक मुळे.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलांमृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | ——— | ——— |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH BYE 26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|
| १. आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. —"— | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. —"— | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. —"— | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. —"— | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. —"— | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. —"— | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½ × ५½ | ०-६० | ३-५० |
| ११. द्वारका माई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. —"— | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. —"— | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. —"— | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. —"— | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. —"— | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. मूर्ती फोटो (बस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

श्री. रा. द. बन्ने, संपादक यांनी श्री साईबाबा संस्थान, साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४, यांचे करिता गिता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ येथे छापून प्रकाशित केले.